
म. ग्रं सं. ठाणें.
विषय निबंध .....
सं. क्र. ३४६


REFBK-0026594

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, त्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे भरावी लागले.

JL 1992

AUG 1992

AUG 1992

1992

UG 1996

19/ec

16 SEP 1992

23 [illegible] 1992

3 OCT 1992

31 OCT 1992

25 NOV 1992


16 DEC 1992

21 AUG 1994

(क्र. मा. पहा.)
१००००–११–८९

मी तरुणी

छाया दातार


REFBK-0026594

ग्रंथाली
अभिनव वाचक चळवळ

प्रकाशक
दिनकर गांगल, चिटणीस,
ग्रंथाली वाचक चळवळ,
३४/९०२ नेहरूनगर,
कुर्ला, मुंबई ४०००२४

मुद्रक
चिं. स. लाटकर,
कल्पना मुद्रणालय,
४६१/४, 'शिवपार्वती',
पुणे ४११०३०

© अशोक दातार

प्रकाशन क्रमांक ४२

पहिली आवृत्ती
अभिनव प्रकाशन
जानेवारी १९७९

दुसरी आवृत्ती
जानेवारी १९८५

मुखपृष्ठ : जुई सेठ

मूल्य २५ रुपये

डोळस निरीक्षणासाठी
मला सातत्याने मदत करणारा
माझा मित्र-सहचर-अशोक यास—

प्रस्तावना

'मी तरुणी' या पुस्तकाला प्रस्तावना लिहावी अशी जेव्हा छाया दातार यांनी इच्छा प्रकट केली तेव्हा मी जरा बिचकलेच. एखाद्या नव्या दमाच्या विचारी तरुण बाईची प्रस्तावना घेणे त्यांच्या पुस्तकाच्या दृष्टीने अधिक योग्य होईल असे मला वाटले व मी तसे त्यांना सुचविलेही.

श्रीमती दातार या नवविचारांच्या एक बंडखोर लेखिका म्हणून प्रसिद्ध आहेत. तेव्हा त्यांचे नव्या पिढीचे बंडखोर विचार माझ्या सारख्या वयातील बाईला कितपत पेलतील याची मला जबरदस्त शंका होती. पण त्या बरोबरच 'मी–तरुणी' या बऱ्याचशा कुतूहलजनक शीर्षकाखाली सध्याच्या तरुणीच्या मनात काय चालते, आमच्या पिढीपेक्षा त्यांचे विचारविश्व किती बदललेले आहे हे जाणून घेण्याची इच्छाही तितकीच तीव्र होती. त्यांनी आग्रह करताच मी प्रस्तावना लिहिण्याचे कबूल केले. म्हणून हे चार शब्द, एवढेच प्रस्तावनेचे स्वरूप.

त्यांचे सारे लेख वाचल्यावर काही लेख वस्तुस्थितीवर विदारक प्रकाश पाडणारे असल्याचे मला पूर्ण पटले. काहींबद्दल शंका उद्‌भवल्या. तरीही 'मी–तरुणी' या लेखमालेद्वारा त्यांनी सध्याच्या तरुण पिढीसमोर जे विचार मांडले आहेत ते वाचून मला फार आनंद झाला असे मी निःसंकोचपणे म्हणू शकते. कारण आम्ही बहुसंख्य सुशिक्षित स्त्रिया शिकलो, तरीही आमच्यावरची जबाबदारी कधी ओळखली नाही असे मला नेहमी वाटत आले आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी व जरा आधी समाज-सुधारकांनी निश्चेष्ट पडलेल्या भारतीय स्त्रीला चालती-बोलती करून स्वतःच्या पायावर उभे राहाता यावे, शिक्षणाने तिला आत्मविश्वास यावा, या करता जेवढे कळकळीचे

प्रयत्न केले, त्याच्या शतांशसुद्धा आम्ही सुशिक्षित म्हणवणाऱ्या स्त्रियांनी केले नाहीत. बहुजन समाजातील स्त्रीवर्गाची स्थिती सुधारण्याकरिता आम्ही प्रयत्न तर करीत नाहीच, उलट सवता सुभा करून बहुजन-स्त्रियांपेक्षा चार हात दूरच राहतो. आमच्या हस्तिदंती मनोऱ्यात रममाण होऊन समाजाचे चक्क दोन विभाग पडण्यास कारणीभूत होतो. छाया दातार यांची वृत्ती अशी नसून समाजपरिवर्तन करून पाहण्याचा आगरकरादी जुन्या सुधारकांचा वारसा त्यांनी उचललेला आहे. सर्वसाधारण सुशिक्षित स्त्रियांची नेहमीची कृतिशून्यता किंवा स्वतःपुरताच विचार करण्याची प्रथा मोडून भारतीय स्त्री, जी अजूनही नाममात्रच स्वतंत्र आहे. ती खरीखुरी स्वतंत्र व्हावी, आत्मविश्वास निर्भर व्हावी या करता त्यांनी (कदाचित हे म्हणणे त्यांना आवडणार नाही.) वस्तुस्थितीवर कठोर प्रकाश पाडणारी जी ही लेखमाला लिहिली त्याबद्दल मला त्यांचे अभिनंदन करावेसे वाटते.

'मी–तरुणी' हे पुस्तक 'मनोहर'मध्ये १९७५ साली छायाने लिहिलेल्या ३५–३७ लेखांचे संकलन आहे. ते लिहिणारी लेखिका शरीराने तर तरुण आहेच पण मनानेही तरुण विचाराने पेटून निघालेली एक तरुणी आहे. त्या प्रज्वलित नजरेने ती एकंदर स्त्रीजीवन, विशेषतः भारतीय स्त्रीचे जीवन आपल्या कुवतीप्रमाणे न्याहाळते आहे. ते न्याहाळताना जरूर तेथे परंपरेचे, संस्कृतीचे, गुलामीचे सारे बंधही ती तोडू पाहाते आहे. साऱ्या समाजात सर्वंकष परिवर्तन–क्रांती ती करू इच्छिते, कारण अशी क्रांती झाली तरच स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान नाहीसे होऊन ती खरीखुरी स्वतंत्र होईल असा तिला भरवसा वाटतो. त्या करता मागेपुढे, चहूकडे, दूरवर ती आपली प्रज्वलित नजर टाकते. जेथे काही आशास्थाने दिसतात तिथे ती काहीशी स्थिरावते व त्यांचा आदर्श पुढे धरते. काहीसे या प्रकारचे या लेखमालेचे स्वरूप आहे. लेखिकेला प्रेरणा देणारी वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे. गेल्या दहा वर्षांत युवक-युवतींच्या मनात व वृत्तीत खूपच परिवर्तन झाले आहे. वातावरण झपाट्याने बदलते आहे.

राजकारणात विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा की नाही या चर्चाही बंद होऊन बाहेर आंदोलनाचे वणवे पेटत आहेत. कॉलेज युवकांप्रमाणे सध्याची कॉलेज युवती भोवतालच्या साऱ्या दडपणामुळे असंतोषाने पेटून निघाली आहे. त्याविरुद्ध चालणाऱ्या आंदोलनाच्या वेगवान प्रवाहात उत्स्फूर्तपणे उतरली आहे. पण तिच्या सहाध्यायी तरुणांपेक्षा तिचे प्रश्न निराळे आहेत, असे तिला आढळते. तरुणांच्या बरोबरीने शिक्षण घेऊन प्रगल्भ होऊ पाहणाऱ्या तरुणीला प्रश्न पडतोय, माझ्या जीवनाचा अर्थ काय ? माझे श्रेयस काय ? लग्न होण्याआधी व लग्न झाल्यानंतरही या प्रश्नाचा सल घेऊनच ती आयुष्य जगत असते. आपले शरीर हे केवळ एका स्त्रीचे शरीर न राहता एक संपन्न व्यक्तिमत्व, एक स्वयंभू अस्तित्व म्हणून डौलाने उभे राहावे यासाठी तिचा आकांत चालू आहे.

या करिता उत्तरे शोधणाऱ्या तरुणीचा शोध घेत असता गौरी देशपांडेचे एक उत्तर लेखिकेने उद्धृत केले आहे. 'पुरुषावर प्रेम करायचे पण त्याचा आधार घ्यावयाचा नाही. आतापावेतो सदैव चालत आलेला पुरुषांचा संदर्भबिंदू तोडायचा व स्वतंत्रपणे स्त्री म्हणून जगण्याचा प्रयत्न करायचा.' हे गौरीने शोधलेले उत्तर नवे की जुने? पूर्वीही काहींनी हेच उत्तर शोधून प्रत्यक्षात अवलंबिले होते की काय? किंवा छाया दातार यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे ते केवळ एका व्यक्तीचे आपल्यापुरते त्यावेळी शोधलेले उत्तर आहे? याचा शोध घेण्यापूर्वी एक प्रश्न आधीच उभा राहून सतावतो, तो म्हणजे सध्या असंतोषाने पेटून स्वतःचे श्रेयस शोधणाऱ्या अशा संतप्त तरुणी बऱ्याच आहेत का? आणि असल्याच, तर पोटात वडवानल बागविणाऱ्या; पण वरवर लाटा कल्लोळांनी नाचणारा दाखविणाऱ्या समुद्राप्रमाणे त्यांचे बाह्य वरवरचे स्वरूप आंतरिक स्वरूपापेक्षा इतके वेगळे आहे का? या मुंबई-पुण्यासारख्या शहरातच १९२१ सालच्या 'शाळा कॉलेज छोड दो' या असहकारितेच्या चळवळीपासून १९४२ च्या 'चले जाव परकीय सरकार' या उठावापर्यंत ज्या तरुणी दिसत त्यापेक्षा आताच्या बहुसंख्य तरुणी वेगळ्या का दिसतात? त्यांच्या गप्पा, इत्यादी वेगळ्या का असतात? 'आंतरिक सत्याच्या' गोष्टी करण्याऐवजी गीतेच्या नित्य पठणाप्रमाणे ,फेमिना, फिल्मफेअर, आदी मासिकांचे, साप्ताहिकांचे वाचन, पठण, मनन व त्यानुसार बदलणाऱ्या फॅशन्सचे वर्तन करणाऱ्या युवती पूर्वीपेक्षा बहुसंख्य प्रमाणात का दिसतात? का हा निव्वळ भ्रम आहे? त्यांच्या आपापसातील गप्पा, नवा सिनेमा, नटनटी, त्यांचे पोशाख, तरुण प्राध्यापक, वर्गातील तरुण सहाध्यायी, याबद्दलचे हलके फुलके–काहीसे वात्रट संवाद, एवढेच का ऐकू येते? वरवर फुलपाखरांचे जीवन जगणाऱ्या पण अंतर्यामी सल बाळगणाऱ्या जीवनाच्या श्रेयसाचा, खरोखरी शोध घेणाऱ्या या तरुणी आहेत का? की आकांत करणाऱ्या बिचारी तरुणी बोटावर मोजण्याइतक्या असून बहुसंख्य तरुणी त्याबाबत उदासीन आहेत? खुद्द छाया दातारांनाही हा प्रश्न पडला असावा असे त्यांच्या 'आँधी' सिनेमातील संघर्षबिंदू विशद करणाऱ्या लेखावरून दिसते. या असंतोषाच्या बाबतीत एका कॉलेजच्या नामवंत तरुण प्राचार्याने दिलेले उत्तर मला येथे आठवते. मी त्याला विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या आंदोलनाविषयी, असंतोषाविषयी विचारीत होते. 'तुम्ही म्हणता त्याप्रमाणे या आंदोलनामागे जीवनातील अगतिकता, त्याने येणारी निराशा काही नसून घरची चांगली गर्भश्रीमंत, एवढेच नव्हे तर कॉलेजातील विद्याभ्यासावर ज्यांचे जीवन बिलकुल अवलंबून नाही अशी मुले-मुली थोडेसे निमित्त करून अशा आंदोलनाचा उठाव करतात. निरनिराळे राजकीय पक्ष त्यांचा फायदा घेऊन त्याला तत्वप्रणाली चिकटवतात व हुल्लड आणि एकंदर असंतोष माजवायला मदत करतात. या पलीकडे त्याला अर्थ नाही. गुजराथचेच उदाहरण घ्या–' असे म्हणून त्यांच्या मते गुजराथ

येथील विद्यार्थ्यांच्या असंतोषाचे कारण व स्वरूप त्यांनी मला स्पष्ट करून सांगितले. मला त्यांचे म्हणणे तितकेसे पटले नाही. ते खरे नाही असे मी धरून चालते. त्याचप्रमाणे छाया दातारांचे सध्याच्या युवतीविषयीचे विधान मी जे काय पाहाते, अनुभवते त्यावरून मला काहीसे अवास्तव वाटते. आजच्या तरुणी असंतोषाने अशा पेटून उठल्या असत्या तर वधू विवाहाच्या वेळी बापाला द्यावा लागणारा हुंडा पाहून, माझ्या लग्नाचे मी पाहीन, तुम्ही पाहू नका असे म्हणून त्यांनी बंड तरी केले असते, किंवा आत्महत्त्या तरी केली असती. त्या असंतोषाने पेटून उठलेल्या नसतात. वडिलांनी चांगले स्थळ पाहून द्यावे अशी त्यांची सुप्त इच्छा असते. वर संशोधन करीत असता होणारी हुंड्याची बोलणी त्यांच्या कानावर येत नाहीत हे मला खरे वाटत नाही. पण या युवतींना स्वतः कोणतीच जबाबदारी घ्यावयाला नको असते. पेढा खाऊन टाकायचा आणि त्याचवेळी ठेवूही पाहायचा अशी त्यांची वृत्ती असते. हुंड्याच्या बाबतीत वधू व वर वरून दाखवितात तितके खंबीर असतील, त्या चालीवद्दल जर त्यांना खरोखरीच घृणा असेल तर हुंड्याची प्रथा मोडायला वेळ लागणार नाही. पण त्यांचाच सारा कारभार दबलेला, नमता असतो. 'लग्न झाले नाही तरी चालेल पण हुंडा देऊ देणार नाही, माझ्या पायावर मी उभी राहीन. जीवनाला सामोरी जाऊन माझी जबाबदारी घेईन' अशी कणखर वृत्ती ही असंतोषाने पेटलेली युवक-युवती कधीच दाखवीत नाहीत. म्हणूनच 'हुंडा नावाचा कुत्रा गुरगुरत रहातो.' मुलीचे किंवा मुलाचे लग्न आपण पुढाकार घेऊन करून दिले पाहिजे; ते आपले कर्तव्य आहे, या परंपरागत वाडवडिलात भिनलेल्या वृत्तीला तरुण पिढीच्या कृतिशून्यतेने खतपाणी मिळते. अविवाहित राहून जरठ कुमारी होण्याची अलीकडील तरुणींना भलतीच भीती वाटते. आमच्या काळच्या तरुण मुली पुढे अविवाहित राहिल्या नाहीत, तरी तरुणपणी कितीतरी जणी अविवाहित राहून समाजसेवेची स्वप्ने पहात नाना बेत रचीत. समाजसेवेचे इतके वारे त्या काळच्या हवेत भिरभिरत होते. त्यावेळी लैंगिक भुकेचे एवढे बंड माजले नव्हते. शिकणाऱ्या युवतींची संख्या थोडी होती. शिक्षणाने येणाऱ्या जबाबदारीची जाणीव, सेवेची जाणीव जास्त प्रमाणात होती. डॉ. काशीबाई नवरंगे, डॉ. नागूताई जोशी, कुमारी कृष्णाबाई तुळसकर, मथुराबाई उजगावकर, डॉ. जिराड, सेवासदनाच्या मिस इंजिनीअर, डॉ. रुक्माबाई, इत्यादी कितीतरी चांगल्या सुशिक्षित स्त्रियांची चित्रे त्यांच्यापुढे आदर्श म्हणून धरली जात. या सर्व स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असून एक डॉ. नागूताई सोडल्या तर अखेरपर्यंत आपापल्या कुवतीप्रमाणे समाजसेवा करीत होत्या. या स्त्रियांचा व त्यांच्यामागील डॉ. आनंदीबाई जोशी, पंडिता रमाबाई या स्त्रियांच्या पिढीचा काळच वेगळा होता. आपल्या सामाजिक चालीरीतींचे, रूढींचे, आतापेक्षाही तेव्हा जोरात मंथन सुरू होते. सामाजिक अन्यायाने पेटून निघालेल्या आगर-

कर, फुल्यांसारख्या समाजसुधारकांची प्रज्वलित लेखणी जुन्या अन्याय्य रूढी, चाली-रीतींवर सपासप कोरडे ओढून समाजाला विचार करायला लावीत होती. त्या दोन पिढ्या व नंतरची पिढीही समाज सुधारणा व स्त्रियांच्या परवशतेच्या चळवळीबाबत उदासीन नव्हत्या. शिकू लागलेल्या सर्वच स्त्रियांमध्ये आपण शिकलो म्हणजे आपल्याला शिकायला मिळाले ते ऋण बहुजन स्त्रियांना शिकवून, समाजसेवा करून फेडावे ही जाणीव बरीच जागृत होती. म्हणूनच अविवाहित राहून समाजसेवेचे वेत रचताना, त्यांची स्वप्ने पाहाताना त्यात काही अस्वाभाविक आहे असे त्यांना वाटत नव्हते. घरी आजी, मावशी, आत्या, कधी कधी वडील बहीण विधवा होऊन सन्यस्त आयुष्य घालविताना त्या रोजच पाहात. त्यामुळे त्यात काही कठिण असू शकेल ही कल्पनाही त्यांच्या मनाला शिवत नव्हती. या सर्वजणी पुढच्या आयुष्यात अविवाहित राहिल्या नसल्या तरी त्यापैकी कित्येक तरुणींनी अविवाहित राहून समाजसेवा करायचे वेत रचले होते. पण गेल्या काही वर्षात असे बोलणाऱ्या ध्येयवेड्या तरुणींची वेड्यात जमा होईल, इतकी लैंगिक भुकेची धास्ती तरुणींत येऊ लागली आहे असे दिसते.

या काळातच संमती वयाचा कायदा, घटस्फोटाचा कायदा, विधवा विवाहाचा कायदा, मिश्र विवाह कायदा हे सारे सामाजिक कायदे पास झाले. ते पास केले ब्रिटिश सरकारने कारण शासन त्यांचे होते. पण ते होण्यास लागणारा लोकमताचा दबाव व उठाव समाजसुधारकांनी केला होता. त्यात त्या काळच्या सुशिक्षित स्त्रियांची संख्या थोडी असली तरी त्यांचा भलाभक्कम, सक्रिय पाठिंबा होता.

हे सर्व उल्लेखण्याचे कारण एवढेच की १९२१ नंतर महात्माजींनी सुरू केलेल्या स्वातंत्र्याच्या मोठ्या लढ्यात स्त्रियांनी उडी घेतल्यावर केवळ स्त्री-स्वातंत्र्याचा लढा व विचार या मोठ्या लढ्यापुढे एकदम मागे पडला. स्वातंत्र्याच्या लढ्यातच पुरुषांबरोबर स्त्रिया–मुलीही निर्भयपणे सहभागी होऊ लागल्या–आपोआप पुढे जाऊ लागल्या. १९२१ ते १९४२ चा काळ ज्यांनी प्रत्यक्ष पाहिला, अनुभविला त्यांना व्हिएतनामी स्त्रियांची चांगलीच कल्पना येऊ शकते. घराचे, मायेचे सारे बंध तोडून मानवतेच्या भरात स्त्रिया काम करू शकतात, याचीसुद्धा साक्ष पटते. व्हिएतनामी लढ्यात प्रत्यक्ष रणांगण होते, मृत्यूशी झुंज होती, सर्वनाश होता. महात्माजींचा लढा असहकाराचा होता. त्यात रक्तपात नव्हता. मृत्यूशी झुंज नव्हती. फक्त कारावास, अपमान, राजद्रोह, मानहानी होती. दोन्ही लढ्यांची तुलनाच होऊ शकत नाही, इतकी त्यांची भिन्नता आहे. पण त्यात भाग घेणाऱ्या स्त्री-पुरुष सैनिकांच्या भावनेचा पोत मात्र एकाच जातीचा आहे. असो, सांगायचे एवढेच की स्वातंत्र्य लढ्याने स्त्रियांच्या परवशतेचा, गुलामगिरीचा लढा मागे पडला. फायदा एवढाच झाला की स्त्रियांच्या या लढ्यातील सहभागामुळे स्वातंत्र्यानंतर घटना होताना भारतीय स्त्रियांचा सामाजिक दर्जा कागदोपत्री व कायद्याने एकदम वाढला. मात्र एवढे कबूल करणे भाग आहे,

की प्रत्यक्षात स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान किंवा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन यात म्हणण्यासारखा बदल झाला नाही. स्वातंत्र्यानंतर सारे प्रश्न सुटतील अशी जी एक समजूत होती ती भ्रामक ठरली. छाया दातारांच्या विद्यार्थींजीवनात 'दोन पिढ्या शिकून बाहेर पडल्या तरी गाढ झोपी गेलेल्या राजकन्येचा' जो काळ त्या उल्लेखितात तो हा स्वातंत्र्य लढ्यानंतरचा शांततेचा काळ असावा. त्यामुळे स्त्रियांची परवशतेतून मुक्त होण्याची चळवळ पूर्वी फारशी नव्हतीच अशी त्यांची समजूत झाली असावी. ह्या लढ्याच्या आधीचा, १९२० पर्यंतचा काळ स्त्रियांच्या बाबतीत अन्यायांचा विचार करण्याचा, राजकीय सुधारणांबरोबरच सामाजिक सुधारणांच्या चळवळीचा काळ होता. त्यात दातार म्हणतात त्याप्रमाणे राजकन्या झोपली तर खासच नव्हती. ती झोपली होती ही दातारांची समजूत भ्रामक आहे.

मला वाटते, स्त्री-स्वातंत्र्याबाबतही राजकीय स्वातंत्र्याच्या कल्पनांप्रमाणे आपल्याकडे बदल होत गेला. राजकारणात प्रथम प्रांतिक स्वायत्तता, नंतर डोमिनियन स्टेटस व अखेर पूर्ण स्वातंत्र्य असे बदल होत गेले. तसेच स्त्री-स्वातंत्र्याबाबतही झाले. प्रथम स्त्रीजीवनाला तात लावणाऱ्या सामाजिक रूढींचा, अन्यायांचा विचार होऊन ते ते अन्याय कायद्याने दूर करण्याचा प्रयत्न झाला. त्याबरोबर काही काळाने शिक्षण व अर्थार्जन करून तिला स्वतःच्या पायावर उभे राहाता येईल, तिला अस्मिता प्राप्त होईल असे प्रयत्न सुरू झाले. त्यानंतर मताधिकाराने भारतीय स्त्रीला समाजाच्या, राजकारणाच्या मुख्य क्षेत्रात आणण्याचे प्रयत्न झाले व अखेर समान संधी, समान दर्जा दिला गेला. हे सर्व प्रयत्न वर दिलेल्या ठराविक पायरीने झाले असे म्हणता येणार नाही. पण स्त्री-स्वातंत्र्याच्या कल्पना साधारणपणे अशा वाढत गेल्या. आता घटनेत कायद्याने भारतीय स्त्रीला बरेच स्वातंत्र्य दिले आहे. पण अजूनही समाजात सर्वसामान्य स्त्रीचे पूर्वी जसे दुय्यम स्थान होते तसेच कायम आहे. हे का व्हावे याचा–'मी–तरुणी' या लेखमालेतून छाया दातार शोध घेत आहेत. या दृष्टीने 'भाऊ, बहीण व आई, बाप हाही एक त्रिकोण,' 'स्त्रीला घरच नसते,' 'कायद्याचे कितीही संरक्षण मिळाले तरी स्त्रीचे जिणे आश्रिताचेच,' 'पुरुष म्हणजे सूर्य, बाई ही सूर्यफूल,' इत्यादी लेख स्वातंत्र्याच्या नावाखालीही प्रत्यक्षात काय वस्तुस्थिती आहे याची साक्ष पटविणारे आहेत. 'तू म्हणजे शरीर, म्हणजेच सुंदर वस्तू,' 'हवाई सुंदरीचा व्यवसाय,' 'बाई कितीही नटली...फिटली,' 'आम्हाला फुलपाखरे आवडतात' इत्यादी लेख पुरुषसमाज अजून स्त्रीकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघतो हे स्पष्ट करतात. त्याचवेळी अर्थार्जनातील नवे खाचखळगे दाखवितात. 'बंडखोर घुमारे आताच खुडायला पाहिजेत.' सारखे लेख रूढींवर प्रस्थापित झालेला समाजाचा दृष्टिकोन सांगतात. 'लैंगिक स्वातंत्र्य म्हणजे वासनांची गुलामी नव्हे' यात स्वैराचाराला आळा का पाहिजे हे स्पष्ट करणारे स्त्री-पुरुष संबंधाबाबत मूलगामी विचार

त्यांनी मांडले आहेत. 'पिंजऱ्याचे दरवाजे उघडले गेले आहेत' इत्यादी लेख स्वतः स्त्रीच मनाने अजून किती कमकुवत, दुबळी व आत्मविश्वास नसलेली आहे हे विशद करून सांगतात. अशा स्त्रीला निर्भय, आत्मविश्वासपूर्ण व समाजाची खरीखुरी एक स्वतंत्र घटक करायची असेल तर आतून बाहेरून कसा दुहेरी मारा व्हावयाला पाहिजे यावर दातारांनी नेमके बोट टेवले आहे. त्या करता स्त्री-मुक्ती चळवळ पाहिजे. सहस्रावधी वर्षे संस्कृतीची, धर्माची, रूढींची, पारंपारिक आचारविचाराची जी भारतीय स्त्रीच्या मनावर पुटे बसून एक जाड अभेद्य कवच निर्माण झाले आहे ते फोडून काढायला पाहिजे. शिक्षणाने, अर्थार्जनाने व समाजाच्या साऱ्या व्यवहारांतून प्रत्यक्ष भाग घेऊन तिचा आत्मविश्वास जागा करून समाजव्यवहारात स्वतंत्रपणे काम केल्याने येणाऱ्या कार्यक्षमतेचा तिला प्रत्यय येईल असे केले पाहिजे, तरच आपल्या पंखांत अंतरीक्ष ओलांडण्याचे सामर्थ्य आहे, हे या मैनेला कळेल. नाहीतर आत्मविश्वासाअभावी ती पिंजऱ्यातच राहू पाहील. स्त्रीच्या दुय्यम दर्जाचे निरनिराळ्या लेखातून छाया दातार यांनी जे वर्णन केले आहे ते अगदी तंतोतंत पटणारे आहे.

मानवतेवर प्राण्यात आहार, निद्रा, भय, मैथुन हे सारे माणसासारखेच असते. तेथेही मादीच वंशसातत्याकरता पिलावळ तयार करते, पक्ष्यात, सिंहादी वन्य पशूत पिलांच्या संरक्षणार्थ मोठी होईतोवर नर-मादी दोघेही जोडीने राहातात, संरक्षणाचे काम करतात. पण त्यामुळे मादीला दुय्यम स्थान प्राप्त होत नाही. मग मानवी समाजातच ते का होते? याचे कारण मानवाने चालू केलेल्या अर्थ व्यवस्थेत आहे. संपत्तीचा साठा आणि त्या अनुषंगाने येणारी अर्थव्यवस्था यामुळे स्त्री दुबळी झाली, घराच्या चार भिंतींत कोंडली गेली, हे मार्क्सप्रणीत स्त्रीच्या दुय्यम स्थानाचे कारण त्यांनी पुढे मांडले आहे आणि तेही पटणारे आहे. त्यापुढे जाऊन समाजात विषमता जतन करणारी, दुर्बलांना पिळणारी अर्थव्यवस्था बदलल्याखेरीज, थोडक्यात क्रांती होऊन समाजवाद आल्याखेरीज समाजाच्या सर्व व्यवहारात एक स्वतंत्र घटक म्हणून स्त्री भाग घेऊ शकणार नाही असे त्यांना वाटते. त्याकरिता स्त्रीला कुटुंबापासून तोडले पाहिजे, तिच्यावर पारंपरिक बायकी गुणांचे जे आभासात्मक पुट चढले आहे ते नाहीसे केले पाहिजे व नवे कुटुंब तयार केले पाहिजे असे त्या सुचवितात. येथे मात्र वयस्क मनांना किंचित थयकल्यासारखे होते. क्रांतीला किंवा क्रांतीने येणाऱ्या समाजवादाला विचारी माणूस भीत नाही. समाजातील संपत्तीची विषमता व त्याच्या अनुषंगिक येणाऱ्या गोष्टी कमी झाल्या तर संपत्ती गाठी नसलेल्या सर्वांना पाहिजेच आहे. पण फक्त शंका येते ती ही की अशा समाजवादात स्त्री खरोखर मुक्त होऊन तिचे व्यक्तिमत्व बहरून येईल का? दातार म्हणतात त्याप्रमाणे 'एक संपन्न व्यक्तिमत्त्व व स्वयंभू अस्तित्व म्हणून ती डौलाने उभी राहू शकेल का?'

सध्या मार्क्सप्रणित समाजवादाचा आविष्कार प्रत्यक्षात उतरवलेले दोनच प्रमुख

देश आहेत. एक रशिया व दुसरा चीन. दोन्हीही देशांत राष्ट्राची सारी संपत्ती, उत्पादन साधने समाजाच्या, राष्ट्राच्या मालकीची आहेत. वैयक्तिक संपत्तीच्या विषम वाटणीने होणारे परिणाम नाहीसे व्हावे, व्यक्तीच्या क्षमतेप्रमाणे प्रत्येक व्यक्तीस योग्य शिक्षण, व्यवसायाची समान संधी प्राप्त व्हावी या करता राष्ट्रातील स्त्री-पुरुष नेहमी आपापल्या कुवतीप्रमाणे खपत आहेत. सारी उत्पादन संपत्ती समाजाकरिता तयार होते व समाजहितार्थ प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे वाटली जाते. लहानांपासून मोठ्यापर्यंत प्रत्येक व्यक्तीला अन्न-वस्त्र निवाऱ्याची भ्रांत नाही. क्षमतेप्रमाणे शिक्षणाची संधी मिळते, व्यवसाय मिळतो. शरीराला, मनाला लागणाऱ्या करमणुकीची साधने सर्वांना सारखी उपलब्ध आहेत. सारे खपतात, नेमून दिलेले काम व्यवस्थित करतात. सारे कसे मुंग्यांच्या वारुळाप्रमाणे व्यवस्थित चालते. समाजवादी अर्थव्यवस्था स्वीकारल्यामुळे दोन्ही राष्ट्रांनी फारच थोड्या अवधीत आश्चर्यजनक प्रगती झपाट्याने केली यात शंका नाही. काही वर्षांपूर्वी जगात मागासलेली म्हणून प्रांसिद्ध असलेल्या दोन्ही अवाढव्य राष्ट्रांनी आज जगातल्या बलाढ्य राष्ट्रांच्या मांडीला मांडी लावून बसण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी आणले आहे. राष्ट्रातील सर्वांचे श्रम राष्ट्राकरिता व त्यातून निर्माण झालेली संपत्ती कोणत्याही व्यक्तीकडे न जाता साऱ्या समाजाकरिता म्हणजे त्यातील प्रत्येक व्यक्तीकरिता असे हे सुंदर चक्र चालू आहे. पण त्यामुळे राष्ट्राची एवढ्या झपाट्याने प्रगती करणाऱ्या व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व बहरून ही प्रगती होत आहे की कामकरी मुंग्यांप्रमाणे 'कंडिशन्ड' होऊन हे लोक कामे झपाटताहेत असा प्रश्न उभा राहातो. आता पावेतो रशियाच्या पोलादी पडद्यामागले काही कळत नसे. आता जी एकेक माहिती बाहेर येत आहे त्यावरून व्यक्तिमत्त्व बहरण्याकरिता जे मोकळे वातावरण लागते, स्वतंत्रता लागते ती तेथे नाही असा निष्कर्ष निघतो. स्वतंत्र व्यक्तिविचारांची गळचेपी होतेसे वाटते. चीनच्या बांबूच्या पडद्यामागेही असेच होत असावे अशी त्यातील जी काय थोडीबहुत माहिती झिरपून बाहेर येते त्यावरून दिसते. तेथे तर साऱख्या उलट्यासुलट्या क्रांत्या होत आहेत. त्या राष्ट्रहिताच्या दृष्टीने बरोबर असतील पण सामान्य स्त्री-पुरुषांना गोंधळून टाकणाऱ्या आहेत.

काही दिवसांपूर्वी अमेरिकेत काम करणाऱ्या एका चिनी प्राध्यापकाला भेटण्याची मला संधी मिळाली. तो नुकताच मायदेशाहून परतला होता. चीनने केलेल्या प्रगतीविषयी अभिमानाने बोलत होता. ज्या देशात पूर्वी काही वर्षांपर्यंत अठराविश्वे दारिद्र्य दिसायचे तेथून दारिद्र्य आता हाकलले गेले आहे. अन्न-वस्त्र-निवारा सर्वांना मिळतो आहे. सर्वांना काम मिळते आहे. जी काय करमणुकीची साधने आहेत ती सर्वांना आता उपलब्ध आहेत. आता चीनमध्ये पूर्वीसारखे दिपवून टाकणारे ऐश्वर्य दिसत नाही तसे माणसाला पिचवून टाकणारे दारिद्र्यही नाही. सर्व स्त्रिया, ज्यांना पूर्वी धड चालताही येत नव्हते त्या निर्भय होऊन खेड्यापासून शहरापर्यंत चोहोकडे कामे करीत आहेत,

नेतेपदाला चढत आहेत. आपण हाती घेऊ ते करून दाखवू असे आत्मविश्वासाचे तेज त्यांच्या तोंडावर ओसंडते आहे, असे त्याला दिसले. पण बोलता बोलता सहजपणे असे कळले की, त्याचा भाऊ वहीण त्याला जवळच्या गावच्या स्टेशनवर उतरवून घेण्यास येऊ शकले नाहीत किंवा पोहोचविण्यास जाऊ शकली नाहीत. कारण तेथे सर्वांना सर्वकडे जायची मुभा नाही. शासनाने परवानगी दिल्याशिवाय एक गाव सोडून दुसऱ्या गावी कोणालाही जाता येत नाही. मायदेशी जाताना भावांना, बहिणीला भेटीदाखल म्हणून नेलेल्या वस्तू शासनाच्या देखरेखीखाली त्यांच्या परवानगीनेच तो त्यांना देऊ शकला. स्वतःच्या खेडेगावी त्याचे व्ही. आय. पी. म्हणून स्वागत झाले. पण स्वतःच्या भावाच्या घरी जाऊन त्याला राहाता आले नाही व शासनाने मंजूर केलेल्या वेळीच भावाचा निरोप घ्यावा लागला. चीनमध्ये स्त्रिया सुद्धा तेलाच्या पाइपलाइनवर काम करून राष्ट्राचा तेलाचा प्रश्न कसा सोडवत आहेत. या संबंधी गौरवात्मक रीतीने लिहिलेला एक लेख मला वाचायला मिळाला. त्यात या स्त्रिया एका आड जंगलात काम करत होत्या. त्यांच्या राहाण्याच्या, खाण्यापिण्याच्या, करमणुकीसारख्या सर्व सोयी छान होत्या. त्या सर्व एका कम्यूनमध्ये राहात होत्या. वर्तमानपत्राच्या वातमीदाराने त्यांना पोरेबाळे, संसाराविषयी विचारले. बहुसंख्य मुलींकडून 'आधी चीनचा विचार मग लग्नाचा–तेही उशिरा' असे उत्तर आले. उत्तर देशाभिमानाचे द्योतक आहे. आज चीनमध्ये लोकसंख्या अफाट असल्याने तिला आळा घालण्याचे तंत्र चालू आहे. रशियात दुसऱ्या महायुद्धानंतर लोकसंख्येची गरज असल्याने व अजून वैज्ञानिक शोधांनी बाळे स्त्रीच्या गर्भाशयात न उगविता बाटलीत उगविण्याचे तंत्र शोधून न काढल्याने स्त्रियांच्या मातृत्वाचा गौरव सुरू झाला होता. म्हणजे छाया दातारांनी गौरविलेल्या मातृत्वाच्या नवनिर्मितीचा सृजनात्मक अनुभव स्त्रीच्या मर्जीवर न रहाता राष्ट्राच्या त्या त्या वेळच्या गरजेवर ठरविला जात आहे. अशा परिस्थितीत स्त्री-पुरुषांची, विशेषतः बाईची–एका पुरुषाच्या कुटुंबाची गुलामगिरी जाऊन राष्ट्राच्या गरजेच्या अदृश्य गुलामगिरीत तो सापडत आहे असे अनुमान कोणी काढले तर ते फारसे चूक होणार नाही. थोडक्यात, 'समाजवादी अर्थव्यवस्थेने स्त्रीचे व्यक्तिमत्व बहरून ते एक स्वयंभू अस्तित्व म्हणून डौलात उभे राहील' ही दातारांची कल्पना भ्रामक आहे असे वाटू लागते.

काहीही असले तरी एवढे खरे की भारतीय स्त्री–सुशिक्षित स्त्रीही अजून मनाने खरी स्वतंत्र झालेली नाही. तिच्या सामर्थ्याचा राष्ट्राला व्हावा तसा उपयोग होत नाही. त्याकरिता छाया दातार यांनी या लेखमालेद्वारा केलेल्या प्रयत्नांची आणि सुरू केलेल्या स्त्री-मुक्तीच्या चळवळीच्या उठावाची केवढी तरी गरज आहे!

मुंबई, २० फेब्रुवारी १९७६

—कृष्णाबाई मोटे

दुसरी आवृत्ती निघताना

दुसरी आवृत्ती निघण्याचे भाग्य मराठीतील फारच कमी पुस्तकांना लाभते. या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीसाठी 'ग्रंथाली'ने होकार दिला हे मी माझे कौतुक समजत नसून या विषयाचे ताजेपण अजून टिकून आहे, किंबहुना या विषयाचे महत्त्व अधिक जाणवू लागलेले आहे, या परिस्थितीचे निदर्शक आहे, असे मानते. पंचाहत्तर साली स्त्री-मुक्तीच्या प्रश्नांची चर्चा होऊ लागली होती. त्या संदर्भात लिहिलेले हे लेख आहेत. परंतु आज मागे वळून पहाताना असे जाणवतंय, की त्या चर्चा खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या मनात झिरपल्या नव्हत्या. त्यांच्या मनांची कवाडे ठोठावत गेल्या नव्हत्या. चर्चांमध्ये वाचाळता जास्त होती. आज सात वर्षांनंतर मात्र हे विषय केवळ चर्चेचे राहिलेले वाटत नाहीत तर रोजच्या आयुष्यात हे प्रश्न तीव्रतेने पुढे येत आहेत. काहीवेळा संघटितपणे, काहीवेळा वैयक्तिक पातळीवर त्याबाबत कृती घडत आहेत. समाज सुधारकांच्या काळापासून मुख्यत्वेकरून पुरुषांच्या पुढाकाराखाली सुरू झालेली स्त्री-मुक्ती चळवळ आज स्त्रियांनी स्वतःच्या हातात घेतली असल्याचे चित्र दिसू लागले आहे. आणि म्हणूनच कदाचित आज 'मी-तरुणी' सारखे पुस्तक अधिक आवडीने वाचले जाण्याची शक्यता आहे.

प्रथम प्रकाशनाच्या वेळी प्रकाशक मिळणे कठिण गेले. जे पुस्तक प्रकाशित झाले त्याचे मुद्रण सदोष होते. पुस्तकही नजरेत भरण्याजोगे निघाले नाही. चळवळीच्या प्रसारासाठी उपयुक्त होईल, आणि चळवळीमध्ये काहीही खपून जाते, अशा किमान अपेक्षेने पुस्तक छापून आणले गेले. बघता बघता त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. 'ग्रंथाली'ने वितरणासाठी पुस्तक घेतले आणि दोन वर्षांत त्याच्या प्रती संपल्या. या

पार्श्वभूमीवर माझी उमेद वाढली आणि 'ग्रंथाली'ला पुनःप्रकाशन करण्याची विनंती करण्याचा धीर आला.

एका अर्थाने या पुस्तकाला मर्यादा खूपच आहेत. लेख छोटे आहेत. त्या त्या विषयाचे विवरण नीट होत नाही. साक्षेपी वाचकाला या लेखांमुळे नवी दृष्टी मिळाली असे होणार नाही. तसेच ते केवळ स्त्रियांच्या दुःखाचे, अगतिकतेचे ललित पद्धतीने वर्णनही करत नाहीत. त्यांचे स्वरूप मधले आहे. आहे त्या वास्तवामधील स्त्रियांवर येणारी सूक्ष्म दडपणे उघडी करण्याचे व त्यासाठी आवश्यक त्या पद्धतीने प्रश्न विचारीत जाऊन दिशा दाखविण्याचे कार्य हे लेख करतात. विषयांमध्ये विस्कळितपणा जाणवतो. स्त्रीच्या दुय्यमपणाच्या मुळाशी जाऊन एक सुसंगत, सर्वंकष आढावा घेऊन आज स्त्री-मुक्तीसाठी काय करायला हवे यासंबंधीचे मार्गदर्शनही या पुस्तकातून मिळत नाही. केवळ स्वतःच्या जीवनाकडे डोळसपणे बघण्यासाठी उद्युक्त करणे आणि स्त्री-मुक्तीचा, इतिहासाचा अधिक अभ्यास करण्यासाठी उत्सुकता चाळविणे एवढेच मर्यादित कार्य या लेखातून होऊ शकेल याची मला जाणीव आहे. आणि मला वाटते तेही आज महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील छोट्या शहरातून 'मी-तरुणी' पुस्तकासाठी माझ्याकडे विचारणा आल्या आहेत. स्त्रियांच्या मनातील वाढत्या अपेक्षा आणि आकांक्षा यांच्या त्या निदर्शक आहेत.

आज स्त्री-मुक्ती प्रश्नासंबंधी व स्त्री-पुरुष संबंधाबद्दलची माझी जाण अधिक वाढली आहे असे वाटते. तरीही या संग्रहातील लेखांमध्ये काही बदल न करता, किंवा एकूणही संग्रहाचे स्वरूप न बदलता पूर्वीच्याच स्वरूपात हा संग्रह पुनःमुद्रित करण्याचा निर्णय मी घेतला आहे. महत्त्वाचे कारण मला वाटते, त्या लेखांतील लालित्य टिकविणे हे आहे. त्या सगळ्याच लेखनामध्ये सोपेपणा, सुटसुटीतपणा आणि रचनेचा बांधेसूदपणा आहे. तो तसाच रहावा असे वाटते. या लेखांवरोवर नवीन काही लेख एकत्रित करता आले असते. परंतु ती शैली आज टिकविता येईल की नाही याची भीती वाटते. येथील काही लेखांत झालेली मांडणी आज अपुरी वाटतीय पण चुकीची वाटत नाही. तेव्हा हे लेख १९७५ साली, आंतरराष्ट्रीय स्त्री वर्षानिमित्त लिहिलेले आहेत एवढा संदर्भ पुन्हा एकदा मांडून, हे लेख दुसऱ्या आवृत्तीच्या रूपाने वाचकांच्या हाती देण्यास मला आनंद वाटत आहे. आज असाही आत्मविश्वास वाटतो आहे की, केवळ चळवळीसाठी केलेले लिखाण इतके मर्यादित स्वरूप त्याला नसून, जीवनाचे एक महत्वाचे परिमाण– स्त्री-पुरुष संबंध– याविषयी केलेल्या चिंतनाची झाक या लिखाणाला आहे आणि म्हणूनच हे लिखाण दुसऱ्यांदा प्रसिद्ध करण्याची गरज आहे.

—छाया दातार

॥ १ ॥

पुरुषावर प्रेम करायचं—पण आधार मात्र घ्यायचा नाही

माझ्या लहानपणचा काळ वेगळा होता. एवढेच काय, स्वीटसिक्-स्टीनमध्ये प्रवेश करून तरंगत, टेकडी पलीकडची स्वप्नं बघत मी जेव्हा महाविद्यालयात प्रवेश केला तेव्हाही भोवतालचे वातावरण खूपसे संथ, शांत होते. लेखन, वक्तृत्व, नाटक, एन्. सी. सी. या माध्यमांतून व्यक्तिमत्त्वाला पैलू देत एखादी युवती आपल्या वेगळ्या अस्तित्वानं चमकायची आणि मग शालीनपणे बोहल्यावर चढून एखाद्या संपन्न घरात सून म्हणून जायची. बहुतांशी मुलींची स्वप्ने हीच. मध्यमवर्गीय घरांतून यौवनाची चाहूल लागली की स्थळे पहायला लागायची हीच पद्धत. महाविद्यालयात जायचं तेही लग्नाचं जमेतोवर या माफक उद्देशाने. एखादे वेळी एखादा जोडीदार तेथे मिळायचाही. तो जर चांगल्या घरातला निघाला तर मुलीचा तो पराक्रम समजला जाई. 'हुंडा वाचला, वरा पटकावला की हो नवरा!' जातीचा अर्थातच हवा. परजातीचा निघाला तर मग घरात नाटक आहेच. मोठाच समरप्रसंग. पण बहुसंख्य मुलींना मध्यस्थाची किंवा 'रोहिणी' मासिकाची मदत घ्यावीच लागे.

मला आठवतंय, त्यावेळी स्त्रीस्वातंत्र्याची वगैरे फारशी चर्चाही होत नसे. निदान वक्तृत्वस्पर्धेत तरी हा विषय लावलेला कधी आठवत नाही. राजकारण, मग ते विद्यापीठीय असो किंवा समाजातील इतर प्रश्नांविषयी असो, त्यावेळी विद्यार्थ्यांपर्यंतच फार पोचलेले नव्हते. त्यामुळे विद्यार्थिनीही त्यापासून चार हात दूर असत.

आणि ही फार पूर्वीची गोष्ट नाही सांगत मी. फक्त दहा वर्षांपूर्वीची. ही दहा वर्षं जगून झाल्यावर वाटतंय खूप काही जगले मी. अनुभव खूप घेतला. पण विचार करायला लागले तर लक्षात येतंय दहाच वर्षं फक्त. पण वातावरण किती झपाट्याने बदललंय. बाहेर आंदोलनांचे वणवे पेटताहेत. 'विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घ्यावा की नाही' हा आमच्या वेळी वक्तृत्वस्पर्धेतील आवडता विषय. आज या विषयावर चर्चा करायला कोणाला वेळच नाहीय्. विद्यार्थी राजकारणात पुढे सरसावलाय. एवढेच नव्हे तर त्याच्या गर्जनांनी दिल्लीचे तख्त हलू लागले आहे आणि ह्याहीपेक्षा अतिशय महत्त्वाची गोष्ट घडतीय्, कॉलेज युवतीसुद्धा उत्स्फूर्तपणे या वेगवान प्रवाहात उतरली आहे. शालीनपणे सून होण्याची स्वप्ने बघणारी ही युवती असंतोषाने पेटून निघाली आहे.

हा झाला तिच्या सामाजिक जाणिवेचा भाग. आजची तरुण मुलगी नेहमीच्या वर्तुळाच्या बाहेर पाय टाकण्यासाठी धडपडत आहे. मात्र तिच्या अस्वस्थतेचा पोत मात्र आजच्या तरुण मुलाच्या अस्वस्थतेपेक्षा थोडा वेगळा आहे. आजचा तरुण येथील शिक्षण पद्धतीने वैतागतो, भ्रष्टाचाराने पेटून उठतो. बेकारीमुळे जीवनाची दिशा हरवून बसतो. पण या सगळ्या दिव्यातून पार पडून त्याला बऱ्यापैकी नोकरी मिळाली, सुंदरशी बायको मिळाली तर त्याला तोडकी मोडकी का होईना, सुखाची सावली मिळते. पण आजच्या तरुण मुलीचे प्रश्न नेमके येथे सुरू होतात. आंदोलनात भाग घेणारी ही युवती, तरुणांच्या बरोबरीने शिक्षण घेऊन प्रगल्भ होऊ पाहणारी ही युवती–हिला प्रश्न पडतोय, माझ्या जीवनाचा अर्थ काय ? माझे श्रेयस काय ? संवेदनाक्षम मनांच्या अनेक तरुणींना जाणवणारा हा प्रश्न ! लग्न झाल्यानंतर ह्या प्रश्नाचा सल घेऊनच ती आयुष्य जगते.

दोन पिढ्या शिकून बाहेर पडल्या आणि गाढ झोपी गेलेल्या राजकन्येला तिच्या प्रदीर्घ झोपेतून जाग यावी तसं काहीसं आज घडू लागलेलं दिसतंय. आजची ही युवती स्वतःच्या मनाच्या आत डोकावून पहायला शिकतेय आणि तिला तिच्या मनाच्या तळाशी खोल एक बिलोरी मणी दिसतोय. तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाच्या अनेक शक्यतांचे किरण त्याच्या पैलूतून बाहेर फाकताहेत. या प्रकाशकिरणांनी ती बावरून गेलीय. हा प्रकाशकिरण अंगभर भिनला पाहिजे. माझे शरीर हे 'स्त्रीचे शरीर' एवढीच मर्यादित व्याख्या न राहता एक संपन्न व्यक्तिमत्त्व, एक स्वयंभू अस्तित्व म्हणून डौलाने उभे रहावे यासाठी तिचा आकांत चालू आहे. पण मार्ग मात्र अजून सापडत नाही. एक प्रचंड अस्वस्थता, एक प्रचंड घुसमटणे, एक प्रचंड वादळ उरात घेऊन ही तरुणी जगते आहे.

कधीकधी हे वादळ असह्य होऊन ती उरी फुटते आणि अस्मितेची एक उंच चिळकांडी आकाशापर्यंत पोचते. एक बंडखोर आवाज वर्षानुवर्षाच्या संस्कृतीचे बंध

चराचरा कापत समाजाला आव्हान देत आपल्याच नादात गिरक्या घेत राहातो. भोवतालच्या चिरेबंदी भिंतीच्या आत घुमत राहतो. धडका देत राहतो. संस्कृतीची बंधने तोडण्याचा तो केवळ स्वैराचार नसतो. ते प्रश्न असतात संस्कृतीचा पोकळपणा सिद्ध करणारे. ते प्रश्न असतात संस्कृतीच्या या चिरेबंदी अभेद्य भिंतींची गरज काय म्हणून जाब विचारणारे! त्या आवाजाला कळत असतं, खरं जीवन तर या भिंतींच्या बाहेरच वाहतंय, तेच भरभरून आत घ्यायला हवं, नव्या जीवनाची नवी मूल्यं, नवी श्रेये शोधायला हवीत. या भिंतीचे अवशेष आता पडायला नकोत का? हे डबक्यातलं जीवन आता संपायला नको का?

हा आवाज आहे गौरी देशपांडेचा. 'दीपावली' दिवाळी अंकातील कादंबरी वाचलीत? 'कारावासातील पत्रे.' अवश्य वाचा. गंमत अशी की यावेळी माझ्या अनेक मैत्रिणींनी मला ही कादंबरी रेकमेंड केली. गौरी देशपांडे या व्यक्तीला लांबून थोडीफार ओळखते मी. त्याहीपेक्षा तिच्या साऱ्याच कथा मी आवर्जून वाचत आले. त्यामुळे तिच्या अनुभवाची वीण मला माहीत होती. तिचा हा स्वतःचा शोध घेण्याची धडपड मला परिचित होती. तिच्या अभिव्यक्तीतील बेबंदपणा आणि धीटपणा मला नेहमीच मोह घालत होता. (तो कित्येक तरुणांना धक्कादायक पद्धतीनं आकर्षित करतो अशी माझी नोंद) पुरुष आणि स्त्री यांच्या संबंधांचे अतिशय बारकाईने गौरी निरीक्षण करत जाते. आजपर्यंत स्त्रीच्या आयुष्याचा संदर्भबिंदू म्हणजे पुरुष हा आपला नेहमीचा अनुभव. संदर्भबिंदू म्हणजे काय? प्रथम पुरुष आयुष्यात येतो तो बाप म्हणून. त्याच्या नावाचा शिक्का बसल्यावरच ती जगात अमक्यातमक्याची मुलगी म्हणून ओळखली जाऊ लागते. मग हा बाप गृहस्थ तिचे कन्यादान करतो आणि ती नवऱ्याच्या नावाने ओळखली जाते. अमक्या तमक्याची बायको म्हणून मिरवते. मग ती आई बनते. पप्पूची आई! किंवा म्हातारपणी कर्तृत्ववान मुलाच्या माताजी! तेव्हा गौरीचा हव्यास 'ह्या संदर्भबिंदूची शिकल्यासवरलेल्या स्त्रीला खरोखरच गरज आहे काय' हे तपासायचा. खरं प्रेम अंतर्बाह्य समजून घेणारा जोडीदार ही आयुष्यातली सर्वोत मौल्यवान गोष्ट, असे गृहीत तत्त्व मनात धरून ती भटकभटक भटकली. आयुष्याला पूर्णत्व देणारा पुरुष तिला हवा होता आणि मग तिची तीच उमगली, आयुष्याला पूर्णत्व देणं तिच्याच हातात होतं. एक संपूर्ण व्यक्ती म्हणून ती जेव्हा कोणा पुरुषाला भेटेल तेव्हाच समानतेचे नाते प्रस्थापित होईल. तिने प्रस्थापित नीतिमूल्ये उधळून लावली. ढोंगीपणा करायचं नाकारलं. तिने स्त्री म्हणून तिला नाकारल्या गेलेल्या स्वातंत्र्यासाठी बेगुमान झगडा दिला. तिला स्वातंत्र्य हवं होतं पुरुषाच्या संदर्भात. तिला पुरुष आवडत होता. आकर्षक वाटत होता. पण त्याची सांस्कृतिक ताबेदारी, हुकुमत, प्रेमाचे ढोंग आवडत नव्हते. आणि याला तिनं उत्तर शोधले. एकटं उभं राहायचं. सगळे संदर्भ तोडून. पुरुषावर प्रेम

करायचं पण आधार घ्यायचा नाही. आपले अस्तित्व आपणच तोलायचं.

गौरीचं उत्तर हे अनेक उत्तरांपैकी एक उत्तर आहे. विचार करायला लावणारं. कदाचित अनेक तरुणींचे आई-वडील माझ्यावर चिडतील—गौरीच्या मार्गाचे समर्थन केले म्हणून. माझी जबाबदारी मार्गदर्शकाची नाही. माझी जबाबदारी फक्त मला जे जाणवलंय, ते डोळस पद्धतीने इतरांनाही बघायला लावण्याची. अस्तित्वावरची भरजरी आवरणे फेकून देऊन स्वच्छ मनाने प्रवाहामध्ये उतरण्यासाठी प्रवृत्त करण्याची. आणि मग ह्या विशाल जीवनाचे आव्हान पेलायला ही नवी तरुणी आपोआपच सिद्ध होईल असा विश्वास नाही वाटत ?

॥ २ ॥

बाई ग, नवरा मिळव, त्याला सांभाळ वगैरे

१९ जानेवारीच्या अंकात जाई निंबकर यांचे पत्र वाचले. पहिल्या लेखात मी गौरी देशपांडे यांच्या कादंबरीचा उल्लेख केला होता. त्यात गौरीच्या 'मी चा शोध' या प्रक्रियेचे कौतुक होते. गौरीचे उत्तर मी मान्य केलेले नव्हते. स्त्रीला पुरुषाशिवाय राहता येईल का नाही, तिने राहावे की नाही वगैरे अनेक प्रश्न जाई निंबकर यांनी उपस्थित केले आहेत. त्या संबंधी बरंच लिहावं लागेल. पण मला वाटतं, माझ्या लेखातून आणि गौरीच्याही कादंबरीतून स्त्रीने पुरुषाशिवाय राहावं, त्यातच खरे सुख आहे असे कुठेही सूचित केलेले नाही. शिवाय अमूक गोष्ट करावी किंवा अमूक करू नये अशी त्रिकालाबाधित सत्ये कधी असू शकत नाहीत. आपण काळाने इतके बांधले गेलेलो असतो, की त्या त्या वेळची समाजरचनेची चौकट; त्या त्या वेळी मनुष्यजाती मध्ये वसत असलेली प्रगल्भता या सर्वांचा विचार करावा लागतो.

अगदी एक साधं उदाहरण द्यायचं तर मार्क्सच्या 'मुक्त प्रेम' या कल्पनेचा केला जाणारा विपर्यास. साधारणपणे मार्क्सच्या 'मुक्त प्रेम' या कल्पनेचा गाभा असा सांगितला जातो–कुटुंबव्यवस्था नष्ट होईल तेव्हाच स्त्री-पुरुष खरे मुक्त होतील आणि 'मुक्त प्रेम' या तत्त्वावर स्त्री-पुरुषांचे संबंध राहतील. गंमत अशी की, मार्क्सने मुक्त प्रेम ही कल्पना एका नव्या समाजाच्या संदर्भात मांडली. एखाद्या प्रतिभावंताला किंवा द्रष्ट्याला सबंध इतिहासाचा अभ्यास केल्यावर मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीचे नियम

सापडतात. दिशा सापडते. आणि तो यापुढे मानवी संस्कृतीची वाटचाल कशी होऊ शकेल याची काही रेखाटने देतो. काही धूसर चित्र रंगवितो. नव्या समाजाची स्वप्ने पाहू शकणाऱ्या द्रष्ट्याची भाकिते असतात–चोख शास्त्रीय आधारावर उभी. मार्क्स संपूर्ण मानवाचे स्वप्न पहात होता. भौतिक परिस्थिती बदलली गेली, एक मालक–एक मजूर, एक श्रीमंत–एक गरीब असा भेदभाव उरला नाही. उत्पादनाचे तंत्र खूप प्रगत झाले, सुबत्ता आली, सर्व अर्थव्यवस्थेचे सामाजीकरण होऊन बाजारू अर्थव्यवस्था नाहीशी झाली की या सर्वांचा परिणाम मानवी मनावर होईल. मानव अधिक सुजाण, प्रगत, प्रगल्भ होईल. त्याच्यामध्ये सांस्कृतिक क्रांती होईल. अशा वेळी आजच्या सारख्या कुटुंब व्यवस्थेची गरज मानवाला उरणार नाही, असं मार्क्स म्हणतो.

आज जेव्हा अमेरिकेसारख्या बाजारू अर्थव्यवस्थेवर अवलंबून असणाऱ्या समाजामध्ये मुक्त प्रेम ही कल्पना रावविली जाते तेव्हा स्त्रीची कशी केविलवाणी अवस्था होते ते आपण बघतो. मुक्त प्रेम व स्वैराचार यामध्ये फरक आहे. आज अमेरिकेमध्ये स्वैराचार चालू आहे. ग्लास तोंडाला लाव आणि पाणी संपले की फेकून दे, असे त्यांचे शरीर वापरण्याचे तत्त्वज्ञान आहे. मुक्त प्रेम या कल्पनेमध्ये मार्क्सला शरीर-स्वातंत्र्य अभिप्रेत नव्हते. त्याला प्रगल्भ, प्रगत माणसाला कायद्याच्या बाह्य बंधनांची गरज भासणार नाही असे म्हणायचे होते. आज हे शक्य होईलसे वाटत नाही.

हे समजून घेण्यासाठीच स्त्रीला दास्य का आलं हे आधी समजावून घेतले पाहिजे. टोळी जीवनातून मानवाने शेती संस्कृतीमध्ये प्रवेश केला. गुरे पाळणे सुरू झाले. गुलाम बाळगून शेतीतून जास्त धान्य निर्माण करणे शक्य झाले. संपत्तीचा संग्रह करता येऊ लागला. आणि कुटुंबव्यवस्था जन्माला आली. एक पुरुष–त्याच्या मालकीची जमीन, संपत्ती. ती संपत्ती वारसा हक्काने पुढं आलेल्या वंशजाला मिळावी म्हणून आपली हक्काची बायको. ती आपल्या ताब्यात राहावी म्हणून तिची चार भिंतीच्या आत रवानगी. मग संस्कृती, साहित्य वगैरेतून आहे तीच समाजव्यवस्था कायम राहावी, यासाठी प्रयत्न. अशी ती परंपरा आहे. हिंदू संस्कृतीचा जन्म यातूनच झाला. रूढी, चालीरीती, ज्याने त्याने आपापल्या जागी राहावे, नसते प्रश्न विचार नयेत, बंड करू नये, ही सगळी त्यामागे उद्दिष्टे होती आणि ती पुरेपूर पाळली गेली. स्त्रीला वाटत गेलं, की ती खरीच कमकुवत आहे, शरीराने आणि मनानेसुद्धा. तिला वेलीची उपमा दिली गेली. तिने वृक्षाच्या आधारे राहावे. तिला पतिव्रता म्हटलं गेलं. आणि अशा सुंदर शब्दांनी आपलं काम बजावलं. मंगळागौर, वटपौर्णिमा, हरतालिकेचा उपास या सगळ्यांतून तिला सांगितलं गेलं 'बाई ग! नवरा मिळवणे आणि त्याला सांभाळणे हे तुझे आयुष्यातील ध्येय–एकमेव. मान खाली घाल, तोंडातून शब्द काढू नको. छळ सहन कर. त्यातच तुझी मुक्ती.'

ह्या हिंदु-धर्माने आणि सनातन भारतीय संस्कृतीने आपले काम चोख बजावले आणि त्यावेळची अर्थव्यवस्था जपून ठेवली. आता नवी अर्थव्यवस्था येऊ बघते आहे. अविभक्त कुटुंब की विभक्त कुटुंब असे वादविवादसुद्धा मागे पडत आहेत. माणसं दूर देशी जातात. नोकरीसाठी, धंद्यासाठी. कुटुंब पद्धतीचे विघटन होऊन नवीन एक पती-पत्नीचे कुटुंब सुरू झाले आहे. स्त्रीच्या स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावल्यासारख्या दिसू लागल्या आहेत. पूर्वी सासरच्या माणसांचा तिच्यावर हक्क असे, आता पतिदेवांचा एकट्याचाच हक्क आहे. आणि पतिदेवांच्या त्या बंधनावर प्रेम या शब्दाचे झिर-झिरीत आवरण आहे. परिस्थितीने ती अजून स्वतंत्र नाही. शिक्षण नाही. नोकरी नाही. अगदी देशातील ८० टक्के स्त्रियांची स्थिती अशी आहे.

प्रश्न येतो– उरलेल्या सुशिक्षित स्त्रियांच्या बाबतीत. ज्यांना या स्वातंत्र्याची जाणीव येणे शक्य आहे, त्या स्त्रिया तरी आज स्वतंत्र झालेल्या दिसतात का? अगदी शिक-लेल्या मुलीही बहुतेक वेळा आंधळेपणाने त्याच रूढी पाळत येतात. आणि या ना त्या सबबीखाली पुरुषाचा आधार, सुरक्षितता सोडण्याची तयारी दाखवीत नाहीत. याला एक कारण आजचे शिक्षण. आजही पुन्हा मुलींसाठी होमसायन्सची कॉलेजेस् काढून त्यांची लिंगवैशिष्ट्ये जपण्याची तयारी दिसते. घर सजवायचं कसं, चमचमीत जेवण करून पतिराजांची मर्जी राखायची कशी, पुष्परचना कशी करायची, यातच, तिचे व्यक्तिमत्त्व फुलविण्याचा प्रयत्न होतो. एकीकडे या जुन्या चालीरीती तिच्या मनातील दुय्यमपणाचे, हळवेपणाचे सावट चालू ठेवतात. दुसरीकडे अर्थव्यवस्थाही आपला बाजारूपणा तिच्या मनावर ठसवीत राहते. अर्थव्यवस्थेतून काही मूल्ये तयार होतात. त्यांचा तिच्या भावी जीवनावर परिणाम होत असतो. पैसा म्हणजे सुख, पैसेवाला नवरा हवा. आपल्यापेक्षा जास्त शिकलेला नवरा हवा. तिला एकटे राहायला सुरक्षित वाटत नाही. एकट्या मुलीकडे समाज वेगळ्या नजरेने बघतो. फायदा घ्यायचा प्रयत्न करतो.

आज मला राग येतो तो समाजशास्त्रज्ञ स्त्रियांचा, विचारवंत स्त्रियांचा. स्त्रीच्या मागासलेपणाविषयी त्या चिडीने बोलतात. स्त्रीला गुलामी आवडते म्हणून नाके मुरडतात. पण यासाठी जबाबदार ही समाजव्यवस्थाच आहे, हे दाखवून देत नाहीत. गौरी देशपांडेचेही तेच...तिला स्वतःच्या अनुभवातून स्त्रीच्या व्यक्तित्व विकासाचे महत्व कळते. त्यासाठी ती चालीरीती, रूढी, ही संस्कृती ह्यांना शिव्या देते. आवाज उठविते. पण याचबरोबर आजच्या आर्थिक स्थितीचा, वारसा हक्काच्या कल्पनेचा किती महत्वाचा भाग आहे, याची जाणीव करून देत नाही. गौरी देशपांडे जेव्हा बंडाचा झेंडा उभारते आणि पुरुषाच्या आधाराशिवाय जगण्याचा निर्णय घेते तेव्हा ते सर्वसाधारण उत्तर नसते. ते सगळ्यांच्यासाठी उत्तर ठरत नाही. ते उत्तर तिच्या-पुरतं असतं आणि तोही निर्णय जीवनभर खरोखर किती प्रमाणात अमलात आणला

जातो याचा शोध घेतला पाहिजे. भोवतालचे सर्व वातावरण तसेच कायम ठेवून एकेका व्यक्तीने स्वतंत्र होण्याची धडपड करणे, हे उत्तर याला नक्कीच नाही. स्त्रीला स्वतंत्र होण्यासाठी, स्त्री-पुरुष संबंध अधिक सुसंवादी करण्यासाठी संघटित प्रयत्नाची आवश्यकता आहे. आणि बंडाचा झेंडा उभारू इच्छिणाऱ्या स्त्रीजातीचे पुढारीपण केले पाहिजे. आर्थिक मागण्या, सामाजिक मागण्या, सांस्कृतिक मागण्या पुढे ठेवूनच झोपी गेलेल्या स्त्रीची जागृती होऊ शकेल; समाजाला हादरे बसतील. ते नुसतेच खळबळजनक नसतील तर विधायक असतील. स्त्रीचे मन बदलण्याचा प्रयत्न म्हणजेच सांस्कृतिक क्रांती करण्याचा प्रयत्न हा आर्थिक क्रांतीच्या समांतर जातो.

स्त्रीची आज दिसणारी स्वभाववैशिष्ट्ये वात्सल्य, शालीनता, कष्टाळूपणा, आधाराची गरज वगैरे उपजतच आहेत असे मानणारे खुशाल मानोत. पण शास्त्राने हे आता सिद्ध केलंय, की जीवशास्त्रीय फरक काही प्रमाणात सोडल्यास स्त्री व पुरुष यांच्या स्वभावात आणि मनोधारणेमध्ये फारसा फरक आढळत नाही. आजची स्वभाववैशिष्ट्ये दिसताहेत ती वर्षानुवर्षाच्या श्रमविभागणीचे, आर्थिक, सामाजिक व्यवस्थेचे संस्कार आहेत. ही श्रमविभागणी नैसर्गिक बुद्धिमत्तेतील फरकामुळे आली नसून श्रमविभागणी झाली आणि स्त्रियांची बुद्धी न वापरता गंजून गेली- आज दोन पिढ्या तिच्या बुद्धीला खतपाणी मिळायला लागल्यावरोबर तिच्या व्यक्तिमत्त्वाचे रोपटे तरारून वर येताना दिसते आहे. आणखी अनुकूल वातावरण मिळाले तर हे रोपटे अधिक जोरकस वाढेल. आणि आता आढळणारी स्त्रीची म्हणून स्वभाववैशिष्ट्ये केव्हाच नाहीशी होतील. ही वैशिष्ट्ये केवळ लिंगभेदावर आधारीत न राहता एखाद्या पुरुषालाही वात्सल्य अधिक चांगल्या प्रकारे दाखविता येईल किंवा सेवाशुश्रूषा करता येईल. एखादी स्त्री अधिक चांगले राज्य करू शकेल. नवेनवे वैज्ञानिक शोध स्त्रीला अधिकाधिक मुक्तीच्या मार्गाकडे न्यायला सिद्ध होत आहेत. उद्याच्या इतिहासकाराला कदाचित स्त्रीची वैशिष्ट्ये काय होती याचा इतिहासात शोध घ्यावा लागेल. तेव्हा जाई निंबकर म्हणताहेत तशी स्थिती आता आहे खरी. पण कुठचंही तत्त्व पुढं येऊन ते रुजून त्यांची अंमलबजावणी व्हायला वेळ लागतोच ना! जीवनाची गतिमानता लक्षात घेतली तर स्त्रीचे भवितव्य उद्याच्या हातात अधिक उज्ज्वल आहे. मात्र त्यासाठी झगडण्याची आज आवश्यकता आहे.

जातो याचा शोध घेतला पाहिजे. भोवतालचे सर्व वातावरण तसेच कायम ठेवून एकेका व्यक्तीने स्वतंत्र होण्याची धडपड करणे, हे उत्तर याला नक्कीच नाही. स्त्रीला स्वतंत्र होण्यासाठी, स्त्री-पुरुष संबंध अधिक सुसंवादी करण्यासाठी संघटित प्रयत्नाची आवश्यकता आहे. आणि बंडाचा झेंडा उभारू इच्छिणाऱ्या स्त्रीजातीचे पुढारीपण केले पाहिजे. आर्थिक मागण्या, सामाजिक मागण्या, सांस्कृतिक मागण्या पुढे ठेवूनच झोपी गेलेल्या स्त्रीची जागृती होऊ शकेल; समाजाला हादरे बसतील. ते नुसतेच खळबळजनक नसतील तर विधायक असतील. स्त्रीचे मन बदलण्याचा प्रयत्न म्हणजेच सांस्कृतिक क्रांती करण्याचा प्रयत्न हा आर्थिक क्रांतीच्या समांतर जातो.

स्त्रीची आज दिसणारी स्वभाववैशिष्ट्ये वात्सल्य, शालीनता, कष्टाळूपणा, आधाराची गरज वगैरे उपजतच आहेत असे मानणारे खुशाल मानोत. पण शास्त्राने हे आता सिद्ध केलंय, की जीवशास्त्रीय फरक काही प्रमाणात सोडल्यास स्त्री व पुरुष यांच्या स्वभावात आणि मनोधारणेमध्ये फारसा फरक आढळत नाही. आजची स्वभाववैशिष्ट्ये दिसताहेत ती वर्षानुवर्षाच्या श्रमविभागणीचे, आर्थिक, सामाजिक व्यवस्थेचे संस्कार आहेत. ही श्रमविभागणी नैसर्गिक बुद्धिमत्तेतील फरकामुळे आली नसून श्रमविभागणी झाली आणि स्त्रियांची बुद्धी न वापरता गंजून गेली- आज दोन पिढ्या तिच्या बुद्धीला खतपाणी मिळायला लागल्याबरोबर तिच्या व्यक्तिमत्त्वाचे रोपटे तरारून वर येताना दिसते आहे. आणखी अनुकूल वातावरण मिळाले तर हे रोपटे अधिक जोरकस वाढेल. आणि आता आढळणारी स्त्रीची म्हणून स्वभाववैशिष्ट्ये केव्हाच नाहीशी होतील. ही वैशिष्ट्ये केवळ लिंगभेदावर आधारीत न राहता एखाद्या पुरुषालाही वात्सल्य अधिक चांगल्या प्रकारे दाखविता येईल किंवा सेवाशुश्रूषा करता येईल. एखादी स्त्री अधिक चांगले राज्य करू शकेल. नवेनवे वैज्ञानिक शोध स्त्रीला अधिकाधिक मुक्तीच्या मार्गाकडे न्यायला सिद्ध होत आहेत. उद्याच्या इतिहासकाराला कदाचित स्त्रीची वैशिष्ट्ये काय होती याचा इतिहासात शोध घ्यावा लागेल. तेव्हा जाई निंबकर म्हणताहेत तशी स्थिती आता आहे खरी. पण कुठचंही तत्त्व पुढं येऊन ते रुजून त्यांची अंमलबजावणी व्हायला वेळ लागतोच ना! जीवनाची गतिमानता लक्षात घेतली तर स्त्रीचे भवितव्य उद्याच्या हातात अधिक उज्ज्वल आहे. मात्र त्यासाठी झगडण्याची आज आवश्यकता आहे.

॥ ३ ॥

भाऊ–बहीण--आई
वडील : असाही त्रिकोण

या देशात स्त्री आणि पुरुष यांना शिक्षणाची समान संधी खरोखर आहे काय? प्रश्न तसा कठिण होता. सगळ्याच प्रश्नांची तर्कशुद्ध उत्तरे जर आयुष्यात देता आली असती तर आयुष्य इतकं गुंतागुंतीचं झालंच नसतं. कॉम्प्युटरमध्ये माहिती भरली की खटकन् एक कार्ड हातात. उलट सुलट विचार नाहीत. उत्तर फक्त एकच संभवते! तसंच पूर्वांच्या काळी एक बरं होतं. चालीरीती दृढ आणि भक्कम असल्या की सगळे काही निर्णय घ्यायचे ते चालीरीती ह्या निकषावर. मग चांगलं, वाईट, बरोबर, चूक ठरविणे सोपे असते. हजारो वर्षे एकच एक उत्तर चालत येतं. प्रश्न येतो जेव्हा हे निकष, ह्या कसोट्या कालबाह्य ठरतात तेव्हा. जेव्हा या निकषांना आव्हान देत व्यक्ती उभी राहाते संक्रमण काळात तेव्हा.

आता बघा हं. सिच्युएशन ही अशी. नीमा जोशी–वय वर्षे अठरा. नीमाचा भाऊ-वय वर्षे एकोणीस. नीमाचे वडील पोस्टमास्तर. नीमाची आई सकाळी साध्या वरणाशी फोडणीचा भात नि संध्याकाळी फोडणीच्या वरणाशी साधा भात असा टापटीपीने, काटकसरीने संसार करून जगणारी गृहिणी. एवढा काटकसरीने संसार केल्यामुळे पाचदहा हजार रुपये नीमाच्या वडिलांच्या नावे पोस्टात श्री शिल्लक.

खरं म्हणजे इतक्या सुखी संसारात प्रश्न येऊ नये. नीमाने लग्न होईपर्यंत कॉलेजात जावं. चांगलंसं स्थळ दिसलं की नीमाच्या वडिलांनी नीमाचे लग्न उरकून नीमाच्या

बाबतीतले कर्तव्य उरकल्याच्या आनंदात कृतकृत्य व्हावं. मग नीमाच्या भावाने डॉक्टर होण्याचा प्रयत्न करावा किंवा इंजिनिअर. काहीच नाही तर बी. एस्सी. होऊन औषध कंपनीचा विक्रेता म्हणून नोकरी धरावी. कसं छान विधिलिखित आहे! महत्त्वाच्या गोष्टींच्या एकदा चाकोऱ्या आखलेल्या असल्या की मग त्या त्या चाकोऱ्यांमध्ये छोटेमोठे खळगे असणारच. उदा.—नीमाच्या लग्नात हुंड्यावरून कुरबूर. मुलगा एखाद्या वर्षी नापास होणे किंवा सिगारेटी ओढू लागणे वगैरे. इतपत मनाची तयारी कोणत्याही आई-बापांची असते.

पण नीमाच्या आई-वडिलांना अनपेक्षित असे वळण त्यांच्या आयुष्यात आले. सुदैवाने म्हणा, दुर्दैवाने म्हणा, नीमाने सायन्स विषय निवडला. इंटरसायन्सला बी. ग्रूप घेतला. तेव्हा लोकांनी थट्टा केली, 'काय नीमा, डॉक्टर होणार काय?' नीमाने उडवून लावलं, 'आम्ही कुठे बाई इतक्या हुशार!' नीमाची आई म्हणाली, 'पोरीच्या जातीला उगीच नसते डोहाळे!' नीमाचे वडील म्हणाले, 'परवडलं पाहिजे ना! डॉक्टर व्हायचं म्हणजे दहा पंधरा हजार खर्च आला.' नीमाच्या भावाने मान उडविली, 'पोरी काय नुसत्या मरमर अभ्यास करतात. डोकं असतं कुठं!' स्वारी मनातून टरकली होती. कारण मागच्या वर्षी तब्येतीचे निमित्त सांगून त्याने स्वतः इंटरसायन्सला ड्रॉप घेतला होता. यंदा तो फर्स्ट क्लास मिळवणारच अशी सगळ्यांची खात्री होती. एकदा मेडिकलला गेला की पाचसहा वर्षांत गडी तयार होऊन बाहेर पडणारच. मग प्रॅक्टीस, गाडी, बंगला सगळं आलंच.

पाहता पाहता चित्र बदलले. इंटरसायन्सच्या निकालाचा दिवस. नीमा आली तीच पंखामध्ये सहस्र अश्वांची शक्ती घेऊन. चक्क पासष्ट टक्के मार्कस् पडले होते. वरून कितीही विनय दाखविला तरी तिने मनात डॉक्टर व्हायची महत्त्वाकांक्षा बाळगूनच अभ्यास केला होता. त्याच वेळी एखाद्या पत्रकाराने तिचा इंटरव्ह्यू घेतला असता आणि विचारले असते, 'तुम्हाला डॉक्टर व्हायची प्रेरणा कुठुन मिळाली?' तर तिने सरळ उत्तर दिले असते, 'माझ्या आईचे व्यक्तित्वशून्य जीवन मी बघत होते, तेव्हाच मी ठरविले की संसारगाडा ओढण्यापेक्षा काही वेगळे अस्तित्व मला पाहिजे.' किंवा तिने कदाचित असेही सांगितले असतं की 'मला समाजसेवा करायची आहे.' किंवा कदाचित हे सगळं ती सांगूही शकली नसती. नुसतीच म्हणाली असती, 'मला वेगळं व्हायचंय.'

घरी वातावरण मात्र दुःखी कष्टी होते. नीमाच्या भावाला फर्स्ट क्लास मिळालेला नव्हता. मेडिकलला ॲडमिशन मिळणे एक दिव्य ठरणार होते. नीमाचे कौतुक झाले उसन्या हसूने. आणि नीमाने जेव्हा मेडिकलला जाण्याचा विषय काढला तेव्हा वातावरणाचा दुःखी कष्टी रंग जाऊन एका नव्या ताणाचा रंग आला. नीमाच्या भावासाठी सोलापूर, बेळगाव, रांची अशा दूरदूरच्या ठिकाणी मेडिकल कॉलेजला प्रवेश

मिळविण्याचे प्रयत्न चालू होते. कॅपिटेशन फी पाच हजारांपासून दहा हजारांपर्यंत भरावी लागेल अशी चर्चा सुरू होती. शिवाय मेडिकल कोर्स महागडा, नीमासाठी पैसे आणायचे कोठून ?

नीमाचा सवाल होता–गुणानुक्रमे संधी मिळाली पाहिजे. मी गुण जास्त मिळविले, मला सहज प्रवेश शक्य. तेव्हा मीच मेडिकलला जाणे योग्य.

वडिलांचा सवाल– नीमा शेवटी नवऱ्याच्या घरी जायची. हिच्यावर एवढा पैसा ओतून उपयोग काय ? आम्ही राहणार मुलाकडे. आमचा सांभाळ तोच करणार. तेव्हा गुंतवणूक त्याच्यात केलेली बरी.

नीमाचे उत्तर– एक तर मी लग्न करणार नाही. म्हणजे माझ्या शिक्षणाच्या जोरावर दुसऱ्याला फायदा होणार नाही. किंवा मी लग्न केले तरी तुम्ही माझ्याकडे रहायला या. मुलाकडे राह्यलं पाहिजे ही चाल जुनी झाली.

या नीमाच्या सूचनेवर नीमाची आई भयंकर नाराज. 'नाही ग बाई, जावयाच्या घरचं पाणीही पिणार नाही. मुलाच्या लाथा परवडल्या.'

नीमाचा भाऊ फुरंगटून म्हणतो, 'शेवटी तुमचे नाव मीच लावणार आहे. वंश मीच चालवणार. माझ्या स्टेटस्वरून तुमचं समाजातील स्टेटस् ठरणार !'

नीमा भांबावते–सध्याच्या चालीरीतींच्या आणि आर्थिक चौकटीत हे सगळं खरं आहे. प्रश्नाचं व्यावहारिक गुळमुळीत शहाणपणाचे उत्तर हेच. स्त्रीला स्वतंत्र स्टेटस् नसलं तरी चालतं. पण पुरुषाला स्वतंत्र स्टेटस् हवं. आणि ते शिक्षण व पैसा यानेच मिळू शकते. तेव्हा शिक्षणाचा पहिला हक्क त्याला हवा. नीमाच्या मनात येतं, पण भारतीय घटनेत दिलेल्या 'स्त्री-पुरुषांना प्रत्येक क्षेत्रात समानसंधी' या हक्काचे काय ? ही समान संधी या परिस्थितीमध्ये प्रत्यक्षात येणे शक्य आहे काय ? एका प्रश्नामध्ये अनेक मूलभूत प्रश्न दडलेले असल्याचे तिच्या लक्षात येते. पहिला प्रश्न–शिक्षणासाठी पैसे खर्च करण्याची गरज का भासावी ? उद्या शिक्षणच फुकट मिळू लागलं आणि गुणवत्तेच्या आधारावर संधी हे तत्त्व सर्वमान्य झालं तर आज स्त्री म्हणून तिला मिळणारं दुय्यम प्रेफरन्स निश्चित जाऊ शकेल आणि समान संधीचा खरा हक्क उपभोगता येईल.

मग येतो दुसरा प्रश्न–पुरुषाला स्वतंत्र स्टेटस्ची आवश्यकता भासते. स्त्रीला वेगळे अस्तित्व, स्वतंत्र स्टेटस् का नको ? पुरुषप्रधान संस्कृती नाहीशी झाली तरच स्त्रीच्या वेगळ्या अस्तित्वाची गरज स्त्री-पुरुष दोघांनाही पटू शकेल.

मग ही पुरुषप्रधान संस्कृती नाहीशी कशी होईल ? ही पुरुषप्रधान संस्कृती टिकून राहिली आहे वारसा हक्कामुळे. वडिलांचा वारसा पुढे चालवायचा म्हणजे काय ? त्यांच्या संपत्तीचे मालक व्हायचे. त्यांची जात टिकवून ठेवायची. चालीरीती टिकवून ठेवायच्या. थोडक्यात संस्कारसंचित जपायचे. पण उद्या समजा, संपत्ती साठवून

ठेवण्याची कल्पनाच उरली नाही, सर्व गोष्टी समाजाच्या मालकीच्या, जातपात उरली नाही, कोणीही कोणाशी विवाह करावा– म्हणजे शुद्ध रक्ताची कल्पनाच नामशेष झाली तर ? अशा वेळी वारसा जपायचा म्हणजे काय करायचं ? आणि मग मुलगा व मुलगी ह्या फरकाची तरी आवश्यकता उरेल का ?

आणि हे सगळं समजा घडलं तर चौथ्या प्रश्नाचे उत्तर आपोआपच मिळेल. म्हाताऱ्या आई-वडिलांनी मुलाकडे जायचं की मुलीकडे, हा कूटप्रश्न निर्माण होईल का ? उत्तर असेल– जेथे आनंद वाटेल, स्वभाव जुळतील तेथे जावे. कारण आर्थिक तणाव उरलेले नसतील. समाजानेच म्हातारपणी स्वास्थ्य, सोय पाहाण्याची जबाबदारी उचललेली असेल. मी पैसा गुंतविला त्याच्या बदल्यात तू माझा सांभाळ कर, अशी कराराची भाषाच रद्दबादल होईल.

आणि मला वाटतं तेव्हाच नीमाच्या प्रश्नाचे उत्तर मिळेल–शिक्षणाची समानसंधी स्त्री आणि पुरुष यांना खरोखरच आहे काय ?

ङ

॥ ४ ॥

पुरुष म्हणजे सूर्य आणि स्त्रिया सूर्यफूल ?

परवा एका मैत्रिणीला जेवायला बोलावले होते. अमेरिकेला जायची होती ती. नवरा आधीच गेला होता. घर शोधून झाले होते. आता ती जाणार होती. निरोपाचे जेवण होते. नेहमीप्रमाणे विषय सासूबाईंवर येऊन ठेपला. ती सांगत होती, 'प्रकाशला जाऊन दोन महिने झाले, त्याला वाचनाची खूप आवड. तो सगळी वर्तमानपत्रे, नियतकालिके घेत असे. टाईम्स, इलस्ट्रेटेड वीकली, टाईम, न्यूजवीक. प्रकाश गेला तरीही मी सर्व चालूच ठेवले होते. मलाही वाचनात तितकाच रस. आणि आता उलट प्रकाश नसल्यामुळे आणखीनच वेळ मिळत होता. पण प्रकाश गेल्याच्या दुसऱ्या दिवसापासून सासूबाई मागे लागल्या होत्या, अग, आता कशाला मराठी, इंग्रजी– दोन दोन पेपर्स ? मराठी घ्यावा. इंग्लिश बंद करायला सांग. त्या मासिकांचा खर्चही फार येतो. ती पण टाकू नकोस म्हणावं त्या पेपरवाल्याला.'

मला आधी रागच आला.

'म्हणजे काय ? मी जर इंग्लिश वाचू शकते तर मला इंग्लिश पेपर का नको ? प्रकाश इतकीच मीही शिकलेली आहे.'

'तेही खरंच ग ! पण आपण बायकांनी उगीच इतकं सगळं वाचून करायचं काय ? तू काही नोकरी करत नाहीस की राजकारण खेळत नाहीस.'

मला हळूहळू गंमत वाटू लागली. पेपर ही खरंच पुरुषांची मक्तेदारी. प्रकाश

असतानासुद्धा पेपर आला की इंग्लिश पेपर आधी प्रकाश वाचणार. त्याशिवाय त्या पेपरला दुसऱ्या कोणी हात लावयचा नाही. वायकांना पेपर वाचायला मिळणं हा वाय प्रॉडक्ट. मेला घरात पडलेलाच असतो, वाचा. 'तुम्हालाही पेपर वाचायचे स्वातंत्र्य दिलेले आहे!'

गंमत म्हणजे तेवढ्यात प्रकाशचेही तिकडून पत्र आले, 'येथे येण्याच्या तयारीला लाग. भांडीकुंडी आणण्याच्या भानगडीत पडू नकोस. तुझ्या तेथील खर्चासाठी थोडे पैसे पाठवीत आहे. सध्या खर्च कमी असेल. मित्रमंडळी नाहीतच. बाहेरचा खर्च पण कमी झाला असेल. आपला मासिके, पेपर, वर्गण्या मिळून खर्च महिना ५९ रुपये होता. तोही बंद करशीलच. तेव्हा एवढ्या पैशात भागावे.'

'म्हणजे मी पेपर्स वाचू नयेत हे माझ्या सासूबाईंचे मत नव्हते, तर आमच्या पतिराजांचीही तीच इच्छा होती. थोडक्यात हे प्रातिनिधिक मत होते.'

माझ्या परदेशी जाणाऱ्या या मैत्रिणीचे मतप्रदर्शन संपते न संपते तो माझ्या दुसऱ्या मैत्रिणीने आपले मतप्रदर्शन केले, 'काय चूक आहे ग! महिना ३०–४० रुपये वाचविले तर तीनचार महिन्यांनी एखादी चांगली साडी घेता येईल.'

'नाहीतर सोनं घेऊन ठेवायचं.' माझ्या दुसऱ्या मैत्रीणबाई उद्‌गारल्या.

'अग पण पातळांवर खूप व्हायला आपण काही लहान मुले आहोत का? मला तर पुष्कळदा आपण साड्यांचे प्रदर्शन करणाऱ्या मॉडेल्स आहोत असंच वाटायला लागतं.'

'हे बघ, तुझा नवरा असताना दोघांचा मिळून एवढा खर्च वाचनावर करणे ठीक होते. पण आता एकटीसाठी करायचा म्हणजे!'

'माझं म्हणणं असं, माझं लग्न व्हायच्या आधीसुद्धा प्रकाश सर्व मासिके, वृत्तपत्रे घेतच होता की नाही! तेव्हा त्याच्या एकट्यासाठी खर्च होतच होता. पुरुषाचा एकट्याचा खर्च चालतो, बाईचा का नाही चालू?'

'तू नोकरी कर आणि खुशाल कर ना!'

'हे तुझं म्हणणं पटलं. म्हणजे मला माझ्या मनाप्रमाणे वागायचं तर आर्थिक स्वातंत्र्य हवं. एरवी कितीही म्हटलं की समानता आहे–माझे पाकीट तुझंच, तरी ते बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी!'

माझी दुसरी मैत्रीण लगेच म्हणाली, 'आणि आपल्या या पातळांच्या लोभाचा फायदा घेऊन नवरा चक्क आपल्याला विकत घेत असतो.'

'चल ग! विकत घेतो ही कल्पना कशीशीच वाटते. प्रेमाने वस्तू देणे म्हणजे काय विकत घेणे?'

'खरंच अग, माझा नवरा घराला चक्क हॉटेल समजतो. घराची काही जबाबदारी घेत नाही. त्याला कामासाठी बरेच वेळा फिरतीवर जावे लागते. घरी आला की

शनिवार–रविवार दारू, मित्र आणि पत्ते. फिरतीवरून येताना प्रत्येकासाठी मोठं मोठं पॅकेट. आधी खूप कौतुक वाटायचे त्याच्या त्या वस्तूंचे. आता मात्र त्याने आणलेल्या साड्या कधी नेसाव्याशा सुद्धा वाटत नाहीत. बायको म्हणजे भोज्या. यांना मात्र कामाचे निमित्त आहे, स्वतंत्र विश्व आहे. आम्हाला मात्र घराचं खुराडं.'

'असं म्हटलं, की माझा नवरा म्हणतो, तुम्ही करा तुमच्या स्वतंत्र मैत्रिणी. तुमचा ग्रूप तयार करा.'

'हो! आणि मैत्रिणी केल्या की पुन्हा चिडवायला तयारी, तुमच्या 'बायकी' गप्पा सुरू झाल्या म्हणून.'

'आम्हाला जर जग पहायलाच मिळत नाही तर आमच्या गप्पांचा परीघ पोचणार कसा जगापर्यंत!'

'तुला आवडेल का ग नोकरी करायला?'

'खरं सांगू का, आताच्या परिस्थितीत नाही आवडणार. पण उद्या मुलांना ठेवायची सोय झाली, घरात खूप यंत्रे आली, खाण्यापिण्याच्या आवडी बदलल्या, नवऱ्याने घरकामात मदत केली तर अगदी आनंदाने!'

'मला नाही बाई त्या नोकरीचे कौतुक. आज बघ नं! नवरा ऑफिसात गेल्यावर मी इतकी मजेत असते. फ्रेंच शिकते. बायकांच्या कॉफी क्लबला जाते. रमी खेळते.'

'तुम्हा उच्चवर्गीय बायकांचं ठीक आहे. नवरे चिक्कार पैसे मिळवतात. पण मला मात्र असं जीवन अजिबात आवडणार नाही. कुणाच्या तरी सावलीत राह्यल्यासारखं वाटतं. फ्रेंच शिकणं, कादंबऱ्या वाचणं ह्या अगदी 'अनप्रॉडक्टिव्ह' (अनुत्पादक) गोष्टी वाटतात. पुन्हा आपला नवरा संध्याकाळी घरी आला की नाजूक, नखरेल, आज्ञाधारक, गोड, शालीन भूमिका कायमच.'

'तरी बरं! मी निदान फ्रेंच तरी शिकते. माझ्या इतर शेजारणी नुसत्या झोपा काढतात. तर माझा नवरा मला म्हणतोच, दुपारी कोठे बाहेर जाऊ नकोस. झोप घे. म्हणजे मी ऑफिसातून यायच्या वेळेस तू फ्रेश दिसली पाहिजेस.'

'वारे वा! हे म्हणजे फारच झालं. आम्ही काय 'वेश्या' आहोत काय? संध्याकाळी थकून भागून घरी आल्यावर यांच्या मनोरंजनार्थ सेवेस हजर.'

'हे म्हणजे एखाद्या सूर्यफुलासारखं झालं. सूर्याबरोबर स्वतःचे मुखही सूर्यफूल बदलत जाते.'

पुरुष म्हणजे सूर्य आणि स्त्रिया सूर्यफूल ही विभागणी बरोबर आहे का?

॥ ५ ॥

बाइ कितीही नटली तरी हौस कोणाची फिटली ?

परवा 'ती फुलराणी' नाटक पाहिले, मंजुळा उर्फ फुलराणीचे वडील दगडोबा साळुंके आपले जीवनभाष्य सांगत सांगत बाईवर येऊन घसरतात. 'अहो, बायका शेवटी स्वतंत्र होणार ? अगदी स्वतंत्र होऊन पैसे मिळविले, पावडर लावली, वेणी घातली, लिपस्टिक फासली तरी कोणासाठी ? अहो म्हणच आहे ना !

'बाई कितीही नटली.

तरी हौस कोणाची फिटली ?'

आणि सणकन् मला एका मुलाखतीची आठवण झाली. स्त्रियांच्या इंग्रजी साप्ताहिकाच्या त्या संपादकबाई होत्या. त्यांना मी प्रश्न विचारला, 'व्यक्तिमत्त्व विकास, स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा, स्त्री-मुक्ती असा तुमच्या साप्ताहिकाचा उद्देश आहे असे तुम्ही म्हणता. एखादादुसरा लेख यासंबंधी असतोही, पण मासिकाची बरीचशी पाने नव्या फॅशन्सचे कपडे घालून मिरवणाऱ्या मॉडेल्सनी भरलेली असतात. स्त्रीच्या शरीराचा वापर करून असंख्य जाहिरातदार आपला माल खपविण्याचा प्रयत्न पानोपानी करतात. याचा स्त्रियांच्या मनावर काहीच परिणाम होत नसेल ? तिच्या मनात 'स्त्री म्हणजे प्रदर्शनीय वस्तू, सुंदर शरीर' अशी स्वतःची प्रतिमा तयार होत नसेल का ?'

त्यांनी उत्तर दिले, 'हे बघा, फॅशन्स करणे म्हणजे सुंदर दिसण्याचा प्रयत्न करणे.

३४६८
रद्द

निसर्गाने जे काही दिलेले आहे ते मानव आपल्या बुद्धीने सुंदर करण्याचा नेहमीच प्रयत्न करतो. स्त्रीने सुंदर राहिलेच पाहिजे. दर वेळी रंगरंगोटी केलेली स्त्री फुलपाखरूच असते असं मानण्याची चाल केव्हाच बाद झाली आहे. अगदी साधं अन्नाचंच उदाहरण घ्या ना! रोजचं अन्न, पण आपण त्यावर किती संस्कार करतो, सजवून टेबलावर मांडतो.'

बाईचं उत्तर बरबर बिनतोड होतं. सुंदर दिसलंच पाहिजे. कलात्मक जीवन जगण्यातच खरं माणूसपण आहे. नाही तर जनावरात आणि आपल्यात फरक काय राहिला.

समर्थन बरोबर आहे. या समर्थनाला विरोध करताना गरिबी, दारिद्र्य, सामाजिक जाणीव वगैरे निकष लावता येतील. लोक लावतातही. मी ते निकष लावणार नाही. मी तात्त्विक निकष लावू इच्छिते.

साधी गोष्ट आहे. बाईनी समर्थन करताना अन्नाचे उदाहरण घेतले. ते महत्त्वाचे आहे. आपण अन्नाचा उपभोग घेतो. आणि उपभोग घेताना अधिक आकर्षक वाटावे, जिव्हेबरोबर डोळ्यांनाही सुख मिळावे म्हणून अन्न सजवून ठेवतो. उपभोगाच्या वेळी सगळ्या संवेदना इंद्रियांचा वापर झाला तर आनंद जास्त, सुख जास्त.

परंतु अन्नाबाबत घेतला जाणारा उपभोगाचा दृष्टिकोन शरीराबाबतही घेतला जावा का? हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. पुरुषही शरीराकडे तसा बघतो; आपल्या स्वतःच्या व बाईच्या. आणि बाईला तर आपल्या संस्कृतीनेच शिकवून ठेवलंय, 'बाईग, तू, उपभोगाची दासी. पुरुषाच्या वासनेची शिकार.' पूर्वीच्या काळी हे ठीक होतं, पण आता मानव संस्कृतीची इतकी पावले चालून आला तरी त्याने स्त्रीकडे केवळ लैंगिक भुकेचे साधन म्हणून बघावे; इतकंच नव्हे, तर स्त्रीने स्वतःकडे तसंच बघावे. नव्हे, तर त्याच विचारांना उत्तेजन द्यावे हे बरोबर आहे का? स्त्री शिकली-सवरली तरी तिचे मुख्य भांडवल राहाते शरीर सौंदर्य. मुलगी दाखवायला घेऊन जायची. पहिला प्रश्न 'दिसायला कशी आहे?' अगदी मुलीमुलीसुद्धा आपापसांत हाच प्रश्न विचारतात. कारण त्यांना जगाच्या बाजारातील सौंदर्य आयुष्यात इतकं महत्त्वाचं ठरतं की नक्कल, विडंबन, विकृतीकरण सर्व काही सुरू होतं. आज फॅशन्सवर टीका होते याचे कारण आज फॅशन्सचा बाजार होतो. ती कला राहात नाही.

मग फॅशन्स करू नयेत का? सौंदर्याची काळजी घेऊ नये का? फॅशन्स कराव्यात. सुंदर दिसण्यामध्ये कला आहे, असली पाहिजे. पण ते सुंदर दिसणे हे दुय्यम राहिलं पाहिजे. सुंदर दिसणं ही व्यक्तिमत्त्वाभोवती असलेली 'झालर' इतकंच त्याचे कार्य. बाकीचे गुण, कौशल्य, बुद्धिमत्ता यांच्या विकासाला जास्तीतजास्त उत्तेजन दिले पाहिजे. स्त्रीचे प्रश्न आज फॅशन्सचे नसून व्यक्ती म्हणून स्वतःकडे पाहता यावे, त्यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करण्याचे आहेत. इंजिनीयर, डॉक्टर, कुशल

कारागीर, पायलट सर्व क्षेत्रात आघाडीप्रमाणे नोकऱ्या करता याव्यात यासाठी तिने स्वतःच्या सौंदर्याला विसरण्याचे हे दिवस आहेत. आज ती जेव्हा सौंदर्याचा विचार करते तेव्हा पुरुषाच्या संदर्भातच करू शकते. तिच्या फॅशन्स या केवळ लैंगिक आकर्षण कसे वाढेल या निकषावर बेतलेल्या असतात. व्यक्तिमत्त्वाचा उठाव होईल, अशा बेतलेल्या नसतात.

आता कोणी विचारील, तुम्ही हे कसे काय ठरवाल हो ? कोणती स्त्री फॅशन्सकडे कला म्हणून वघते आणि कोणती केवळ आकर्षक शरीर दिसावे म्हणून फॅशन्सचा आश्रय घेते ? हे दाखविणे तसं कठिण आहे पण अशक्य नाही.

ज्या ज्या स्त्रियांना फॅशन केल्यावर सतत जाणीव राहाते, ज्यांची फॅशन स्त्रीत्वाला उत्तेजन देणारी असते, तेथे आपल्याला ही वस्तुपणाची जाणीव निश्चित दिसून येते. जेथे व्यक्तिमत्त्व व फॅशन यांचा सुंदर मिलाफ झालेला असतो तेथे फॅशन अशी वेगळी दिसणार नाही. ती स्त्री व्यक्ती म्हणून तुमच्या नजरेत भरते.

दुसरी गोष्ट दिसून येते ड्रेसच्या निवडीमध्ये. कामाच्या वेळी कामाला सोयीस्कर ड्रेस. संध्याकाळी, समारंभांना वेगळ्या प्रकारचा ड्रेस. अशा प्रकारे जेव्हा स्त्रिया, तरुण मुली फरक करतात तेव्हा त्यांच्या मनातील स्वतः वद्दलची जाणीव निश्चित लक्षात येते.

हे सर्व अतिशय सूक्ष्म परिणाम असतात. आजची स्त्रियांची नियतकालिके दोन प्रकारचे परिणाम साधत राहतात. एक स्त्रीची परंपरागत भूमिका कायम टेवण्याचे काम. सु–गृहिणी, सु–पत्नी, सु–माता कसे व्हावे यावर चर्चा, लेख, कथा. मराठीतील एका तरी स्त्रियांच्या मासिकाने ' मराठी विनोदी साहित्यात स्त्रियांचे विडंबन 'अशा प्रकारचा लेख लिहिला आहे ? की नेहमी वायकांवर घसरणाऱ्या विनोदी लेखकांची हजामत केली आहे ? ' वायका भांडकुदळ, वायकांना डोके कमी, त्यांच्या तोंडात तीळ भिजत नाही ' अशा प्रकारच्या कल्पना ही मंडळी सातत्याने पसरवीत असतात. पण वायका अशा का वनतात ? एकमेकींची उणीदुणी काढणे इतकी संकुचित दृष्टी त्यांना का लाभते याचा शोध घेण्याचा कोणी प्रयत्न केला आहे ?

दुसरी नियतकालिके स्वतःला आधुनिक म्हणवतात आणि स्त्रियांची स्वतःच्या शरीराबद्दल व्यापारी प्रतिमा तयार करतात. ' फॅशनेबल कपड्यांचे नमुने, ' ' स्त्रीला लैंगिक सुख मिळते काय ? ' अशा प्रकारच्या विषयांमध्ये धीटपणा दिसतो खरा पण म्हणून स्त्री स्वतंत्र व्यक्ती म्हणून पुढे येण्यासाठी काय प्रयत्न होतात ? तिच्या बुद्धीवरचा गंज काढण्यासाठी काय केले जाते ? आणि असे प्रयत्न जर होणार नसतील तर दगडोबा साळुंके म्हणतात तशीच स्त्रीची स्थिती राहील. बाई कितीही नटली तरी त्याने तिला स्वातंत्र्य मिळेल काय ?

॥ ६ ॥

लग्न : कधी ? कोणाशी ? कोण ठरवणार ?

स्त्रीच्या आयुष्यात विवाहाचे स्थान काय ? भयंकर गंभीर वगैरे वाटतो नाही हा प्रश्न ! हा प्रश्न किती मुलींच्या मनात येत असेल ? स्त्री-स्वातंत्र्याचा वगैरे प्रश्न कधी निघाला तर बुजुर्ग खुशाल सांगून टाकतात, 'ती पाश्चात्त्य देशांतील फॅडं आमच्याकडे नाहीत. अहो, आमच्या संस्कृतीनं प्रत्येकाला प्रत्येकाची जागा ठरवून दिली आहे. आमच्याकडे स्त्रिया आनंदाने कुटुंबाचे काम करतात आणि सुखी असतात.' संस्कृतीच्या अदृश्य ताणांवर केवढा हा विश्वास !

परिस्थितीच अशी आहे. दर वर्षी हजारो, लाखो मुलींचे विवाह होतात. मंगलाष्टके कौतुकाने रचली जातात. आरोह–अवरोहाच्या लयीत गायिली जातात. अक्षतांचा पाऊस पडतो. आई-वडिलांचे निःश्वास ऐकू येतात. काळजी संपली. जबाबदारी पार पडली. आपण श्वास घेतो, पाणी पितो, तितक्याच अपरिहार्यपणे नकळत लग्नही करतो. अशा प्रकारची लग्ने हा जुगार असतो हे माहीत असूनसुद्धा आपण तो खेळतोच. अनुभवांती लक्षात आलंय की साधारण फासे बरे पडतात. आणि नशिबावर फारसे काही अवलंबून आपण ठेवलंच नाहीय्. सगळं पद्धतशीर आखीव–रेखीव आहे; चालीरीती, रूढी, संस्कार, शिक्षण. वेल कशी चढवायची, कशी वाढू द्यायची, सुशोभित कशी करायची या सर्वांची काळजी संस्कृती नामक माळी घेत असतोच ! मनाच्या वेड्यावाकड्या वाढणाऱ्या फांद्या छाटून टाकूनच मग उंच वाढायची परवानगी असते.

विशेषतः मुलीला. तिला ठाकठीक करून ती या चौकटीत व्यवस्थित बसेल याचा इतका विश्वास असतो. वरं, साधने वापरली जातात ती इतकी सूक्ष्म, अदृश्य.

पूर्वी ढोलांच्या ढमढमाटात, नगारे बडवत सती जाणाऱ्या स्त्रीचा गौरव व्हायचा. सतीचे उदात्तीकरण करून सतीचे महत्त्व इतक्या लहानपणापासून त्या तरुणीच्या मनात बिंबविलेले असायचे की तिच्या आयुष्याचा अर्थ तिला सरणावर चढण्यातच दिसायचा. पद्धतशीरपणे संस्कृतीचे डगले घातलेले बागुलबोवा जागोजाग उभे असायचे.

तर आता लग्नाच्या बोहल्यावर चढवायला मारपीट करायची गरज नसते. सनातन संस्कृतीचे वारसे–रक्तातून वाहणारी परंपरा, साहित्यातून गायिलेले स्त्रीच्या सुकोमलतेचे गोडवे, पुरुषाच्या भक्कम शरीराचा आधार, वाकडे पडलेले पाऊल, चाकोरीच्या बाहेरील घनदाट अंधाराची भीती. आणि एवढेही एखादी चुकार तरुणी प्रश्न विचारायला पुढे सरसावलीच, 'प्रत्येक मुलीने आयुष्यात लग्न केलंच पाहिजे का?' तर तिची अंथरुणावर खितपत पडलेली आई डोळ्यांत पाणी आणून म्हणते, 'स्वाती, तुझं लग्न होईतोवर माझे प्राण घुटमळत राहतील.'

तीच स्वाती माझ्यापुढे बसली होती. स्वाती गोडबोले तिचं नाव. आयुष्यात काही तरी करावं, आयुष्याला अर्थ आणावा, 'मी कोण?' चा शोध घ्यावा म्हणून आज ती धडपडतीय.

तिला विचारलं, 'आज ज्या आकांताने प्रश्न विचारते आहेस तो तेव्हाच का नाही विचारलास?'

स्वाती म्हणाली, 'कितव्या वर्षी? वयाच्या अठराव्या वर्षी? फार स्वप्नील वय होतं ते! सगळ्या जगाकडेच कुतूहलाने बघायला शिकत होते मी. आकाश आवडायचं, पण आकाशात मुक्त मनानं उडायला भीती वाटायची. बळजबरी कुठेच नव्हती. पण आईची शेवटची इच्छा. समोर आणला तो मुलगाही काही वाईट नव्हता. स्थळ चांगलं होतं. कधीतरी लग्न करायचंच. तरीसुद्धा कुठेतरी नकोसं वाटत होतं. पळून जाऊन घरातलं सगळं ते प्रेमळ वातावरण उद्ध्वस्तही करता येत नव्हतं. हो म्हणून टाकलं. नवरा छान आहे. पण...'

'स्वाती, तुला लग्नाची चौकटच नकोशी वाटतीय का?

'मला सांगता येत नाही छायाताई, लग्नाच्या चौकटीचाही आधारच वाटतो मला. हक्काचा साथीदार आहे, मुलं आहेत दोन चिव चिव करणारी. माझ्या एक अविवाहित मैत्रिणीला बघते नं मी! फार एकाकी जीवन वाटतं तिचं!'

स्वातीला वरंच काही म्हणायचं होतं. पण तिला ते व्यक्त करता येत नव्हतं. ते परवा मला मीनाच्या बोलण्यात सापडलं.

'खरं सांगू, नोकरी करून अगदी सुखात होते मी. फावल्या वेळात पेंटिंग करत

होते. मैत्रिणी होत्या, मित्र होते. तरीसुद्धा ज्या माझ्या मामांकडे मी राहात होते ते लोक इतकं चाकोरीतील जीवन जगणारे होते, प्रेमळ होते, लाघवी होते. माझे अविवाहित राहाणे किंवा अनुकूल माणसाचा शोध घेत प्रतीक्षा करणे त्यांना समजू शकत नव्हते. घरातल्या त्या वातावरणाने माझा बळी घेतला. एक दिवस चक्क एका वऱ्यापैकी माणसाला मी विवाहासाठी होकार देऊन बसले. लग्न झालं, पुढे मोडलं.'

अशी ही मीना विवाहाच्या अनुभवानं पोळली नाही. 'नाही बुवा जमलं' म्हणून दोष न देता सरळ बाहेर आली.

यामध्ये दोषी कोण ? स्वातीची आई ? जिने मृत्युशय्येवर असताना, लग्नाचा आग्रह धरला आणि स्वातीच्या नकळत तिला एका आखलेल्या चौकटीत जाऊन बसावं लागलं !

मीनाचे मामा आणि मामी दोषी होते ? लग्न करून सुखी हो म्हणणारे ? स्त्री आणि लग्न या दोन गोष्टींच्या समन्वयातच सुखाची मर्यादित व्याप्ती ठेवू पाहणारे ?

मीना लाटेबरोबर वाहत गेली का ? या व्यक्ती जेव्हा माझ्याशी बोलतात तेव्हा त्या व्यक्ती राहात नाहीत. त्या प्रातिनिधिक बनतात. माझ्या लक्षात येतंय, आजच्या तरुण मुलींवर ही अदृश्य दडपणे फार मोठ्या प्रमाणावर पडत आहेत. मुलीला आखलेल्या चौकटीत बसवायाचं आणि मग 'घरचं सगळं व्यवस्थित करून बाहेरचं काम करते हो' या कौतुकाच्या वाक्यातील घरचं सगळं करणं हे प्रथम महत्त्वाचं, हे फार मोठे गृहीतकृत्य ठासून सांगितलेलं असतं. आजच्या तरुण मुलींचा कोंडमारा तेथे होतोय. तिला व्यक्ती म्हणून प्रथम जगू द्या, तिच्या व्यक्तिमत्त्व वाढीसाठी आवश्यक वातावरण तयार करा. आज अजूनही तरुण मुलगी एखाद्या वृद्ध व्यक्तीला वाकून नमस्कार करते तेव्हा त्याच्या तोंडून सहज उद्‌गार निघून जातात, 'चांगला नवरा मिळेल हो पोरी.' किंवा एखादी सुंदर मुलगी नमस्कारासाठी वाकते तेव्हा कौतुकोद्‌गार निघतात, 'कोणीही मागणी घालील हो तुमच्या सोन्यासारख्या मुलीला !' त्या तरुण मुलीच्या मनातील तारुण्यसुलभ स्वप्ने आणखी गडद होतात. तिला कळत नसते– या सर्व तिच्या व्यक्तिमत्त्वाला खुरटून टाकणाऱ्या अशुभ सावल्या आहेत.

या अशुभ सावल्या काढून टाकून निखळ मोकळ्या उन्हात स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे चैतन्यपूर्ण रोपटे वाढायला आपण मदत करणार की नाही ?

॥ ७ ॥

स्त्रीला घरच नसतं....

बंद दरवाजा–अमृता प्रीतम.

अनुवाद : प्रतिभा रानडे, केसरी प्रकाशन.

कादंबरीचे सूत्र आहे–स्त्रीला घर नसतंच. पहिलं घर बापाचं, नंतरचं नवऱ्याचं– कारण घर नेहमी पुरुषाचेच. पुरुष नेहेमीच बायकांना घराबाहेर काढत आला आहे. पण कधी कोणी बाईने पुरुषाला घराबाहेर काढलं आहे का?

भारतीय स्त्रीजीवनाची अगतिकता, असहाय्यता इतकी सहज क्वचितच व्यक्त होते. छोटीशी शंभर पानी कादंबरी. एका आधुनिक, सुशिक्षित स्त्रीच्या जीवनाचा आलेख. आणि तरीही त्यात हजारो वर्षांचा स्त्रीचा मूक आक्रोश घुमत राहिल्याचा भास होतो. स्त्री ही परावलंबी, गुलाम, दासी. मग ती कष्टकऱ्यांच्या घरातील स्त्री असो किंवा मध्यमवर्गीय खाऊनपिऊन सुखी घरातील स्त्री असो. एक पंजाबी लोकगीत या पुस्तकात येते. ते खूप बोलके आहे–

अलगोजू बज्जदा ढाणिये की,
मेरा मन नही लगदा पाणिये की
मिया अलगोजुआ–मिया अलगोजुआ!

अर्थ असा आहे–हे कातणं, चरखा फिरविणं, चूलमूल, खाण्यापिण्याची व्यवस्था- एक स्त्री हे सगळे कष्ट काय म्हणून करते? वजन काचेचं असू दे, नाहीतर चांदीचं

असू दे, नाहीतर मातीच्या मडक्याचं– त्याचा भार व्हायचा तो होतोच– कुठल्यातरी माणसाची गुलामी, सेवा. शरीराला सहन होतं त्यापेक्षा जास्त मनसुद्धा त्यांचंच गुलाम बनतं.

स्त्रीच्या गुलामीचे आणि जन्मजात दुःखाचे व्रण 'कम्मीच्या' (नायिकेच्या) मनावर फार लहानपणापासूनच उमटले होते. छोट्याशा कम्मीने वडिलांनी संतापून आईला मारलेले पाहिले होते. आईच्या अंगावरचे काळेनिळे व्रण आणि अश्रूंची सतत धार. कम्मीच्या आईचे आई-वडील लहानपणीच वारले. काकांनी इस्टेट हडप केली. आणि कम्मीच्या आईचे लग्न लावून दिले. कम्मीची आई रिकाम्या हाताने घरात आली. त्याचा राग कम्मीच्या वडिलांनी जन्मभर काढला.

एक प्रसंग मात्र कम्मीच्या मनात जन्मभर भळभळणारी जखम बनून राहिला. कम्मीच्या आईच्या हातून इस्त्री करताना वडिलांच्या शर्टची कॉलर जळाली. मध्यरात्री कम्मीला जाग आली तेव्हा घराचा बाहेरचा दरवाजा कोणीतरी क्षीणपणे खटखटत असल्याचा भास झाला. ती घाबरून आईच्या खोलीत आली. अंधारातच तिला आई खोलीत नसल्याचे जाणवले. तिने दाराकडे झेप घेतली. वडिलांनी दंडाला ओढून तिला अडवायचा प्रयत्न केला. अवघ्या सोळा वर्षांची कम्मी. दाराची कडी काढून बघते तो कडाक्याच्या थंडीत बाहेर आई गाठोड्यासारखी पडलेली. अंगात फक्त खमीज. तिने आईला उचललं. अंग बर्फासारखे थंडगार. दोन दिवस न्यूमोनियाच्या तापाने जळून आई गेली. कम्मीच्या मनात बापाबद्दलचा संताप ओतप्रोत भरून राहिला. आणि गर्द उदासीन जीवन झाकोळून गेले. पुढे जीवनभर याच उदास सुरांनी तिला साथ केली.

कम्मीला लग्नाबद्दल नफरत होती. पण ती कधी कडवट बनली नाही. तिने कांग्रो खोऱ्यांतील दूरच्या एका गावी एका छोट्याशा शाळेत आपले घर वसविण्याचा प्रयत्न केला. वसतिगृहातील मुले, नदी, पहाडातील धुंद वासाची फुले, पहाडी स्त्रिया यात ती रमून गेली. स्वतःसाठी तिने कुंपण घालून घेतले. वडिलांचे पत्र आले. आईने तिच्या मैत्रिणीला शब्द दिला होता. सत्यपालचा व तिचा तोंडी साखरपुडा झाला होता. कम्मीने प्रिन्सिपॉलबाईंचा सल्ला घेतला. ती कम्मीची मानलेली आई. बाई स्वतः अविवाहित राहिली होती. पण जीवनाकडे खूप गांभीर्याने बघू शकत होती. बाईनी कम्मीला समजविले, 'हे बघ, आपल्याच टेलीफोनचा नंबर आपण जन्मभर फिरवीत राहिलो तर पलीकडून आवाज येईल का? तसंच आहे हे. आयुष्याच्या यंत्रातून जर काही प्रतिसाद हवा असेल तर स्वतःचाच नव्हे, दुसऱ्या कोणाचा नंबर फिरवावा लागतो.' जीवन हा एक संवाद आहे हे बाईंना स्वतःच्या एकाकीपणातून उमगलेले होते.

कम्मीचे सत्यपालशी लग्न होते आणि पंधराव्या दिवशी तिच्याच वयाची एक

मुलगी दारी हजर. ती सत्यपालची बरेच वर्षं प्रेयसी आहे आणि तिच्या पोटी सत्यपालचा अंकुर वाढतो आहे. सत्यपालने कम्मीच्या वडिलांनी दिलेल्या घरावर डोळा ठेवून हे लग्न केले होते तर ! जणू कम्मीला असं काही होणार याची अस्फुट चाहुल होती. न चिडता न संतापता कम्मी तिचे सत्यपालशी लग्न लावून देते आणि तिच्या मार्गातून दूर होते. पुन्हा एकदा जगापासून दूर आपल्या शाळेत येऊन रमते. स्त्रीच्या दुःखाचे सूत्र तिला इतक्या स्पष्टपणे उमगलेलं असते, की तक्रार करण्याची तिला गरजही वाटत नाही.

पण एक अनामिक हुरहूर, ओढ– कम्मीला वाटत रहायची, 'माझे हात एका अस्तित्वाला शोधताहेत– कुणाचं अस्तित्व कोणास ठाऊक ! पण एखाद्या पुरुषाचे अस्तित्व.' हीच ओढ पुन्हा एकदा तिला सुमेशच्या प्रेमाला बळी पाडते. पत्रकार सुमेश अचानक तिच्या त्या छोट्याशा खेडेगावात येतो. आजारी पडतो. पुस्तकांची देवाणघेवाण होते. त्याला कम्मीचे हळवे, चिंतनशील मन कळते. तो कम्मीवर अनोख्या प्रेमाचा वर्षाव करतो. पुन्हा एकदा कम्मीच्या मनात वादळ सुरू होते. मॉं– तिच्या प्रिन्सिपॉल बाई सल्ला देतात, 'कम्मी, समुद्रात वादळ असतं म्हणून कोणी जहाज हाकारायचं थांबतं का ? तू अशी किनाऱ्यावर किती दिवस राहणार ?' तिला स्वतःबद्दल वाटायचं– आपलं आयुष्य रहाटाला बांधलेल्या दोरासारखं अडकून पडलंय– तिच्या शाळेत दरवर्षी मुली रिकाम्या घागरीसारख्या यायच्या आणि विद्येचे पाणी भरून घेऊन जायच्या– आपापल्या प्रियकराकडे. मैलोगणती समुद्र ओलांडून त्यांचा प्रवास व्हायचा.

सुमेशला कम्मीच्या प्रथम लग्नाची व अपयशाची माहिती असते. तो तिला पत्रातून लिहितो– 'कम्मी, माझ्या जीवनाच्या कागदपत्रावर मला कोणाच्या कायद्याचं शिक्कामोर्तब नकोय. मला हवं आहे प्रेम ! कायदेकानूची सही नको.'

आणि ह्याच सुमेशबरोबर संसार थाटल्यावर थोड्याच दिवसांत ती घटना घटते. सुमेशचे आईवडील येत असल्याची तार येते. सुमेश या विनकायद्याच्या लग्नाला घाबरतो. शेवटी करिअरचा प्रश्न असतो. वडील चिडले तर परदेशी जायला पैसे मिळणार नाही. जन्मभर पत्रकार म्हणून मिळणाऱ्या दिडक्यांवर गुजराण करावी लागेल. तिची रवानगी एका हॉटेलात होते. त्याचा दरवाजा तिला बंद होतो. स्वाभिमानी कम्मीला ते मानवणे शक्यच नव्हते. ती पुन्हा एकदा आपल्या घरी परत येते–शाळेत. तिच्या हक्काच्या घरी.

तिचे त्याला शेवटचे पत्र असते–

'सुमेश !

तुझे घर तुला लखलाभ होवो.

तुझा पैसा, तुझ्या बाबांचा पैसा !

राजवाड्यासारखं तुझं घर तू सजव.
धर्माची,
समाजाची,
गौरवाची,
प्रतिष्ठेची
किती सुंदर सुंदर फुलं तुझ्या घराच्या फुलदाणीत आहेत !
आणि माझं प्रेम–
रस्त्यातल्या धुळीसारखं– तुझ्या पायाखाली पडलं आहे. आज तू तुझ्या सुंदर घरात जाशील ना ?
तेव्हा त्या पायपुसण्याला आपले पाय पुसून जा.

—कम्मी.'

माझ्या लक्षात आले, लेखिकेने हे तीन पुरुष तीन व्यक्ती म्हणून वारकाव्याने मुद्दामच रंगविल्या नाहीत. हा संघर्ष त्या व्यक्ती व कम्मी यांच्यातील संघर्ष नाहीच मुळी. हे तिघेही पुरुष समाजाचे प्रतिनिधी आहेत. स्त्रीला दासी म्हणून वागविणारा वाप, घरावर डोळा ठेवून लग्न करणारा सत्यपाल आणि प्रेमापेक्षाही करिअरला जपणारा सुमेश. हे तिघेही स्त्रियांना वापरतात. याच अनुभवातून कन्मीचे स्वतःचे आयुष्य कोरले जाते. तिला स्वत्व सापडते. याचेच उत्तर लेखिकेने कादंबरीच्या सुरुवातीला लिहिलंय.

यह बंद दरवाजा
अपनी खोई हुई.
चाबी के नाम !

॥ ८ ॥

स्त्रीला कुटुंबापासून तोडले पाहिजे....
नवे कुटुंब निर्माण झाले पाहिजे....

परवा एका बाईशी माझी वादावादी झाली. भांडणच म्हणा ना ! बाईंचा युक्तिवाद असा, 'काय ग, तू एवढी स्त्री-मुक्तीच्या नावाने आरडाओरडा करतेस, स्त्री-मुक्तीसाठी सोपे उत्तर काय, आर्थिक स्वातंत्र्य द्या. स्त्रीला नोकरी द्या. आज नोकरी करणाऱ्या असंख्य मुली बघतेस नं ? अगदी या लांडे स्कर्ट घालणाऱ्या खिश्चन, पारशी मुलींपासून ते सचिवालयातील काकू मुलींपर्यंत. काय ग, या मुली पैसे कमावतात आणि कसले स्वातंत्र्य मिळवतात ? यांची अय्या, ईश शब्दफुले तर अजून संपलेलीच नाहीत. उलट या फॅशनेबल मुली तर सतत स्वतःच्या स्त्रीत्वाची जाणीव करून देतात. स्वतःच्या मनात वागवतात. म्हणजे तुझ्या म्हणण्याप्रमाणे घरात राहून स्त्रीत्वाची जाणीव टिकून राहते आणि बाहेर चारचौघांत मिसळलात, व्यवहार केलेत तर ती लगेच नाहीशी होते असं काही मला आढळत नाही. स्त्री-पुरुष भेद असे एकदम नष्ट होत नाहीत. आपल्या महाराष्ट्रीयन मुलीसुद्धा कळत नकळत आपल्या स्त्रीत्वाचा फायदा घेतच असतात की. बॉस बोलला तर भराभरा डोळ्यांतून अश्रू. ओव्हरटाईम करायला थांबायची तयारी नाही. रात्री जाताना सोबत कोण ? तेव्हा तुझे हे आर्थिक स्वातंत्र्याचे उत्तर आपल्याला काही पटत नाही !'

मी खरंच बुचकळ्यात पडले. आजची आर्थिक स्वातंत्र्य मिळालेली स्त्री पूर्वीच्या स्त्रीपासून फारशी बदललेली नाही. अगदी परवा परवा मृणाल गोऱ्यांचा हाच

अनुभव आहे. महागाई प्रतिकार महिला समितीच्या आंदोलनात ऑफिसात जाणाऱ्या स्त्रिया, तरुण मुली फारच थोड्या प्रमाणावर आल्या. घोषणा द्यायला नकार. पुस्तिका विकत घ्यायला नकार! मनाची कवाडे संपूर्ण बंद. फक्त कवाडे उघडी होती, ती नव्या सिनेमांची नावे ऐकायला किंवा साडीच्या खरेदीविषयी बातचीत करायला.

याचे कारण काय? आर्थिक स्वातंत्र्य हा परवलीचा शब्द होऊन बसलाय, स्त्री-मुक्ती चळवळीत. पण हे आर्थिक स्वातंत्र्य मिळवायला बाहेर पडलेल्या स्त्रीच्या स्वभावामध्ये आणि तिच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात फरक पडला नाही. तिची कामेसुद्धा तीच पारंपरिक. समाजवादी देशातसुद्धा स्त्रिया खूप मोठ्या प्रमाणावर बाहेर पडल्या. त्यांच्या कामाचे वैविध्य वाढले. अगदी अवकाशवीर स्त्रीपासून ते तंत्रज्ञ, डॉक्टर अशा विविध क्षेत्रांत स्त्रिया लीलया वावरू लागल्या. तरी पुन्हा दुकानांच्या पुढे रांगा लावायची वेळ आली की रांगेमध्ये स्त्रियाच जास्त दिसतात. इतकेच नव्हे तर जास्तीत जास्त मुलांना जन्म देणाऱ्या मातांना राष्ट्रमाता म्हणून पदके मिळतात. गौरव होतो. अर्थ काय? स्त्रीकडे वंशनिर्मिती, कामगारनिर्मिती करणारे साधन म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन गेलेला नाही.

आपल्याकडे तर नोकरी करणाऱ्या तरुण मुलींमधला मागासलेपणा अजून गेलेला नाही. घरात पूरक उत्पन्न म्हणून नोकरीसाठी बाहेर पडणाऱ्या बहुसंख्य. कोणी हुंडा जमवायला. कोणी वडिलांच्या मागे भावंडांना पोसायला. कोणी विवाहिता नवऱ्याचे उत्पन्न पुरत नाही म्हणून. आणि काही चटक चांदण्या केवळ पैशाची चटक म्हणून सर्वसाधारणपणे या स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात कनिष्ठ जागेवर काम करतात. त्यांचे स्वतःचे कुटुंबातील स्थान दुय्यम, नोकरीच्या जागी काम दुय्यम—पाट्या टाकण्याचे. तिचे समाजाशी नाते असते तेच अप्रत्यक्षपणे–नवऱ्याची पत्नी म्हणून. नवरा समाजाच्या व्यवहारात भाग घेणार. त्याची घरवाली सुख पाहणारी, तिला मतदानाचा हक्क मिळाला तरी ती नवऱ्याचेच मत द्विगुणित करते इतकेच–अशी परिस्थिती असताना आर्थिक स्वातंत्र्य मिळाले तरी स्त्री-पुरुष भेद संपेल कसा?

यासाठी करायचं काय? याचे उत्तर परवा 'वुमन इन चायना' या पुस्तकाचा अभ्यास करताना मिळाल्यासारखं वाटलं. चीनमध्येही परिस्थिती भारतासारखीच. मागासलेली स्त्री. काम करायला बाहेर पडणाऱ्या अगदी थोड्या. क्रांतीनंतर कुटुंबनियोजनाचा प्रश्नही मोठा, मात्र त्यांनी कुटुंबनियोजन या प्रश्नाकडे दोन दृष्टिकोनातून पाहिलं. एक लोकसंख्या थोपविणे. त्याहून महत्त्वाचा दुसरा दृष्टिकोन स्त्रीची 'स्त्रीत्वा तून' मुक्ती करणे. जन्म देणे म्हणजे एखादे सुंदर चित्र काढणे, सुरांची लकेर छेडणे मुलाला जन्म देणे हा सृजनशील प्रत्यय. ते कर्तव्य नव्हे. इतिकर्तव्य तर नव्हेच नव्हे. आणि तो सृजनशीलतेचा प्रत्यय तेव्हाच राहतो, जेव्हा त्यासाठी स्त्रीचे मन उत्सुक असते. नाहीतर कुत्रीची वीण वाढणं आणि स्त्रीने मुलांची परेड प्रसवणं यात काहीच

फरक राहात नाही.

यातून या प्रश्नाकडे पाहिल्यावर त्यांच्या लक्षात आले, की स्त्रीची भूमिका बदलली पाहिजे. परंपरेने स्त्री स्वतःकडे पत्नी म्हणून बघते, माता म्हणून बघते, आणि मग तिची कामे तिला नैसर्गिक अपरिहार्य वाटतात. यापुढे तिला स्वतःकडे माता म्हणून बघायला लावणे साफ चूक. तिच्या मातृत्वाला पर्यायी आकांक्षा दिली गेली पाहिजे.

हे सूत्र मानले जाऊन संबंध चीनमध्ये यासाठी खास प्रयत्न करण्यात आले. 'कुटुंबापासून स्त्रीला तोडणे' असे या प्रक्रियेचे वर्णन करता येते. आपल्याकडचे सनातनी यावर लगेच गहजब करतील. कुटुंबसंस्था मोडायची? अनाचार माजेल. चीनमध्ये त्यांनी जुनी कुटुंबव्यवस्था मोडली आणि नवे कुटुंब उभारायला सुरुवात केली. स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य द्यायचे पण तिचे काम हे केवळ पूरक काम, दुय्यम काम, नवऱ्याचा पगार पुरत नाही म्हणून काम या दृष्टिकोनातून पाह्यचे नाही. एक व्यक्ती म्हणून तिला कामाचा हक्क हा मुख्य आशय. त्या कामामध्ये तिची जास्त इन्व्हॉल्व्हमेंट कशी वाढेल याचा प्रयत्न. या कामामध्ये नेतृत्व घेण्याची शक्यता. बरोबरीच्या सहकाऱ्यांमध्ये तिच्या गुणांबद्दल, कर्तृत्वाबद्दलचा आदर. आणि याहीपेक्षा एक गोष्ट अत्यंत कटाक्षाने पाळली जाते ती तिला तिच्या परंपरागत भूमिकांपेक्षा विविध क्षेत्रांमध्ये काम देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न. परिचारिका, शिक्षिका, सेक्रेटरी ती नेहमीच होत राहिली. पण आता तिला आत्मविश्वास येत गेला की ती पुरुषाच्या बरोबरीने सर्व कामे करू शकते.

याचाच दुसरा एक अर्थ हा की स्त्रीला स्वतःकडे एक 'कामगार' म्हणून बघायला शिकविते. अर्थव्यवस्थेचा एक घटक म्हणू तिने स्वतःकडे बघणे. आतापर्यंत तिचे अस्तित्व दुय्यम होते. ते आता मुख्य प्रवाहात आणणे.

आणि येथेच मला वाटतं, चिनी नेत्यांना स्त्रीच्या दास्याची किल्ली सापडली आहे. त्याच कुटुंबपद्धतीत राहून, आहे त्याच चालीरीतींच्या चौकटीमध्ये स्त्री खऱ्या अर्थाने मुक्त होणार नाही. त्यांच्या लक्षात आलं, की शहरामध्ये काम करणारी स्त्री ही कुटुंबातून अधिक लवकर मुक्त होते. खेड्यातील स्त्री शेतामध्ये काम करायला जाते खरी. पण घरचे काम सांभाळून. तिच्या मनात घरच्या कामाचा प्रेफरन्स कायम असतो. कारखान्यातील स्त्री कारखान्यातील काम. ती भूमिका ही आयुष्यात सर्वात महत्वाची भूमिका मानते. आणि घरकामाशी तडजोड करते. तेथे तिच्या मनात नेतृत्वाची आकांक्षा निर्माण होते. परंपरागत भूमिकेपेक्षा पर्यायी भूमिका तिला मिळते. या भूमिकेच्या जबाबदाऱ्या, सामाजिक दडपणे यामुळे ती संततिनियमन करते. तिचा व्यक्ती म्हणून विकास होतो.

तेव्हा माझ्या लक्षात आलंय की आर्थिक स्वातंत्र्य देताना आणि स्वीकारताना हे भान मनामध्ये ठेवायला हवं. आपल्याकडे सगळेच व्यवहार पोकळपणे चालू असतात.

आत्माच हरवलेला असतो. व्यापारीकरणाची गरज म्हणून स्त्रीला नोकऱ्या मिळतात आणि 'स्त्रीने नोकरी करावी पण कुटुंब सांभाळून हो' असा पोक्त सल्लाही मिळतो. तेव्हा तडजोड करण्याचा सल्ला देणाऱ्या समाज सुधारकांनी, कुटुंब सांभाळा म्हणण्यापेक्षा नवे कुटुंब निर्माण करा, असा सल्ला देणे आवश्यक आहे.

ଌ

॥ ९ ॥

लैंगिक स्वातंत्र्य म्हणजे वासनांची गुलामी नव्हे !

१९७३ चा जुलै महिना. किर्लोस्कर मासिकातर्फे परिसंवाद होता. परिसंवादातील चर्चेची टिपणे काढून नंतर त्याचा वृत्तांत दिवाळी अंकात देण्याची कल्पना होती.

विषय तसा खळबळजनक. एक सिच्युएशन दिलेली. एक तरुण ब्राह्मण, नवश्रीमंत वर्गातील कॉलेज विद्यार्थिनी. तिचे तत्त्वज्ञान-योनीचे पावित्र्य वगैरे झूट आहे. शरीर चाहेल तेव्हा मी मनात येईल त्या मित्रावरोबर झोपेन. मला हे स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे.

तिचाच एक मित्र. तरुण ब्राह्मण विद्यार्थी– त्याचे तत्त्वज्ञान– अशा मुलीवरोबर मजा मारायला माझी हरकत नाही, पण तिच्याशी लग्न करून पत्नी म्हणून स्वीकार करायला माझी तयारी नाही.

काय म्हणणं आहे, बोला ! वरवर विचार केला तर आधुनिक मनाच्या तरुण मुलांची प्रतिक्रिया असणार–आहे बुवा, मुलगी बंडखोर आहे. जुनी संस्कृती, पावित्र्य, मांगल्य वगैरे पोकळ शब्द झिडकारून द्यायला तयार आहे. मुक्त मनाने आपल्या नैसर्गिक गरजांना सामोरं जायला तयार आहे. मन मारायचं काय म्हणून !

मुलावद्दल प्रतिक्रिया असणार–साला संधिसाधू, भेकड आहे. स्वतःची बायको मात्र पवित्र. दुसऱ्याची उष्टी चालेल काय ! दांभिक लेकाचा !

संस्कृतिप्रिय तरुण म्हणतील, ' निदान कुलशीलवान ब्राह्मण तरुणीला हे असभ्य,

निंद्य, संस्कृतीला काळिमा फासणारे लक्षण आहे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे.'

मुलगा जरा ढोंगी आहे. पण दोष त्याचा नाही. ती शरीर द्यायला तयार असेल तर त्याने का घेऊ नये? शेवटी पुरुषाला विविधता लागतेच.

ह्या झाल्या वरवरच्या पृष्ठभागीय प्रतिक्रिया. पण त्यावेळी आम्ही पाच जणांनी अगदी कसून चर्चा केली होती. या लैंगिक स्वातंत्र्यामध्ये अनेक समस्या अंतर्भूत होत्या. हे लैंगिक स्वातंत्र्य फक्त विवाहपूर्व की विवाहानंतरही? समजा केवळ अनुकूल पतीच्या निवडीसाठी विवाहपूर्व स्वातंत्र्य घेतले तर विवाह नंतर ही सवय कायम राहणार नाही कशावरून? वैवाहिक बंधनाच्या पावित्र्याचे काय? कुटुंब संस्थेचे काय? समाजाला कुटुंब संस्थेची गरज आहे की नाही? मुलांचे संगोपन कसे करणार? इतक्या दूरपर्यंत समस्यांची गाडी जाऊन पोचली.

मला मात्र सगळ्यात मूलभूत प्रश्न होता लैंगिक अनुभवाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहायचे? अर्थात एक गोष्ट नक्की की कोणत्याही प्रश्नाकडे पाहण्याचे दृष्टिकोन हे समाजाच्या प्रगतीच्या टप्प्यात त्या त्या वेळच्या गरजांप्रमाणे बदलत राहतात, अधिक प्रगल्भ होतात. काही वेळा एखादी विकृती त्यामध्ये घुसते. कुटुंबव्यवस्था, चारित्र्य, पावित्र्य हे सर्व शाश्वत, सनातन नसते. नाही तर पूर्वी चार भिंतीच्या आत, हातभर पदराच्या आड राहणारी स्त्री आज नोकरीसाठी बाहेर पडल्यावरोबर चारित्र्याच्या कल्पनाही सैल होत गेल्या. मुख्य मुद्दा काय की लैंगिक अनुभवाकडे बघण्याचा दृष्टिकोन.

फार पूर्वी मानव समाजात वंशवाढ हे आद्य कर्तव्य समजले जाई. त्यासाठी शरीरसंबंध येत. या शरीरसंबंधाना पावित्र्याचा बुरखा दिला गेला. अशा तऱ्हेने पती पत्नीचे संबंधच फक्त पवित्र समजले जात. आपल्याच रक्ताचे बीज आहे हे सिद्ध व्हावे म्हणून पती पत्नीला जखडून ठेवे. रूढीमुळे मनावरही परिणाम होई. आणि पातिव्रत्याच्या उदात्त दडपणाखाली स्त्री मन मारायला शिके. पुरुष मात्र स्वातंत्र्य घेई. देवदासींची पद्धत रूढ झाली ती याच पुरुषी अहंकारासाठी.

यानंतर मात्र पाश्चात्य समाजात औद्योगीकरण झाले. व्यापारी संस्कृती आली. पूर्वी देवदासी, रखेली किंवा अंगवस्त्र हे बांधलेले असे. त्या स्त्रीचा मृत्यूपर्यंत सांभाळ करण्याची जवाबदारी त्या पुरुषावर असे. या व्यापारी संस्कृतिवरोबर दोन तासांसाठी शरीर विकणारी वेश्या तयार झाली. दोन तासांचा करार. संततीनियमनाची साधने आली आणि याचाच एक प्रभाव म्हणून शरीरसंबंधाकडे लैंगिक भूक या दृष्टिकोनातून बघितले जाऊ लागले. त्यामध्ये शरीराच्या पावित्र्याची किंवा संबंधाच्या पावित्र्याची कल्पना गेली. वर वर्णन केलेली तरुण स्त्री ही याच तत्त्वज्ञानाचा आधार घेते आहे.

जशी पाण्याची तहान, अन्नाची भूक तशीच शारीरिक भूक. जितकी अन्नाची भूक

नैसर्गिक आणि सनातन आहे तितकीच ही लैंगिक भूक. ग्लास अँड बॉटर थिअरी. पाणी पिऊन ग्लास फेकून देता येतो तसेच. उपभोग घेतला, वापरून झाले की शरीर फेकून दिले. प्राण्यांच्यात नसतात का नरमादी संबंध ! तेथे भाऊ-बहीण, आई-मुलगा नाती टिकतच नाहीत. मानव हाही एक प्राणी आहे. आपल्या संस्कृतीने बंधने घातली आहेत म्हणून आपण वासना दाबून ठवतो. पण त्यातूनच विकृती, चोरटेपणा निर्माण होतो. म्हणून लैंगिक स्वातंत्र्य. अर्थात हे स्वातंत्र्य फक्त पुरुषालाच कारण पुरुषप्रधान संस्कृती. पुरुषाकडे सत्ता, पैसा, शरीर विकत घेण्याचे स्वातंत्र्य. यातूनच मिथ तयार झाली पौरुषाची. पुरुषाची वासना अधिक धारदार. खऱ्या पुरुषाला अनेक स्त्रिया लागतात. अन्नात जशी विविधता हवी तशी लैंगिक अनुभवातसुद्धा.

हा युक्तिवाद वरून अगदी विनचूक दिसतो. यावरचं उत्तर म्हणून स्त्री-मुक्ती चळवळीच्या पुरस्कर्त्या पुरुषाला लैंगिक स्वातंत्र्य आहेच, म्हणून आम्हालाही हवे अशी मागणी विनधास्त करतात. पण हे केवळ जशास तसे बवणे झाले. बंडखोरी जरूर आहे. पण लैंगिक अनुभव म्हणजे काय याचे भान न ठेवणंही आहे. पेटीकोटच्या नाडीवर चारित्र्य अवलंबून नाही ! वाक्य झणझणीत आहे. पण पोकळ आहे.

हा युक्तिवाद करणाऱ्यांचा पोकळपणा एका प्रश्नाने उघडा पडेल. काय हो, तुम्ही प्राण्यांशी मनुष्यप्राण्याची तुलना करता. कोणे एके काळी प्राणी व मनुष्य एकाच पद्धतीचे जीवन जगत होते. नैसर्गिक प्रेरणाच प्रमाण मानीत होते. पण आज दहा हजार वर्षात वाघ वाघच राहिला. पण मनुष्यप्राणी बदलला. संस्कृतीची केवढी तरी पावले त्याने टाकली. वाघ अजूनही कच्चे मांस खातो. तुम्ही खाल का ? तुम्ही त्या मांसावर संस्कार कराल. शिजवाल. मसाले घालाल. चमचमीत कराल. शिवाय तुमच्या खाण्यापिण्याच्या वेळा ठरलेल्या असतील. तुम्ही तुमचे जीवन अधिक नियमित, सुसंबद्ध, अर्थपूर्ण केलेले आहे. याचाच अर्थ प्राण्यांच्या नैसर्गिक प्रेरणा त्याच स्वरूपात तुमच्यात उरलेल्या नाहीत. तुम्ही त्याच प्रेरणांवर ताबा मिळविला. त्या हव्या तशा वापरल्या, वाकविल्या. तेव्हा लैंगिक अनुभव हा केवळ लैंगिक भूक या पातळीवर राहूच शकत नाही. आता लैंगिक अनुभव हा स्त्री-पुरुष यांच्यामधील संवादाचे साधन झाले आहे. मानव हा अधिक पूर्णत्वाकडे चालला आहे. पूर्वी तो रूढींच्या बंधनामुळे काही गोष्टी करत असे. ती बाह्य बंधने होती. आता त्याचे मन अधिक प्रगल्भ, सुसंस्कृत होत चालले आहे. आता तो नैसर्गिक प्रेरणांची शिकार होत नाही. त्याच्या आतून त्या प्रेरणांचे नियमन होते. एखादी स्त्री आवडली, संवाद साधला गेला तरच तिच्याशी शारीरिक पातळीवर संवाद साधावासा त्याला वाटेल. स्पर्श हे कमी वापरले जाणारे आणि म्हणूनच अधिक संवेदनाक्षम, प्रभावी साधन होऊ शकते.

इथे ही तरुण मुलगी जेव्हा वाट्टेल त्याच्या जवळ झोपण्याचे स्वातंत्र्य मागते तेव्हा ती रूढींपासून स्वातंत्र्य मागते पण त्याचवेळी ती वासनांची गुलाम होत असते. ती

मानवी पातळीवर अधिक अर्थपूर्ण जीवन जगत नाही. रूढी या आपणच तयार केल्या. काळाची गरज म्हणून त्यांची गरज संपली की त्या तोडून मोडून फेकून द्याव्यात हे बरोबर. म्हणजे तुम्ही रूढींपासून स्वातंत्र्य मिळवाल, पण त्याचबरोबर निसर्गापासून, नैसर्गिक प्रेरणांपासून स्वातंत्र्य मिळविणे हेही आवश्यक आहे. विमानाचा शोध लावून मानवाने जडत्वापासून स्वातंत्र्य मिळविले. हवेवर तो आरूढ झाला. तसेच रक्तातील आंधळ्या वासनेने पिसाट होण्यापेक्षा त्या वासनेचा अधिक अर्थपूर्ण वापर करणे, वासनेवर आरूढ होणे हे प्रगत मानवाचे लक्षण आहे.

मग पुन्हा प्रश्न येईल की मी सुद्धा सनातन्यांप्रमाणे कुटुंबव्यवस्था पवित्र मानते की काय? याचे उत्तर एकच. की एकीकडे आजची सक्तीची, आशयहीन कुटुंबव्यवस्था आणि दुसरीकडे बंडखोर लैंगिक स्वातंत्र्याची कल्पना या दोघांनाही खरे उत्तर आहे–पावित्र्य हे रूढींचे नाही, कुटुंबसंस्थेचे नाही–ते स्त्री-पुरुष नात्याच्या अर्थपूर्णतेचे आहे. सक्तीने लावलेल्या लग्नात व्यभिचार असतो, तसाच तो केवळ बंडखोरपणातसुद्धा असतो. उद्या दोन तरुण-तरुणींनी एकमेकांची निवड केली. घरून लग्नाला विरोध झाला. लग्न लांबले आणि त्यांचा शरीरसंबंध आलेला असला तरी त्याला पाप म्हणता येणार नाही. याच तत्त्वावर विधवेला किंवा घटस्फोटितेला पुन्हा विवाह करता येणे हे तर्कशुद्ध आहे. कारण येथे योनीची शुचिता, पावित्र्य हा निकषच नाही. निकष आहे, दोन मनांच्या खऱ्याखुऱ्या जुळणीचा. लैंगिक अनुभवाकडे 'प्रॉडक्टिव्ह' दृष्टिकोनातून बघण्याचा आणि मग बाकीच्या गंभीर वाटणाऱ्या समस्या आपोआप सुटतील. सध्याच्या सांस्कृतिक, आर्थिक अवस्थेला कुटुंबव्यवस्था आवश्यकच आहे; ठीक आहे. पण अधिक उत्तम कुटुंब तयार होणे आवश्यक आहे तेही याच प्रकारच्या दृष्टिकोनातून लैंगिक स्वातंत्र्य म्हणजे वासनांचे गुलाम होणे मात्र नक्कीच नव्हे.

॥ १० ॥

उरलं-सुरलं ह्याच म्हशीला

मला वाटतं अजूनही बहुसंख्य घरातून सगळ्यांची जेवणं झाली की मग आई जेवायला बसते. सगळ्यांनी खाऊनपिऊन ढेकरा दिल्या की उरलंसुरलं आईला. सगळ्यांनी आपापल्या आवडीचे पदार्थ वाढून घेतले की उरेल ते आईच्या पानात. कोणी पानात टाकले तर ते आईच्या पोटात. मला आठवतंय–आमची आई स्वतःला 'कचऱ्याची टोपली' म्हणायची, तेव्हा गंमत वाटायची. आमच्याही मनावर थोर आईचे वात्सल्य, प्रेम वगैरे उदात्त प्रतिमा इतकी रुजली होती की आई म्हणजे हे सर्व आलंच असं आम्ही गृहीत धरून चाललो होतो.

आज मी पत्नी झालेय, आई झालेय. तेव्हा माझ्यावरही तीच पाळी आलीय. खरं म्हणजे पहिल्यापहिल्यांदा नवरा म्हणायचा सुद्धा–'शिळं तूच कशाला खातेस ? बरोबरच जेवायला बसू.' पण माझ्या डोक्यात आदर्श गृहिणी म्हणून माझ्या आईची प्रतिमा इतकी फिट्ट बसली होती की एरवी चवीची इतकी चोखंदळ मी, पण घरात फक्त नवऱ्याला आवडणारे पदार्थ करणे, गरम फुलका त्याला वाढणे वगैरे गोष्टी सहजी शिकले, दुपारी तो घरी जेवायला नसतो. तेव्हा रात्रीचे शिळे उरवून दुपारी पुरविणे. आयत्या वेळी पाहुणेराबळे आले तर त्यांच्याबरोबर नवऱ्याला वाढून उरलं तर स्वतःला, नाही तर झक्कपैकी भूकच नव्हती म्हणत रिकाम्या पोटी झोप. ही भूमिका मी सहजी जगू लागले. त्यात काही चूक आहे असं मला वाटेचना. 'संसार सुखाच

व्हायचा असेल तर बाई ग, मन मारावं लागतं,' 'टापटिपीने संसार करावा लागतो,' वगैरे सुभाषिते आपोआप माझ्या रक्तात झिरपली होती.

मागच्या वर्षी एक अमेरिकन मैत्रीण भेटली. गेल ओमवेट—आणि तिने चक्क माझी उलट तपासणी आरंभली.

'तुमच्या संस्कृतीमध्ये स्त्रीचे स्थान काय?'

'देवता, जगन्माता.'

'मग देवतेला पहिला नैवेद्य द्यायची पद्धत का नाही? तू नंतर का जेवतेस?'

'सोयीचे पडते म्हणून. कोणाला कमी पडायला नको.'

'मग तुला कमी पडलं तर?'

'एखाद्या दिवशी चालतं ग. मरत नाही मी!'

'बरोबर आहे. तू मरत नाहीस. पण एखाद्या गरिबाच्या घरी असाच प्रसंग घडतो. कल्पना कर. आधीच जेमतेम चार घास अन्न शिजवलं जातं. तेही चार दिवसानं. नवऱ्याचा मान मोठा, शिवाय त्याचे काम शारीरिक कष्टाचे म्हणून त्याला अन्न आधी. मग पोरं कावकाव करून भोवती पडणार. त्यांच्या हातावर ठेवलं पाहिजे. शेवटी तपेल्याच्या कडेला उरलेली चार शितं त्या बाईच्या वाट्याला येणार. तिचा गुन्हा कोणता? ती स्त्री आहे म्हणून? एक गोष्ट खरी की या समाजव्यवस्थेमध्ये ४० टक्के लोकसंख्येला २३०० कॅलरीजसुद्धा अन्न मिळत नाही. पण त्यातही गरीब स्त्रीवर दुहेरी अन्याय. गरीब म्हणून आणि स्त्री म्हणून.'

गेलने भराभर आकडे फेकले माझ्या तोंडावर. मी भारतीय. माझ्यापेक्षा, माझ्या देशासंबंधी तिचा अभ्यास जास्त. भारतात दर हजार पुरुषांमागे ९३० स्त्रिया असतात. स्त्रियांचे प्रमाण इतके कमी का? केलाय विचार? जीवशास्त्रज्ञ सांगतात की निसर्गामध्येच जन्माला येणाऱ्या मुलांमध्ये मुलींचे प्रमाण जास्त असते. समजा १०० मुले जन्माला आली की त्यातील ५२ मुली असतात. ४८ मुलगे असतात आणि असे असून जन्मभरची लोकसंख्या लक्षात घेतली तर स्त्री-पुरुष लोकसंख्येचे प्रमाण समान आढळते. याचाच अर्थ स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त असले पाहिजे.

तिने दुसरे आकडे समोर टाकले. एकूण पुरुष व स्त्रिया यांच्या मृत्यूचे प्रमाण असे आहे: हजार पुरुषांमध्ये जर १० पुरुष मेले तर हजार स्त्रियांमध्ये ११ स्त्रिया मरतात. त्याहूनही अधिक खोलवर विचार केला तर दिसून येते की चार वर्षे वयापर्यंत ज्या बालकांचे मृत्यू होतात त्यामध्ये मुलींची संख्या जास्त असते. दर हजार मुलग्यांमध्ये जेव्हा १० मुलगे मृत्युमुखी पडतात तेव्हा दर हजार मुलींमध्ये १२ मुली मरण पावलेल्या आढळतात.

कारणे काय? गरिबीमध्ये उपाशी राहण्याचा प्रसंग बाईवर अधिक वेळा येतो. आमच्या धर्माची, संस्कृतीची ती उदात्त शिकवण आहे. अगदी स्त्रीच्या नशिबीच्या

या भीषण सत्यापासून चिमुकल्या बालिकेचीसुद्धा सुटका नसते. गरीबाच्या घरात जुळी मुलं झाली तर दुधाचा एकुलता एक घोट मुलग्यांच्या तोंडी पडतो. अगदी श्रीमंत घरीसुद्धा हा लिंगभेद कळत नकळत होतच असतो. शिक्षणाच्याबाबत, घरात अरेरावी करण्याबाबत. हट्टाबाबत, काम करण्याबाबत, प्रत्येक ठिकाणी लहानपणापासूनच चिरंजीव अधिकार गाजवायला शिकतात. कारण तो कुलदीपक, पांग फेडणारा, पिंडदान करणारा. म्हातारपणी खाऊ घालणारा. आता गरिबाच्या घरी काही संपत्ती असते का? तर वारसाचा प्रश्न. पण वरिष्ठ वर्गांनी घालून दिलेल्या परंपरांचे अंधानुकरण चालूच राहते. ज्या घरात पाचसहा मुली एका पाठोपाठ एक जन्माला आल्या असतील आणि त्यांच्या नंतर एकुलता एक कुलदीपक, त्यांचे हाल तर विचारूच नका. मुलापाटची नवजात बालिका तर कोपऱ्यात पडून आक्रोश करीत राहते. आई कामाला गेलेली. तिच्या नशिबी पुष्कळदा स्तनपानसुद्धा नसते. असं मूल मरून जाणे सहज घडते. गरिबी हा आमच्या अर्थ व्यवस्थेचा भाग झाला आणि त्या गरीबीतील सुद्धा अधिक घोर छळ हा आमच्या संस्कृती व्यवस्थेचा भाग झाला आणि गंमत म्हणजे ही अर्थव्यवस्था व संस्कृतिव्यवस्था हातात हात घालून जातात.

अगदी साधी गोष्ट घ्या. स्त्रीचा आम्ही जगन्माता म्हणून गौरव करतो. पण आज खेडोपाडी आणि शहरात सुद्धा गरिबांपैकी किती स्त्रिया योग्य ती वैद्यकीय मदत न मिळाल्यामुळे मरतात? स्त्रीच्या जीवनाचा मार्गच मुळी मरणाच्या दारातून जात असतो. या स्त्रीला खास संरक्षण मिळावे, तिचे बाळंतपण अधिक सुसह्य व्हावे म्हणून किती सुसज्ज रुग्णालये आपल्या देशात उपलब्ध आहेत? एकूण लोकसंख्येपैकी निम्मी स्त्रियांची लोकसंख्या असताना आणि त्यांच्या जीवनाचा प्रसूती व संतती हा अपरिहार्य भाग असतानासुद्धा फक्त नफ्याकडे पाहू इच्छिणाऱ्या या पुरुषप्रधान संस्कृतीला या गोष्टीची निकड भासू नये हे स्वाभाविक आहे. आमच्या अर्थव्यवस्थेत स्त्रीच्या एकूणच अस्तित्वाचा विचार केलेला आढळतो का? स्त्रीचं मरण हे स्वस्त आहे. आमच्याकडे कुटुंबनियोजनाकडे पाहिले जाते ते फक्त लोकसंख्या वाढीच्या राक्षसाच्या भीतीने. स्त्रीच्या मुक्तीचा मार्ग म्हणून नव्हेच. आणि त्यामुळेच स्त्रीला ऑपरेशन करून संतती नियमन करायचे असले तरी नवऱ्याची परवानगी काढावी लागते. हा नवरा कोण सोकोबा! त्याला काळजी फक्त पुत्रजन्माची. स्त्रीच्या शरीराची, मनाची असते का? आणि ती बिचारी मूक संमती देते. कारण पुत्रजन्म नसेल तर ती नरकात पडेल ही भीती, इतर सामाजिक दडपणे.

माझ्या हळूहळू लक्षात यायला लागलं. आपल्याकडे स्त्रीवर अन्याय दाखविताना अजून कधीकधी घडणारे केशवपनाचे उदाहरण, जैन दीक्षेचे उदाहरण, सतीचे उदाहरण, बलात्काराचे उदाहरण दाखविले जाते. हे तर अगदी ढळढळीत अन्याय आहेत. पण या छुप्या अन्यायाचे काय? लाखो स्त्रियांना आज नवऱ्यांची बीण

वाढवीत जगावं लागतं. आपलीच प्रसूती आपल्या हाताने करून स्वच्छता, पौष्टिक अन्न, कश्शाची पर्वा न करता दुसऱ्या दिवसापासून कामावर जावं लागतं. छोट्या मुलींना भुकेपायी प्राण गमवावे लागतात. स्त्रियांना निकृष्ट आणि अपुऱ्या अन्नावर दिवसेंदिवस जगावं लागतं. स्त्रीचे अस्तित्व हे किती दुय्यम आणि कःपदार्थ आहे हे तुमच्या आमच्या लक्षात येत नाही. कारण थोडाफार सुखवस्तूपणा आणि संस्कृतीचे मंजुळ नाद यांनी वातावरणाला पवित्रपणा येतो. पण हे वरचे पापुद्रे हळूहळू काढून टाकले तर आत एक नग्न सत्य सापडतं– स्त्रीची गुलामी–सोयीस्करपणे राबविली गेलेली. शारीरिकरीत्या बंधनात ठेवून. मानसिकरीत्या बंधनात ठेवून.

इंदिरा गांधी आमच्या पंतप्रधान आहेत म्हणून आमच्या येथे स्त्री-मुक्ती झाली आहे म्हणणाऱ्यांनी खुशाल तसे म्हणावे. मला मात्र स्वतःला १००० पुरुषांमागे ९३० स्त्रिया हे आकडे सतत जाळत राहिले आहेत.

□

॥ ११ ॥

कायद्याचे कितीही संरक्षण मिळाले तरी स्त्रीचे जिणे आश्रितांचेच !

परवा एका मैत्रिणीबरोबर वकील महाशयांकडे गेले होते. तिला घटस्फोट हवा होता. तिचे लग्न नोंदणी पद्धतीने झाले होते. एकमेकांच्या स्वभावामुळे जवळ रहाणे अशक्य होते. तिच्या नवऱ्याची संमती मिळण्यासारखी होती. तेव्हा कायद्याची चाल काय ? अर्ज कोठे करायचा ? कसा करायचा ? किती दिवस लागतील ? वगैरे माहिती हवी होती. कोणीतरी सल्ला दिला की अमुक वकीलसाहेब त्यातले तज्ज्ञ आहेत. त्यांच्याकडे जा. वकीलसाहेबांनी आमचे म्हणणे ऐकून घेतले आणि फी सांगितली हजार रुपये. आम्ही दोघीजणी चांगल्याच नर्व्हस झालो. नोंदणी विवाहाबाबतचा कायदा खूप प्रगत आहे असं ऐकून होतो. पण पहिल्याच अनुभवाला कायद्याचा हिसका चांगलाच जाणवला. पैसा तर बराच लागणार होता. त्याबरोबरच कोर्टामध्ये लांबलचक दाव्यांची रांग. दिवाणी दावे जेथे चालतात तेथेच हाही दावा चालणार.

माझ्या मैत्रिणीचा अनुभव जमेस धरून आम्ही दोघींनी कायद्याची प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी पुस्तकाची शोधाशोध केली. कायद्याच्या किचकट भाषेला आम्हीही बिचकून होतो. मनात येत होते, कायदे ढीग गेले, पण ते सामान्य स्त्रियांपर्यंत पोचले नाहीत तर उपयोग काय ? आम्ही सुशिक्षित स्त्रिया असून आमची ही स्थिती, तर अडाणी, नोकरी न करणाऱ्या बाईची काय स्थिती होत असेल ? तिला

निवेदन
उदय
२६५.८४
रमधर

या कायद्याचा आधार घेण्याची ताकद कितपत असेल? काठी हातात दिली खरी. पण त्या काठीची शक्ती पटवून द्यावी लागते. ती काठी मारायचे धैर्य तिच्या अंगात निर्माण करावे लागते. हे आज होणे शक्य आहे का?

अखेर एक चांगले पुस्तक हाती पडले. 'स्त्री आणि कायदा' लेखिका : ब॑. सुनीती पुंगलिया : स्त्रीसखी प्रकाशन. अतिशय सोप्या, सहज भाषेत लिहिलेले हे पुस्तक. कायद्याच्या किचकट भाषेतून कायद्याची मुक्तता करणारे हे पुस्तक. 'हिंदु स्त्रियांना कायद्याने मिळालेले अधिकार' एवढीच मर्यादित व्याप्ती.

प्रस्तावनेत हिंदु स्त्रीच्या ऐतिहासिक परिस्थितीचा आढावा घेताना हिंदू स्त्रीच्या सामाजिक दर्जाचा लेखिकेने ऊहापोह केला आहे. एका अभेद्य अशा कुटुंबपद्धतीमध्ये हिंदू स्त्रीचे अस्तित्व चिणले गेले होते तिच्या घरकामाला, मुलांना जन्म देणे, वाढविणे या कामांना सामाजिक, आर्थिक व्यवहारामध्ये वेगळे स्थान नव्हते. पुरुषाच्या जीवनाचा भाग म्हणून हे सर्व काम अध्याहृत धरले जात असे. तिला उदरभरणासाठीसुद्धा पुरुषाच्या इच्छेवर अवलंबून राहावे लागे. तिच्या सर्व अस्तित्वाचा संदर्भ पुरुष होता. १९ व्या शतकाच्या मध्यापासून स्त्रीच्या या दुय्यम दर्जाचा विचार प्रामुख्याने होऊ लागला. १८२९ साली सतीबंदी कायदा झाला. तोपर्यंत धर्माने नियत होणाऱ्या समाजजीवनाला हात लावण्याची राजकीय सत्ताधाऱ्यांची हिंमत नव्हती. १९७२ पर्यंत वेळोवेळी अनेक कायदे होऊन स्त्रीच्या अस्तित्वावरील रूढींचा अंमल कमी कमी होत गेला आणि परंपरागत कुटुंबपद्धतीपासून तिला कायदेशीर स्वातंत्र्य मिळत गेले. येथे कायदेशीर स्वातंत्र्य शब्द मुद्दाम वापरला आहे. कारण कायदेशीर स्वातंत्र्य हे मुख्यतः कागदावरील स्वातंत्र्य असते. ते स्वातंत्र्य प्रत्यक्षात मिळविण्यासाठी आत्मविश्वास असलेले व्यक्तिमत्त्व लागते. धैर्य लागते. म्हणूनच कायदा व प्रत्यक्ष सामान्य स्त्रीची स्थिती यामध्ये भयंकर तफावत आढळते.

या पुस्तकामध्ये पाच महत्त्वाचे कायदे विशद केले आहेत. (१) हिंदू विवाह कायदा, (२) हिंदू वारसा हक्क, (३) हिंदू अज्ञान व पालकत्व, (४) हिंदू दत्तक व पोटगी, (५) गर्भपाताचा कायदा.

(१) अ : हिंदू विवाह कायद्यानुसार विवाह हा संस्कार आहे ही धार्मिक कल्पना झुगारून दिली गेली. ह्या धार्मिक कल्पनेनुसार वैवाहिक नाते ह्या जन्मी तोडता येणे शक्य नव्हते. नव्या कायद्यासाठी विवाह हा एक करार आहे हे तत्व पायाभूत धरले गेले व कोणताही करार मोडता येतो या तत्वानुसार विवाहविच्छेद किंवा घटस्फोट घेता येणे या कायद्याने शक्य केले. एका ठरावीक मर्यादेपर्यंत हा कायदा पुरोगामी आहे. पण एकदा 'विवाह म्हणजे प्रेमावर आधारित परस्पर संमत सहअस्तित्व' अशी व्याख्या केली तर कराराचा पोकळपणा किंवा व्यापारीपणा दिसून येतो. मात्र आज तरी आपला समाज त्या पायरीवर पोचलेला नाही.

या नव्या कायद्यानुसार वधूचे वय किमान पंधरा वर्षे व वराचे वय अठरा वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच अठरा वर्षे वयाची मुलगी झाली की तिला सज्ञान समजले जाऊन तिला पालकांच्या संमतीशिवाय लग्नाचा हक्क मिळणे. यामुळे 'आंतरजातीय विवाह आहे', 'मुलगा पसंत नाही' अशा सबबीखाली आई-वडिलांना लग्न थांबविता येत नाही. त्यातूनही दंडेलीचा वापर करून वधूवरांना घाबरविणारे आई-वडील असतातच. त्या वेळी वधू-वर किती खंबीर आहेत याची परीक्षा लागते.

(१) ब : द्विभार्या प्रतिबंधक कायदा : पत्नीला मूल होत नाही, घराण्याला वारस नाही, ती सतत आजारी असते या कारणाखाली एक पत्नी हयात असताना दुसरा विवाह करता येत नाही. असा विवाह करणाऱ्या माणसाला सात वर्षेपर्यंत तुरुंगवास व दंड होऊ शकतो. हजारो वर्षे हिंदू स्त्रियांनी सवतीचा जाच सहन केला. नवऱ्याचे अनेक स्त्रियांशी कायदेशीर, बेकायदेशीर संबंध सहन करीत स्वतःची मानसिक कुचंबणा अनुभवली. या कायद्यामुळे निदान कायदेशीर संबंध तरी बंद होऊ शकले.

(१) क : पत्नी आवडत नाही किंवा तिच्याशी पटत नाही, नवरा पळून जातो, त्याला महारोग होतो, गुप्तरोग होतो, धर्मांतर करतो, अशा अनेक कारणांमुळे परित्यक्त जीवन जगण्याची पाळी अनेक स्त्रियांवर येते. स्त्रियांना नोकरी मिळू शकत नसल्यामुळे लोकांच्या घरी आश्रितासारखे राहाणे, नाहीतर शरीर विकणे याशिवाय तिला पर्याय राहात नाही. अशा वेळी स्त्रीने कोर्टाकडे अर्ज केला तर पतीने पत्नीला घरी न्यावे असा वैवाहिक हक्काच्या अंमलबजावणीचा हुकुमनामा कोर्ट काढू शकते. मात्र याबाबतीत सक्ती करू शकत नाही. वेड, व्यभिचारी वर्तन, क्रूर वागणूक ह्या कारणांखाली व महारोग, गुप्तरोग, धर्मांतर या कारणांखाली कायदेशीर विभक्तपणा मिळण्याची तरतूद कायद्याने केलेली आहे.

(१) ड : कायदेशीर विभक्तपणाच्या पुढची पायरी घटस्फोट. पूर्ण विवाहाची कल्पना असेल तर वरील कारणांखाली कायदेशीर विभक्तपणा जाहीर झाल्यावर दोन वर्षांनी घटस्फोटासाठी अर्ज करता येतो. मात्र दोषी व्यक्तीला हा अर्ज करता येत नाही. ज्या व्यक्तीवर अन्याय झाला आहे त्याच्यावरील अन्यायाच्या निराकरणासाठीच ही सोय आहे. मात्र या प्रकारे घटस्फोट मिळविण्यासाठी ५-६ वर्षांचा कालावधी लागतो व ऐन तारुण्याची वर्षे वाया जातात. मनस्ताप होतो. घटस्फोट मिळाल्यानंतरही वर्षभर लग्न करता येत नाही.

(१) इ : या हिंदु कायद्याव्यतिरिक्त नोंदणी विवाहाचा कायदा अस्तित्वात आला. हा खरोखर प्रागतिक आहे. कोणत्याही जातिधर्मांच्या दोन स्त्री-पुरुषांना स्वतःचा धर्म न बदलता सरकारी नोंदणी कार्यालयात जाऊन एक महिना आधी नोटीस देऊन विवाह करता येतो. अशा प्रकारच्या विवाहाचे बंधन तोडणे अधिक सोपे असते. येथे

पतीपत्नीची परस्पर संमती हाच पाया असतो. विवाहबंधन तोडतानाही इतर कारणे व पुरावे देण्याची गरज नसते. एक वर्षभर विभक्त राहून परस्पर संमतीने विवाह बंधनातून मुक्त होता येते. इतर अनेक देशांपेक्षा हा कायदा प्रगत आहे असे मानतात. पतीपत्नींची प्रगल्भता हाच या कायद्याचा पाया आहे.

(२) – १९५६ च्या पालकत्वाच्या कायद्यान्वये स्त्रीला मुलांच्या पालकत्वाचे बरेच अधिकार मिळाले आहेत. मात्र अजूनही वडील जिवंत असेतोवर मुलांचे पालकत्व आईकडे जाऊ शकत नाही. आश्चर्य म्हणजे बँकेमध्ये अज्ञान मुलांचे खाते उघडायचे असेल तर सुशिक्षित आई मुलांची पालक म्हणून स्वीकारली जात नाही.

मात्र अनौरस मुलांची पालक प्रथम आईच असते. आईनंतर हे हक्क वडिलांकडे जातात.

२१ वर्षांखालील अज्ञान पत्नीचे पालकत्व २१ वर्षांखालील अज्ञान पतीला मिळते. मात्र सज्ञान स्त्रीच्या पतीला तिच्या पालकत्वाचे अधिकार मिळू शकत नाहीत. पुनर्विवाहामुळे स्त्रीच्या आपल्या मुलांच्या पालकत्वाच्या अधिकारास बाधा येत नाही.

(३) एकदा स्त्रीला आर्थिक व्यवहारात स्थान नाही म्हटलं की तिने आर्थिकदृष्ट्या वडील, नवरा, मुलगा यांच्यावर अवलंबून राहावे ही परंपरा आलीच. आजपर्यंत स्त्रीला खाऊपिऊ घालणे हे परंपरेने पुरुष करत आला होताच. त्याला 'वारसा हक्क' कायद्याचा पाठिंबा मिळाला, इतकेच. नव्या कायद्याने हिंदू स्त्रीला कन्या, पत्नी, माता या विविध नात्यांनी वारसा हक्क मिळाला. आपल्या हयातीत व नंतर स्वतःच्या संपत्तीची इच्छेनुसार व्यवस्था करायला ती मुखत्यार झाली. मृत पुरुषाने जर मृत्युसमयी मृत्युपत्र केले नसेल तर त्याच्या इस्टेटीचे समान हिस्से त्याची मुले-मुली, हयात पत्नी, हयात आई, मृत मुलाची विधवा सून या सर्वांमध्ये वाटले जातात.

यामध्ये मृत्युपत्र केले नसेल तर हे वाक्य महत्त्वाचे आहे. कारण बहुतांशी लोक मृत्युपत्र करतात आणि त्यांच्या मनावरच्या संस्कारांमुळे वंशाचे नाव पुढे चालविणाऱ्या मुलांकडे त्यांची तागडी झुकते.

दुसरी गोष्ट म्हणजे एरवी अर्धांगी म्हणून संबोधिल्या गेलेल्या पत्नीला इस्टेटीतून अर्धा वाटा मिळत नसून अनेक आश्रितांमधील समान वाटा तिच्या वाट्याला येतो. म्हणजेच तिचे नवऱ्याशी नाते हे आश्रिताचे नाते आहे.

(४) हिंदू दत्तक व पोटगी कायद्याप्रमाणे हिंदू विधवा अथवा अविवाहित बाईला जर मूल होत नसेल तर हिंदू पुरुषाप्रमाणेच दत्तक मुलगा व मुलगी घेण्याचे अधिकार आहेत. तसेच विवाहित पुरुषाला दत्तक मुलगा वा मुलगी घेतेवेळी पत्नीची संमती घ्यावी लागते.

अविवाहित स्त्रीने दत्तक मुलगा घेतल्यास दत्तक मुलाने वा मुलीने आडनाव

कोणते लावायचे हा प्रश्न उत्पन्न होऊ शकत नाही. कारण आडनावासंबंधी कोणताही कायदा नाही. लग्न झाल्यावर स्त्रीने नवऱ्याचे नाव घेतले पाहिजे असा कायदा नाही. किंवा घटस्फोटानंतरही पूर्वीचे नवऱ्याचे नाव बदलले पाहिजे असे बंधन नाही.

पोटगी कायद्याप्रमाणे हिंदू विवाहित स्त्रीला विभक्त राहून पोटगी मागण्याचा हक्क प्राप्त होतो. तसेच घटस्फोट घेतल्यानंतर जर तिने पुनर्विवाह केला नाही, तिची वर्तणूक अनैतिक नसेल, तिने स्वतः धर्मांतर केले नसेल, तर स्त्रीला नवऱ्याकडे पोटगी मागता येते. विधवा मुलीला वडिलांकडून पोटगी मागता येते, तशीच विधवा सुनेला सासऱ्याकडून पोटगी मागण्याचा अधिकार कायद्याने मिळाला आहे. पुनर्विवाहानंतर पोटगी बंद होते.

(५) १९७२ साली गर्भपाताचा कायदा अंमलात आला. या कायद्यानुसार कोणत्याही सज्ञान स्त्रीला स्वतःच्या इच्छेनुसार व अखत्यारीत गर्भपात करून घेणे शक्य आहे. त्यासाठी पतीच्या संमतीची वा परवानगीची कायद्याने आवश्यकता नाही.

खालील परिस्थितीत गर्भपात कायदेशीर ठरतो. (१) स्त्रीचे जीवित धोक्यात असेल, (२) बलात्कार झाला असेल, (३) स्त्रीच्या शारीरिक किंवा मानसिक आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असेल, (४) जन्माला येऊ पाहणारे मूल शारीरिक वा मानसिक दृष्ट्या विकृत असण्याची शक्यता असेल, (५) कुटुंब-नियोजनाचे उद्दिष्ट असेल.

या कायद्यामध्ये कुमारी मातेला गर्भपाताचा सरळ सरळ अधिकार नाही. पण तीन नंबरचे कलम पुष्कळच लवचिक ठेवून त्या कलमाखाली या कायद्याचा फायदा कुमारी मातेला घेता येतो. आयुष्यात एकदा घडलेल्या चुकीची भरपाई म्हणून नको असलेले मूल जन्माला आणण्यापेक्षा गर्भपातामुळे चूक सुधारण्याची संधी मिळते.

कायदे वाचून माझ्या लक्षात आले की कायदे पुष्कळसे संरक्षक आहेत. पण त्याचबरोबर आहे ती स्त्रीची गुलामी कायम ठेवली गेली आहे. ती गुलामी सुसह्य व्हावी एवढेच प्रयत्न आहेत. कारण येथे आहे ह्या परिस्थितीला गृहीत धरले गेले आहे. स्त्रीची भूमिका फक्त कन्या, पत्नी, माता. स्त्री आणखी करू काही शकेल का? तिला दुसऱ्याच्या इस्टेटीतील वारसा मिळावा म्हणून धडपड. पोटगी मिळावी म्हणून धडपड. पण तिचे हे आश्रिताचे जिणे कसे जाईल? हा खरा मूलभूत प्रश्न नाही का? कायद्याचा बडगा दाखवून किती बायका आज हक्क मिळवून घेऊ शकतात? आणि अशा तऱ्हेने कायद्याच्या आधारामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो का?

मला वार्शीच्या एका प्रसंगाची आठवण झाली. तीस-चाळीस मुलींचा गट. १६-१७ वर्षे वयाच्या मुली. तलाठी, पोलिस, हवालदार, शिपाई यांच्या मुली. जेमतेम मॅट्रिक पास किंवा नापास. आई-वडिलांना घाई झालेली मुलींची लग्ने उरकून टाकण्याची. पण हुंडा द्यायला पैसे नाहीत. मुलींची कुचंबणा. त्यांना लग्न करायचे नाही. त्यांना

स्वातंत्र्य हवे होते. नोकरी हवी होती. त्यांची मागणी एकच होती, 'आम्हाला नोकरी द्या,' 'आम्हाला काम द्या.' माझ्या लक्षात आलं, स्त्रियांसाठी हे कितीही पुरोगामी कायदे केले तरी त्यांचा दुय्यम दर्जा, आश्रितांचा दर्जा बदलणार नाही. त्याला उपाय एकच–प्रत्येक स्त्रीला नोकरी, प्रत्येक स्त्रीला काम.

ङ

॥ १२ ॥

हुंडा : गुरगुरणारा कुत्रा

आजच्या तरुणीला तिच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव देण्यासाठी कार्यक्रम काय घ्यावा असा नेहमीच प्रश्न पडतो. पुरुष आणि स्त्री यांच्यामध्ये वैर आहे असे घोषित करून पुरुषाविरुद्ध बंड करायला तयार हो असं म्हणायचं ? तिचे वडील, तिचा भाऊ, तिचा भावी पती, त्याचे वडील हे सगळे तिचे शत्रू म्हणून तिच्यापुढे उभे करायचे ? प्रश्न महत्त्वाचा आहे. आजच्या बहुसंख्य तरुण मुलींना मनासारखं शिक्षण मिळत नाही. जबाबदार कोण ? पुरुष ? समजा शिक्षण कसंबसं दिलं तर नोकरी मिळत नाही. जबाबदार कोण ? मग असहाय्य बिचारी लग्नाच्या बाजारात उभी. तिथं हुंड्याशिवाय नवरा मिळत नाही. या हुंडा पद्धतीला जबाबदार कोण ? हुंडा घेणारा पुरुष असतो. पण हुंडा देणाराही पुरुषच असतो. तो पुन्हा मुलाच्या लग्नात आणखी कोणाकडून हुंडा घेत असतो. म्हणजे पुन्हा स्त्रीवर अन्याय करणारा पुरुषच ! असे साधे सरळसोट उत्तर देऊन भागत नाही.

या हुंडा पद्धतीच्या तर खूपच खोलात जायला पाहिजे. एखादी रूढी काही कारणांनी जन्म घेते. तिचे विकृतीकरण होते आणि एखादा रोग अंगात मुरावा तशी ती समाजाच्या रक्तात मुरते. मग त्या रूढीविरुद्ध कितीही आंदोलने होवोत. युक्रांद सारख्या संघटनेने गाढवांची मिरवणूक काढली. विधानसभेने कायदे पास केले. पण कायद्यांनी कागदांची शोभा वाढली. हुंडा जिवंतच राहिला. लाखो कोवळ्या तरुण

मुलींची आयुष्ये हुंड्याच्या मुळावर लटकत राहिली.

कोण म्हणेल, काय सांगता बाई! जागृती होते आहे हळूहळू. थोडेसे प्रेमविवाह होतात. काही सुशिक्षित लोक उदारपणा दाखवितात. हुंडा घेत नाही असे अभिमानाने सांगतात. खरं आहे आपलं म्हणणं. पण अंधारात काजवा चमकावा, नं तितकंच. बाकी सगळा अंधार. आणखी घनदाट होणारा. कारण मला दिसतं की श्रीमंतांमध्ये, वरिष्ठ वर्गांमध्ये तर दिवसेंदिवस हुंडा ही मोठी प्रतिष्ठेची गोष्ट बनत चाललीय. त्यांची संपत्ती वाढतीय तसतसा हुंड्याचा आकडाही फुगत चाललाय आणि त्याचे अनुकरण आज सामान्य जनताही करते आहे. माझ्या येथे काम करणाऱ्या लक्ष्मीबाईची गुलाब. दिसायला नेटकी, वागायला स्मार्ट. शिवणकामाचं शिक्षण घेतलेली. बाप दारूड्या. आई काम करते. तिचं लग्न पर्मनंट नोकरी आणि २०० ते ३०० रु. पगार असणाऱ्या तरुणाशी करायचं झालं तर त्याचा भाव चार तोळे सोनं व दोन्ही कडचा खर्च. बापरे! गुलाबच्या मागे दोन बहिणी. म्हणजे गुलाबचे लग्न या आयुष्यात व्हायची चिंता नको. मी मनात म्हणते, हिला कोणीतरी भेटो आणि त्याच्याबरोबर ही पळून जावो. हुंडा नावाचा कुत्रा जो गुरगुर करीत बसलाय त्याचा डोळा चुकवून.

परवा एक मित्र आला होता. सांगत होता, आमच्याकडे खेडेगावी हुंडा ही प्रथा आता आतापर्यंत नव्हती. धट्टीकट्टी, शेतात काम करणारी मुलगी पहायची अर्थात जातवाली हवीच. की काम फत्ते.

गंमन बघा, मुलीच्या बाबत सौंदर्य हा फार महत्वाचा निकष असतो. प्रथम तिच्या रंगाची चर्चा होते. मग तिच्या नाकाची लांबी काढण्यात येते. डोळ्याचे सौंदर्य फक्त पतिदेवांच्याच लक्षात येतं. पूर्वीच्या काळी लांबसडक केस हा एक ॲसेट असे. आता विग्ज् मिळायला लागल्यापासून त्यांचे महत्त्व कमी झाले.


तेव्हा थोडक्यात काय, मुलीला पसंत करताना सगळे बाह्य निकष लावले जातात. सौंदर्य बघणे म्हणजे तिच्या शरीराकडे वस्त् म्हणून पाहणे. तिचा बाप किती हुंडा देऊ शकतोय याचा विचार करणे म्हणजे त्या मुलीला लगडलेला पैसा बघणे किंवा ती मुलगी नोकरी करतेय की नाही हे बघणे. याचा अर्थ तिच्या नोकरीशी लग्न लावणे. हे सगळं या शब्दात मांडलं की भयंकर वाटते. कारण चालीरीती, रूढी, संस्कृती या नावाखाली आपण जे काही सहजपणे करत असतो तेच नेमकं नागवं सत्य होऊन आपल्यापुढे उभं राहातं.

एखादा मुलगा डॉक्टर होतो. मग दवाखाना काढतो. कधी कर्ज घेऊन, कधी बापाच्या पैशाने. मग तो लग्नाच्या बाजारात दिमाखाने वावरतो. त्याचा बाप आणि तो खणखणीत शब्दात हुंड्याची मागणी करतात. बाप म्हणतो, आम्ही मुलीला जन्मभर पोसणार आहोत. तरुण म्हणतो, माझ्या नावाने ती समाजात मिरवणार

आहे. माझ्या प्रतिष्ठेचा ती उपयोग करणार आहे. एखादा बिझनेसमन जसे गुडविलचे पैसे मागतो तसा हा तरुण स्वतःच्या योग्यतेची किंमत करत असतो. मुलीला स्वतंत्र अस्तित्व नाहीच, हे गृहीत धरूनच. समर्थन काय ? मग, 'माझ्या शिक्षणाला एवढा खर्च आला. त्याच्या जोरावर मी पैसे मिळवणार. माझी ही भांडवल–गुंतवणूक आहे. तुमच्या मुलीच्या सुखी आयुष्याचा पायाही या भांडवल गुंतवणुकीवर अवलंबून आहे. तेव्हा तुम्हीही त्याचा भार थोडा थोडा खांद्यावर घ्या.' तर्कशास्त्र सरळ आहे. पण या तर्काचा पाया काय ? गृहीत कृत्य काय ? 'पैशामध्येच सुख आहे.' मुलीला सुख देणे म्हणजे खूप पैसा कमावणारा मुलगा पाहून देणे. हे मूल्य मनात बाळगणारे लोक आहेत म्हणून हुंड्याचा पाठपुरावा सतत होत असतो. हुंडा देणारे आहेत, म्हणून मागणारेही आहेत.

माझ्या अंदाजाप्रमाणे ही प्रथा सुरू झाली असावी आंदण देण्यापासून. मुलीच्या खर्चासाठी म्हणून जमिनीचा एखादा तुकडा दिला जाई किंवा स्त्रीधन म्हणून सोन्याचे दागिने. अडीअडचण आली, नवऱ्याने बायकोला टाकून दिले, किंवा अकस्मात मेला तर मुलीला काही उत्पन्न रहावे ही मुळातील कल्पना. किंवा वारसा हक्काचा एक भाग म्हणून पडलेली ही रीत. कारण आपण कितीही म्हटलं की हुंडा आमच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे तरी ही संस्कृती शेवटी वरच्या वर्गांपूर्तीच मर्यादित राहिलेली दिसते. ज्यांच्याकडे देण्यासारखं होतं ते आपणहून देत असत. कष्टकरी वर्गात मगाशी म्हटल्याप्रमाणे काम करणाऱ्या स्त्रीला विकत घेण्याची पद्धत होती. मात्र आता या उच्च वर्गात त्याच पूर्वीच्या प्रथेची पोकळ चौकट उरलीय. त्यातला अर्थ केव्हाच निघून गेलाय.

जोपर्यंत पैसा म्हणजे सुख हे मूल्य जात नाही, खुल्या मोकळ्या वातावरणात तरुण-तरुणींच्या भेटीगाठी होत नाहीत, जोपर्यंत माझा व्यक्तिविकास करून मी आर्थिक स्वातंत्र्य मिळवणार आहे आणि मगच अनुरूप तरुणाच्या गळ्यात माळ घालणार आहे असे शिक्षण तरुणीला मिळत नाही, जोपर्यंत शिकलेल्या तरुणीला नोकरी मिळत नाही, तोपर्यंत व्यक्तिमत्त्व, कलागुण, स्वभाव या मानवी गुणांना आपल्या समाजात स्थान नाही. तोपर्यंत खऱ्या अर्थाने मानवी पातळीवर विवाह होणे शक्य नाही. आणि मग हुंडाबंदीसाठी कितीही मोर्चे काढले तरी टेबलाखालून हुंडे दिले जातील. त्यावर सुसंस्कृत आवरणे घातली जातील आणि असंख्य तरुण मुलींची भवितव्ये पैशाच्या आवाजावर नाचत राहतील.



॥ १३ ॥

हुंडा म्हणजे चक्क वाटमारीच की !

१९ एप्रिल १९७५ 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पाचव्या पानावरची बातमी वाचली ? 'वरदक्षिणा म्हणजे हुंडा नाही. कोर्टाचे मार्मिक विश्लेषण.'

'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये आलेल्या बातमीच्या आधारे हकीगत अशी की अशोक आंबेकर नावे तरुण व सुषमा पत्की यांचा विवाह झाला. विवाहानंतर वितुष्ट येऊन सुषमा सासर सोडून निघून आली. अशोक आंबेकर याने तिच्याकडे लग्नामध्ये घातलेले दागिने परत द्यावे अशी मागणी केली. त्यावरोवर सुषमाच्या वडिलांनी हुंड्याच्या रकमेची अशोककडे कायदेशीर नोटीस पाठविली. प्रकरण कोर्टात गेले.

या सर्व हकिगतीतून हुंडाप्रतिबंधक कायद्याच्या अनेक मूर्ख मर्यादा दिसून येतात. पहिलीच गोष्ट केवळ पतीपत्नीमध्ये वितुष्ट आल्यानेच हुंडा प्रतिबंधक कायद्याचा आधार घेण्याची कल्पना मुलीच्या वडिलांना सुचली. याचा अर्थ काय ? हुंडा दिला हे प्रथम पुराव्याने सिद्ध होणे आवश्यक आहे. याचा अर्थ लग्न होणे, हुंडा देणे हे सर्व विधी प्रत्यक्षात घडले पाहिजेत. आता कल्पना करा की एकदा लग्न होऊन मुलगी सासरी गेली की कोणत्या बापाला जावयावर खटला भरून आपल्या मुलीच्या मुखामध्ये माती कालवावीशी वाटेल ? समजा उद्या असा खटला कोणी भरला तर त्या मुलीवर जावई किंवा सासरा त्याचा सूड काढणार नाही याची खात्री द्यायला सरकार तयार आहे का ? कायदा किती भंपक असू शकतो त्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

कायदा करताना तो कायदा राबविण्यासाठी अनुकूल व मुक्त वातावरण आहे की नाही याची दक्षता सरकारने कधी घेतली आहे काय ?

लाखो विवाह दरवर्षी होत असतात. हुंडा या ना त्या मार्गाने दिला जातो. पण तेरी भी चूप मेरी भी चूप ! कायद्याची अंमलबजावणी हे कायद्याचे अंग किती महत्त्वाचे आहे हे आजकाल सर्वच कायद्यांच्या बाबत लक्षात येतंय. साध्या कर आकारणीपासून ते कमाल जमीनधारणा मर्यादा कायद्यापर्यंत प्रत्येक कायद्याबाबत हीच तऱ्हा.

मुलीचे लग्न हे अनेक प्रकारच्या दडपणाखाली पार पडते. सामाजिक दडपण, आर्थिक दडपण. मुलीचे लग्न झाले पाहिजे, तिला कुंवार कशी ठेवायची, सौभाग्य हेच तिचे लेणे वगैरे तिच्यावरील सामाजिक दडपण. तिचे मन, लग्नाची शारीरिक-मानसिक गरज हे मानसशास्त्रीय दडपण आणि तिचे लग्न झाले नाही तर तिचे पोट भरावे लागेल हे आर्थिक दडपण. कारण आज मुलीला नोकरी मिळून ती आर्थिक-दृष्ट्या स्वतंत्र होण्याची शक्यता फारच कमी. तेव्हा जोपर्यंत ही दडपणे कमी होत नाहीत तोपर्यंत मुलीचा बाप कोर्टात जाऊन आपले नाव बदनाम करून घेण्याची शक्यता कमी !

याच कायद्याचा आणखी एक महत्त्वाचा घटक असा आहे की हुंडा प्रतिबंधक कायद्याचा आधार घेण्यासाठी मुलीनेच फिर्याद करणे आवश्यक आहे. आता तुम्हीच सांगा. भारतामध्ये कोणती स्त्री इतकी सज्ञान, धैर्यशील आणखी सधन असते ? तिला प्रत्येक घासासाठी बापावर अवलंबून राहावे लागते. तिला बापाच्या संमतीशिवाय अशा प्रकारचा खटला लढविणे शक्य होईल का ? आपल्यासारख्या गरीब देशात स्त्रियांना शिक्षण नाही, नोकरी नाही आणि अशा तऱ्हेने तिची कोंडी झाली की एखाद्या दरोडेखोराने जसे वाट अडवून लूटमार करावी तशा तऱ्हेने आजकाल हुंडा घेतला जातो. एक प्रकारची वाटमारीच ही. गोजिरवाणा युक्तिवाद काय ? अहो त्या पैशाचे आम्ही तुमच्या मुलीला दागिनेच चढविणार आहोत. पण कशासाठी ? शेवटी तुमची सून, तुमची बायको इतमानाने मिरवावी म्हणूनच ना ! शेवटी मान तुम्हालाच !

या पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र टाईम्स'मधील बातमीमध्ये कायद्यातील जी तरतूद ढळढळीतपणे दाखविली आहे ती अशी–

लग्नाच्या वेळी एका पक्षाने दुसऱ्या पक्षाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष किंवा लग्नाचे वेळी अथवा लग्नानंतर 'लग्नाकरिता' (as consideration of marriage) काही मालमत्ता वा मूल्यवान वस्तू दिली तर तिला हुंडा समजण्यात यावे. न्यायाधीशांनी हा कायदा अपुरा असल्याचे मत व्यक्त केले. मला मात्र प्रश्न पडतोय की पळवाटांचा आधार घेणाऱ्यांना अभय देणारी ही न्याययंत्रणा आज आजच्या समाज

व्यवस्थेमध्ये कोणते कार्य बजावत आहे ?

आपण लग्नविधी जर बघितले तर लक्षात येईल की लग्नामध्ये विविध विधींची गरज म्हणून अनेक गोष्टी दिल्या जातात. सीमंतपूजनाच्या वेळी वरदक्षिणा, वरमायची ओटी भरण्यासाठी साडी, नणंदेचे पाय धुवून तिला साडी, वरपित्याला चांदीचा पेला. रुखवतामध्ये भांड्यापासून ते लग्नाचा सगळा खर्च, या अनेक गोष्टी थोड्या फार चालीरीतीच्या नावाखाली पण सक्तीने केल्या जातात आणि या 'लग्नाकरिता' असतात. कारण या गोष्टी करण्याचे नाकारले तर लग्न मोडण्याची भीती असते. तेव्हा कायद्याच्या भाषेचा मला अर्थ लागतोय तो असा की या सर्व गोष्टी 'डावरी' या शब्दामध्ये अभिप्रेत होतात. श्रीमंत घरची लग्ने सोडली तर आज मध्यमवर्ग व कनिष्ठ मध्यमवर्ग यातील लग्नेही अगतिकतेने होतात, सावकाराकडे जावे लागते. कर्जबाजारी व्हावे लागते. आजकाल हुंडा नको, पण मानपान व खर्च तेवढा तुम्ही करा हो! असं म्हणून सुधारक म्हणून मिरवणारी मंडळी बरीच दृष्टीस पडतात. त्यांच्याही सुधारणेचा बुरखा एकदा फाडायला हवा आहे. कारण वरील व्याख्येप्रमाणे लग्नाचा खर्च व मानपान हाही भाग सक्तीच्या भागाखालीच येतो. अगदी प्रेमविवाहामध्ये सुद्धा नवरा मुलगा आई-वडिलांचे नाव पुढे लावून लग्नाचा खर्च तेवढा तुम्ही करा असे शेपूट घालतोच. माझ्या समजुतीप्रमाणे कायद्याने या सर्वच गोष्टींवर बंदी घातली आहे आणि यापैकी कोणतीही गोष्ट आडमार्गाने केली तर त्याला तत्वशून्य भ्रष्ट व्यवहार करणाराच म्हणावा लागेल.

आदर्श विवाह कधी होईल ? तरुणी–तरुणी स्वतः नोकरी करून लग्नाचा, संसाराचा खर्च स्वतः पैसे साठवून करण्यास तयार होतील त्याचवेळी त्यामध्ये पिळवणूक राहाणार नाही.

ठीक आहे. सध्याच्या आपल्या परिस्थितीमध्ये मुलीला नोकरी नाही. ती वडिलांवर अवलंबून आहे. अशा वेळी दोन्ही पक्षांनी ऐपतीचे पैसे एकत्र करावेत व दोघांची मिळून जी रक्कम जमेल त्यामध्ये समारंभ साजरा करावा. या प्रकरणात 'वोलणी' नावाचा प्रवेशच नसेल. सध्या तरी हे स्वप्नरंजन वाटतंय. कारण आज हे मूल्य अस्तित्वात नाही. खोटा मोठेपणा मिरवण्याचे मूल्य हे विषमतेतून जन्माला येते.

अशा परिस्थितीत वरदक्षिणा म्हणजे हुंडा नव्हे असे सांगणाऱ्याच कायद्याला काय म्हणावे हेच कळेनासे होते ! कारण हुंडा देणे असा प्रत्यक्ष विधी हिंदू धर्माच्या कोणत्याही पद्धतीत नाही. तेव्हा वरदक्षिणा देणे एवढेच नव्हे तर सबंध लग्नसमारंभ हाच सक्ती व दडपणाच्या खाली घडतो हे डोळसपणे विचार करणाऱ्या माणसाला सांगायल नको. न्यायदेवता आंधळी असते म्हणतात ते किती खरंय याचा पुन्हा एकदा प्रत्यय येतोय.

॥ १४ ॥

तरण्याताठ्या पोरी पैशापायी विकल्या जातात तेव्हा....

वॉर्डन रोडवर राहणाऱ्या माझ्या मैत्रिणीच्या शेजारच्या ब्लॉकवर परवाच पोलिसांनी 'रेड' घातली. चारपाच मुली राहायच्या तिथे. बरीच तरुण मंडळी येऊन जायची. हास्याचे फव्वारे ऐकू यायचे. चुकून कधी मैत्रिणीच्या घराची बेल दाबली जायची. दारात दारूचा वास मारीत गिऱ्हाईक उभं. मैत्रिणीच्या घरच्या लोकांच्या कपाळावर आठ्या पडायच्या. पण सगळेच नोकरी करणारे–आईसुद्धा. दिवसभर घरात कोणीच नसे. तेव्हा या गोष्टीचे दखल घेण्याची फारशी गरज वाटत नव्हती.

पोलिसांनी पंचनामा करायला सुरुवात केली. त्या सगळ्याजणी धंदा करत होत्या हे सिद्ध होऊ लागले. सबंध ब्लॉक अद्ययावत साधनांनी भरलेला. टेपरेकॉर्डर, टी. व्ही उत्तमोत्तम कपडे, परदेशी सौंदर्यप्रसाधने. मुलीही अगदी फॅशनेबल, सोफिस्टिकेटेड, यस–फॅस करणाऱ्या. लगेच माझ्या मैत्रिणीच्या आईने माझ्याशी वाद घालायला सुरुवात केली. 'पाहिलंस, तू म्हणतेस धंदा काही कोणी आवडीने करत नाही. परिस्थितीने माणूस अगतिक होतो. कोणीतरी धंद्याला लावून देतो. आता तू सांग. या मुलींना काय कमी आहे? शिक्षण आहे. दिसताहेत चांगल्या घरच्या. यांनी नोकरी का करू नये? मानाने का राहू नये? शेवटी तुला सांगते, ही रक्ताची चटक, मान गेला खड्ड्यात. शरीर विकून दागिन्यांची हौस करणाऱ्या या पोरी. यांनीच स्त्रीजातीला काळिमा आणलाय.' एका सुशिक्षित बाईची ही प्रतिक्रिया.

वाशिंची हिराबाई सांगत होती, 'माझ्या घराशेजारीच दारूचा गुत्ता आहे गुत्त्याला लागून एक माणूस बायांचा अड्डा चालवितो. पुरुष माणसे दारू पिऊन तर्र होतात. पैसा उधळून टाकतात. आम्ही पंचवीस-तीस बायका जमा केल्या. काठ्या घेतल्या आणि गुत्त्यावर येणाऱ्या पुरुषांना मारायला सुरुवात केली. काहींनी शेजारच्या घरात जाऊन वेश्यांना दरादरा बाहेर ओढून आणलं आणि वजावलं— येथून पन जा. नाहीतर आमच्याशी गाठ आहे. काय सांगू छायाताई, आपली ही स्त्रीजातच स्त्रीजातीचा छळ करते. दारू तेथे बाई आणि बाई तेथे दारू.' ही झाली वेश्येबद्दल एका अशिक्षित बाईची प्रतिक्रिया.

मी तिला विचारलं, 'हिराबाई, दारू आणि बाई कोणाच्या मालकीची होती?'

'ती नेहमीच पुरुषाच्या मालकीची असते बाई. अगदी दारू विकायला बाई बसलेली असली तरी तिचा पैका जातो तिच्या दादल्याच्या हाती.'

'तेव्हा हिराबाई, बाईचा छळ बाई नाही करत. दारू प्यायलाही पुरुषच लावतो आणि बाईला शरीर विकतानाही पुरुषच दलाल मध्ये असतो आणि खरं पाहिलं तर पुरुषाच्याकडे असलेला पैसा, भांडवल, खरं म्हणजे त्याला मदत करते. त्याला हवा असतो फायदा-नफा. तो आपले भांडवल वापरून जे हातात येईल ते विकतो.'

मध्यंतरी एका विदुषी बाईनीसुद्धा असेच एक विधान केलेले आठवले. 'वेश्या ही समाजाची महत्वाची गरज भागवत असते. म्हणूनच समाजाने वेश्येला मानाने वागविले पाहिजे.'

या तिन्हीही प्रतिक्रिया वेश्याव्यवसायाचे मूलभूत स्वरूप समजावून न घेता केलेल्या आढळतात. कारण त्या मागे दोन रूढ समजुती प्रामुख्याने दिसतात. वेश्याव्यवसाय हा सर्वात जुना धंदा आहे. त्यामुळेच तो प्रत्येक समाजाचे स्वाभाविक अंग आहे. ते आवश्यक पाप आहे. दुसरे कारण आहे, पुरुषाची वासना ही स्त्रीपेक्षा अधिक तीव्र असते. म्हणून त्याला अनेक स्त्रिया लागतात. त्यातूनच त्याच्या वासनेला खाद्य पुरविणारी बाजारपेठ तयार होते–वेश्याव्यवसाय.

हे गैरसमज किती पोकळ आहेत हे इतिहासात थोडेसे डोकावले तरी लक्षात येते. तिबेटमधील टोळ्यांमध्ये रूढ असलेली एक पद्धत खूप बोलकी आहे. रस्त्याने कोणी प्रवासी जायला लागला की घरातील वृद्ध स्त्रिया तरुण मुलींना घेऊन त्याच्याकडे जात. त्या प्रवाशाने मुलीबरोबर शय्या करून तिला अंगठी किंवा तत्सम वस्तु बक्षीस देण्याची अपेक्षा असे. अशा कमीतकमी वीस वस्तू मुलीला जमवाव्या लागत. जिच्याकडे वस्तू जास्त ती मुलगी लैंगिक दृष्ट्या सर्वात आकर्षक समजली जाई. प्रजोत्पादनासाठी अशी तरुणी योग्य आहे याची खात्री पटे. अशा लैंगिक रूढीतूनच स्त्री ही लैंगिक वस्तू हा दृष्टिकोन दिसून येतो.

याच्याच पुढची पायरी देवाच्या सेवेसाठी देवदासी, मुरळी सोडण्याची कल्पना.

लोकांनी मंदिरामध्ये यावे. धार्मिक गोष्टींना महत्त्व द्यावे म्हणून धर्मगुरू तरुण मुलींना मंदिरात आणायचा प्रयत्न करीत, असे डॉ. शॉटस् या इंग्लिश लेखकाने लिहिले आहे. देवदासींच्या वास्तव्यामुळे अनेक पुरुष मंदिराकडे आकर्षित होत.

पुढे व्यापारी मंडळी प्रवासाला निघत. त्यांच्या सोयीसाठी प्रमुख व्यापारी– शहरी, राजधानीच्या– शहरी वेश्यांची खास वस्ती असे. हिंदू संस्कृतीप्रमाणे नवऱ्याच्या मृत्यूपाठोपाठ त्याची संपत्ती स्त्रीला मिळत नसे. घरी छळ होई. अशा विधवा स्त्रिया पोट भरण्यासाठी वेश्याव्यवसायाचा आधार घेत. तसेच त्यांच्या संततीला पुढे त्याच व्यवसायात राहावे लागे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात वेश्यांसंबंधीचे बरेच नियम तपशीलवार मांडले आहेत. तिच्या उत्पन्नावर कर असे. वेश्यावस्तीत दारूची दुकाने असत. त्या दारूवरील कराने राजाच्या खजिन्यात बरीच भर पडे. त्यामुळेच अशा स्त्रियांना राजा उत्तेजन देई.

इंग्लंडमध्येही पब्जमध्ये लोकांनी अधिक दारू पिण्यास यावे म्हणून मुद्दाम वेश्या पाळल्या जात. नफा जास्त मिळावा हा एकमेव उद्देश. म्हणूनच त्या वेळी पार्लमेंटमध्ये अनेक वेळा वेश्याव्यवसाय विरोधी कायदे होऊन सुद्धा वेश्याव्यवसाय चालू ठेवण्यात अनेक हितसंबंधीयांचे हात गुंतलेले असत. सैनिक व खलाशी यांना दूरदूर सफरीवर जावे लागे. कौटुंबिक जीवनापासून वंचित राहावे लागे. लष्करी अधिकारी वेश्यागृहे चालवीत. त्यांना चकला म्हणवीत. महायुद्धाच्या वेळी तर वेश्यावस्ती व तेथे चालणारे बेकायदेशीर व्यवहार यांना ऊत येई. सध्याचे उदाहरण म्हणजे व्हिएतनाम. सबंध दक्षिण व्हिएतनामची अर्थव्यवस्था अमेरिकन सैनिक व त्यांना लागणाऱ्या आवश्यक सेवा– वेश्या व्यवसायासकट– यावर उभी होती.

अवाढव्य वाढणारी शहरे तर वेश्याव्यवसायाची खाणच. ही सुजलेली शहरे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा अपरिहार्य परिणाम. नफ्याच्या प्रेरणेवर आधारलेला व्यवहार. कामगारांना जागा पुरविण्याची जबाबदारी मालक वर्ग घ्यायला तयार नाही. जागेची टंचाई. कुटुंब आणून बिऱ्हाड करणं चैनीची गोष्ट. १९६१ साली मुंबईमध्ये दर हजार पुरुषांमागे पाचशे एकतीस स्त्रिया हे प्रमाण. मग कुटुंब जीवनापासून वंचित झालेला, महागाईत पिळलेला, धावपळीच्या जीवनामुळे आयुष्यातून फेकला गेलेसा माणूस वेश्यागृहाचा रस्ता चालू लागतो. काळा पैसा खर्च करायला दारू, वेश्या यांसारखे दुसरे उत्तम मार्ग नाहीत. लाच देण्यासाठी स्त्री शरीर उपयोगी पडतेच. पुरुषाची वासना विकत घेता येते. अशा रीतीने पोषक वातावरण वेश्या व्यवसायासाठी तयार होत जाते. सार्वत्रिक दुष्काळ हा वेश्या स्वस्त मिळविण्यासाठी सुकाळ. गाई–म्हशी कवडी मोलाने विकल्या जातात. तसेच तरण्याताठ्या मुली-बायका, वडील व नवरे विकून टाकतात. काही तरुण मुलीही स्वतः या लोंढ्यामध्ये सामील होतात. सरकार काम देऊ शकत नाही. दलाल लोक टपलेलेच असतात.

वेश्याव्यवसायात पुरुष दलाल असतात आणि या दलालांना बरकत चांगली होते तोपर्यंत हा व्यवसाय टिकून राहील. 'धुणी-भांडी' घासून मानाने जगावे म्हणणे ठीक आहे. पण धुणी-भांडी घासायला शहरात येईतोवरच दलालाने त्यांना गाठलेले असते.

चांगल्या घरच्या तरुण पोरी या व्यवसायात जातात कारण पैसा. पैसा हेच या समाजाचे मूल्य. तो कोणत्याही मार्गाने मिळवावा. काळा पैसा मिळवताना पहिल्यांदा मन मारावे लागते. तसेच शरीर विकताना प्रथम मन मारावे लागते. एकदा सवय झाल्यावर काय! स्त्रियांना नोकरीच्या संधीही कमी असतात. लग्न हाही पुष्कळदा सक्तीचा व्यभिचार ठरतो. अशा वातावरणात पैशाची व सुखसोईची चटक लागलेली एखादी मुलगी या व्यवसायाकडे वळली नाही तरच नवल.

तुम्हीच सांगा दोष कोणाचा जास्त? चैनीची गुलाम असणाऱ्या त्या मुलीचा की जी समाजव्यवस्था पैसा हे मूल्य तयार करते, वेश्याचे दलाल तयार करते तिचा?

जेव्हा प्रत्येक स्त्रीला शिक्षण मिळेल, नोकरीची हमी मिळेल, स्त्रीकडे वस्तू म्हणून पाहिले जाणार नाही, तिची खरेदी-विक्री थांबेल, शहरे वाढणार नाहीत, प्रत्येकाला कुटुंबजीवन मिळेल, नफ्याची प्रेरणाच नाहीशी होईल त्यावेळी वेश्याव्यवसाय आपला गाशा गुंडाळेल. स्त्री-पुरुषांचे मुक्त संबंध तरीही कदाचित राहतीलच. पण त्याला व्यवसाय हे स्वरुप नसेल. स्त्रीच्या गुलामीचे उघडउघड व्यापारी स्वरूप नष्ट होईल.

❀

॥ १५ ॥

स्त्रीच्या नावावर खंडीभर पैसे बँकेत टाकले तरी तिचे मन स्वतंत्र होईल का ?

'हे बघ, आपण म्हणतो की नाही, स्त्रीच्या कामाला योग्य तो दर्जा मिळाला पाहिजे. तिच्या गृहकृत्याचे, मुलांच्या संगोपनाचे मूल्य तिला मिळाले पाहिजे. त्यासाठी एक उपाय सुचतोय मला. सरकारने एक कायदा करावा–नवऱ्याला मिळालेल्या प्रत्येक पैशातील अर्धा वाटा त्याने बायकोच्या नावावर केला पाहिजे. नवरा जितके पैसे मिळवेल त्याच्या निम्मे पैसे बायकोचे. कशी वाटते आयडिया ?' माझ्या एका अस्मिता जागृत झालेल्या मैत्रिणीने उपाय सुचविला.

माझ्या दुसऱ्या एका मैत्रिणीने लगेचच ही कल्पना उचलून धरली. 'मला ही कल्पना पटते बाई ! सध्या आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये जास्त नोकऱ्या उपलब्ध करून देण्याची कुवत नाही. तेव्हा बायकांना नोकऱ्या मिळणे शक्य नाहीं. वरं, नोकरी केली तरी बाईचा त्रास दुप्पट वाढतो. बाहेरचे काम आणि घरचे काम. त्यापेक्षा सध्याच्या परिस्थितीत तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी एवढं तरी आपल्याला निश्चित करता येईल.' दोघीही या आयडियावर खूष होत्या.

'आयडिया तशी चांगली आहे, पण ती प्रत्यक्षात कशी अमलात आणता येईल ते बघू या. आणि समजा अमलात आली तरी त्याचा स्त्रीला कितपत फायदा होईल याचाही तपास करू.' माझ्यातील मास्तरीण लगेच जागी झाली. हल्ली तेवढं एक शिकलेय मी. सगळ्यांचे शांतपणे ऐकून घ्यायचं आणि हळूहळू मुद्देसूदपणे खंडन

करीत जायचं. लोक उत्स्फूर्तपणे समाजातील अनेक कठिण प्रश्नांना सोपी सोपी उत्तरे सुचवीत असतात. त्या सोप्या उत्तरांना सुरुंग लावायचा असेल तर पायरीपायरीनेच जावे लागते. उदा. रस्त्यावरच्या सगळ्या भिकाऱ्यांना उचलून तुरुंगात किंवा भिक्षागृहात डांबून टाकावे म्हणजे रस्ते स्वच्छ दिसतील किंवा झोपड्यांना आग लावून द्यावी म्हणजे गलिच्छ वस्त्या निर्मूलन होईल किंवा स्त्रियांना कायद्यानं समानता मिळवून द्यावी म्हणजे स्त्रियांना आपोआप उच्च स्थान मिळेल किंवा वेश्यावस्ती गावापासून दूर हलवावी म्हणजे कुलीन स्त्रिया व तरुण मुले याच्या मनावर वाईट संस्कार होणार नाहीत, वगैरे वगैरे. माझ्या मैत्रिणीची आयडिया बेसिकली या सर्व आयडियांहून वेगळी नव्हती.

मग मी माझी मेथड वापरायला सुरुवात केली. आज, समजा सरकारने कायदा केला की या सार्वभौम भारतातील यच्चयावत पुरुषांनी आपल्या मिळकतीतील अर्धी मिळकत पत्नीला द्यावी. त्याची अंमलबजावणी कशी करणार ? अधिकारी नेमणार ? त्यांनी एक तारखेला घरोघर जाऊन पाहणी करायची ?

आपण अगदी टप्प्याटप्प्याने जाऊ या. रोजावर काम करणारा मजूर घेऊ. त्याला चक्क हातावर रोख पैसा ठेवावा लागतो. त्याला आपण म्हटलं, निम्मा पैसा तू ठेव. निम्मा बायकोला दे. तो 'हां' म्हणणार. घरी पोचणार. खिशात उरलेले दोन-चार आणे बायकोचे. दुसरा वर्ग कामगारवर्ग. त्यांनाही चेकने पैसे दिले जात नाहीत. आठवड्याच्या अखेरीस रोख पगार. त्यांच्या बायकांना मजुरी घेण्यासाठी बोलाविणे शक्य नाही. बरं, समजा चेकने पैसे देण्याची सक्ती केली तरी पुन्हा प्रश्न उभा राहीलच. कामगारांच्या बायका सर्व अंगठेबहाद्दर. तेव्हा कामगाराच्या बायकोला पैसे काढण्यासाठी नवऱ्यावरच अवलंबून रहावे लागेल. दुसरी अडचण होईल बँकामधील खाती वाढतील आणि कामगारांचा खर्च वाढेल.

तिसरा वर्ग पांढरपेशा कर्मचाऱ्यांचा. यांना पगार चेकने मिळतो खरा परंतु त्यांच निम्मा पगार बायकोला दिला तरी बायकोला स्वातंत्र्य कसे काय मिळेल ? घरचा खर्च बाईलाच करावा लागतो. भुकेल्या पोटी मुले बाईच्याच मागे लागतात. तिच्या नावाचे सर्व पैसे तिला घरातच खर्च करावे लागतील. एवढंच नव्हे तर जास्ती लागतील ते नवऱ्याकडेच मागावे लागतील. म्हणजे पुन्हा तिचे नवऱ्यावर अवलंबून रहाणे चालूच राहते. अशा फारच कमी स्त्रिया असतील की ज्यांच्या वाट्याला नवऱ्याचा अर्धा पगार मिळतो, त्यातून घरचा खर्च भागून शिवाय चैनीसाठी आणि मनमानेल ते घेण्यासाठी पैसे उरतील.

यानंतर कारखानदार, व्यापारी यांचा वर्ग. हा वर्ग आपल्या बायकांच्या नावाचा उपयोग नेहमी करून घेतच असतो, आज सगळ्या कंपन्यांचे अकाऊंटस जर आपण पहायला गेलो तर आपल्या लक्षात येईल की बहुतेकांच्या बायका धंद्यामध्ये भागीदार

म्हणून कागदावर दाखविलेल्या असतात. आयकर चुकविण्याचा सोपा मार्ग. श्रीमत शेतकऱ्यांच्या बायकांच्या नावे जमीन असते. ह्या कोणाही बाईला खऱ्या अर्थाने कधीही कंपनीच्या व्यवहारात सामील करून घेण्याचे प्रयत्न होत नाहीत. काही जणी शोभेसाठी ऑफिसात जातातसुद्धा. पण सारेच लुटपुटीचे. खऱ्या अर्थाने, मनानेसुद्धा त्या स्वतंत्र आहेत असे त्यांचे त्यांनाही वाटत नाही. हाती पुष्कळ पैसा असणे आणि मनासारख्या साड्या घेता येणे म्हणजे स्वातंत्र्य अशी पुष्कळांची संकुचित कल्पना असते. पण ह्या श्रीमंताघरच्या बायकांना पैसा पुष्कळ मिळत असला तरी त्यांची खरी भूमिका काय असते हे त्यांच्याजवळच जाऊन बघितले पाहिजे.

नवरा हा अनेक कारखान्यांचा किंवा व्यापारी कंपन्यांचा मालक. लाखो रुपयांच्या उलाढाली करणारा कर्तबगार पुरुष.

त्याचा पुरुषी अहंकार चांगलाच पोसला गेलेला असतो. तोच अहंकार त्याने घरात न गाजविला तर नवल. त्याने बाईच्या नावावर पैसे ठेवले तरी मी तुझ्यावर उपकार करतो ही भावना जाते थोडीच! 'तुला काय कळतंय!' 'तुझं काम सुंदर दिसण्याचं,' 'चतुर संभाषण करून मनोरंजन करण्याचं.' 'मुलांना सांभाळायला काय अक्कल लागते!', 'कुरकुर करण्याचे काम नाही,' 'दहा नोकर ठेव हवं तर' ह्या त्याच्या ठाम कल्पना. त्या बाईचं जीवन तर खरंच बांडगुळासारखे होते. फक्त नवऱ्याच्या मुलांना जन्म देणे, धंद्याला पुढे वारस पुरवणे आणि समारंभाना आवश्यक ते यजमानीणपद सांभाळणे.

तेव्हा अनिता, आता तूच सांग, यापैकी कोणत्या स्त्रीला तू म्हणतेस तो कायदा करून खरं स्वातंत्र्य मिळू शकेल? जोपर्यंत पुरुषाची पत्नी ह्या संदर्भातच तिच्या जगण्याचा अर्थ आहे तोपर्यंत तिने घरातील कामे करून पुरुषाला पूरक म्हणून रहावे. घर सुंदर करावे, कुटुंब सुखी ठेवावे, या नशिबापासून तिची सुटका होईल का? घरकाम हे दुय्यम आणि म्हणून हे काम करणारी स्त्रीही दुय्यम ही कल्पना जाऊ शकेल का? कागदावर ढीगवेळा खरडलं तरी ती समान ठरेल का? मुख्य म्हणजे तिच्या नावावर खंडीभर पैसे बँकेत शिल्लक ठेवले तरी तिचे मन स्वतंत्र होईल का? स्वातंत्र्याचा पाया असतो आत्मविश्वास आणि हा आत्मविश्वास जगाच्या व्यवहारात भाग घेऊनच येतो. तो कामगारांच्या बायकोला दिवसभर चार भिंतीच्या आत कष्ट उपसूनही येणार नाही किंवा श्रीमंताच्या बायकोला रमी खेळून आणि आणि दिवसभर कॉफी पार्ट्यांना जाऊन मिळू शकणार नाही. स्वयंपाक करणे व मूल सांभाळणे ही मादीची म्हणून कामे तिला देण्यात आली. याखेरीज ती जेव्हा आपले कर्तृत्व दाखवू शकेल, नोकरी करील, धंदा करील तेव्हाच तिला आत्मविश्वास येईल आणि स्वातंत्र्याचा खरा अर्थ कळेल.

पण सध्याची स्त्रीला वापरणारी संस्कृती अशा प्रकारे स्त्रीला पुढे येण्यासाठी

मदत करू शकेल, तिच्यामध्ये मनोधैर्य निर्माण करू शकेल, याची शक्यता फार कमी वाटते. ही संस्कृती, ही अर्थव्यवस्था फक्त जागोजाग इंदिरा गांधींची छायाचित्रे आणि झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर अशा तुरळक स्त्रियांच्या तसबिरी टांगून आमची तोंडे बंद करील, 'बायांनो केवढी महान आपली संस्कृती! केवढा महान तुमचा गौरव!'

ङ

॥ १६ ॥

तरुण मुली काय फक्त चैनीसाठीच नोकरी करतात ?

मध्यंतरी एका निबंधस्पर्धेचे परीक्षण करीत होते. नेमका विषय आठवत नाही. पण 'युवकांच्या मनातील असंतोष' अशाच प्रकारचा काहीतरी विषय होता. त्यातील अनेक निबंधातून असंतोषाची केलेली कारणमीमांसा गंमतशीर होती. शिक्षणावर घसरणे स्वाभाविक होते. जुन्या पिढीने घालून दिलेले भ्रष्टाचाराचे आदर्श वगैरे संतापाची कारणे होतीच. पण बहुतेक निबंधांतून बेकारीवर बराच भर दिला होता आणि बेकारीचा दोष बऱ्याच जणांनी बायकांवर टाकला होता.

अगदी पेटंट युक्तिवाद : आजकाल बऱ्याच तरुण मुली गरज नसताना नोकऱ्या करतात आणि पैशांचे काय करतात ? लिपस्टिक, पावडरी, नटणे, मुरडणे, साड्या फॅशन्स आणि गरीब घरच्या मुलांना मात्र दोन वेळच्या घासासाठीसुद्धा नोकरी मिळत नाही. त्या मुलांच्या बुद्धिमत्तेचा मला राग आला नाही. कीव वाटली. ती मुले तरी काय बिचारी ! वृत्तपत्रातून येणाऱ्या प्रचाराचाच बळी ! खरं म्हणजे आमच्या मराठी विचारवंताच्या संकुचित ज्ञानाचाच बळी !

'मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत कारण मुली नोकऱ्या करतात.' हा युक्तिवाद म्हणजे 'मराठी तरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत कारण मद्रासी आणि केरळीय तरुण महाराष्ट्रात येतात.' हे कारण देण्याइतकेच मूर्खपणाचे आहे. याचे कारण एवढेच आहे, की आम्हाला कोणालाही आजच्या शिक्षण पद्धतीतून ज्ञान मिळविण्याचा

शास्त्रीय दृष्टिकोन शिकविला जात नाही. आम्ही वरवर विचार करत जवळजवळ दिसणाऱ्या दोन गोष्टींचे संबंध जोडून मोकळे होतो आणि प्रश्नाचे उत्तर मिळाले, याचा आनंद मानत आपले ग्रह अधिक बळकट करतो.

मुलींनी नोकरी करावी की नाही यावर जेव्हा आपण वाद घालतो तेव्हा 'नैतिक' निकष लावतो. शेवटी तर काय लग्नच करणार नं! नवरा मिळवील की पैसे. नवऱ्याने नोकरी करायची, पैसे मिळवायचे आणि स्त्रीने मुलांना जन्म द्यायचा, घर सांभाळायचे ही श्रमविभागणी आपण इतकी गृहीत धरलीय की यापेक्षा वेगळं काही असू शकतं ह्याचा विचार करण्याची गरजच भासत नाही आपल्याला. ही श्रमविभागणी कशी आली, कुठून आली, का आली याचा केलाय कधी कोणी विचार?

स्त्रीने 'मादी' असावं आणि मादीच रहावं. एकीकडे कुटुंबनियोजनाची साधने आली. प्रगती झाली. प्रजोत्पादन ही गरज कमी होत गेली. मानववंश पुढे चालू रहावा म्हणून संततीचे बीज वाढविणे अपरिहार्य आहे असे आता कोणी म्हणू शकत नाही. आता मूल होणे ही आपल्या हातातली गोष्ट झाली. मुलाला वाढविणे ही एक सर्जनशील प्रक्रिया आता होऊ शकते. त्याला शिकवणं, घडविणं, संस्कार करणं यामध्ये स्त्रीइतकाच पुरुषही भाग घेऊ शकतो. अशा परिस्थितीत स्त्रीकडे मादी म्हणून बघायचे कारण काय? आपण स्त्रीकडे व्यक्ती म्हणून कधी बघणार?

मी 'मादी' शब्द वापरला म्हणून काही मंडळी चिडतील. पण वात्सल्य, प्रेम, त्याग, सेवावृत्ती या सगळ्या फुलोऱ्याच्या खाली उघड, निखळ सत्य हेच आहे की आतापर्यंत स्त्रीकडे 'मादी' म्हणूनच पाहिले जाई. आता नव्या जगामध्ये स्त्रीला व्यक्ती म्हणून जगायचा अधिकार आहे. नोकरी करण्याचा अधिकार आहे. याच्याही पुढे जाऊन मी म्हणेन की एखाद्या पुरुषाला जगण्याचा जितका अधिकार आहे, व्यक्ति-स्वातंत्र्य आहे तितकाच अधिकार स्त्रीला आहे. आपण नेहमी स्त्री-स्वातंत्र्य हा शब्द वापरतो. खरं म्हणजे स्त्री-स्वातंत्र्य हा वेगळा शब्द वापरायची गरज का भासावी? व्यक्तीमध्ये स्त्रीचा समावेश होत नाही का?

या सनातनी लोकांचे एकदा डोळे उघडण्याची गरज आहे. पशुपक्ष्यांमध्येही नर-मादी असतातच की. पण त्यांच्याकडे 'मादी' या प्रकाराचे फारसे स्तोम माजलेले आढळत नाही. प्रणयाराधनाचा काळ किंवा पिलांना जन्म देण्याचा काळ सोडला तर वाघ-वाघीण, सिंह-सिंहीण, एवढंच काय, उंदीर-उंदिरी, बोका-मांजरी, चिमणा-चिमणी सारखेच असत. वाघासारखीच वाघीण शिकार करते. निर्भयपणे कोठेही भटकते. चिमणी घरासाठी काड्या आणते. तेवढ्याच काड्या चिमणाही आणतो. निसर्गाने मादी म्हणून सोपविलेली कामे पार पाडली की तिचे मादीपण इतर कोणत्याही व्यवहाराच्या आड येत नाही. मग माणसाचीच मादी वेगळी का? तिच्या निसर्गदत्त कार्याचे अवास्तव स्तोम माजवून तिला चूल ते पाळणा या मादीय

कृत्यात डांवण्याचा अट्टहास का केला जातो? ही सगळी या महान संस्कृतीच्या शिल्पकारांची किमया आहे हे आपण लक्षात घेणार की नाही? आणि आता जुन्या संस्कृतीची कात टाकन देण्याची गरज निर्माण झालीय हे ओळखणार की नाही? का अजूनही त्या दिव्य संस्कृतीचे गोडवे गात दुभंगलेले जीवन जगणार?

एकीकडे काळावरोवर आपण फरफटत जात आहोत. परिस्थितीमुळे स्त्रीला वाहेर जाऊन नोकरीची गरज भासू लागते. नोकरी करणारापैकी केवळ १ टक्का मुली लिपस्टिकसाठी व फॅशनसाठी नोकरी करत असतील. पण असंख्य स्त्रिया इतक्या प्रतिकूल परिस्थितीत नोकरी करत असतात. मुलांना सांभाळण्यासाठी पाळणा-घरे नाहीत. तरुण मुलींना हुंडा जमविण्याची काळजी किंवा वडील वारल्यामुळे थोरल्या मुलीवर नोकरीची जवावदारी पडते. तिच्यावर धाकटी भावंडे अवलंबून असतात. पतिराजांच्या जेवण्या-खाण्याची सवयी ती वदलू शकत नाही. सगळे साग्रसंगीत हवे. तेव्हा तिच्याकडे नाक मुरडून वघणे आणि वेकारीचा शाप तिच्या 'करणीमुळे' मिळतोय असे कारण दाखविणे हा बुद्धिमत्तेचा अपमान आहे.

उलट आजची परिस्थिती अशी आहे की आर्थिक संकटे वाढत आहेत, नोकऱ्यांवरून काढून टाकण्याचे प्रमाण वाढत आहे. अशा वेळी पहिली गदा येते ती स्त्रियांच्यावर, शिरगणती दाखविते की पूर्वी सर्व काम करणाऱ्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण २३ टक्के होते. आता ते ११ टक्क्यांवर घसरले आहे. याचाच अर्थ आर्थिक अरिष्टांच्या काळात सर्वच कामगारांना त्रास सोसावा लागतो. काम करण्याचे व्यक्ति-स्वातंत्र्यच हिरावून घेतले जाते. पण त्यातही पहिला आघात सहन करावा लागतो स्त्रियांना. कामगार स्त्रियांसाठी पाळणा-घरे असावीत, वाळंतपणाचे फायदे मिळावेत, समान कामाला समान वेतन मिळावे या तऱ्हेचे कायदे होतात. पण हे कायदे पाळावे लागूच नयेत म्हणून कामगार स्त्रियांनाच कामावरून कमी केले जाते किंवा अविवाहित मुलींनाच कामावर राहायची परवानगी मिळते किंवा काही वेळा तिचे लग्न झाले तरी तिला कुमारी दाखविण्यात येते हे सत्य किती जणांना माहीत आहे? विशेषतः ज्यांना लाखो रुपयांचा नफा होतो त्या औषधी कंपन्यामध्ये ही कारवाई राजरोस चालते.

अशा वेळी ही आर्थिक व्यवस्था कायम रहावी, असंतोष माजू नये म्हणून 'स्त्रियांनी नोकऱ्या करणे वाईट' अशी नैतिक विचारसरणी हितसंबंधी विचारवंत पोसतात असे म्हटले तर चूक होईल का?

॥ १७ ॥

क्रियाशील राजकारणात स्त्री सहभाग कमी

माझ्या कॉलेजात जाणाऱ्या बहिणीला मी विचारलं, 'आँधी बघितलास ?'

'अय्या, काय ग्रेट आहे ! सुचित्रा सेन आणि संजीव कुमार अगदी परफेक्ट मॅचिंग कपल.'

'तुला 'आँधी' का आवडला ?' माझा सिली ॲकॅडेमिक प्रश्न.

'त्या दोघांचा रोमान्स इतका सुंदर रंगविला आहे. उगीच 'पळापळी' नाही. तो बघ प्रसंग ! सकाळी ती त्याला उठवत असते. त्याची बोटं हळूच गरम चहामध्ये बुडविते. त्याचा हात भाजतो आणि तो बोंबलत उठतो आणि सुचित्रा मस्त मिस्किल पणे हसत असते.'

'अग, पण या सिनेमाचे वैशिष्ट्य काय ?'

'संजीवच्या आणि सुचित्राच्या प्रेमामध्ये वादळ येतं आणि ओसरतं.'

'वादळ सुचित्राच्या प्रेमामध्ये येतं की राजकारणात येतं ?'

'अगं, राजकारण हे तिचे बाह्य जग झालं. वरवरचं. प्रत्येक राजकारणी माणसाला एक व्यक्तिगत जीवन असतंच की नाही ! ती तर स्त्री आहे. तिच्या जीवनात प्रेमाला महत्त्व असणारच.' मी पुढे तिला काहीच विचारलं नाही. कारण तिचे उद्‌गार हे अगदी प्रातिनिधिक होते. स्त्रीकडे अजूनही फक्त स्त्री किंवा प्रमुख भूमिका म्हणून स्त्री असे पाहण्याचा आपल्या समाजाचा दृष्टिकोन तिच्यद्‌वा उगारातून सहज

दिसत होता.

माझ्या लक्षात आलं, एखाद्या प्रसंगाचा अर्थ आपण कसा लावतो, एखादा प्रसंग आपण कसा समजावून घेतो हे सगळं आपल्या संस्कारावर, शिक्षणावर, मूल्यांवर अवलंबून असते. माझ्या वहिणीच्या मते सुचित्रा सेनच्या व्यक्तिमत्त्वाचा राजकारण हा पैलू वरवरचा वाटत होता. तिच्या मते सुचित्राच्या जीवनातील वादळ हे पतीपासून अनेक वर्षं दूर राहिल्यामुळे साठून आलेल्या एकाकीपणामुळे आलेले वादळ होते. माझ्या मते मूलतः ते वादळ राजकारणातील होते. त्याचा उगम मात्र तिने स्वीकारलेला राजकारण हा व्यवसाय तिच्या कुटुंबाच्या चौकटीत सहज शक्य न झाल्यामुळे जो वनवास पत्करावा लागला त्या संघर्षात होता. नवऱ्याने स्वेच्छेने राजकारणात जायला परवानगी दिली नाही आणि जेव्हा निवड करण्याचा प्रसंग आला तेव्हा तिच्यातील घरकुल, नवरा, मुलगी या त्रिकोणात बद्ध झालेली स्त्री मेली. तिच्यातील व्यक्ती जागी झाली. ती केवळ स्त्री नव्हती. समाजाची नागरिक होती. तिला अस्मिता होती. कर्तृत्व होते. कुवत होती. तिला एकाकीपणा जरूर वाटत होता, पण तो स्त्रीचा नव्हता. कोणत्याही मनुष्यप्राण्याला एकटे जगताना जो एकाकीपणा वाटू शकतो तो एकाकीपणा होता. जेव्हा दहा वर्षांनी तिचा पती तिला अचानक पुन्हा भेटला, तेव्हा ती राजकारणाची पथ्ये विसरली आणि वादळात सापडली. लोकांना तो तिचा पती हे माहीत नसल्या नेत्यांनी तिच्या शीलाची शंका घेतली. म्हणजे एक स्त्री म्हणून तो तिच्यावर अन्याय झाला. पुरुषाच्या शीलाची दखल घेण्याची गरज कोणालाच वाटत नाही. माझ्या वहिणीला राजकारण आणि स्त्री यातला संघर्ष जाणवला नाही.

नुकताच 'कमिटी ऑन दी स्टेटस ऑफ वुमेन' ह्या कमिटीचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यात त्यांनी स्त्रिया आणि राजकारण यासंबंधी महत्त्वाचे निष्कर्ष काढले आहेत.

तसं पाहिलं तर भारतामध्ये राजकारणात भाग घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण इतर अनेक मागासलेल्या तसेच पुढारलेल्या औद्योगिक देशापेक्षाही जास्त आहे. १९६५ साली जगामध्ये एकूण ११२ राष्ट्रांत स्त्रियांना मतदानाचा व निवडणुकीस उभे राहण्याचा हक्क मिळालेला होता. अजून ९ राष्ट्रांमध्ये स्त्रियांना कोणत्याही प्रकारचे राजकीय हक्क नाहीत. फ्रान्स, प. जर्मनी, नॉर्वे, युगोस्लाव्हिया या प्रगत देशांतसुद्धा संसद सदस्यांपैकी स्त्रियांचे प्रमाण ५ टक्के आहे. भारतात १९७१ साली संसदसदस्यांपैकी स्त्रियांचे प्रमाण ६ टक्के होते. मात्र १९६७ साली एकूण मतदानांचा हक्क प्राप्त असलेल्या स्त्रियांपैकी फक्त ११ टक्के स्त्रियांनी आपली निवड नोंदविली. याचा अर्थ एकच की स्त्रियांच्या एकूण राजकीय जाणिवेत तफावत फार भयंकर आहे. ज्या स्त्रियांना संधी, वातावरण, पैसा मिळाला, शिक्षण मिळाले त्यांनी पुरुषांची बरोबरी केली. भारतासारख्या सगळ्याच क्षेत्रांत विषम विकास व विषमता असताना हा

विषम विकासही अपरिहार्य वाटतो. सर्वसाधारण स्त्री मात्र अजूनही दुय्यम नागरिक म्हणूनच जगते.

क्रियाशील राजकारणात एकूणच कमी स्त्रिया भाग घेतात याची महत्त्वाची तीन कारणे कमिटी देते. (१) निवडणुकांचा खर्च फार वाढला आहे. स्त्रियांकडे आर्थिक साधने क्वचितच असतात. इंदिरा गांधी, सावित्री देवी सारख्या बायका यशस्वी होतातच. मात्र पैशाच्या अभावी स्त्रियांना पक्षाच्या पाठिंब्यावरच अवलंबून राहावे लागते. स्वतंत्र उमेदवार म्हणून उभे राहणे शक्य होत नाही. पक्षसुद्धा पुष्कळदा खर्च करू शकणारा उमेदवारच निवडतात. म्हणजेच पात्रता, योग्यता, कुवत यांना महत्त्व नसून पैशाला महत्त्व आहे. या पैशाच्या स्पर्धेत पुरुषही मागे पडतातच. मग स्त्रियांचा काय पाड ! याचा अर्थ एकच की खाजगी संपत्ती, मालमत्ता हा स्त्रियांच्या वाटेतील एक प्रमुख अडसर आहे.

(२) दुसरे कारण कमिटी देते की आजकालच्या राजकारणामध्ये हिंसेचे प्रमाण वाढते आहे. गुंडांची सेना ठेवायला एक तर पैसा लागतो. पैसा नसेल तर स्वतःचे बळ पाहिजे. स्त्रीला हे दोन्ही शक्य नाही.

(३) तिसरे कारण समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन. पुरुषाच्या बायतीत शीलाचा प्रश्न कोणी काढणार नाही. पण स्त्री मात्र जणू आपली बायको किंवा सून असल्यासारखी प्रत्येक जण तिची चौकशी करणार. तिच्या प्रत्येक हालचालीकडे संशयाने बघणार. आँधीमध्ये लेखकाने याचीच दखल घेतली आहे.

आपण नीट विचार केला तर आपल्या लक्षात येतं, की या तिन्ही गोष्टी एकमेकांत गुंतलेल्या आहेत. सगळ्यांकडचीच खाजगी संपत्ती नाहीशी झाली की खऱ्या अर्थाने समान पायावर सगळेच उभे राहतील. पैशाच्या जोरावर चालणाऱ्या गुंडगिरीला वाव राहणार नाही. आणि हळूहळू स्त्रीकडे पाहण्याचा परंपरागत दृष्टिकोन बदलण्याच्या प्रक्रियेला चालना मिळेल. तिचे शील आणि चारित्र्य ह्यांना महत्त्व मिळणार नाही. पुरुष व स्त्री एकाच मापाने तोलले जातील.

या अहवालातील सर्वांत महत्त्वाचा निकष आहे, ज्यावेळी स्वातंत्र्य चळवळ जोरात चालू होती त्याच वेळी स्त्री राजकारणात ओढली गेली. काळाची गरज इतकी जबरदस्त होती की त्या शक्तीमुळे स्त्रीच्या मनावरील संस्काराचे बांध तटातट फुटले. तिच्या मनात प्रेरणा निर्माण झाली. मात्र चळवळीचे राजकारण संपले आणि मग संस्थात्मक प्रस्थापित राजकारण सुरू झाले. तेथे पैसा, खानदान, लबाडी यांना महत्त्व मिळू लागले. आणि स्त्रिया मागे पडल्या.

याचा अर्थ एकच की आजही स्त्रीला खरी मुक्ती साधायची असेल तर ती चळवळीच्या राजकारणानेच साधता येईल. प्रस्थापित राजकारणामध्ये एखाद्या हुशार स्त्रीला वाव मिळेल. ती पंतप्रधान बनेल. पण स्त्री जातीची मुक्तता त्यातून होणे

शक्य नाही. तसेच महिलामंडळे स्थापून किंवा गरजू स्त्रियांसाठी अर्धवेळ काम देणारी उद्योगमंदिरे उभारून स्त्री-मुक्ती करता येणार नाही. त्यासाठी राजकारण खेळावे लागेल. अखेर राजकारण म्हणजे काय ? आपल्या मागण्या घेऊन पुढे येणे. सर्वांच्या सामुदायिक मागण्या मिळविण्यासाठी लढाऊ मार्गाने झगडणे आणि मुख्य म्हणजे राजकारण हा स्त्रीजीवनाचा एक महत्त्वाचा पैलू मानणे. कोणताही पैलू हा वरवरचा किंवा खालचा किंवा गाभ्याचा असा नसतोच. प्रत्येक व्यक्ती हीच विलोरी असते आणि परिस्थितीप्रमाणे ती ती बाजू चमकत राहते, पुढे येते त्या त्या बाजूला महत्व मिळते. आज तरी प्रत्येक स्त्रीने आपल्या मुक्तीसाठी आणि म्हणूनच सर्व स्त्रीजातीच्या मुक्तीसाठी राजकारण याच पैलूला धार लावणे आवश्यक आहे. तरच त्या स्त्रीला 'आँधी' मधील सुचित्रा सेनची राजकारणातील ट्रॅजेडी, ही स्त्रीची ट्रॅजेडी होती हे कळू शकेल.

ङ

॥ १८ ॥

पिंजऱ्याचे दरवाजे उघडले गेले आहेत....

१९७५ साल हे आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष म्हणून साजरे करण्याचे ठरले आहे. देशोदेशीच्या स्त्री संस्थांनी यामध्ये भाग घेतला आहे. स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधी चर्चा सुरू आहेत. परिषदा भरवल्या जात आहेत.

हे सगळे थोड्याफार अर्थाने पापक्षालनाचे प्रयत्न आहेत. आजपर्यंत स्त्रीला दास्यात ठेवले गेले. तिला दुय्यम दर्जा दिला. तिला घराच्या दावणीला बांधून ठेवले. देशोदेशी हीच परिस्थिती होती. प्रत्येक देशात आर्थिक व्यवहार सगळे पुरुषांच्या ताब्यात. मालमत्ता त्यांच्या नावाची. राज्यसत्ता, राजकारण पुरुषांची क्षेत्रे. एखादी स्त्री असामान्य बुद्धिमत्तेने किंवा शौर्याने चमकलीच तर ते अद्‌भुत समजले जाई. सगळी बंधने झुगारून तिचे गुण बाहेर उफाळून येत. पण सर्वसामान्य बाईला सर्वसामान्य पुरुषापेक्षा अत्यंत हीन वागणूक मिळे. वर्षानुवर्षे तेच कंटाळवाणे काम, तीच संततीची वीण.

शास्त्राने खूप प्रगती केली. जीवशास्त्राने स्त्रीचा व पुरुषाचा मेंदू समान शक्तीचा, समान गुणवत्तेचा असतो हे सिद्ध केले. आर्थिक व्यवस्था बदलत चालली. अर्थव्यवस्थेमध्ये स्त्रीने भाग घेणे नितांत आवश्यक ठरले. तांत्रिक शोधामुळे कामाचे स्वरूप बदलत चालले. शारीरिक शक्तीचा भाग कमी महत्वाचा ठरू लागला. संतती नियमनाच्या साधनांचा शोध लागला. स्त्रीला मुक्त होण्यासाठी आवश्यक भौतिक

परिस्थिती तयार झाली.

ही सगळी वस्तुस्थिती खरी. पण आज भारतीय स्त्रीकडे, येथल्या तरुण मुलीकडे बघताना मला एका मैनेच्या गोष्टीची आठवण येतीय. आजची भारतीय तरुणी मला त्या पिंजऱ्यातल्या मैनेसारखी वाटते.

एक मैना होती. लहानपणापासून पिंजऱ्यात राहिलेली. तिच्या पंखातील शक्तीच नाहीशी झाली होती. तिला आकाशाची स्वप्नं सुद्धा पडेनात. तिला बाहेरच्या जगाची इतकी भीती घातली गेली होती. ससाणे, गिधाडे तिच्यावर टपून बसलेत. एकदा तिच्या मालकाने पिंजरा उघडला तरी ती बाहेरच येईना. बादळबाऱ्यात रहायची सवय नव्हती तिला. पिंजऱ्यात बसल्याबसल्या स्वतःकडेच पाहण्यात ती रमून जायची. तिच्या पंखांचा मखमली रंग. तिच्या कंठीचा मंजुळ आवाज. पिंजऱ्याचे दरवाजे उघडून ती जेव्हा बाहेर येऊन दाणे टिपायला लागली तेव्हासुद्धा तिला आकाशाकडे पहायचं धैर्य होईना. ती स्वतःभोवती नाचू लागली. गाऊ लागली. दुसऱ्यांची करमणूक करू लागली. सगळ्यांनाच सोयीचे झाले. पिंजरा काढला गेला. स्वातंत्र्य मिळाल्याचे जाहीर झाले आणि तरीसुद्धा मैनाराणी दूर उडून जात नव्हती.

'मैने मैने, नाच ग!' म्हटलं की नाचायची.

'मैने मैने बोल ग!' म्हटलं की बोलायची.

'मैनेला काय हवं?' 'लिपस्टिक!' सगळे लोक म्हणायचे. मैना किती शिकली हो! किती सुधारली! मैनेला खूप बरं वाटायचं. पण मनातून दुःखही होत होतं. अजून तिला उडता येत नव्हतं. कावळा यायचा, पारवा यायचा. पोपट यायचा. सगळे लांब लांब उडत जायचे. पोपट दूर देशीच्या गप्पा सांगायचा. हिरव्या कच्च्या पेरूच्या आठवणी काढायचा. कावळा मारून आणलेले उंदीर दाखवायचा. पारवा गिरेंबाज मान फुगवून घुमत बसायचा. मैनेला त्यांचा हेवा वाटायचा.

एक दिवस दूरदेशीची मैना आली. उडत उडत अंगणातल्या फांदीवर येऊन बसली. मैनेला आश्चर्याचा धक्का बसला. तिनेही पंख जरा उंचावले. पंखांमध्ये वारा भरल्यासारखा झाला आणि वाऱ्यावर ती आपोआप तरंगली. पंख थोडेसे हलवल्यावर ती जमिनीपासून उंचावर पोचली. जमिनीवरचे पाय सुटल्यावर तिला थोडी भीती वाटली. पण फांदीवरच्या मैनेचे आकर्षण होते. तिला धीर आला. आणखी एक-दोनदा भरभरा पंख हलवल्यावर ती फांदीपर्यंत पोचली. तिचे पाय अलगद फांदीवर टेकले. तिने फांदी गच्च पकडली. तिला थकल्यासारखे झाले. परदेशी मैना मोठी दिमाखात बसली होती.

'मैनाबाई मैनाबाई, कुठून आलीस ग तू?'

'आले साता समुद्राच्या पलीकडून.'

'कमाल आहे बाई, भीती नाही वाटली येताना?'

'कावळा कुठे भितो ? पोपट कुठे भितो ?'

'पण मैनाबाई तुमच्या पंखात एवढी शक्ती कुठेय ?'

'तेच तर पहायचं होतं आणि बघ, येऊन पोचले की नाही !'

'शिकलीस कुठे ?'

'आपली आपण. शेजारचा पोपट शिकत होता. त्याला रोज बघायची मी.'

'आणि तुझ्या मालकाने सोडले बरे तुला.'

'सोडतो कुठचा. पळून आले मी !'

'आणि खायला-प्यायला काय ?'

'स्वतः कष्ट करून मिळविले मी.'

'बाई ग, तुझे लग्न ?'

'करीन की माझी मीच. हवा तसा नवरा शोधेन.'

'आणि हुंडा कोण देईन ग !'

'झूठ बाजारात बसलेल्या मुलाशी लग्न करायला कोण जाईल ?'

'अशी हिंडतेस- फिरतेस, स्वयंपाक कोण करेल, घरकाम कोण उरकेल ? ती तर कामे आपलीच आहेत.'

'कोण म्हणते स्वयंपाक करणे हे मैनेचे 'नैसर्गिक' आणि 'अनुवंशिक' काम आहे म्हणून ? मी हे संपूर्णपणे नाकारते. आपण बाहेर जाणार, बुद्धीची कामे करणार, तशीच नवऱ्याने घरची कामे केली पाहिजेत आणि खरं म्हणजे सगळ्या बायकांनी दररोज घरी सर्व स्वयंपाक केलाच पाहिजे. हे तत्त्वच मला मान्य नाही. माझ्या मते प्रत्येक कामाच्या ठिकाणी अत्यंत स्वस्त दरात अन्न देणारी कॅन्टिन्स असावीत. ज्या स्त्री-पुरुष मैनांना स्वयंपाकाची आवड असेल त्यांनी स्वयंपाकाच्या तंत्राचे खास शिक्षण घ्यावे व खुशाल अशा कॅन्टिनमधून नोकरी करावी. अगदी एखाद्या सुट्टीच्या दिवशी एखादे पेंटिंग काढावे किंवा गाणं गावं. तशी एखादी पाककृती मी करीनसुद्धा पण कला म्हणून.'

'आणि घरातील आजाऱ्यांची, म्हाताऱ्या सासू-सासऱ्यांची सेवा ग कोणावर सोपवणार ?'

'तेच तर मी म्हणते. त्यासाठी माझ्या एकटीची शक्ती, बुद्धी व वेळ मी का वाया घालवू ? स्वयंपाक जसा सार्वजनिकरीत्या करायचा, तसेच याही जबाबदारीचे. प्रत्येक वस्तीमध्ये जवळच एक मोठे शुश्रूषा केंद्र असावे. आजारी, अतिवृद्ध माणसांना तेथे ठेवावे. ते चालविण्याची जबाबदारी सर्वांनी मिळून स्वीकारावी. खास शिक्षण घेतलेले, परिचारकाची आवड असलेले स्त्री-पुरुष मैना अशा शुश्रुषागृहात काम करतील. तो त्यांचा व्यवसाय ठरेल. कार्यक्षेत्र ठरेल. सक्ती नव्हे. बंधन नव्हे.'

'आणि मुलांची सोयसुद्धा तू अशीच लावून टाकणार असशील.'

'हो, माझ्या कामाच्या वेळी मला बाहेर जायलाच हवं. मी जर चांगली शास्त्रज्ञ असेन तर माझा वेळ मी मुलांच्या मागे किती घालवू शकेन? समाजाने चालविलेली बालसंगोपन केंद्रे हेच त्याचे उत्तर.'

'अग, पण मुलांना आईचे प्रेम नको का मिळायला?'

'मिळेल की. रात्री आम्ही एकत्रच असणार. सुट्टी एकत्र घालवणार. अग, पूर्वी अविभक्त कुटुंब पद्धतीत नाही का आई, काकू, आत्या सगळ्या मिळून मुलांचा सांभाळ करीत. तेव्हा कुठे आईचा पदर त्यांना सारखा मिळे? तसंच आता. त्या वस्तीतील सर्वांनी मिळून मुलांची काळजी घ्यायची. मुलांची आवड असलेली खास शिक्षण घेतलेली मंडळी मुलांचा छान सांभाळ करतील. तेच त्याचे काका, मामा, मावशी, आत्या या नात्याने वावरतील.'

'आणि तुझ्या नवऱ्याला हे सगळं रुचेल का? त्याला तर सवय असेल त्याच्या आई-वडिलांचे चोचले पुरवते ते पाहण्याची.'

'तेच तर मी बदलीन. तुला माहीत आहे का, यालाच तर सांस्कृतिक क्रांती म्हणायचं—माझ्या मनाची आणि त्याच्या मनाची. पण ही सांस्कृतिक क्रांती पार पाडायची म्हणजे प्रथम पहिल्या सगळ्या अटी पूर्ण व्हायला हव्यात बरं का! नाहीतर काय, आजकालच्या बायकांसारखं व्हायचं. तडफडत पहाटे ऊठा. स्वयंपाक करा. धावत धावत गाडी गाठून ऑफिसात जा. बॉसच्या समोर खाली मान घालून वागा आणि थकून घरी या. की चहा प्यायाला नवरोबा हजर. शिवाय सासूबाईंचा चेहरा वाकडा आणि इतके करून स्वातंत्र्य कोणते मिळविले तर लिपस्टिक घेण्याचे किंवा टी. व्ही. विकत घेण्याचे. पुन्हा निवडणुकीच्या वेळेला मत देताना, कोणाला देऊ हो, म्हणून नवऱ्याचा शर्ट खेचा.'

'बराच विचार केलास बाई. माझं तर ऐकूनच डोकं दुखायला लागलंय.'

'तुझ्यासारख्या मैनांमध्ये जागृती करण्यासाठीच तर मी हिंडते आहे. हा बघ आपल्या सगळ्यांचा मागण्यांचा जाहीरनामा. अगदी आतापासूनच मी तुझ्यासारख्या तरुण मैनांचे डोळे उघडणार आहे. तुला एक वाक्य सांगून ठेवते ते लक्षात ठेव. 'One is not born a woman, she becomes a woman.' कोणतीही स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला आली नसून तिला लाभलेले स्त्रीत्व हा संस्कृतीचा वारसा आहे.'

आणि त्या जाहीरनाम्याची एक प्रत या मैनेकडे ठेवून ती उडून गेली. दुसऱ्या एका दूर देशात.

ही छोटी मैना फांदीवरच थरथरली. तिने आकाशाकडे नजर टाकली. आयुष्यात पहिल्या प्रथम तिला आकाशाचे स्वप्न पडले.

आज स्वतः शिकलेल्या, पुढारलेल्या, मुक्त झालेल्या स्त्रियांनी इतर अज्ञानी

स्त्रियांना, तरुण मुलींना नाके मुरडून, चालणार नाही. त्यांनी त्या मैनेसारखाच ठोस मागण्यांचा जाहिरनामा घेऊन प्रचार करायला हवा आहे. मैनेच्या पंखांना शक्ती देण्याचे काम हे त्यांचे आहे. मैनेला आकाशाचे स्वप्न दाखविण्याचे काम हे त्यांचे आहे.

ङ

॥ १९ ॥

चार घरच्या चार पोरी
एकेकीची तऱ्हाच न्यारी !

परिचय– इव्हज वीकली स्टाईल. भारतीय जीवनात 'स्त्रीचे स्थान काय?' यासंबंधी बराच अभ्यास चालू आहे. निष्कर्ष प्रसिद्ध होत आहेत. मी मात्र पुढे चार केस स्टडीज देतेय– चार तरुणींचा जिवंत परिचय– इव्हज वीकली स्टाईल.

यास्मिन सलोमी :

'माझ्या लहानपणापासून माझी एकच महत्त्वाकांक्षा आहे. सौंदर्य सल्लागार बनायचं.' असं गोड, सुंदर स्वप्न यास्मिन अभिमानाने सांगते. ती कॉन्व्हेंट स्कूलमधून एस.एस.सी. झाली आणि तेव्हाच तिने ठरविले, शिक्षणाला रामराम ठोकायचा. आणि मुंबईत 'व्हॅलेंटीन ब्यूटी पार्लरमध्ये' तिने नाव दाखल केले. यास्मिन सांगते, 'माझ्या आई-वडिलांची याला पूर्ण संमती होती. इतकेच नव्हे तर त्यांनी जास्तीत जास्त सहकार्य दिले. एक दिवस स्वतःचे ब्यूटी सलून उघडायचे हे माझे ध्येय आहे. त्यासाठी बराच खर्च येईल याची मला कल्पना आहे. आजकाल पेडररोड किंवा अशा पॉश ठिकाणी जागा घ्यायची तर वीस-पंचवीस हजार पागडी द्यावी लागते. शिवाय आमच्या या धंद्याला साधनेही बरीच लागतात. जाहिरात बरीच करावी लागेल. माझ्या वडिलांनी मला वीस हजार रुपये बक्षिस देण्याचे कबूल केले आहे. नाहीतर माझ्या लग्नात ते वीस हजार रुपये खर्च करणार होतेच. माझा चुलत भाऊ बँक

ऑफ इंडियामध्ये ऑफिसर आहे. त्याने बँकेकडून कर्ज मिळवून द्यायचे आश्वासन दिले आहे. आणि माझ्या गोड स्वभावामुळे आणि कौशल्यामुळे मी गिऱ्हाइकांना निश्चित आकर्षित करीन याची मला खात्री आहे.

'अर्थात पैसे मिळविणे हे माझ्या आयुष्यातील एकमेव ध्येय नाही. मला अनेक हॉबीज् आहेत. माझे ड्रेसेस मी स्वतः डिझाइन करते. पाश्चात्य आणि पॉप संगीताची मला अतिशय आवड आहे. आय ॲम् क्रेझी अबाऊट दि फिल्मस्. मी चिक्कार सिनेमे बघते, बॅडमिंटन खेळते. जीवन म्हणजे एक थुईथुई नाचणारं कारंजं आहे असं मला वाटतं.

'शिवाय मला स्वयंपाकही करता येतो हं. शाळेत आम्हाला होमसायन्स हा सक्तीचा विषय होता. डोळ्यांत पाणी आणत कांदा चिरण्याखेरीज गत्यंतर नव्हते.'

चार बहिणींपैकी यास्मिन सर्वात धाकटी. म्हणूनच सर्वांची आवडती. जरा लाडावलेली. यास्मिन अतिशय सोशल आहे तिला पार्ट्या आवडतात. ती असली की पार्टी सहज रंगते.

सुजाता घारपुरे :

ही शांत, शालीन, आज्ञाधारक सुजाता, यंदा बी. ए. ला बसते आहे. अहमद सेलर चाळीमध्ये राहाणाऱ्या सुजाताला रोज पहाटे उठून पाणी भरायचे काम करावे लागते. सुजाता म्हणते, 'आधी मला खूप राग यायचा. आई साखरझोपेतून उठवायची म्हणून. पण आता वाटतंय की त्यामुळेच मला लवकर उठून काम आटोपून अभ्यासाला बसण्याची सवय लागली. आई पहाटे उठून वडिलांचा डबा करीत असे. एक दिवस लोकलच्या डब्यात चढताना वडील पाय घसरून पडले. त्यातच त्यांचा अंत झाला. रात्री बारा वाजता बातमी समजली.

'वडिलांच्या प्रॉव्हिडंड फंडावर दोन वर्षे जेमतेम निघाली. आता पुढच्या वर्षी मी नोकरी करेन या आशेवर आहेत सगळी. धाकट्या भावंडांची शिक्षणे व्हायची आहेत. लग्नाची तरल स्वप्ने पहायचे मी केव्हाच विसरले.

'शेजारच्या कमल देसाईला मी बघते आहे. बिचारीने नोकरीला सुरुवात केली, वडिलांच्या तुटपुंज्या पगाराला मदत म्हणून आणि आता दहा वर्षे झाली तरी वडिलांची तिच्या लग्नाबद्दल काही हालचाल नाही. चटक लागलीय तिच्या पगाराची त्यांना. तिला बिचारीला पर्याय नाही काही. आपणहून नवरा शोधायचे धाडस नाही. बघताबघता तिचा चेहरा जून झाला.

'आमच्या कॉलेजमध्ये मुलींचे सरळसरळ दोन भाग पडतात. आम्ही टिकलीपट्टी न करणाऱ्या मुली एकीकडे, आणि दुसरीकडे एलेफंटसचे फ्लेअरस उडवीत जाणाऱ्या बिनधास्त मुली. खूप मोठी दरी आहे आमच्यामध्ये. त्यांच्यापैकी एकीचा परवा फोटो

होता इव्हज वीकलीत. 'तिला कुकींगची आवड आहे' असं कौतुकाने लिहिले होते. येथे आई आजारी असताना महिना न् महिना कुकींग करत आम्ही कॉलेजला येतो. वडील वारलेले, शिकवण्या करा, लहान भावंडांची गणिते सोडवा. आईला स्वयंपाकात मदत. आमच्यासारख्या मुलींबद्दल कौतुकाने लिहावे, असं कसं वाटत नाही या संपादकांना ? आदर्श पुढे ठेवायचे ते त्यांचे की आमचे ?

'माझ्या पिढीच्या सगळ्याच मुली या प्रकारच्या परिस्थितीतून जात असतात. यापुढे वडिलांच्या छायेखालून नवऱ्याच्या छायेखाली जाणं यासारखं सुख माझ्या पिढीच्या वाट्याला येणं कठिण दिसतंय. पुढच्या वर्षी नोकरीसाठी अर्ज करीत फिरावे लागेल या कल्पनेने जीव गजबजून गेलाय.'

भीमा :

ही गावकुसाबाहेरच्या वस्तीतील भीमा. रंगाने काळीभोर पण घोटीव शरीराची. अंगभर गोंदणाची रांगोळी. भीमा म्हणते, 'शाळेत जायचं काही माझ्या नशिबात नव्हतं. माझ्या आयला पाठोपाठ चार पोरं झाली. आई सकाळी उठून भाकर भाजून रानात जायची, नाहीतर डोंगरावर काट्या-कुट्या गोळा करायला. बापुस राहायचा कोणाच्या तरी मळ्यात राखण करायला. पोरांच्या गुताड्याकडे मीच बघायची. कधी कधी घरात चूलच पेटायची नाही. घरात दाणा नसायचा. पोरांना कडेला घेऊन मी न् माझी मैत्रिण जात असू नदीकिनारी, करवंदीच्या जाळ्या धुंडाळायला. कधी भुई-मुगाच्या शेंगा काढून झाल्या की ढेकळे शोधत फिरायचं. एखाद दुसरी उरलेली शेंग सापडेल म्हणून.

'आता धाकटी बहीण मोठी झाली. ती बघते पोरांकडे. मी जायला लागले आयच्या संगतीने रानात. पहिल्याच दिशी त्या मेल्या पाटलाच्या पोरानं असं डोळा घालून बघितलं माझ्याकडे. लय भीती वाटली. अंगातून शिरशिरी गेली. आयने बजावलं. एकटंदुकटं जाऊ नगोस. त्या रतनच्या बरोबरीने राहा. रतन मोठी दमबाज पोरगी आहे. डोळ्याला डोळा भिडवून बोलते कोणाच्याबी.

'तिनेच सांगितले, मागच्या वर्षी ह्यांच उडारग्याने त्या बजाबाईला उभ्या पिकात गाठले होते. तिला दिवस गेले तेव्हा बोंबाबोंब झाली. त्याने औषध देऊन मूल पाडायला सांगितले. त्यातच गेली बिचारी देवाकडे. जणु ह्यांचीच आम्ही मालमत्ता आहोत. आमच्या हातचं पाणी बी चालत नाही–आमची गांड कशी चालते यांना ?

'आई सांगते, 'आपल्या सारख्यांच्या नशिबीचे भोग आहेत बाई ! कोणी तरणा-ताठा मुलगा येऊन तुला घेऊन गेला की सुटले एकदा.' आता लगीन व्हायचे म्हणजे माझ्या नवऱ्याने माझ्या बापसाला तीनशे रुपये द्यायला पाहिजेत. दोनशे रुपयाहून खाली तर तो कबूलच होणार नाही. सगळी जवान पोरं पडली बेकार. केव्हा केव्हा

काम मिळतं तेवढंच. एवढे पैसे जमणार कधी आणि माझं लगीन होणार कधी !

'माझ्या पिढीच्या सगळ्याच जवान मुलींप्रमाणे आपली जवानी सांभाळत राहाणं आणि शेतात काम करीत पोटाची खळगी भरणं एवढंच माझ्या हातात !'

गुलाब :

वय वर्षे सोळा, आकर्षक, वळणदार शरीराची गुलाब वेधडकपणे सांगते, 'माझ्या लहानपणीच मी ठरवले होते वेश्या व्हायचे. माझ्या आईकडे तऱ्हेतऱ्हेची माणसे येताना मी लहानपणापासून बघत होते. माझ्या मावश्या संध्याकाळ झाली की नटून-थटून तयार व्हायच्या. दिवेलागण झाली की त्यांचा दिवस उजाडायचा. आम्हा पोरांची आतल्या खोलीत रवानगी होई. दरवाजा बाहेरून बंद. फटीतून दारू पिऊन बरळणाऱ्या माणसांचे आवाज येत. पुष्कळदा पैशावरून वाचाबाची. दर गुरुवारी आईचा मालक येऊन पैसे घेऊन जाई.

'शेजारी एक शाळा होती. आजूबाजूची सर्व मुले तेथे येत. आमच्यासारखी बरीचशी. पण आमच्या बाई आम्हाला गलिच्छ बागवीत. आमचा उल्लेख रांडेची पोरे म्हणून करीत.

'चौथी पाचवीपुढे गाडी काही जाईना. पुन्हा कधी शाळेची सबब सांगितली की आई म्हणे, 'शेवटी रांडाच नं व्हायच्या तुम्ही !'

'माझ्या पिढीच्या बहुतेक मुली वेश्याव्यवसायच करणार आहेत. बाहेर कुठे नोकरी मिळण्याची शक्यता कमी. आई म्हणते, 'रस्त्यावर बेवारशी कुत्र्यासारखं पडण्यापेक्षा येथे निदान डोक्यावर छप्पर तरी आहे.' आईचं एक वाक्य माझ्या चांगलंच लक्षात आहे. 'बाई ग, स्त्रीचा जन्मच असा. एका पुरुषाखाली रोज दाबून घेतलं काय आणि रोज नव्या पुरुषाखाली गेलं काय ! शेवटी आपलं पोट भरतं ते दोन पायातल्या खळगीनंच.'

'मी वयात येऊन दोन वर्षे झालीत. आई म्हणते, माझा चेहेरा बराय. शरीर भरलेले आहे. धंद्यामध्ये बऱ्यापैकी बरकत होईल. आज मी माझ्या नव्या जीवनाच्या उंबरठ्यावर उभी आहे. आईने धंद्याला सुरुवात करताना आपले निळे हलणारे डूल मला दिले आहेत शुभेच्छा म्हणून.'

॥ २० ॥

हवाई सुंदरी की ग्लोरिफाईड 'आया'

मी फोन केला आणि तिने आपली डायरी उघडून मला मुलाखतीची वेळ सांगितली. 'उद्या सिंगापूरची फ्लाईट आहे. परवा मी परत येईन. तुम्ही गुरुवारी सकाळी या.'

गुरुवारी सकाळी तिच्या दारात हजर राहातानाच माझ्या लक्षात आले, तिच्यामध्ये ती 'रुबाबदार आदब' होती. कदाचित इतर कुठेही ती भेटली असती तरी कोणी न सांगताही मी ओळखलं असतं. शी इज ॲन एअर होस्टेस! हवाई सुंदरी! माझ्या एकदम लक्षात आले, इंग्लिशमध्ये होस्टेसचा अर्थ आहे आदरातिथ्य करणारी स्त्री आणि मराठीत आम्ही चक्क होस्टेसचा भाषांतर केले 'सुंदरी'. आदरातिथ्य करणाऱ्या स्त्रीचे व्यक्तिमत्त्व आकर्षक असेल तर कोणालाही आनंदच वाटेल. पण मग 'व्यक्तिमत्त्व' या शब्दात बऱ्याच छटा व्यक्त होतात. सुंदरता हा एक पैलू झाला.

माझा पहिलाच प्रश्न होता, 'तुमच्या या व्यवसायात सौंदर्य हा विषय किती महत्त्वाचा असतो?'

'आमच्या जॉबसाठी ज्या जाहिराती प्रसिद्ध होतात त्यात सुंदर किंवा देखणी तरुणी पाहिजे असे लिहिलेले नसते. पण इंटरव्ह्यू घेताना मामुलीच प्रश्न विचारले जातात. त्यावरून तरी आमच्या व्यक्तिमत्त्वाचे इतर पैलू कळू शकत असतील असं वाटत नाही.'

'अर्ज भरताना शरीराची 'मापे' विचारलेली असतात का?

'नाही. एवढे खुल्लम-खुल्ला काहीच विचारलेले नसते.'

'किंवा इंटरव्ह्यूच्या वेळी तुम्हाला मॉडेलींग करायला लावतात का? चालून दाखवा वगैरे?'

'नाही. पुढे ट्रेनिंगमध्ये थोडेफार चालण्याकडे लक्ष पुरविले जाते. पण साधी गोष्ट आहे. तुमचं देखणेपण, तुमची भाषा, बोलण्याची लकब, वेष, मॅनर्स या सर्व गोष्टींन, ८० टक्के महत्त्व असतं आणि या सर्व गोष्टी मुलाखतीमध्ये समजून येतातच की!'

'विमानामध्ये आदरातिथ्य करण्याच्या कामासाठी स्त्रियांचीच खास जरूर आहे असं तुम्हाला वाटतं का? नाहीतरी अन्न शिजवलेलं असतंच. नीट पॅक केलेले असतं. एखादा पुरुषही ते काम तितक्यात तत्परतेने, कार्यक्षमतेने करू शकतो.'

'हे मात्र मला मान्य नाही. स्त्रियांच्याकडे जी शालीनता असते, प्रेमळपणा असतो, सेवावृत्ती असते ती पुरुषांकडे नसते. या प्रकारच्या कामाला स्त्रियाच योग्य आहेत.'

'ठीक आहे. पण मग ही स्त्री अविवाहित असावी अशी अट का? तिसाव्या वर्षानंतर तिने नोकरी सोडावी अशी अट का? तुम्हाला जर तिची सेवावृत्ती हवीय, तिचा प्रेमळपणा हवाय तर तिच्या वयाशी तुमचे काय कर्तव्य? तुम्हा हवाईसुंदरीच्या मध्ये या विषयावर कधी चर्चा होते का?'

'थोडीफार चर्चा होते. पण बहुतेकींचे तिशीच्या आत विवाह होतात आणि त्या आयुष्यात स्थिर होतात.'

'आणि त्यांना त्यांच्या रूपामुळे आणि विमानातील ओळखीमुळे चांगले श्रीमंत नवरे मिळत असतील. त्यामुळे पुढे नोकरी केलीच पाहिजे असे आर्थिक दडपण नसेल.'

'खरं आहे थोडं फार.'

'यातूनच एक गोष्ट स्पष्ट होते की, या नोकरीत केवळ गुण, कौशल्य याला महत्व नाही. गुण ५० टक्के आणि शरीर ५० टक्के. आठशे रुपये पगारापैकी ४०० रुपये गुणांना. ४०० रुपये आकर्षक शरीराला. ही नोकरी हे स्त्रीचे डीग्रेडेशन आहे. येथे शरीर ही वस्तू आहे. सुंदर आकर्षक वस्तू. हे तुम्हाला पटतं का?'

'ओ! आय नेव्हर थॉट ऑफ धिस वे! मी असा विचार कधीच केला नाही.'

'या सर्व हवाई कंपन्यांच्या जाहिरातीतून पुरुषांची मने आकर्षित करण्यासाठी तुमच्या शरीराचे प्रदर्शन केले जाते. विमानातून प्रवास करणाऱ्यांपैकी पुरुषांचे प्रमाण किती असते?'

'जवळ जवळ ७० टक्के पुरुष असतात.'

'आणि त्यांच्या बरोबर जर बायका असतील तर त्यांची तिकिटेही पुरुषांनीच

काढलेली असतात. म्हणजे तुमचे खरे गिऱ्हाईक पुरुषच. त्यांच्या हातात निर्णय घेण्यासाठी आवश्यक आर्थिक सत्ता. त्यांचे चोचले पुरविणे. त्यांना उपभोग्य वस्तू पुरविणे हे एअर लाईन्सचे काम.'

'तुमचे म्हणणे थोडेसे खरंय. आम्हीसुद्धा आपापसात आम्हाला 'ग्लोरिफाईड आया' म्हणून चिडवतो. विमानातील प्रवासी काहीवेळा ओकाऱ्या करतात. काम नाही धाम नाही. वेळ घालवायला दारू पिणे. मग काहींचा बॅलन्स सुटतो. ओकारी झाली की रुमाल घेऊन आम्हालाच जावे लागते.'

'आणि अशाच प्रकारचे काम जमिनीवर करणाऱ्या हॉस्पिटलमधील आयांना पगार मिळतो फक्त दोनशे रुपये. तुम्हाला पगार आठशे रुपये, कारण तुम्ही श्रीमंत माणसांच्या ओकाऱ्या काढता. त्यांच्या सेवेला तुमच्यासारख्या फॅशनेबल आया परवडतात. तिकिटाची किंमत जास्त ठेवली की झालं!'

'तुम्ही अगदी आमच्या व्यवसायाची चिरफाड करता आहात.'

'मला याची गरज वाटते. कारण आज आपल्याकडे हवाईसुंदरीचा व्यवसाय म्हटला की तरुण मुलीचे डोळे एकदम कौतुकाने विस्फारतात. त्यांना वाटतं तो एक बहुमान आहे. कारण आपल्याकडे प्रत्येक गोष्टीचे मूल्यमापन पैशाने होते. शिक्षिकेचा पेशा कितीतरी जास्त निर्मितिक्षम आहे. जास्त उत्पादक आहे. पण तिला पगार कमी. मान कमी आणि त्याबद्दल एकूणच समाजामध्ये असंतोष नाही. स्त्रियांच्या मनात तर मुळीच नाही.'

'तुम्ही म्हणता ते बरोबर आहे थोडंसं. आम्ही शरीरासकट आमचे गुण आठ तासांसाठी विकतो. आम्हाला महिन्यातून ५० तास काम करावं लागतं. शिक्षिकेला १०० तास काम करावं लागतं. पण आम्हीही थोडाफार स्वाभिमान दाखवतो. एकच उदाहरण देते. जम्बो विमानात फर्स्टक्लासच्या प्रवाशांसाठी स्पेशल लाऊंज असतो. तेथे दारूसाठी बारही असतो. त्या लाऊंजमध्ये खास आकर्षण म्हणून संस्कृतीचे प्रतीक असा राजस्थानी पेहेराव केलेली हवाईसुंदरी असते. आमच्या सुपरवायझरने एक दिवस फर्मान काढले. लाऊंजमधील हवाईसुंदरीने बसता कामा नये. तिने प्रवाशांच्या खुर्च्यांच्या रांगांमधून मॉडेलसारखे मधून मधून हिंडले पाहिजे. ती चिडली. तिने नकार दिला. तिचा युक्तिवाद असा होता, 'कोणा परदेशी माणसाला या पोशाखाबद्दल कुतूहल वाटले तर तो जवळ येतोच. चौकशी करतो. आम्ही उठून पोशाख दाखवतो. पण उगीचच आमच्या शरीराचे प्रदर्शन करीत हिंडणे आम्हाला आवडणार नाही. बारमध्ये दारू भरणे, दारू नेऊन देणे हे आमचे काम. ते आम्ही करूच.'

'तुमच्या बाबतीत असा आक्षेप घेतला जातो की विमानाचे पायलटस व हवाईसुंदरी यांचे संबंध असतात. यामध्ये पुरुषांकडून परिस्थितीचा फायदा घेतला जातो

का ? सक्ती होते का ? '

' माझ्या अनुभवाप्रमाणे सक्ती होत नाही. विचारणा होते. पण ते तुमच्या मनावर असतं. '

' पण ज्या मुलीला जास्त पुरुषांकडून विचारणा होते ती ' ग्रेट ' असं समजलं जातं का ? '

' मुलींमध्ये थोडीफार असूया वाटते तिच्याबद्दल. कारण पुरुषाला आपण ' स्त्री ' म्हणून आवडावं असं मुलींना अजूनही वाटतं. मला वाटतं पुरुषांनाही पौरुषाबद्दल असंच वाटतं. मला मात्र असं आढळलंय की अशा मुलीबद्दल पुरुषांच्या मनात मात्र आदर नसतो. '

' अगदी बरोबर आहे तुमचं म्हणणं. आपल्या सगळ्या शिक्षणातूनच सतत स्त्री व पुरुष यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण लैंगिक भेद आहेत, लिंगानुसार त्यांच्या भूमिका, कामे वेगळी आहेत हे इतकं प्रकर्षानं शिकविलं जातं की त्या व्यक्ती म्हणून जगूच शकत नाहीत. त्या ' स्त्री ' म्हणून जगतात. '

' थोडं थोडं तुमचं म्हणणं पटतंय मला. पण मला मात्र हे सगळे बरंच नैसर्गिक वाटतंय. '

' तुमचे बॉस कोण असतात ? '

' उड्डाणाच्या वेळी आमच्यावर सुपरवाइझर सारखे दोन पुरुष असतात. त्यांना पर्सर आणि असिस्टंट पर्सर म्हणतात. आम्हाला अडचणीच्या वेळी मदत करणे हे त्यांचे काम. उदा०– दारू पिऊन एखादा प्रवासी क्षुल्लक कारणावरून भांडण करतो. एखादा कोणी छेडछाड करतो. '

' पण या जागेवर पुरुषच का ? बाई का नाही ? '

' पुरुषच पाहिजे. एक तर दंगा करणाऱ्या दारूड्या माणसाला आवरणे बाईला कठिण जाईल. दुसरे कारण पुरुष जास्त शांत डोक्याने, समंजसपणे काम करू शकतो. '

' पहिलं कारण पटलं. पण दुसरं नाही. मला वाटतं आपण बायकांनाच सवय झालीय की आपला सुपीरिअर, बॉस हा पुरुषच असला पाहिजे. आपण ' असं का ? ' असा प्रश्नच विचारीत नाही. आपण उलट समर्थन करतो. सबंध एअर इंडियामध्ये अधिकाराच्या जागेवर किती स्त्रिया असतील ? '

' फारच थोड्या, हाताच्या बोटावर मोजण्याजोग्या. '

' तुम्हाला ट्रेनिंग किती दिवस घ्यावे लागते ? '

' जवळजवळ तीन महिने. एअर लाइन्सच्या कामाचे स्वरूप. विमानाच्या आतील भागाची माहिती. अगदी घरच्या मोलकरणीला घर पूर्णपणे माहीत असतं ना तसंच आम्हाला विमानाचा आतील भाग. इमरजन्सी लँडिंगच्या वेळी आवश्यक काळजी,

फर्स्ट एड, ही तांत्रिक माहिती. मग वेगवेगळ्या दारूचे प्रकार. शिवाय सौदर्यप्रसाधनांचा उपयोग, सौदर्यवृद्धी आहेच.'

'प्रवाशांशी कसे वागावे याबद्दल काही सूचना?'

'हो. प्रॅक्टिकल ट्रेनिंगमध्ये ते आलंच. धर्म आणि राजकारण हे दोन नाजूक विषय. ते बोलायला बंदी. जिव्हाळा दाखवत वरवरच्या गप्पा एवढेच स्वरूप. मुख्य म्हणजे आमची स्त्री म्हणून प्रतिमा कायम राखली पाहिजे. पाश्चात्य हवाई कंपन्यांच्या हवाईसुंदरीबद्दल पुष्कळदा टीका ऐकू येते त्या फार पुरुषीपणे वागतात. बेपर्वाईने बोलतात.'

मुलाखत संपली. माझे अखेरचे इंप्रेशन होते. 'हवाईसुंदरी या शोकेसेसमधील बाहुल्या. स्त्रीत्वाची लक्ष्मणरेषा ओलांडायची नाही. अडाणी, बावळट बाई तर नको. तशीच फटाकडी, स्वतंत्र व्यक्तिमत्वाची तरुणीही नको. चतुर, गोड संभाषण करणारी, मनकवडेपणाने गरजा ओळखणारी, त्या पूर्ण करणारी आज्ञाधारक, क्यूट, लवलवत्या शरीराची अविवाहित तरुणी. उड्डाणातील टेम्परेरी बायको.'

ङ

॥ २१ ॥

आम्हाला फुलपाखरं आवडतात....

जाड गालिचा घातलेली उबदार खोली. वातानुकुलित झुळझुळीत गारवा. व्यवस्थापन अधिकाऱ्यांची वार्षिक सभा चालू. सध्या एका नाजूक विषयावर हलकी-फुलकी चर्चा. कंपनीमध्ये सेक्रेटरी मुलींची आवकजावक फार मोठ्या प्रमाणावर होते. यावर उपाय काय? मुली टिकत नाहीत. दरवेळी नवी जाहिरात. पुन्हा इंटरव्हयू. चक्र चालू. सेक्रेटरी म्हणून स्त्रियांना घ्यावे की नाही?

'मला वाटतं, बहुतेक सेक्रेटरी म्हटल्या की त्यांची लग्ने व्हायचीच आणि त्या नवऱ्याबरोबर चिमणीसारख्या भुर्र उडून जायच्या.'

'मला वाटतं, बहुतेक सेक्रेटरीना 'पूल' मध्ये एकत्र रहायला आवडत नाही. एकत्र असल्या की अनेक अधिकाऱ्यांची कामे करावी लागतात. एखादा गावाला गेला तरी दुसरा असतोच बॉसिंग करायला. पाच नवऱ्यांची एकच बायको असावी तसे होते ते.'

'यू आर राइट. माझ्याही लक्षात आलंय, प्रत्येक सेक्रेटरीला एकाच बॉसची सेक्रेटरी म्हणून काम करायला आवडतं. त्यातही बॉस जितका वरिष्ठ तितका त्याचा प्रेफरन्स जास्त. बायकोला जसं नवऱ्यामुळे स्टेटस् येते तसे सेक्रेटरीचे स्टेटस् तिच्या बॉसच्या पदावरून ठरते. शिवाय एकच बॉस असल्याने तो कुठेही परगावी गेला की हिला पेरी मेसनच्या कादंबऱ्या वाचायला सुट्टी!'

'बरोबर ! तुम्ही केलेले सेक्रेटरी आणि बॉस यांच्या नात्याचे वर्णन मला पटले. ही आठ तासांची नवरा-बायकोची जोडी असते. जपानमध्ये तर ही सेक्रेटरी अपुरी पडते म्हणून बहुधा त्यांनी 'ऑफिस वायको' अशी नवी जागा तयार केली आहे. सेक्रेटरी केबिनच्या बाहेर बसते. ही बायको केबिनमध्येच बसणार ! ॲस्प्रोची गोळी देणार ! चष्मा पुसणार ! पत्र शोधून देणार !'

'पोरींना सेक्रेटरी आणि टायपिस्ट या पोस्टवर ठेवू नये असं माझं स्पष्ट मत आहे बुवा ! त्यांचे सारखे टेलिफोन्स येतात. गप्पा होतात. हातातील बिणकामाकडे लक्ष असते. दहा वेळा टॉयलेटला जातात. खिदळतात.'

'आणि लेडी सेक्रेटरी, टायपिस्ट म्हटल्या की प्रेमप्रकरणे वगैरे भानगडी आल्याच. ऑफिसमधील गॉसिप्सना खाद्य. बॉस कितीही सभ्यपणे वागला तरी या पोरींचे चाळे आणि कटाक्ष यामुळे उगीच त्या बॉसची बदनामी !'

'या पोरी काम फार थोडे करतात आणि इतरांनाही करू देत नाहीत. परवा ती टिमोथी जमिनीवरचा कागद घ्यायला वाकली तर..... तिचा स्कर्ट भलताच लांडा होता. सगळ्यांचे लक्ष तिच्याकडे. ऑफिसमधले कामाचे वातावरण बिघडते.'

'याहीपेक्षा महत्त्वाचा दुर्गुण म्हणजे त्यांचे कामात अजिबात मन नसते. मला तर कधीकधी वाटते की त्यांना डोके नसावेच. आपण डिक्टेट केलेले शब्द त्यांच्या कानांतून सरळ हाताकडे जातात आणि बोटातून उतरतात. एखाद्या मशीनसारखे यांत्रिक काम, ते शब्द डोक्यापर्यंत पोचतच नसतील.'

'संध्याकाळी थांबायची तयारी नाही. प्रमोशनची महत्त्वाकांक्षा नाही. त्यामुळे ओव्हर टाईमची गरज वाटत नाही. संध्याकाळी उशिरा घरी सोडले तर सोबतीची गरज. प्रकरण गळ्यातच पडते.'

'एखादी विवाहित असेल तर तिची बाळंतपणे. त्यासाठी रजा. कॅथालिक असेल तर बाळंतपणाच्या आकड्याला मर्यादाच नाही.'

'मला वाटतं, या सगळ्या पार्श्वभूमीवर आपण धोरणविषयक निर्णय घेतला पाहिजे. पुरुष सेक्रेटरी ठेवणे हे जास्त फायदेशीर ठरू शकेल.'

'मला वाटतं, पुरुष सेक्रेटरीच्याही बाबतीत आपले फायदेतोटे दोन्हीचा विचार झाला पाहिजे. माझा अनुभव आहे की, पुरुष सेक्रेटरीमध्ये आता आपण पाहिलेले पोरींसारखे दुर्गुण नसतात. ते कामात अधिक लक्ष घालतात. आपले लक्ष विचलित करत नाहीत. पण त्यांच्यामध्ये इतर काही दुर्गुण असतात. मुख्य म्हणजे पुरुष सेक्रेटरी युनियनच्या कामात अधिक भाग घेतो. त्याला प्रमोशनची गरज असल्याने तो ओव्हर टाईम करतो, रात्री थांबतो, पण त्याचबरोबर त्याचा ओव्हर स्मार्टनेस काही वेळा नकोसा होतो. विशेषतः कॉन्फीडेन्शियल मॅटरच्या बाबतीत फार सावध राहावे लागते. कंपनीची गुपिते एखादे वेळी फुटण्याचा संभव असतो. लाच घेण्याची

प्रवृत्ती पुरुषामध्ये जास्त असते. तो विश्वासघात करण्याची शक्यता अधिक.'

'दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरुष सेक्रेटरीला जामणे मोठे कठीण जाते. रागाचा पारा वर चढवता येत नाही. बाईला घरीसुद्धा दुसऱ्या कोणी बॉसिंग करायची सवय झालेली असते. येथेही ती तुमच्याकडे आदराने बघते. तिच्याबाबत जरा सैल जीभ चालते. मग सॉरी म्हटले की काम भागते. पुरुष सेक्रेटरी ताठ राहतो.'

'पुरुष सेक्रेटरी युनियनच्या कामात भाग घेतात हा महत्त्वाचा तोटा आहे. कारखान्यातल्या कामगारांमध्ये युनियनचे प्रस्थ असतेच. पण पांढरपेशांमध्ये ते वाढून चालणार नाही. पोरी बऱ्या. त्यांना नोकरीचे, महागाई-भत्त्याचे तसे सोयरसुतक नसते. एका कंपनीत त्यांचे आयुष्य पाच वर्षांहून जास्त नसते.'

'मी तुमच्याशी सहमत आहे. या फिरत्या जिप्सींचा एक फायदा असतो. काम कमी असेल तेव्हा काढून टाकल्या. जास्त असेल तेव्हा भरती केल्या. खळखळ नाही. आवाज नाही. गरीब घरची मुलगी असेल तर मान मोडून काम करील. घरी काम करायची सवय रक्तात भिनलेली असते.'

'बोललो, रागावलो तर क्षुल्लक कारणासाठी रडेल सुद्धा. पण मनात डूख धरणार नाहीत. युनियनकडे प्रकरण घेऊन जाणार नाही. निमूट ऐकून घेईल. गरीब असतात अशा पोरी.'

'त्या डोके चालवीत नाहीत याचा एक फायदाही असतो. फाजील रस दाखवीत नाही. आगाऊपणे सूचना करत नाहीत. तुमच्या चुका काढत नाहीत.'

'आणि कॉन्फिडेन्शियल कामाला तर बाई सेक्रेटरीच हवी. एरवी बायकांच्या तोंडात तीळ भिजत नाही. गॉसिप करतील. पण कंपनीची गुपिते त्यांच्यापाशी सुरक्षित राहतील. कारण त्यांना त्यांचे महत्त्व न कळण्याची शक्यता अधिक. शिवाय ही गुपिते दुसरीकडे विकून पैसे मिळविणे वगैरे चलाखपणा त्यांच्याकडे बहुधा नसतो.'

'खरं सांगू का! मला आपली डोळ्यांना आल्हाददायक, आज्ञाधारक, चुणचुणीत पोरगी छोटी नोटबुक घेऊन समोर उभी असलेली बरी वाटते. आपण आलो की झटकन उठते. आपण सांगतो ते भराभर टिपून घेते.'

'आणि त्यातही खिश्चन किंवा पारशी पोरी बऱ्या. सेक्रेटरीशिप त्यांच्या रक्तात परंपरागत मुरलेली असते. महाराष्ट्रीयन पोरींची जरा भीती वाटते. एखादीची अस्मिता उगीच टोकदारपणे पुढे आली असल्याचा भास होतो. पुरुषांच्या नजरा सराईतपणे झेलायची सवयही तिला नसते.'

'नाही म्हटलं तरी एरवी ऑफिसचे वातावरण आणि काम इतकं रूक्ष असते की वाळवंटात ओॲसिस किंवा एखादे शोभेचे पामचे झाड असावंसं वाटतंच.'

'राइट यू आर. माझे हेच म्हणणे आहे. ऑफिसमध्ये अधिकारी म्हणून बाई

नको. आपली बॉस म्हणून बाई नको. तिच्याकडून आज्ञा घेणे आपल्याला कठिण वाटेल. पण.....

'I like sweet dumb butterfly hovering around me' गोड मट्ट फुलपाखराने रुंजी घातलेली आवडेल बुवा मला!'

'हीअर यू आर, हीअर यू आर. मला वाटतं, आपल्या सर्वांचे एकमत झालेले आहे. मुली कदाचित टिकून राहणार नाहीत. पण त्या निमित्ताने त्यांचे नवेनवे चेहेरे दिसतील. वातावरण प्रफुल्लित राहील. त्यांना टेवल्यामुळे होणारे तोटे गृहीत धरले तरी त्यांचे इतर अनेक फायदे लक्षात घेण्याजोगे आहेत. म्हणूनच यापुढे आपण ही चर्चा थांबवू आणि आपले आहे तेच धोरण पुढे चालू टेवू. फुलपाखरे कोणाला आवडत नाहीत!'

ङ

॥ २२ ॥

अधिकारी स्त्रीलाही चौकटीतच वावरावे लागते

'आम्हाला स्त्री अधिकारी आवडत नाहीत.' हा अभिप्राय कोणाचा असावा? स्त्री सेक्रेटरीचा. आणि हे निरीक्षण आहे शरू रांगणेकर यांचे.

'आम्हाला फुलपाखरे आवडतात.' हा लेख लिहून झाल्यावर अधिकारी स्त्रियांच्याबाबत त्यांच्या भोवतालच्या लोकांची मते काय असतात, याबद्दल कुतूहल जागृत झाले होते. या संदर्भात शरू रांगणेकरांना भेटण्याचा सल्ला मिळाला. शरू रांगणेकर आज कित्येक वर्षे स्वतः व्यवस्थापन क्षेत्रात काम करत आहेत. त्याचबरोबर ते या विषयांत तज्ज्ञही आहेत. मुख्य म्हणजे व्यवस्थापन क्षेत्रात जो मानवी स्वभाव दृष्टीस पडतो त्याविषयी त्यांचे फार बारकाईने निरीक्षण आहे.

भारतामध्ये स्त्रियांना उच्च अधिकाराची जागा भूषविण्याची संधी इतर अनेक पाश्चात्य देशांपेक्षा अधिक आहे. हे त्यांचे पहिले निरीक्षण. कारण काय? स्वातंत्र्यानंतर आपल्या देशामध्ये अल्पसंख्यांकांना खास संरक्षण देण्याची पद्धत रूढ झाली आहे. प्रत्येक क्षेत्रात राखीव जागा. स्त्रियाही याला अपवाद नाहीत. काही उच्चपदस्थ जागा भरताना स्त्री म्हणून त्या व्यक्तीचा खास विचार होण्याचा संभव असतो.

दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, भारतामध्ये जातीच्या अस्मितेला महत्व जास्त आहे. एखाद्या जातीतील बाई जर पुढे येत असेल तर स्त्री-पुरुष भेद दुय्यम मानून त्या बाईला जागा करून देतील. अमेरिकेत मात्र स्त्री-पुरुषातील अंतर्विरोध अतिशय

महत्वाचा मानल्यामुळे, 'जीव गेला तरी बाईपुढे मान तुकविणार नाही,' अशी गुर्मी अधिक आढळते. बाईच्या हाताखाली काम करायला पुरुष नाराज असतात.

भारतासारख्या देशात स्त्री-अधिकाऱ्यांसाठी अनुकूल वातावरण तयार होते, त्याला आणखी एक कारण आहे. येथील व्यवस्थापन पद्धतीमध्ये नोकरशाहीवर भर जास्त. एखादी व्यक्ती एकदा चिकटली की ती या सिनिऑरिटीच्या तत्वानुसार उच्चपदी पोचते. वशिल्याची तट्टे सोडा. त्यांची गोष्ट वेगळी. पण एखाद्या माणसाच्या अंगी इतर अनेक गुण असूनही त्याला इतरांना डावलून प्रमोशन देता येत नाही. सिनिऑरिटीच्या तत्वानुसार स्त्रीलाही उच्च पदासाठी फार प्रयत्न करावे लागत नाहीत. सरकारी नोकऱ्यात म्हणूनच उच्चपदस्थ स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.

याच नोकरशाहीचे वैशिष्ट्य म्हणजे अधिकाराच्या जागेवर नेमणूक करताना विद्यापीठीय गुणवत्तेस अधिक महत्व दिले जाते. स्त्रिया प्रामाणिकपणे अभ्यास करून गुणवत्ता प्राप्त करतात. आय. ए. एस. या परीक्षेत यशस्वी स्त्रियांचे प्रमाण पुष्कळ आहे, हा त्याचा एक पुरावा. पाश्चात्य देशात विद्यापीठीय गुणवत्तेपेक्षा आक्रमक व्यक्तिमत्व, पुढाकार घेण्याची प्रवृत्ती, हजरजबाबीपणा, कल्पकता, धूर्तता वगैरे अनेक निकष लावले जातात. तेथे स्त्रिया मागे पडत असाव्यात.

मात्र रांगणेकरांच्या मते आता चित्र बदलतंय. आता औद्योगीकरण वाढतंय, (माझ्या मते- उद्योगामध्ये बाजारीकरण झपाट्याने होतंय.) आणि स्त्रियांना- 'मॅनेजर' म्हणून वावरणाऱ्याची संधी कमी होत चालली आहे. (या बाजारी अर्थव्यवस्थेमध्ये लागणारा बनेलपणा अजून कमी स्त्रियांच्या ठिकाणी मुरला आहे.) मुख्य म्हणजे केवळ विद्यापीठीय गुणवत्तेच्या आधारे नोकरी मिळाली तरी ती टिकविणे ही अधिक गंभीर गोष्ट आहे. व्यावहारिक चातुर्य याची आज अधिक गरज भासते. स्त्रिया तेथे मागे पडतात.

रांगणेकर स्त्रीच्या व्यवस्थापकीय कौशल्यासाठी तीन निकष लावतात.

(१) विद्यापीठीय माहितीव्यतिरिक्त जगातील इतर व्यवहाराची माहिती, भोवती घडणाऱ्या घटना, त्यांचे परस्पर कारण संबंध हे व्यवस्थापकाला माहीत असणे जरूर असते. स्त्रिया ही माहिती मिळवून स्वतःचे क्षितिज सतत रुंदावण्याची काळजी घेत नाहीत.

(२) भविष्याचा सतत वेध घेऊन धोरणांमध्ये लवचिकता ठेवणे किंवा धोरणे ठरविताना परिस्थितीचा सर्वांगीण विचार करणे हे स्त्रीला जमत नाही. उदाहरणार्थ, कामगार संघटनांशी करार करताना येत्या ३-४ वर्षांतील कंपनीची परिस्थिती, बाजाराची परिस्थिती याचा विचार करून कामगारांना आश्वासने द्यावी लागतात.

(३) स्वभाव-वैशिष्ट्य हा आणखी एक निकष. स्त्रीला आपण कुठे कमी तर पडत नाही ना असा न्यूनगंड सतत वाटत राहातो. म्हणून स्वतःचे कर्तृत्व सिद्ध

करण्यासाठी ती सतत ताणाखाली वावरते. खोटा अभिनिवेश तिच्या अंगी बाणतो. पुरुष अधिकारी हातून चूक झाली तर लवकर कबूल करतो, स्त्री अधिकारी कबूल करण्यामध्ये कमीपणा मानते. तिचे तिच्या सहकाऱ्यांशी संबंध बिघडण्याचा धोका उत्पन्न होतो.

स्त्री सेक्रेटरीला स्त्रिया मॅनेजर आवडत नाहीत, याचे महत्वाचे कारण, स्त्रिया मॅनेजर अधिक बॉसिंग करतात. रांगणेकरांचे हे निरीक्षण मला बिनचूक वाटले. मात्र याच्या मागील कारणांचा शोध घ्यावासा वाटला. स्त्रीकडे स्त्री म्हणूनच पाहण्याची इतकी सवय झालेली असते की अधिकारी स्त्रीला आपण अधिकारी आहोत हे सिद्ध करणे महत्वाचे वाटत असावे. कारण स्त्रियांच्याही मनात स्त्रीच्या बुद्धीबद्दल, कुवतीबद्दल एक प्रकारचा सूक्ष्म अनादर परंपरेनेच वसत असतो. अधिकारी स्त्रियांना थोडीफार 'ग' ची बाधा झाली असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. शिवाय सेक्रेटरी मुलींना पुरुष अधिकाऱ्यांकडून त्यांच्या स्त्रीत्वाचे कौतुक केले जाते, सवलती मिळतात याची सवय झालेली असते आणि स्त्री अधिकाऱ्यांजवळ लाळघोटेपणा करता येत नाही.

'स्त्रियांना लाच देणे कठिण जाते' हे आणखी एक स्त्रीसुलभ वैशिष्ट्य. मॅनेजर स्त्रीला हॉटेलात नेऊन स्कॉच व्हिस्की पाजून मैत्री जुळवून तिच्याबरोबर 'डील' करता येत नाही. मी मघाशी म्हटले तसे स्त्रिया अजून पुरेशा 'बनेल' बनल्या नाहीत.

रांगणेकर याला कारणे देतात, एक तर स्त्रिया अब्रूला, अपकीर्तीला फार घाबरतात. दुसरे म्हणजे बहुतेक स्त्रियांचे नवरे नोकरी करत असल्यामुळे दोघांचे मिळून उत्पन्न बऱ्यापैकी असते. 'पूरक' उत्पन्न म्हणून लाच घेण्याची गरज स्त्रीला वाटत नसावी.

गंमत म्हणजे मला नुकतेच कळलेले काही प्रसंग रांगणेकरांच्या निरीक्षणाच्या विरोधी आहेत. काही अधिकारी स्त्रिया पुरेशा आत्मविश्वासाने लाच घेतात असा अनुभव आहे. 'हम भी कुछ कम नही' हाच स्त्री-स्वातंत्र्याचा गुण अंगी बाणत चालला आहे.

स्त्रियांना व्यवस्थापनाच्या क्षेत्रामध्ये भविष्य आहे की नाही, याबाबत मात्र रांगणेकरांना शंका होत्या. अपत्यजन्म हे करिअरमध्ये निश्चित बाधा आणते. व्यवस्थापनामध्ये सातत्याला महत्त्व असते. घराचेही व्यवस्थापन तिलाच बघावे लागत असल्याने वेळ फार कमी मिळतो. व्यवस्थापकीय पेशामध्ये पार्ट्यांना फार महत्त्व असते. स्वतःच्या कंपनीच्या पार्ट्यांना हजर राहायचे की नवऱ्याच्या पार्ट्यांना हजर राहायचे असे गंभीर प्रसंग निर्माण होतात. नवऱ्याच्या करिअरसाठी बायकोने त्याग करायचा की नाही?

रांगणेकरांशी बोलताबोलता तास निघून गेला होता. रांगणेकरांचे प्रश्न बरोबर होते. पण माझ्या लक्षात आलं हे प्रश्न निर्माण होत आहेत. कारण आज अधिकारी स्त्रीला काही ठराविक रीतिरिवाजांच्या चौकटीमध्येच वावरावे लागते. स्त्री म्हणून गोळा झालेले पारंपारिक कवच, सहजपणे गळून पडत नाही. अधिकारी स्त्रीच्या भूमिकांची विभागणी ही प्रथम स्त्री व मग अधिकारी अशी होत असते. व्यवस्थापन करण्यासाठी पार्ट्यांची गरज का भासावी? ओळखी होण्यासाठी पार्ट्यांची गरज आहे असे मान्य केले तरी नवऱ्याबरोबर शोभेची बाहुली म्हणून बायकोने गेले पाहिजे असा आग्रह का?

॥ २३ ॥

शिक्षिका

माझा विश्वास बसणे शक्य नव्हते. स्वतंत्र सार्वभौम भारतात स्त्रियांना जेथे १०० टक्के समान हक्क दिलेले आहेत, हिंदू कोड बिलासारखा प्रागतिक कायदा झालेला आहे, त्या भारतात मुंबईपासून पन्नास मैल असलेल्या एका गावी महाविद्यालयासारख्या सुशिक्षित, विद्यासंपन्न संस्थेमध्ये अशा प्रकारची घटना घडू शकते हे मला आकलनीय नव्हते.

एक स्त्री–तरुणीच–छोट्या मुलीची आई. उच्चविद्याविभूषित. महाविद्यालयात प्राध्यापक. सर्व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग. सर्वांगाने विकसित व्यक्तिमत्व. महाविद्यालयात विद्यार्थ्यांची आवडती शिक्षिका. मिळून मिसळून काम करणारी. पहिल्याच वर्षी तिने मुलांना नाट्याच्या नव्या जाणिवा दिल्या. स्वतः दिग्दर्शन करून एक नवे नाटक रंगभूमीवर आणले. त्या गावाला हे सर्व काही खूप नवीन होते. एक नवचैतन्य, नवा प्रकाशकिरण अचानक तिथे शिरला आणि सगळे वातावरण उजळून गेले.

तिलाही ते सारे खूप छान वाटले. शहरी जगाच्या धकाधकीत थकली होती ती. नवऱ्याबरोबर सांभाळून घ्यायचा खूप प्रयत्न केला तिने. लाचारी पत्करली. त्याच्या लहरी, त्याच्या खर्चिक सवयी. सगळं सगळं चालेल. तिचा आणि मुलीचा खर्च करायलाही ती तयार होती. नोकरी करून स्वतःचा सांभाळ. फक्त तिला त्याचा सहवास हवा होता. मित्र म्हणून. तिला एकाकी जगता येत नव्हते. लग्न करतानाच हे सगळे

तिने कबुल केले होते आणि तरीदेखील सगळे गणित चुकले. आदर्श भारतीय स्त्री-प्रमाणे समर्पणाची तयारी दाखवूनसुद्धा सूर जमू शकले नाहीत. घटस्फोट घ्यायची मनाची तयारी करायलाच हवी होती.

आणि हा मुक्काम मुंबईपासून दूर. त्या परिचित लोकांपासून, वातावरणापासून आतापर्यंत उगीचच नवऱ्याचे बांडगुळ पोसत होतो असे तिच्या लक्षात येऊ लागले. जीवनात समरस झाला असता तर दोघांचे मिळून सर्जनशील नाते तयार झाले असते. पण दोन जीवनांचा मिलाफ होऊ शकला नाही. ती वाढत होती. तिच्या क्षेत्रात कर्तृत्व दाखवीत होती. तो मात्र त्याची चाकोरी सोडीत नव्हता. बांडगुळच. तिचे भावनिक जीवन ती उगीचच त्याच्या भोवती वेढून ठेवीत होती. तो हसला का, तो रुसला का या तालावर स्वतःचे सूर काढीत होती.

या आडगावच्या महाविद्यालयात तिने जेव्हा अर्ज केला तेव्हा हे सगळे बंध, पाश तोडायचे निर्णय घेऊनच. अर्थात पहिल्याच मुलाखतीमध्ये व्यवस्थापक मंडळाला फार विश्वासात घेणे शक्य नव्हते. 'प्रकृती स्वास्थ्यासाठी मुंबई सोडून येथे येण्याचा निर्णय आपण घेत आहोत' असे मोघम कारण. बरोबर चार वर्षे वयाची मुलगी. व्यवस्थापक मंडळाने मुलींच्या हॉस्टेलला मेट्रन म्हणून तिची नेमणूक केली. प्राध्यापकाची जागा दिली. आणि तिची उत्तम सोय झाली.

समुद्राच्या काठावरच महाविद्यालयाची इमारत. लाटा अंगणात खेळायच्या. पौर्णिमेला चंद्राचे चांदणे ऐन भरात. उफाळणारी भरती. ती स्थिर होत होती. वर्ष-भरात तिने सर्वांना खूष केले.

तिचा हा 'सेपरेशन्' चा काळ आहे अशी अफवा उठू लागली होती. तिला त्याचे सोयरसुतक नव्हते. फक्त त्या लहान गावात एकटी राहणारी बाई हे चांगलेच कुतूहल होते. त्यामुळे थोडीशी बातमीसुद्धा पटकन बाहेर सटकायची. एका दृष्टीने बरेच होते. सगळ्यांची मानसिक तयारी हळूहळू होईल.

वर्ष संपत आले. पंधरा मार्चला शेवटचा दिवस. मग परीक्षा, सुट्या, आईकडे जाणे. दोनतीन महिने भरगच्च होते आणि प्राचार्यांचे बोलावणे आले. तिची बागणूक चांगली होती. कामाचे रिपोर्ट्स उत्तम होते. नावे ठेवायला कुठेही जागा नव्हती.

ती प्राचार्यांच्या केबिनमध्ये जाऊन उभी राहिली. प्राचार्यांनी बसण्याची खूण केली. प्राचार्य नेहमीच भारदस्तपणे आणि गंभीरपणे बागत.

'मग तुम्ही काय निर्णय घेतलात?' त्यांनी रोख सवाल विचारला.

'म्हणजे?' तिला हे अनपेक्षित होतं.

'तुमचा विभक्त राहण्याचा काळ संपत आला आहे. तेव्हा तुम्ही घटस्फोट घेणार की पुन्हा मिळतं घेणार?'

क्षणभर तिला काही सुचेना. हे चक्क खाजगी जीवनावर आक्रमण होते. त्यांचा

संबंध काय? माझ्या व्यवसायासंबंधी बोला. तेथील कौशल्याबद्दल दोष दाखवा. तुमची घटना मला पाहू द्या. हा प्रश्न विचारायचा अधिकार कोणत्या कायद्यान्वये तुम्हाला मिळालाय मला कळू द्या.

'मला वाटतं माझा हा खाजगी प्रश्न आहे.'

तिने कणखर शब्दात सांगितलं. एक पाऊल मागे सरकायची तिची तयारी नव्हती.

'हे बघा, जे स्वातंत्र्य तुम्हाला मोठ्या शहरात मिळू शकते ते येथे मिळणे कठिण आहे. गाव छोटं आहे. येथे सगळ्यांच्याच आयुष्याचा खाजगीपणा मर्यादित असतो. शिवाय व्यवस्थापक मंडळातील लोकांच्या हातात बरीच कर्तुम्अकर्तुम् सत्ता असते. कागदावर कोणतेही तांत्रिक कारण दाखवून आज तुम्हाला काढून टाकायचे अधिकार त्यांना आहेत.'

'आपल्या येथे काम करणारी तुळसा नवऱ्याला सोडून राहते. तिने काडीमोड घेतलेला आहे. तिला तुम्ही कधी प्रश्न विचारलेत?' तिचा आवाज आता सात्विक संतापाने कातर झाला होता.

'तुम्ही, मी–आपण समाजाच्या वरच्या थरात असतो बाई. आपण लोकांपुढे आदर्श ठेवायचे असतात. आपले अनुकरण सामान्य माणसे करतात. आपण त्यांना वागणुकीचे नियम, चालीरीती घालून द्यायच्या असतात.'

'म्हणजे या समाजाच्या मनावर तुम्ही राज्य करता. या समाजाची मने तुम्ही बनवता. तुम्हाला अनुकूल अशी, तुमची सत्ता मान्य करणारी. तुमच्यापुढे मान झुकवणारी.' ती क्षणभर थांबली.

'हो. मी घटस्फोट घेणार आहे. घटस्फोट घेऊन मी माझ्या विवाहाच्या करारातून मुक्त होणार आहे. जो विवाह मला सुख द्यायला अपयशी ठरला त्यातून बाहेर पडूनच मला माझा विकास साधता येईल. घटस्फोट घेणं हे मला कोणत्याही अर्थाने पाप वाटत नाही. तो माझा अधिकार आहे.'

'बाई, याविषयी मलाही जास्त वाद घालता येत नाही. पण व्यवस्थापक मंडळाला एका घटस्फोटित स्त्रीला महाविद्यालयाच्या स्टाफवर ठेवणे आणि विशेषतः मुलींच्या वसतिगृहाची मेट्रन म्हणून काम करू देणे अप्रस्तुत वाटते.'


'पण का?' अस्फुटसा शब्द तिच्या तोंडून बाहेर पडला.

वर्षाच्या आतच गाशा गुंडाळून तिला ते गाव सोडावे लागले.

एका घटस्फोटित स्त्रीला–पुरुषाशिवाय राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रीला–अजून आपल्या समाजात सहजपणे स्वीकारले जात नाही. एकीकडे आपण औद्योगीकरणाच्या गप्पा मारतो. इंदिरा गांधींकडे बोट दाखवून आमच्या स्त्रीवर्गाच्या औदार्याची पाठ थोपटून घेतो आणि दुसरीकडे एक आपल्या व्यवसायात निपुण स्त्री एकटी स्वतंत्र स्वतःच्या पायावर उभी राहण्याचा प्रयत्न करत असतानाच आपण

तिच्या पायाखालची फळी काढून घेतो.

स्त्रीने पुरुषाच्या आधाराच्या खांबाशी स्वतःला बांधून घ्यावं. तिने त्याच घाण्या-भोवती फिरत रहावं. तिने स्वतंत्र होऊ नये. कारण काय? आमची कुटुंब–व्यवस्था मोडकळीस येईल. पण खरे कारण वेगळेच होते. कुटुंब व्यवस्थेतील पुरुषी वर्चस्व नष्ट होईल. पुरुषाला गावभर हिंडायला परवानगी, बायकोसाठी मात्र एकपतीव्रत हा दुटप्पीपणा पूर्वापार चालत आलेला आणि संस्कारांची पुटे चढवून चढवून स्त्रीचे मन तयार केले गेलेले. आजही शिक्षण मिळते तरी त्याच पुरुषी वर्चस्वाच्या चौकटीत तिला जखडून ठेवण्याची प्रवृत्ती संपलेली नाही. ती अधिक सोफिस्टिकेटेड झालेली आहे एवढेच. कारण वेगळेच दिले गेले. पण खरं कारण सगळ्यांनाच कळून चुकलेले होते. असे बंडखोर धुमारे आताच खुडून टाकले नाहीत तर सगळाच डोलारा कोसळेल नं!



॥ २४ ॥

शेतमजूर स्त्री

शहादा तालुक्यात नांदरखेडा गावी शिबीर सुरू झालं. आदिवासी स्त्रियांचे शिबीर लिहिता-वाचता न येणाऱ्या शंभर अडाणी बाया एकत्र जमल्या. वरवर पाहाणाऱ्याला त्यांचे चेहेरे निर्बुद्ध वाटले असते. मध्यमवर्गीय साहित्यिकांनी त्यांच्याकडे स्त्रियांची 'झुंड' म्हणून नाकेही मुरडली असती. कष्टकरी स्त्री-पुरुषांचे कष्ट करणारे, धुळीने माखलेले, चिखलाने बरबटलेले हातच त्यांना दिसतात. त्या हातांच्या वर डोके असते, छातीच्या आत हृदय असते वगैरे गोष्टीकडे लक्ष द्यायला ते सोयीस्करपणे विसरतात. या साहित्यिकांचा आरोप असतो की हे लोक घोषणांच्या भाषेत बोलतात. त्यांना व्यक्तिगत भाषा नसते. त्यांची भाषा ही झुंडीची भाषा असते. ती पुढाऱ्यांनी शिकविलेली पोपटपंची असते. हे पुढारी फक्त घोषवाक्यांमध्ये बोलतात आणि या झुंडीच्या जोरावर स्वतःचे महात्म्य वाढवून घेतात.

या पार्श्वभूमीवर या शिबिरात जमलेल्या शंभर बायांच्या मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न मी करत होते. वरवर बघताना ती बायांची झुंड वाटत होती. शिबिराला सुरुवात घोषणांनी झाली.

श्रमिक संघटना झिंदाबाद !

श्रमिकांच्या एकजुटीचा विजय असो !

कष्टकरी बायांच्या एकजुटीचा विजय असो !

बायास्नी दणका ! मालदारनु भणका !

मग भिलोरी भाषेत अर्ध्या तासाचे भाषण आणि त्यानंतर २०–२० बायांचा एकेक गट असे पाच गट. शंभर बायांपैकी साठ तरुण मुली. गटागटामध्ये बसल्यावर एकेकीच्या व्यक्तिमत्त्वाला आकार यायला लागतो. व्यक्तिमत्वाच्या रेखा ठाशीव, उठावदार होत जातात. माझ्या लक्षात येतं ही कळपातील मेंढरे नव्हेत. इतकेच नव्हे तर मध्यमवर्गीय महिला मंडळात दर गुरुवारी भरतकामाच्या किंवा पाककौशल्याच्या प्रात्यक्षिकासाठी जमणाऱ्या नखरेल, दिखाऊ स्त्रियांसारख्या या निर्बुद्ध स्त्रियाही नव्हेत. मुख्य म्हणजे प्रत्येक स्त्रीला ओळख करून देताना मी अमक्या तमक्याची मिसेस अशी ओळख करून द्यावी लागत नव्हती किंवा माझे मिस्टर अमुक तमुक आहेत असा नवऱ्याचा आश्रय घ्यावा लागत नव्हता. प्रत्येक जण सांगत होती, 'मी शेतमजुरी करते.' बिसापैकी दोघींच्या घरी थोडी थोडी शेती होती. पण तरीही सुगी संपल्यावर दुसऱ्याच्या शेतावर किंवा सरकारी रस्त्याच्या कामावर मजुरीला जाण्याची गरज भासत होती. प्रत्येकीला स्वतःचे स्वतंत्र स्थान होते. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये प्रत्येकीचा प्रत्यक्ष सहभाग होता. प्रत्येकीची व्यथा एकच होती–काम खूप कमी मिळते. वर्षातून निम्मे दिवस हातावर हात टेवून बसावे लागते आणि जेव्हा काम मिळते तेव्हा पगार खूप कमी मिळतो. दीड रुपये, दोन रुपये रोज फक्त. आता संघटनेमुळे पगार वाढतोय हळूहळू. काही ठिकाणी संप करून सरकारी कायद्याप्रमाणे तीन रुपये रोज मजुरी मिळवून घेतली होती. ज्या ठिकाणच्या बाईला तीन रुपये रोज मिळत होता ती बाई मोठ्या अभिमानाने सांगत होती, 'ताई, आता मालदार (श्रीमंत शेतकरी) नरम झालाय. पहिला दीड रुपया पण द्यायचा नाही. आता न बोलता तीन रुपये हातावर ठेवतो.'

मग एकेकीच्या कहाण्या सुरू व्हायच्या. 'ताई, मी पहिली खूप घाबरायची हवालदाराला. खुप मारायचा. मालदाराचा कोणावर राग असला की आदिवासींविरुद्ध खोटी तक्रार करून द्यायचा तो फौजदाराकडे, 'ह्या आदिवासीनं कणसं पळवली.' मग फौजदार जीपातून गावाकडं यायचा आणि घेऊन जायचा. आम्ही सर्व लपून बसत असू. आता नाही घाबरत.'

'त्याचं असं झालं. आमच्या गावाला पडिक जमीन खूप आहे. ती खेडायला (कसायला) मिळावी म्हणून सत्याग्रह केला होता. पन्नास बाया आणि पन्नास पुरुष कुदळी घेऊन खणायला गेलो होतो. फौजदारबी आला होता. खूप हवालदार त्याच्याबरोबर. पिंजऱ्याची गाडी आणली होती. आम्हाला पकडून घेतलं. बारा पुरुष आणि नऊ बाया. पिंजऱ्याच्या गाडीत बसिवलं. पण भीती नाय वाटली. खूप घोषणा दिल्या. मग कोर्टात उभं केलं. साहेबाने विचारलं, 'गुन्हा कबूल आहे का?' मी म्हटलं, 'हो, गुन्हा कबूल. पोट भरावं म्हणून गुन्हा केला. जमीन खेडायला मिळावी

म्हणून गुन्हा केला. तू काही पोटाला देणार नाहीस. मालदार देणार नाही.' आणि गुमान चौदा दिवस जेलात जाऊन आले.'

'भीती नाही का वाटली सायबाची?'

'काय नाही. त्याला काय भ्यायचं! चोरी थोडीच केली होती?'

'नवऱ्याने परवानगी दिली का?'

'त्याला काय विचारायचं? गावच्या सर्वांचा निर्णय होता. शेवटी पोराबाळांचं आपल्याला बघावं लागतं ना!'

'मग तू जेलात गेल्यावर पोराबाळांचं खाणंपिणं कोणी केलं?'

'गावात लोक नव्हते का? एकेक पोर जेवलं एकेकाच्या घरी.'

'पण जमीन मिळाली का एवढं सगळं करून?'

'ताई, मला भूल देतेस काय? अग एकदा सत्याग्रह करून जमीन थोडीच मिळणार आहे? असं बघ. झाड आहे, त्येला तोडायचं आहे, त्यावर एकदा वार करून पडेल का ते? सतरा वार करायला हवेत.'

मी चकित. अडाणी निर्बुद्ध झुंडीतील बाई मला चळवळीचे शास्त्र समजावून सांगत होती.

'अडची' गावची चंद्राबाई सांगत होती, 'ताई, धुयाच्या मोर्चाला फार गंमत आली. (येथे 'ळ' म्हणता येत नाही. धुळे–धुये, तळं–तय) असे पाय सुजून आले होते.'

'का ग चंद्राबाई, तुला चालायची सवय नाही वाटतं?'

'ताई, अग पाच कोस तर माझं रोजचं चालणं होतं. जंगलात कामालाच मुळी चार मैल जावं लागतं. (जंगल म्हणजे शेत) पण धुयाला तीस कोस चालत गेलो आम्ही. माझी पोट्टी तेव्हा नऊ महिन्यांची होती. अंगावर पीत होती.'

'तिलाही उन्हात घेऊन गेली होती?'

'मग काय तर. कुठे ठेवणार?'

'अग मग जायचं नाही इतक्या दूर.'

'बरं सांगताय ताई. संघटनेचे काम होते. यायला नको? कधी गावाच्या बाहेर पडले नव्हते. तहसीलदाराची कचेरी बघितली नव्हती. पुनःपुन्हा मोका थोडाच मिळतो. गावाच्या पुष्कळ बाया निघाल्या. चळवळ नाही केली तर मजुरी कोण वाढवून देणार?'

'काय ग, पण मजुरीचे करार होतात तेव्हा बोलणी करायला बाया जातात का?'

'नाय बा, गावचे पुरुष असतातच की, शिवाय कुमारभाऊ, विजयभाऊ कोणीतरी कार्यकर्ता असतो.'

'पण मजुरी तुम्ही पण करता. तुम्हाला मजुरी पुरुषापेक्षा कमी मिळते, मग

बायांतर्फे बोलणी करायला तुम्ही जायला नको ?'

'बरोबर आहे ताई, या अडचीच्या बाया नाही जात बोलणी करायला. पण आम्ही जातो. आमच्या गावच्या बायांचे पुढारीपण मी करते. कुमारभाऊंनी मला बोलावलं होतं कराराच्या वेळी.'

'मालदाराने पुरुष आणि बाया दोघांनाही तीन रुपये मजुरी कबूल केली का ?'

'तो बरा करील ? आधी म्हणत होता, पुरुष मजुराला तीन रुपये देईन. बाई मजुराला दोन आणि अर्धा. मी खूप गाया (शिव्या) दिल्या. पुरुष मजूर करू शकत नाही ती कामे आम्ही बाया करतो. आम्हाला पण तेवढीच रोजी पाहिजे.' तावा-तावाने ती बोलत होती. नाकपुड्या थरथरत होत्या.

'मालदार खूप त्रास देतो का ?'

'देत होता संघटना व्हायच्या आधी.'

'ताई, पण जास्त त्रास दिला ओव्हरसिअरने. दुष्काळात रस्त्याच्या कामावर होतो. धाकलं पोर होतं मला. त्याला झाडाखाली सावलीत झोपवून मग कामाला लागायची मी. तर एक दिवस झाडच कापून घेतलं भडव्यानं ! थोडं पण सुख लागू देत नव्हता तो.'

एकेकीच्या एकेक व्यथा. अत्याचार, जुलमाच्या कहाण्या आणि त्या सर्वांवर मात करून आता संघटना केल्याचा आनंद. विजय मिळविल्याचा आनंद. भाषण संपल्या-संपल्या थोडासा कंटाळा येई. मग पुन्हा घोषणा आणि क्रांतिकारक गाणी. पूर्वीच्या लग्नाच्या गाण्यांच्या चालीवर आता संघटनेची आणि क्रांतीची गाणी.

माझ्या लक्षात येतं. या घोषणा झुंडीच्या घोषणा नाहीत. या घोषणा प्रत्येकीच्या स्वतंत्र व्यथांचा आविष्कार आहे. प्रत्येकीचे स्वतंत्रपणे काही ना काही दुःख आहे आणि त्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी त्यांना संघटना मिळाली आहे. त्यांची एक-जूट झाली आहे. त्या एकजुटीतून त्यांना बळ मिळालंय. ही झुंड नाही. ही आतापर्यंत निद्रित असणाऱ्या स्त्रियांची संघटना आहे.

'हा आवाज कुणाचा ?'

'कष्टकऱ्यांचा !' ही घोषणा झुंडीची घोषणा राहू शकत नाही. ती क्रांतीसाठी सज्ज होऊ इच्छिणाऱ्या, व्यवस्थितपणे संघटित झालेल्या, उद्याच्या जगाची निश्चित कल्पना असणाऱ्या कष्टकरी स्त्रियांच्या आत्मविश्वासाचा बुलंद आविष्कार असतो.

'स्त्रीला मुक्ती हवी असेल तर तिने समाजवादी चळवळीच्या लढ्यात भाग घेतला पाहिजे.' हे टाळीचे वाक्य. पण ते प्रत्यक्षात उतरलेलं आढळलं येथे–शिबिरात येणाऱ्या आदिवासी स्त्रीमध्ये.

आम्ही गटागटाने चर्चा करत बसलो होतो आणि अचानक सगळ्याजणी मागे वळून पाहायला लागल्या. मंडपाच्या दारामध्ये एक आदिवासी तरुण बाई उभी होती.

हातात पिशवी, कपाळावर घामाचे ओघळ. दुपारचे बारा वाजत आलेले. एकजण कुजबुजली, 'भुरीबाई आली. कुरंगीची भुरीबाई.' दुसरी म्हणाली, 'कार्यकर्ती बाई आहे. पुढारीबाई.'

भुरीबाई पुढे येऊन आमच्याच गटात बसली.

'दमून आलीस ग.'

'हो ताई. पाच कोस चालत आले.'

'उन्हाची का आलीस ? काल रात्री येऊन पोचायचंस.'

'काय सांगू ताई. कालच यायला निघाले. घरात दिराचे लग्न होते. सासरभाऊ जायला देणार नाहीत. माहीत होतं. कामाचा बहाणा करून निघाले. दोन मैल चालत आले, तर वाटेत सासरभाऊ आडवं. हातातील पिशवी काढून घेतली. मला पुढे घेऊन घरी आले. रात्री जेवणं झाली जिवाची घालमेल सुरू होती. काय करावं सुचेना. संघटनेचे काम महत्त्वाचे हे मनात पक्के होते. रात्रभर झोपले नाही. पहाटे हळूच निघाले. जवळ पैसे नव्हते. तशीच चालत आले.'

आणखीही दोन बाया अशाच निघाल्या. कोणाच्या घरी नणंदेचे लगीन होते. कोणाच्या गावी जेवण होते. पण सगळे सोडून त्या शिबिराला आल्या होत्या. संघटनेने त्यांच्या जीवनात क्रांती घडविली होती. पूर्वीची जमातीची बंधने त्यांनी तोडून टाकली होती. माझ्या लक्षात आले, त्या माझ्यापेक्षा अधिक स्वतंत्र होत्या. चळवळीने त्यांना नुसतीच मजुरी वाढवून दिली नव्हती, तर मालदाराच्या जाचातून मुक्त केले होते, कुटुंबाच्या गुलामीतून मुक्त केले होते. त्यांना राजकारण करायला लावले होते. क्रांतीची स्वप्ने पाहण्याची ताकद त्यांच्यामधे आली होती.

वर्षानुवर्षे दारूच्या नशेत गुंगून पडणाऱ्या आदिवासी पुरुषांना त्या धुंदीतून उतरविण्यामध्ये बायांनीच पुढाकार घेतला होता. आदिवासी पुरुषाला मालदार पैसे देई व दारू गाळायला सांगे. पुरुष दारू पिऊन आपापसात मारामारी करत. संघटनेमधे फूट पडे. बायांनी पुढाकार घेऊन गावोगावी दारूची मडकी फोडली. 'दारू पिणार नाही' अशा शपथा घ्यायला लावल्या. स्त्रीच्या शक्तीचा प्रत्यय पुन्हा एकदा सर्वांना आला. तिला स्वतःला, संघटनेच्या कार्यकर्त्यांना येथील स्त्री चळवळ बळकट करण्यासाठी मदत तर करत आहेच आणि ते करता करताच ती स्वतःही मुक्त होत आहे.

॥ २५ ॥

राजकीय कार्यकर्ती

संध्याछाया झाकोळून येत होत्या. बस वेगात चालू होती. तसे सगळेच अनोळखी आणि काहीसे ओळखीचे सुद्धा. अजोळच्या गावी जाताना सगळे काही असेच दिसायचे. छोटे छोटे तलाव, कातरलेल्या झावळ्यांचे गुच्छ घेऊन उभी असलेली ताडांची झाडे. छोटी भातखाचरे आणि गवताच्या काड्यांनी उभी केलेली झोपडी. एखाद्याच झोपडीमध्ये अंथुकसा दिसणारा उजेडाचा ठिपका. जळणाऱ्या लाकडांचा वास. कलकत्ता सोडून बंगालच्या आत आत शिरायला लागलं की सगळीकडे हेच दृश्य. पण लहानपणी आजोळी विमुक्तपणे निसर्गाचा धुंद अनुभव घेणे वेगळे आणि आता सुजाण डोळस नागरिक म्हणून त्याच निसर्गाच्या कुशीत वसणाऱ्या कष्टकरी लोकांकडे जाणे वेगळे.

मातीमध्ये घाम गाळणारे, कष्ट करणारे, बिचारे, अन्न-निवाऱ्याला महाग झाले होते. हाडांच्या मोळ्या कशाबशा एकत्र बांधून जगत होते आणि त्याच जमिनीचे तथाकथित मालक ऐतखाऊपणे ऐश्वर्य उपभोगीत होते, धान्याच्या राशीवर लोळत होते. धान्याच्या गोणी दडवून ठेवीत होते आणि मोलमजुरीवर जगणाऱ्यांना अन्नाला महाग करत होते. त्यांचा अधिकार काय? मालकी हक्क! ते त्या जमिनीचे मालक होते. त्याच्या जोरावर सावकारी करत होते आणि सावकारीच्या जोरावर गरीब शेतकरी कर्जबाजारी झाला की त्याची जमीन गिळंकृत करत होते.

ग्रं. क्र. ३१६८
२६५९७
२०१९

कॉलेजमध्ये शिक्षण घेताना, आजूबाजूचे जग डोळसपणे निरखताना ती या विषमतेनेच अस्वस्थ झाली होती. पण काय करावे हे कळत नव्हतं. वय वर्षे बावीस. कलकत्त्याच्या प्रेसिडन्सी कॉलेजमधून बी. एससी. झाल्यावर कोणत्याही कनिष्ठ मध्यमवर्गातील तरुण मुलीने करावे तेच तिनेही केले. नोकरी धरली. ती एका अमेरिकन कंपनीमध्ये. पगार रुपये पाचशे आणि सहा महिन्यांच्या आत सोडून दिली नोकरी. साम्राज्यवादी देशाची चाकरी आपण करणार नाही!

आणि ती ग्रामीण भागात जायला तयार झाली. शहरातल्या घरात, अंधारात या खोलीतून त्या खोलीत जायला घाबरणारी ती एका पिशवीमध्ये साडी व ब्लाऊज घेऊन निघाली. बाकी सामान काही नाही. पैसे फक्त बसच्या भाड्याचे. कुठच्या तरी अज्ञात खेडेगावचे नाव. तिच्या क्रांतिकारी गटाने काम करण्यासाठी तो प्रदेश निवडला होता. जमीनदाराकडे निमबटाईने राबणाऱ्या कुळांना संघटित करावयाचे होते. सालदारी करणाऱ्या, मजुरी मागणाऱ्या शेतमजुरांना संघटित करायचे होते. त्यामध्ये अछूत होते. संथाळ आदिवासी होते. खत्री होते. सगळ्या जातीजमातीचे लोक होते. त्यांची व्यथा एकच होती. ते शोषित होते. स्वतः राबत होते, कष्ट करीत होते आणि दुसऱ्याच्या घरच्या कणग्या भरत होते. त्याच्या बदल्यात त्यांना दिसत होती सुकी भाकरी. तीही रोजच्याला नशिबी नाहीच.

तिथे ती निघाली होती. या कष्ट करणाऱ्या हातांचा आत्मा जागृत करण्यासाठी. त्यांना माणूस म्हणून त्यांच्या हक्कांची जाणीव देण्यासाठी. तिला शिक्षण मिळाले होते आणि त्याचा तिला समाजासाठी उपयोग करायचा होता. घरात बसून नवऱ्याची सेवाचाकरी किंवा ऑफिसात जाऊन चार पैसे मिळवून लिपस्टिक विकत घेण्याचे स्वातंत्र्य तिला नको होते. तिला स्वतःच्या अंतःस्थ शक्तीचा शोध घ्यायचा होता आणि समाजातील निद्रित जागृत करताकरताच स्वतःच्या शक्तीचा, व्यक्तिमत्त्वाचा स्वतःला परिचय होईल असा तिला विश्वास होता.

आई-वडिलांचा निरोप घेऊन ती निघाली. पैसे मुद्दाम जवळ ठेवले नव्हते. त्या कष्टकरी जनतेमध्ये पूर्णपणे मिसळून जाण्यासाठी ती आली होती. त्यांच्याबरोबर काम करणार होती. त्यांचा विश्वास संपादन करणार होती. त्यांनी खाऊ घातले तरच खाणार होती.

बस स्टँडवर उतरून ती जेव्हा गावात आली तेव्हा गावकुसाच्या एका कोपऱ्यात दाटीवाटीने उभी असलेली गरिबांची वस्ती तिला सहज ओळखू आली. 'राम राम' करत ती एका ओटीवर टेकली. ओटीवरचे सगळे लोक जरा चपापून मागेच सरले. शहरातील माणूस हा बहुतेक सरकारी अधिकारी असतो आणि छळण्यासाठी आलेला असतो असा त्यांचा नेहमीचा अनुभव. चुलीपुढच्या ढणढणणाऱ्या लाकडाचा प्रकाश धूसर होत ओटीपर्यंत पोचला होता. घरात कंदील किंवा चिमणीसुद्धा नव्हती.

दोनतीन विड्यांच्या लाल चिनगारी. एवढाच प्रकाश. हळूहळू आजूबाजूचे काही लोकही जमा होत गेले. ती किंचित भांबावली. 'मी तुमची शत्रू नाही, मित्र आहे.' हे त्यांना कसं पटवून द्यावे हे तिला कळत नव्हते. तिची शुद्ध बंगला भाषा त्यांना परकीय वाटत होती.

ती कोण होती ? कुठची होती ? तिचे आई-वडील कुठे आहेत ? नवरा—मूलबाळ ? त्यांनी तिला परवानगी कशी काय दिली हिंडाफिरायला ? शिकलेली झाली म्हणून काय झालं ! बाईमाणूस, ती एकटी कशी राहू शकेल ? तिचे भूतकालीन टोक कोणाला तरी बांधलेले असले पाहिजे आणि भविष्यकालीन टोक कोणाच्या तरी हातात सुखरूप असले पाहिजे. तिच्या बद्दल त्यांना कुतूहल वाटत होते आणि भीतीही. त्यांना माहीत असलेल्या स्त्रीच्या कोणत्याच रूपात ती बसत नव्हती.

पहिली रात्र तिने तेथेच काढली. पाय पोटाशी घेऊन ती ओट्यावर कुडकुडत झोपली. भाताचा वाडगा तिच्यापुढे आला होता. तिने काम करण्याचा निश्चय केला तेव्हा ह्या सगळ्या तपशिलाचा विचारच केला नव्हता. तिच्या सुरक्षित घरट्यातून, मित्रमैत्रिणींच्या उबदार मायेतून ती फेकली गेली होती. समाजाच्या वास्तवाचा एक भाग म्हणून तेथे ती आली होती. ते वास्तव फार भीषण होते आणि तिला ते पेलायचे होते. त्या वास्तवाला गतिमान करायचे होते.

हळूहळू ती त्यांच्यात मिसळून गेली. त्यांच्याबरोबर काम करायला बाहेर पडू लागली. संध्याकाळी सभा घेऊ लागली. शिकवू लागली. त्यांना संघटनेचे महत्त्व पटवून देऊ लागली. त्या गावातील गरीब शेतकरी, शेतमजूर, जमीनदाराला घाबरून खालमानेने लपून राहायचे. आता ते 'कसेल त्याची जमीन' ही घोषणा देऊ लागले. आपल्या मागण्या मांडू लागले. ती गावोगाव फिरून सगळ्यांना एकजुटीचे महत्त्व पटवू लागली.

पुढे त्यांच्याच गटातील एका शेतकरी मुलाशी तिचे लग्न झाले. तिच्या लक्षात आले, आता लोक तिला अधिक चटकन स्वीकारतात. ती एकटी हिंडत असली तरी तिचे एक टोक बांधलेले आहे, तिच्या भांगामध्ये सिंदूर आहे. लोकांना ते नैसर्गिक वाटते.

तिच्या कार्यातूनच तिला धैर्य मिळत गेले. भोवतालच्या विषमतेमुळे तिचे मन आणि शरीर कणखर झाले. पोलिस जेव्हा तिला पकडायला आले तेव्हा ती अजिबात घाबरली नाही. प्रेमळ, ऊबदार मध्यमवर्गीय कुटुंबातून हिंदु संस्कृतीचा वारसा घेऊन आलेली ती मुलगी एका भीषण सत्याला डोळसपणे सामोरी गेली. पाचसहा महिने ती तुरुंगात होती. तिच्या मुलीचा जन्म तुरुंगातच व्हायचा पण तिची सुटका झाली आणि आठ दिवसांच्या आत तिने एका मुलीला जन्म दिला. आज ही तरुणी अठ्ठावीस वर्षांची आहे. तिची मुलगी भावाकडे आहे. नवरा तुरुंगात आहे. आणि ती भिरीभिरी

हिंडते आहे. आपल्या सहकाऱ्यांना, नवऱ्याला कायद्याची मदत मिळावी, त्यांना न्याय मिळावा म्हणून धडपड चालू आहे.

ही कहाणी फार अद्‌भुत आहे. एखाद्या कादंबरीतील वाटावी अशी. पण ती तरुणी माझ्यासमोर बसली होती. खरी खरी, जिवंत. व्हिएतनाममधील स्त्रियांची क्रांतिकारी वर्णने आपण वाचतो. इतिहासातील स्त्रियांच्या शौर्यगाथा वाचतो. पण माझ्या बरोबरीची एक तरुण मुलगी असे काही भन्नाट आयुष्य जगू शकते, बिनधास्त स्वतःला झोकून देते, हे फार नवीन होते. ती विवाह करते. पण चार भिंतीच्या आतील बंधनात अडकत नाही. उलट पुन्हा नव्या जोमाने काम करते. तुरुंगात असणाऱ्या पतीला सहचरी म्हणून खरीखरी मदत करते. तिचे नाव आहे–जयश्री राणा.

ड

परदेशी तरुणी

॥ २६ ॥

अमेरिकन तरुणी

नंदिता गांधी ही जबर उत्साही मुलगी. मुंबईला झेविअर्स नावाच्या उच्चभ्रू कॉलेजमध्ये शिकली. अमेरिकेला गेली. तेथून आली ती 'समाजवादी स्त्रियांचा गट' या एका गटाशी ओळख घेऊनच. अमेरिकन स्त्रियांच्या प्रश्नांचा अभ्यास करून. अमेरिकन सशोधनाचे तंत्र तिला चांगलेच अवगत. आता तिला मुंबईमध्ये सव्हें करायचाय. कशासाठी ? मुंबईच्या तरुण शिकलेल्या मुलींचा 'कॉन्शसनेस' तपासायचा. म्हणजे काय ? 'स्त्रीचे समाजातील स्थान काय ?' या जाणीवेचा शोध.

नंदिताची कल्पना आहे, एक प्रश्नावली तयार करायची आणि भिरीभिरी हिंडायचे. महाविद्यालयांतून, सरकारी कचेऱ्यातून, लाइफ इन्शुरन्सच्या ऑफिसातून, बँकांतून. नंदिताची ही आयडिया ऐकल्याबरोबर मला आठवण झाली सनफ्लॉवर सिनेमाची. सोफिया लारेन रशियाच्या माळरानावर सूर्यफुलांच्या शेतातून नवऱ्याचे थडगे शोधत भटकत जाते. आम्ही मुंबईच्या सिमेंटी इमारतीच्या जंगलात टेबलाच्या थडग्यामागे बसणाऱ्या जिवंत तरुणींचा शोध घेत भटकणार आहोत.

नंदिताच्या या कळकळीमागे अमेरिकन तरुणींच्या व्यथांची गहिरी जाण आहे याची मला खात्री आहे.

अमेरिकन तरुणी बाहेर पडली ती दुसऱ्या महायुद्धात. पुरुष लढण्यासाठी बाहेर पडला. शस्त्रास्त्रांच्या कारखान्यात काम करू लागला. त्याची जागा भरून काढण्या-

साठी अमेरिकन तरुणी पुढे आली. मात्र युद्ध संपलं आणि या राखीव श्रमशक्तीला पुन्हा एकदा चार भिंतीच्या आत कोंडण्याची घाई सुरू झाली. तेव्हा ही गरीब बिचारी, सुकोमल, आज्ञाधारक अबला बंड करून उठली. महागाई वाढलेली. कुटुंबाच्या खर्चाची तोंडमिळवणी करता करता पंचाईत. त्या तरुणीने आर्थिक स्वातंत्र्याचा हट्ट धरला. उद्योगधंद्याची जगभर वाढ होत गेली आणि अमेरिकन स्त्रीला अर्थव्यवस्थेमध्ये स्थान मिळत गेलं. पूर्वी डेटिंग करत तिला नवऱ्याचा शोध घेण्याची धडपड करावी लागे. आता आर्थिक स्वातंत्र्यामुळे ती अधिक सुरक्षित, अधिक स्वावलंबी झाली. तिला वरंच काही गवसल्यासारख वाटलं.

आणि हळूहळू तिच्या लक्षात यायला लागलं. आपण चक्क खुळ्या आहोत. आपल्याला आर्थिक स्वातंत्र्य मिळालं म्हणजे काय झालं ? आपण घरात करत होतो तेच काम बाहेर धंदेवाईकपणे करू लागलो. आपल्या कामाचे सामाजिकरण झाले आणि त्याचे पैशामध्ये मोल होऊ लागले एवढंच. घरात आजाऱ्याची सेवा करण्याचे तिचेच काम. आता हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून कामाला राहून ती तेच तर काम करतीय. मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी तिच्यावर होती. त्यांना संस्कृती, रूढी, रीतिरिवाज यांच्या साच्यात घालून समाजाला अनुकूल असे व्यक्तिमत्त्व घडविणे हेच तिचे परंपरागत काम. आजही ती पुन्हा शिक्षिकेची नोकरी घेते आणि शाळेत जाऊन समाजाच्या वतीने प्रस्थापित मूल्ये त्यांच्या मनावर ठसवतीय. अमेरिकेत दरदिनी वाढत जाणाऱ्या पांढरपेशा कारकुनांच्या तांड्यामध्ये पुन्हा हीच तरुणी खूप मोठ्या प्रमाणावर आहे. बॉसचे काम करायला—सेक्रेटरीच्या जागेवर तरुणीच लागते. किंचित आकर्षक, स्मार्ट, तरतरीत. सर्व काही जागेवर व्यवस्थित टापटिपीने ठेवणारी. फाईलिंग करणारी. हसतमुखाने सामोरी येणारी. अगदी घरी जशी बायको तशीच ही ऑफिसातील बायको. सेवेस तयार.

बापरे ! म्हणजे हा स्वातंत्र्याचा हव्यास तिला पुन्हा दुसऱ्या प्रकारच्या सापळ्यात आणि दास्यातच घेऊन गेलाय. पैसा मिळवू इच्छिणाऱ्या कारखानदारांनी तिचा हा स्वातंत्र्याचा हव्यास ओळखलाय. ' आर्थिक स्वातंत्र्य हा सर्वोच्च स्वातंत्र्याचा पाया ' हे त्यांचे परवलीचे वाक्य. हाय स्वीटी ! व्हाय नॉट बीकम अ मॉडेल ! तुझे सुंदर पाय ! यातील सौंदर्य असे लपवून कशाला ठेवायचे ? इतके नितळ, कमनीय सौंदर्य. यू आर फ्री टू सेल इट. तू हे विकायला मुक्त आहेस. मी तुला आर्थिक स्वातंत्र्य देतो. तू शरीर दे. नाहीतरी हे तुझे शरीर तू एका पुरुषाला देत होतीसच. तुझा नवरा हुकमत गाजवीत होता. आता पैशाला हुकमत गाजवू दे. तुझे शरीर समाजाच्या उपयोगी पडू दे. तू म्हणजे तुझे शरीर आहेस. तुझे शरीर म्हणजे सुंदर वस्तू आहे. ती वस्तू विकण्याचे तुला स्वातंत्र्य आहे. हवं तर चित्रपट निर्मात्याला बीक किंवा प्लेबॉय मासिकाच्या पानावर जाऊन बस. नाहीतर विकीनीच्या जाहिरातीसाठी दोन तास उभी

राहा. नथिंग बॅड अबाऊट इट. इटस् प्रोफेशन ! हा धंदा आहे. पुरुष आपले डोके विकतो. आपण करतोय ती गोष्ट आपल्याला पटलीय का, आवडतीय का, हा सवालच तो स्वतःला विचारत नाही. त्याला योग्य ते प्रश्न विचारायचे स्वातंत्र्य नाही. फक्त विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे शोधणे एवढंच त्याच्या हातात. मग प्रश्न चुकीचे का असेनात. तसंच बाईला डोके असेल तर तिनं डोके विकावे, नाहीतर तिचे वात्सल्य, स्त्रीसुलभ मार्दव, लडिवाळपणा वगैरे विकायला आहेच की.

म्हणजे औद्योगीकरण सुरू होण्यापूर्वी स्त्रीचे दास्य हे उदात्त संस्कृतीच्या नावाखाली होत असे. अबलत्वाच्या नावाखाली, पुरुषाच्या संरक्षणाची गरज म्हणून, वंशवृद्धीची गरज म्हणून होत असे. आता स्वातंत्र्याच्या नावाखाली पैशाचे, ज्यांच्या हातात पैसा आहे त्याचे दास्य सुरू झालेय. घरातून ते दास्य आता बाहेर विशाल आकाशाखाली आलेय. सामाजिक झालेय. म्हणूनच ते अदृश्य झालेय. याच अदृश्य बंधनाचे बुद्धिवंत अमेरिकन तरुणीला सणकन् भान आलेय. केट मिलेट, जर्मेन ग्रिअर या तरुणींची क्रांतिकारक पुस्तके बाहेर पडत आहेत. तिला जे स्वातंत्र्य मिळालेय तो स्वातंत्र्याचा आभास आहे. तिच्या अस्तित्वाच्या नाड्या आहेत पैशाच्या हातात. तिला हिप्नोटाइज्ड करणे, तिचे मन अमूक एका पद्धतीने तयार करणे, तिच्यामध्ये गुलामी वृत्ती बाणविणे हे त्या पैशाच्या सूत्रधारांचे काम आणि हाच 'कान्शसनेस', हीच जाणीव तिला प्रखरतेने झालीय.

नंदिता मला विचारत होती, शिकलेल्या भारतीय मुलीच्या हे लक्षात आलंय का ? आता कुठे ती बाहेर पडतीय. आर्थिक सामाजिक व्यवहारात भाग घ्यायला लागलीय. मॉडेल बनतीय. एअर होस्टेस बनतीय. टेलिफोन ऑपरेटर, शिक्षिका, कारकून. आपल्याहीकडे व्यापारीकरण वाढलेय. पैशाचे महत्त्व वाढतेय. तेव्हा तिने वेळीच सावध व्हायला पाहिजे. एका हाताने स्वातंत्र्य देऊन दुसऱ्या हाताने ते काढून घेणाऱ्या स्त्रीला दुय्यमच ठेवणाऱ्या, वस्तू म्हणूनच वापरणाऱ्या शक्ती आहेत तरी कोण त्यांचा तपास घ्यायला हवा. त्यासाठीच नंदिताला आजच्या तरुण मुलींच्या जाणिवेची पातळी तपासून पहायची आहे. बघू या तिच्या या प्रयोगातून काय निष्पन्न होतंय.

ङ

॥ २७ ॥

स्त्री : कार्यक्षम ग्राहक ?

'स्त्री सुलभ गुण' हे जन्मजात गुण असतात असे अनेकजण मानतात. स्त्रियाही याला अपवाद नाहीत. पण हेच स्त्रीसुलभ गुण वेगवेगळ्या काळाच्या गरजांनुसार बदलताना आढळतात. ज्याअर्थी या गुणांमध्ये बदल होऊ शकतो त्याचअर्थी ते 'उपजत' नसून गरजेनुसार वाकवलेले किंवा नवे निर्माण केलेले असतात. अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ गालब्रेथ यांनी स्त्रीच्या या गुणांना 'सोयीस्कर सामाजिक गुण' असे विशेषण लावले आहे. त्यांच्या 'इकॉनॉमिक्स ॲन्ड पब्लिक पर्पज' या पुस्तकामध्ये पाश्चात्त्य देशातील मोठमोठ्या 'दादा' कंपन्या स्त्रीच्या या गुणांना कसं काय वाकवितात याचे बारकावे टिपले आहेत.

औद्योगीकरणाच्या पूर्वी स्त्रियांच्या प्रजोत्पादन या गुणाला विशेष महत्त्व होते. माता ह्या भूमिकेवर जास्त भर होता. तसेच कापडधंद्यात, शेतीच्या विशिष्ठ कामामध्ये स्त्रियांचे खास कौशल्यगुण वापरले जायचे. त्याचवेळी वरिष्ठ वर्गातील स्त्रीमध्ये तिचे सौंदर्य, लैंगिक आकर्षण, संभाषण चातुर्य यांना महत्त्व असायचे. आता तांत्रिक प्रगती मुळे या स्त्रीसुलभ कौशल्याची गरज फारशी उरली नाही. वैयक्तिक काम करणारे नोकर, घरगडी, मोलकरीण ही संस्था बंद झाली. काळ्या लोकांनी गुलाम म्हणून राबणे थांबले आणि घरातील कामे करायला घरातल्या माणसाची गरज उत्पन्न झाली. गृहिणीची आवश्यकता निर्माण झाली.

या सामाजिक बदलाबरोबर आर्थिक क्षेत्रात उत्पादन मोठ्या प्रमाणावर व्हायला लागले. या निर्माण होणाऱ्या प्रचंड संख्येच्या वस्तूंना बाजार हवा होता. ग्राहक हवे होते. उपभोग्य वस्तूंच्या नव्यानव्या गरजा निर्माण केल्या जात होत्या. निर्माण केलेला माल उपभोगला नाही तर सबंध अर्थव्यवस्था कोसळली असती. याच वेळेला या कारखानदारांचे लक्ष स्त्रीच्या 'सोयीस्कर सामाजिक गुणांकडे' गेले. 'अधिक उपभोग' हे तत्वज्ञान प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांचा उपयोग होण्यासारखा होता, वस्तूंचा उपभोग घेण्याचीही एक व्यवस्था तयार झाली होती आणि स्त्रीकडे हे काम दिले गेले. 'उपभोगाचे व्यवस्थापन,' घराघरातून निर्माण झालेली घरगड्यांची पोकळी त्या त्या घरातील गृहिणींनी भरून काढली.

'उपभोगाचे व्यवस्थापन' म्हणजे काय ते पाहू. उदाहरणार्थ नव्यानव्या लज्जतदार खाद्यपदार्थांच्या जाहिराती देऊन मोठ्या कंपन्या त्या पदार्थांसाठी मागणी तयार करतात. पण ते खाद्यपदार्थ नजाकतीचे बनवायला कोणीतरी कष्टाळू माणूस लागते. नाहीतर खाद्यपदार्थ करण्यासाठी जेवढे श्रम लागतात त्या श्रमांमध्ये खाण्याचे सुख वाहून जायचे. तीच गोष्ट घर टापटिपीने ठेवण्याची. जितके घर सुखसोयीने परिपूर्ण तितका वेळ त्या सुखसोयी व्यवस्थित चालू रहाव्यात म्हणून सातत्याने लक्ष देण्यात जातो. एअर कंडिशनर नादुरुस्त झाला, शॉवर गळतो आहे, बेसिन तुंबलेय, गालीच्याच्या खाली माती जमलीय, टी. व्ही. मोडलाय, या सर्व गोष्टींची देखभाल करायला कोणीतरी न कुरकुरणारे माणूस लागते. भारतासारख्या देशात नोकरमाणसे मुबलक मिळतात. पण औद्योगिक देशातील अर्थव्यवस्थेशी गरज म्हणून असं कोणीतरी माणूस हवं असतं की 'उपभोगाचे व्यवस्थापन' विनतक्रार, आवडीने, प्रेमाने करेल.

स्त्रीने ही भूमिका सहजपणे स्वीकारल्यामुळेच उपभोगाच्या नव्यानव्या वस्तूंचे उत्पादन करणे अर्थव्यवस्थेला शक्य झाले. अमेरिकेतील गृहिणींच्या घरकामाची किंमत देशाच्या एकूण उत्पादनाच्या पाव इतकी होते. एवढेच नव्हे तर तिने केलेल्या कामाचा जर तिला मोबदला द्यायचा झाला तर वर्षाला तिला १३,००० डॉलर्स इतके वेतन द्यावे लागेल. भारतामध्ये याच हिशोबाने ८०० रुपये महिना गृहिणीला मोजावे लागतील. याचाच अर्थ आज केवळ पोट भरणे व आर्थिक संरक्षण देणे या दोन अटींवर गृहिणीचे श्रम जवळ जवळ फुकटात घेतले जातात. कौटुंबिक प्रेम या नावाखाली स्त्रीला दुय्यम स्थान स्वीकारायला लावणे हा या अर्थव्यवस्थेचा गाभा आहे. गंमत म्हणजे बाजारहाट हा जरी स्त्रीचा प्रांत असला तरी निर्णय घेणे तिच्या हातात नसून अंमलबजावणी फक्त ती करते. घरात खायचे पदार्थ काय करायचे हे नवऱ्याची जीभ ठरवते. गृहिणीला फक्त 'ब्रॅन्ड' निवडता येतो, हे चिकन घ्यायचे की ते घ्यायचे एवढेच ठरविता येते. चिकन करायचे की नाही हा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य तिला नाही.

जाहिरातदार याच गोष्टीचा फायदा घेऊन स्त्रियांवर नेम धरून असतात. या जाहिरातदारांनी तर सुखाची व्याख्याही बदलली आहे. सुख वस्तूंनी मोजता येतं. चायनीज सूप मिळणे म्हणजे सुख, किंवा बायकोने नवऱ्याच्या अंगाला पावडर लावण्याची सेवा करणे म्हणणे सुख ही व्याख्या स्त्रीच्या मनात पक्की रुजते. स्वतः सुख मिळविणे व कुटुंबाला सुखी करणे म्हणजे जाहिरातीची दखल घेऊन बाजारात येणाऱ्या सर्वांत नवीन मालाची खरेदी करून कार्यक्षमता दाखविणे आणि कुटुंबाच्या उपभोगाचे व्यवस्थापन करणे यातच तिला स्त्रीत्वाचे सार्थक वाटते. पूर्वीचे स्त्रीसुलभ गुण जाऊन आता 'योग्य ती खरेदी करणारी कार्यक्षम ग्राहक' हा स्त्रीचा महत्त्वाचा गुण समजला जाऊ लागला आहे. अमेरिकन अर्थव्यवस्थेचा डोलारा या अमेरिकन स्त्रीच्या त्यागावर उभा आहे. अमेरिकन स्त्रीने याला नकार दिला आणि आम्ही ओझी वाहणारे गाढव बनणार नाही, आम्ही आमचा अमूल्य वेळ खाण्यापिण्याचे चोजले पुरविण्यात घालविणार नाही, सुखसोयीचे गुलाम बनणार नाही असे बंड केले तर ? खरं म्हणजे स्त्री-मुक्ती चळवळीने या बंडाला हळूहळू सुरुवात झाली आहे.

□

॥ २८ ॥

चिनी तरुणी

मागच्या प्रकरणात अमेरिकेत चालू असलेल्या स्त्री-मुक्ती चळवळीचा गाभा समजावून घ्यायचा प्रयत्न केला.

१९४५ साली चीनमधील स्त्रीने आपल्या बेड्या तोडण्यासाठी जे प्रयत्न केले ते बरेच धक्कादायक आहेत. तो क्रांतिपूर्व काळ होता. कम्युनिस्टांचे सैन्य आणि चँग कै-शेकचे सैन्य ह्यांच्यात यादवी युद्ध सुरू होते. कम्युनिस्टांनी बराच भाग मुक्त केला होता. स्थानिक लोकांमध्ये नवी जागृती आणण्याचा जोराचा प्रयत्न चालू होता. लोकसंख्येच्या निम्म्या स्त्रिया होत्या. त्या अतिशय दडपशाहीमध्ये राहात होत्या. भारतासारखाच मागासलेला देश. स्त्रियांचे दास्य आणि गुलामी फार भयंकर होती. तिला शेतात काम करायची बंदी, तिचे पाय लहानपणापासून बांधले जायचे आणि चार भिंतीच्या आत तिचा सांभाळ व्हायचा. याच स्त्रीला मुक्त करणे, तिच्या शक्ती नव्या समाजाच्या उभारणीसाठी लावणे आवश्यक होते. नाहीतर नवरा, सासरा, सासू यांच्या हातचा मार खात पिचून जाणं एवढेच त्यांच्या नशिबी होते.

याच काळातील ही कहाणी आहे. एका चिनी तरुणीची. गोल्डफ्लावरची. गावागावात कम्युनिस्ट कार्यकर्ते महिला मंडळांची स्थापना करत होते. सासुरवाशिणी पहिल्यांदाच सूर्यप्रकाशात येत होत्या. आपल्या दुःखाच्या कहाण्या एकमेकीना सांगत होत्या. इतक्या वर्षांचा कोंडलेला संताप आणि उद्वेग बाहेर पडत होता. गोल्डफ्लॉवर

अशाच एका महिला मंडळाची सभासद झाली. तिचा नवरा अगदी स्वार्थी होता. शहरात जाऊन व्यापार करून श्रीमंत होण्याची स्वप्ने बघत होता. तेथे वैफल्य आले की घरी येऊन बायकोला मारपीट करत होता. सासराही हात धुऊन घेई.

महिला मंडळानी या अत्याचारांना वाचा फोडायचं ठरविलं. घरोघरीच्या अत्याचारांचे पाढे वाचण्यात आले. गोल्डफ्लॉवरला आधी भीती वाटली. पण नंतर ती स्वतःची कहाणी सांगण्यास तयार झाली. आई-वडिलांनी सक्तीने लग्न लावले आणि या अनोळखी माणसाशी संसार करायला ती या गावात आली. नवऱ्याची सेवा, सासरेबुवांची सेवा, घरकाम, सगळंसगळं ती करे. पण सुखाचे चार शब्दसुद्धा तिच्या वाट्याला येत नसत. मूलबाळही नव्हते. महिला मंडळाच्या अध्यक्षबाईनी तिला आश्वासन दिले. मात्र एक अट होती जी काही कृती करण्यात येईल तिला पूर्ण पाठिंबा द्यायचा. इतकेच नव्हे तर शेवटपर्यंत आधार घ्यायचा नाही.

एक दिवस दुपारी दवंडी पिटली आणि मंडळाच्या पंधरावीस बायका जमल्या. गोल्डफ्लॉवरच्या घरी आल्या. सासऱ्याला जाब विचारू लागल्या.

'बोला, सुनेचा छळ बंद कराल की नाही?'

'तुम्हाला काय करायचंय? माझं घर आहे. मी पाहून घेईन.' सासरा मग्रुरीच्या भाषेत बोलला.

'हे बघा. सध्या आम्ही नम्रपणे चौकशी करीत आहोत. तुमचे कुटुंब सुखी व्हावे हीच आमची इच्छा आहे. तुमचे सहकार्य मिळाले तर ठीक. नाहीतर आमचा मार्ग आम्हाला हाताळावा लागेल.' अध्यक्षीणबाई कणखरपणे म्हणाल्या.

'चालत्या व्हा माझ्या घरातून.' सासरा ओरडला. त्याबरोबर सगळ्या स्त्रिया दोरी घेऊन पुढे सरसावल्या. त्याचे हात त्यांनी बांधून टाकले आणि मिरवणुकीने सासरेबुवा मंडळाच्या ऑफिसवर आले. तेथे त्यांना कोंडून ठेवण्यात आले. गोल्डफ्लॉवरला आधी खूप वाईट वाटले. ती रडू लागली. पण हळूहळू तिच्यात धैर्य येत गेले. ज्या सासऱ्याकडे मान वर करून पाहण्याचे धैर्य तिला नव्हते तो सासरा आता गोगलगाय झाला होता. तिला एकटीला जे शक्य नव्हते ते सर्वांनी मिळून संघटनेच्या जोरावर करून दाखविले होते. तिला तिच्या आतल्या शक्तीचा प्रत्यय येऊ लागला. सासरेबुवाही घाबरून गेले. स्त्रीशक्तीचे हे रूप त्यांना अपरिचित होते. त्यांनी आपण बदलायला तयार असल्याचे कबूल केले.

'तुझ्या सुनेला तू छळशील का?'

'नाही.'

आणि मग घोषणा झाल्या.

'स्त्रियांनो एक व्हा!'

'परंपरावाद्यांना बडवून काढा.'

'जुनाट मतवाद्यांना खाली ओढा.'

यानंतर गोल्डफ्लॉवरच्या नवऱ्याची पाळी आली. तो परगावाहून परत आला. गोल्डफ्लॉवरने अध्यक्षांकडे तक्रार नोंदविली. दवंडी पिटली गेली. गावातल्या स्त्रिया एकत्र जमल्या आणि तिच्या नवऱ्याला काही कळण्याच्या आतच त्याच्या मुसक्या बांधल्या गेल्या. त्याचा पीळ जायला मात्र वेळ लागला.

'आमचे ऐकतोस की नाही बोल.'

तो मख्खपणे उभा होता.

'आमच्यापुढे मान खाली घालतोस की नाही? बायकोला चांगलं वागवशील की नाही?'

तो कबूल होईना. पिढ्यान् पिढ्या वर्चस्वाचं पाणी अंगात मुरलेले. मग मात्र सर्व स्त्रिया त्याच्या अंगावर तुटून पडल्या. त्याला बराच मार खावा लागला. अनेक वर्षांच्या दुःखाचा बचपा त्याच्यावर निघत होता. तो शेवटी गयावया करू लागला. शेवटी लेखी कबुली घेऊनच त्याची सुटका झाली.

'यापुढे मी कोणतीही वाईट गोष्ट करणार नाही. बायकोला वाईट वागवणार नाही.'

या प्रसंगामुळे गोल्डफ्लॉवरमध्ये एक नवेच चैतन्य उत्पन्न झाले. फक्त स्वतःवरील अन्याय थांबवून भागणार नाही. सर्व स्त्रियांवरील अन्यायाचे निवारण झाले पाहिजे. स्त्रिया स्वावलंबी बनल्या पाहिजेत. खऱ्या अर्थाने मुक्त झाल्या पाहिजेत. ही कल्पना तिच्या मनात रुजली आणि तिच्या आत लपलेल्या 'मी' चा तिला साक्षात्कार झाला.

ती घराघरातून जाऊ लागली. गावोगाव हिंडू लागली. मातीत काम करून स्त्रीचे सौंदर्य कमी होईल या भीतीने पुरुष स्त्रियांना कामावर जाऊ देत नसत. गोल्डफ्लॉवर स्त्रियांना समजावून सांगू लागली की, घरात बसणे कसे एखाद्या पिंजऱ्यात बसण्यासारखे आहे. ती शेतात काम करायला बोलवू लागली. सूत काढायला शिकवू लागली. तिने मुख्य कोणते काम अंगावर घेतले असेल तर ते तरुण-तरुणींच्या ओळखी करून देणे. त्यांचे विवाह जमविणे, केवळ आई-वडिलांच्या आज्ञेनुसार, पैशांसाठी मनाविरुद्ध कोणाशीही लग्न करणाऱ्या चिनी तरुणीला हे स्वातंत्र्य नवीन होते. ती बाहेर पडू लागली. आवडेल त्या तरुणाशी बोलू लागली आणि एकही पैसा न देता लग्न होते म्हणून चिनी तरुणही उत्साहाने भाग घेऊ लागला. असे किती तरी विवाह गोल्डफ्लॉवरने महिला मंडळाच्या इमारतीत लावून दिले. आई-वडिलांच्या परवानगीशिवाय. त्यांना हा सर्वच अनुभव नवीन होता. पण युगानुयुगाच्या दडपणुकीमुळे उसळून येणारा उत्साह आणि बेदरकार धैर्य यांची जोडही अचाट होती.

गोल्डफ्लॉवरसारखी अशिक्षितबाई सूडाने पेटली होती. नव्या समाजाच्या आकांक्षेने वेडावून गेली होती. तिला शिक्षण नव्हते पण दुःखाचा जळजळीत अनुभव होता. तिने नवऱ्याला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. नव्या समाजाची स्वप्ने दिली.

त्याचा परंपरावादी स्वभाव कायमच राहिला. मग मात्र गोल्डफ्लॉवरने त्याच्याशी घटस्फोट घ्यायचा निर्णय घेतला. तिला नवा माणूस हवा होता. शेतकरी तरुण. जो कष्ट करील, वायकोला शिकवेल; सर्व समाजासाठी झटून प्रयत्न करेल. तिला छळणार नाही. ती त्याचे काम करायला तयार होती. पण प्रेमाने. दासी म्हणून नव्हे.

अशी ही गोल्डफ्लॉवर तयार झाली. स्वातंत्र्याची जाणीव आलेली. नवी स्त्री-चळवळीतून, संघटनेतून तिला स्वतःच्या शक्तीचे रहस्य कळत गेले. तिने केलेले उपाय अघोरी वाटतात. पण मग स्त्रीचे दास्यही तितकेच अघोरी नाही का? तिच्या व्यक्तिमत्वाचा बळी घेणारे, तिला पाळीव, प्रेमळ जनावर म्हणून पाळणारे?

ता

॥ २९ ॥

व्हिएतनामी तरुणी

'स्त्री ही पावसाच्या थेंबासारखी आहे, तो थेंब एखाद्या राजप्रासादाच्या शिखरावर पडेल की भाताच्या शेतातील चिखलात पडेल हे कोणालाच सांगता येत नाही.'

ही एक व्हिएतनामी कविता आहे. मला वाटतं जगातल्या सर्व स्त्री जातीचं इतकं जिवंत आणि बोलकं वर्णन माझ्या पाहण्यात कोठेही आलं नाही. स्त्रीचं स्थान काय ? पावसाच्या थेंबासारखं ! तिच्या नशिबाची दोरी दुसऱ्याच्या हातात. तिचे सगळे अस्तित्वच दुसऱ्यासाठी. तिचे हसणे, बोलणे, श्वास घेणे, मुलालाजन्म देणे, हो मुलाला जन्म देतानासुद्धा ती स्वतःच्या सर्जनशीलतेचा आविष्कार म्हणून बघू शकत नाही. ती दुसऱ्याच्या वंशाचा दिवा जन्माला घालत असते. जगातील कोणतीही स्त्री, भारतातील, व्हिएतनाममधील, अंगोलातील, अमेरिकेतील.

आणि एक दिवस तीच व्हिएतनामी स्त्री उठते आणि हातात बंदूक घेते. पकडली जाते. तेव्हा जेलमधील भिंतीवर आपल्या रक्ताने लिहिते,

'पुरुषांनो, येथे मी तुमच्या खांद्याला खांदा लावून लढते आहे गुलाबी गालांची एक स्त्री.

तुमचा माझा शत्रू एक आहे.

त्याच शत्रुत्वाचे ओझे मी खांद्यावर पाहिले.

तुरुंग माझी शाळा आहे. येथील बंदीवान माझे मित्र.

तलवार माझे अपत्य आहे.

आणि बंदूक माझा पती.'

हे खरं वाटतंय? एखाद्या कादंबरीची कपोलकल्पित नायिका किंवा अशीच कोणी अद्‌भुत, असामान्य देवता.

पण तसं नाहीय? अगदी सत्यकथा आहे ही आणि ही कथा सत्य आहे की नाही याचा शोध फार लांब जाऊन घ्यायला नको. त्याचा पुरावा आपल्याला दररोज मिळतो आहे व्हिएतनामच्या युद्धामध्ये.

व्हिएतनाम, चिमुकले राष्ट्र, आज विजयाच्या पताका फडकवीत मुक्तीची वाटचाल करीत आहे. उत्तर व्हिएतनाम फ्रेंचांपासून स्वतंत्र होऊन दहा वर्षे झाली आणि दहा वर्षांनी पुन्हा एकदा व्हिएतनामी जनतेच्या चिवट राष्ट्रभक्तीचा प्रत्यय जगाला येतो आहे. दक्षिण व्हिएतनाम मुक्तीच्या मार्गावर आहे.

व्हिएतनामच्या मुक्तीचे रहस्य काय? राष्ट्रभक्ती, लढाऊ जिद्द वगैरे नेहमीची कारणं आहेतच. पण मला वाटतं, या एकसंघ राष्ट्रभक्तीच्या मागे अत्यंत महत्त्वाची शक्ती आहे ती म्हणजे 'व्हिएतनामी स्त्रिया.' या चिमुकल्या देशातील चिमुकल्या लोकसंख्येपैकी सर्व पुरुषवर्ग जेव्हा रणभूमीवर जातो आणि सतत दहा वर्षे लढत असतो, तेव्हा शेतावर राबायला, कारखान्यातील यंत्रे चालवायला हात लागतात. ते हात आणि नुसते हातच नव्हेत तर डोकीसुद्धा व्हिएतनामी स्त्रियांनी पुरविली. युगानुयुगे शापित शिळा झालेल्या अहिल्येला रामाच्या पदस्पर्शाने जाग आली. व्हिएतनामी स्त्रीला जाग येण्यासाठी युद्धाच्या ठिणग्या पाडाव्या लागल्या आणि झडझडून ती उठली. एका खांद्याला बंदूक, पाठीवर छोटंसं मूल आणि रिकाम्या हातांनी शेतात भाताची लावणी करणारी व्हिएतनामी स्त्री आपण कित्येकांनी चित्रांमध्ये, फोटोमध्ये पाहिली आहे. आजचा व्हिएतनामचा विजय व्हिएतनामी गनिमी सैनिकांच्या बंदुकीतील गोळीवर जितका कोरलेला आहे तितकाच तो व्हिएतनामी स्त्रीच्या हातावर लिहिलेला आहे.

आज उत्तर व्हिएतनाममध्ये शेतीमध्ये ९० टक्के स्त्रिया भाग घेतात. कारखान्यात ९० टक्के स्त्री कामगार आहेत. आया आनंदाने तरुण मुलांना लष्करात भरती व्हायला सांगत आहेत. स्त्रिया आनंदाने पतीच्या अर्जावर सही करत आहेत. कारण ते भाडेकरू लष्कर नाही. सबंध कष्टकरी समाजाच्या एकसंघतेचे, एकजुटीचे आणि स्त्री-पुरुषांच्या समानतेचे ते प्रतीक आहे. खऱ्या अर्थाने समाजवादी समाजव्यवस्था टिकविण्यासाठी त्या सर्वांची धडपड आहे.

युद्धकाळी गरज म्हणून व्हिएतनामी स्त्री बाहेर पडली. पुरुषांनी अविश्वासानेच त्यांच्याकडे पाहिले. 'स्त्रियांनी काम केले तरी पुरुषांच्याच हाताखाली काम करावे. त्या मुख्य झाल्या तर अटळ नाश जवळ आल्याशिवाय राहणार नाही,' असे ताशेरे

झाडले गेले आणि स्त्रियांनी सर्व पारंपरिक कल्पनांना धक्के दिले. स्त्रियांचे कामाचे तास सरासरीपेक्षा जास्त पडले. त्या कष्टाळू आणि उद्योगी असतात असा निष्कर्ष निघाला. त्यांचे कामात अधिक भर पडली. त्या थकून जात. मग त्यांनीच युक्ती काढली. सहकारी पद्धतीने बालसंगोपन केंद्र चालू केले. मुलांची जबाबदारी सर्वांनी मिळून वाटून घेतली. दुपारी स्त्रिया कामाला जात तेव्हा स्त्रियांच्या संघटनेने जागोजागी उपहारगृहे चालवून एक वेळच्या स्वयंपाकाच्या रामरगाड्यातून स्त्रियांना मोकळे केले.

मुख्य म्हणजे स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण फारच कमी होते. त्यांच्यासाठी शाळा चालवून त्यांना मुख्य शिक्षणक्रमामध्ये मिसळण्याची प्रक्रिया जलद सुरू केली. त्यासाठी अनेक युक्त्या योजल्या गेल्या. शेतात काम करताना वाचता यावे म्हणून म्हशीच्या पाठीवर मोठी मोठी अक्षरे रंगविली गेली. सबंध शहरभर जाहिरातीच्या निर्बुद्ध फलकांऐवजी मोठ्या अक्षरातील महत्त्वाचे शैक्षणिक फलक लावले गेले. इतकेच नव्हे तर चित्रपटगृहात शिरताना चित्रपटगृहाच्या दरवाजावरील फलक ज्याला वाचता येईल त्यालाच आत शिरण्याची परवानगी, असा नवा नियम केला.

व्हिएतनामी स्त्रीच्या धैर्य आणि निर्धाराचे आणखीन एक उदाहरण. एका स्त्रीचा नवरा युद्धावर होता. त्यांना एकच मुलगा. आई कारखान्यात कामावर जाई. वरून सतत बॉंबहल्ले होत. पण आईला मुलाची काळजी करत बसायला वेळ नव्हता. बॉंबहल्ला झाला व ती मेली तर काय करायचे याबद्दल संपूर्ण सूचना तिने मुलाला देऊन ठेवल्या होत्या. आई बॉंबहल्यात मृत्युमुखी पडल्यावर तिचे सहकारी घरी चौकशीला आले आणि त्या समंजस मुलाने ओळखले. तो बॅग घेऊन पुढे आला. त्याच्या आईने त्याच्या कपड्यांची बॅगही भरून ठेवली होती. तो म्हणाला, 'आता एकच गोष्ट करायला हवी. माझे बाबा जेव्हा येतील तेव्हा त्यांना मला सांगायला हवे की आई काम करतानाच गेली.'

हे सगळे व्हिएतनाममध्ये घडते आहे. कारण तेथे खराखुरा समाजवाद आला आहे. उत्पादन हे समाजासाठी होते. श्रीमंत-गरीब अशी भीषण दरी तेथे नाही. नफा हा परवलीचा शब्द नाही. तेथील प्रत्येक व्यक्ती, व्यक्ती म्हणून जगते. तेथील प्रत्येक स्त्री प्रत्येक पुरुषाइतकीच स्वतंत्र नागरिक म्हणून जगते. केवळ चूल व मूल या रामरगाड्यात तिचे अस्तित्व कुजत पडलेले नाही. म्हणून एक व्हिएतनामी लोकगीत म्हणते.

'आपल्याला जरी पहाड चढावे लागले,
तरी मी तुझ्याबरोबर येईन.
एकमेकांच्या खांद्याचा आधार घेत आपण पुढे पुढे जाऊ.
रानफळे तोडून आपण पोटे भरू.'
आज आपल्याकडच्या किती स्त्रिया असे म्हणू शकतील?

॥ ३० ॥

जपानी तरुणी

'वेश्यागमनी प्रवासी धंदा' हे शीर्षक कसं काय वाटतं? ई! अगदी अश्लील आहे नाही! हीच अपेक्षित प्रतिक्रिया. पण आजकालचा जपानी प्रवासी धंदा याच नावाने ओळखला जातोय.

एकीकडे जपानच्या प्रचंड आर्थिक प्रगतीमुळे आपले डोळे विस्फारले जातात. जपानी माणसाची उद्यमशीलता, कष्टाळूपणा यांचे आपण कौतुक करतो. पण दुसरीकडे याच आर्थिक प्रगतीच्या बरोबर निर्माण होणारे किडे आणि जंतू यांच्याकडे आपले म्हणावे तितके लक्ष जात नाही. येथे पुन्हा एकदा आपला जुना थिसिस खरा ठरतो. प्रत्येक गोष्टीचे समाजात जेव्हा व्यापारीकरण होते, तिला धंदेवाईकपणा प्राप्त होतो तेव्हा माणसाच्या मनावरही त्याचा परिणाम होतो. माणसामाणसातील संबंधावरही परिणाम होतो. जपानमध्ये आज तेच झालंय. जपानी पुरुषाच्या हातात मोठ्या प्रमाणावर पैसा येऊ लागला आहे आणि जपानी पुरुष त्या पैशाच्या जोरावर बाया विकत घेऊ बघताहेत. चुस्त म्हणून परदेशी बायांवर त्यांची नजर वळली आहे. अनेक जपानी ट्रॅव्हल एजन्सीज तयार झाल्या. त्यांनी जपानी पुरुषांची ही वासना ओळखली आणि आपला नफा नक्की करण्यासाठी तो 'वीक पॉइट' वापरायचे ठरविले. 'परदेशी स्त्रियांचा मनमुराद अनुभव' हे टांगते गाजर प्रवासी कंपन्या आजकाल लटकावून देतात आणि पैसेवाले जपानी पुरुष झुंडीने या खास प्रवासी

दौऱ्यामध्ये सामील होतात. या पुरुषांच्या पैशावर इतर आशियाई देशात वेश्यांचा धंदा जोरात चालतो. अर्थात वेश्यांचा धंदा स्वतःचा क्वचितच असतो. बहुतेक तो दलालांमार्फत किंवा मालकांचा असतो. पूर्वी अमेरिकन सैनिकांनी स्थानिक स्त्रियांचा मनमुराद उपभोग घेतला होता. पैसे उधळून अर्थव्यवस्थेवर परिणाम केला होता आणि स्वतःला 'अग्ली अमेरिकन' हे नामाभिधान प्राप्त करून घेतले होते. आता जपानने ह्या देशांची बाजारपेठ काबीज केली आहे आणि नवश्रीमंत जपानी पुरुष पैसे उधळायला, चैन करायला या देशात ओतले जात आहेत. 'अग्ली जपानी' ही प्रतिमा या लोकांनी तयार केली आहे.

या सर्वांविरुद्ध बंड पुकारलंय जपानी स्त्रियांच्या एका संस्थेने. वुमन्स खिश्चन टेंम्परन्स युनियन या संस्थेने जपानी ट्रॅव्हल एजन्सी, आणि इतर आशियाई देशातील एजन्सीज यांना पत्रके पाठवायला सुरवात केली आहे. पत्रकात म्हटले आहे, 'सध्या आम्हाला जपानी पुरुषांचे जे परदेशी वेश्यागमन चालते, त्याची चिंता वाटते. नवे देश पाहण्याच्या निमित्ताने ते परदेश प्रवासाला जातात खरे पण छुपी इच्छा असते परदेशी स्त्रीशी संभोग करणे. आणि आम्हाला वाटते की ही वाढ होण्यास ट्रॅव्हल एजन्सीजचे धंदेवाईक व नफाखोरीचे धोरण कारणीभूत आहे. अर्थात आम्ही कबूल करतो की जपानी पुरुषांची नैतिक पातळी अत्यंत खालची आहे. अशा दौऱ्यांमध्ये ते आपणहून जातात. पण ट्रॅव्हल एजन्सीजनी हे धंदे थांबवावे आणि इतर देशांनी आपल्या मुलींची अब्रू राखावी.'

जपानी पुरुषाची नीतिमत्ता खालची आहे याची कारणे जपानी संस्कृती, पूर्वांची अर्थव्यवस्था यात सापडतात. जपानमध्ये पूर्वीपासूनच स्त्रीकडे अत्यंत निकृष्ट दर्जाने पाहिले जात होते. आपण वेश्यांचे कौतुक करतो, तिच्या नाजूक पावलाचे, तिच्या मृदु भाषेचे, तिच्या कोमल बोटांचे, पण त्यावेळी त्या नाजुकतेच्या मागील गुलामीची आपण यत्किंचितही दखल घेत नाही. जपानमधील गोंडस स्त्रीच्या मनाची आपल्याला पर्वा नसते. जपानी पुरुषाच्या नीतिमत्तेतून त्यांच्या माणसामाणसांतील संबंधाकडे पाहण्याचा व्यापारी दृष्टिकोन दिसतो.

आणि ही नीतिमत्ता सुधारण्याची आशा करावी तर ट्रॅव्हल एजन्सीज उलट त्या नीतिमत्तेचा फायदा उठवीत तिला खतपाणी घालत असतात. १९७३ ते १९७४ मध्ये दर ५० जपानी पुरुषांमागे एक पुरुष परदेशी जाऊन आला. त्याचे असे झाले.

अमेरिकन बोईंग कंपनीने जम्बो जेटस काढली. प्रेस्टीज वाढावे म्हणून जपानी कंपनीने ती खरेदी केली. मग गिऱ्हाईकें भरावीत म्हणून भाडी कमी केली. मग गिऱ्हाईकांना भुलवायला 'एवढे भाडे खर्च करून तुम्हाला काय काय मिळविता येईल' याची यादी तयार झाली. या यादीमध्ये 'मदनमस्त स्त्रियांबरोबरच्या रंगेल रात्री' हे आकर्षण सर्वांत वर होते. 'पुरुषांच्या स्वर्गाला' भेटीची वचने होती.

प्रत्येक ट्रॅव्हल एजन्सीने आपली कल्पनाशक्ती पणाला लावली होती. साऊथ कोरिया, तैवान, थायलंड ह्या त्यांच्या धमाल जागा होत्या. मग त्यांच्यामध्ये स्पर्धा सुरू झाली. साऊथ एशियातील एका लोकप्रिय मासिकाने तर तेथील मुलींच्या व्यक्तिगत कहाण्या, आवडीनिवडी, मने जिंकण्याच्या खुब्या असा मालमसाला प्रसिद्ध करण्याचा धूमधडाका लावला. म्हणजेच जपानमधले धंदेवाले व इतर देशातील धंदेवाले यांची युती झाली आणि स्त्रियांचे सौदे सुरू झाले. अर्थात हे सर्व अगदी सोफिस्टिकेटेड पातळीवर. यामध्ये मुली पळविणे वगैरे रानटी प्रकार नाहीत हं ! फक्त स्वस्त पैशाची अमिषे मुलींना आणि स्वस्त शरीराची अमिषे पुरुषांना. मग कामे आपल्या आपण होत राहतात. भरघोस नफा मिळतो.

या सर्वांचा परिणाम व्हायचा तोच झाला. साऊथ कोरियातील विद्यार्थ्यांनी सरकारविरोधी निदर्शने केली. तेथील सरकारवर आरोप ठेवला– देशाच्या विकासाचे निमित्त करून पैसा मिळविण्यासाठी तुम्ही तेथील तरुण मुलींना लैंगिक सुख देणारे प्राणी म्हणून वापरता आहात. त्यांनी जपान्यांना नाव दिले, 'लैंगिक साम्राज्यवादी.' आमच्या पोरीवाळींची शरीरे वापरणारे सुलतान.

आता जपानी बायकांनी हा प्रश्न धसाला लावण्याचे ठरविले आहे. या प्रकरणात, 'साऊथ कोरियन बायकांची अब्रू जातीय, आम्हाला काय त्याचे !' अशी भूमिका घेऊन चालणार नाही. घरी स्वतःच्या बायकोला दाबात ठेवणाऱ्या, वेश्येकडून सेवा करून घेणाऱ्या आणि परदेशी पोरीला वापरणाऱ्या जपानी पुरुषाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलण्याचा मूलभूत प्रश्न उपस्थित झालेला आहे. जपानी स्त्रीला कळून चुकलंय की तिला लढा द्यायचाय तो नफ्याच्या प्रेरणेवर चालणाऱ्या बलाढ्य अर्थव्यवस्थेशी. या अर्थव्यवस्थेचे हस्तक म्हणून वावरणाऱ्या या धंदेवाईक ट्रॅव्हल एजन्सीजशी. यांना नीति-मूल्यांच्या आव्हानांचे काय ? या आव्हानांना केराची टोपली.

व्यवहाराची मूल्ये व मनाची मूल्ये ही एकमेकांना तर्कशुद्धतेने बांधली पाहिजेत. व्यवहाराचे मूल्य नफा व स्पर्धा आणि मनाचे मूल्य स्त्रीवद्दल योग्य तो आदर ही परस्परविरोधी आहेत. दुबळ्यांना पिळणे, अत्याचार करणे आणि नफा कमावणे हेच सत्यमेव जयते !

आजही जपानी ट्रॅव्हल एजन्सीजची तक्रार हीच आहे. 'दोष आमचा नाही. वेश्या या संस्थेचा आहे. आम्ही फक्त या वेश्या संस्थेचा जास्तीत–जास्त फायदा घेता आहोत एवढंच.'

मला भीती वाटतीय, भारतामध्येही अशा प्रकारची नफेखोरी सुरू होण्याची शक्यता आहे. आणि नीतिमत्तेच्या बाबतीत भारतीय पुरुष जपानी पुरुषांच्या मागे असण्याचे कारण नाही. स्त्रियांच्या चळवळीला त्याची योग्य दखल घ्यावी लागेलच.

इतिहासाकडे दृष्टिक्षेप

॥ ३१ ॥

स्त्री मुक्तीचा विचार परकीय आहे का ?

इकॉनॉमिक टाईम्समध्ये ' भारतातील स्त्री-मुक्ती ' या विषयावर शिराझ नानपोरीया या विदुषीचा लेख प्रसिद्ध झाला आहे. ' कुऱ्हाडीचा दांडा गोत्यास काळ ' तसे एका स्त्रीनेच स्त्रीच्या गुलामीचे समर्थन करावे ही दुःखाची गोष्ट आहे. या विदुषीने पाच महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. त्यांची दखल घेण्याचे कारण एवढेच की हे मुद्दे थोडेफार प्रातिनिधिक आहेत. अनेक वेळा चर्चेमध्ये सनातनी स्त्री-पुरुषांकडून हे मुद्दे वारंवार उपस्थित होतात.

(१) आजकालच्या स्त्री स्वातंत्र्याच्या कल्पना मुख्यतः पाश्चिमात्य देशातील आहेत. येथील मूठभर बुद्धिमंतांनी त्या आयात केल्या. भारतीय स्त्रीला स्वातंत्र्य हवे आहे की नाही याचा विचारच केला नाही.

(२) आनंदराव शास्त्री, शंकरकुमार शास्त्री वगैरे लोकांनी अनेकदा लिहून ठेवलं आहे की, शिक्षणाने मानव अधिक शहाणा होतो का, हा प्रश्न आहे. त्यामुळे स्त्रियांना शिक्षण मिळाल्यामुळे स्त्रिया स्वतंत्र होतील हे मानणे मूर्खपणा आहे.

(३) वैदिककालीन स्त्रिया मुक्त होत्या. त्यांना धर्ममध्ये, बौद्धिक चर्चेमध्ये भाग घेता येत असे. नंतर मात्र ' पुढील जगाची ' काळजी घेण्याची गरज निर्माण झाली. आत्म्याच्या मोक्षासाठी अनेक प्रकारचे तंत्रमंत्र पुढे आले आणि स्त्रिया मागे पडल्या. तिला मोक्षप्राप्तीसाठी लागणाऱ्या मुलग्याची आई एवढेच स्थान

प्राप्त झाले.

(४) गांधीजींनी अहमदाबादमध्ये गिरणी कामगारांसमोर केलेल्या एका भाषणात असेच विचार मांडले आहेत. 'स्त्रियांनी कारखान्यात काम करू नये. त्यांना घरी पुष्कळ काम असते. स्त्रिया जर बाहेर कामाला जायला लागल्या तर आपले समाज-जीवन उद्ध्वस्त होईल आणि नैतिक मूल्ये घसरतील.'

(५) स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या स्त्रियांनी स्वतःच्या कामाकडे नीच म्हणून न पाहता उच्च म्हणून पहायला शिकले पाहिजे. तरच त्यांना समाधान मिळू शकेल.

आपण पहिल्यापासून एकेका मुद्याचा विचार करू.

(१) स्त्री-स्वातंत्र्याची कल्पना परकीय आहे का? शास्त्रीयदृष्ट्या आपण महत्त्वाची गोष्ट मानतो की जगभरच्या मानव एकच आहे. रक्ताच्या चारच जाती आहेत. याच आधारावर जगभरच्या स्त्रिया एकच आहेत हे मानायला काहीच हरकत नाही. झोपायला भारतीय पुरुषाला अमेरिकन बाई चालते की नाही? किंवा अमेरिकेत तयार झालेले औषध भारतीय रोग्याला चालते की नाही? अमेरिकन मशिनरी भारतीय भांडवलदार वापरतो की नाही! मग विचाराला बंदी का? एक प्रश्न जरूर उपस्थित होतो, की भारतीय स्त्रीच्या मनाची घडण ही अमेरिकन स्त्रीच्या मनाच्या घडणीपेक्षा वेगळी आहे. पण मनाशी घडण ही एक बदलणारी प्रक्रिया आहे. अमेरिकेमध्ये औद्योगिक क्रांती आधी झाली. त्याचा परिणाम तेथील समाजजीवनावर झाला. त्यामुळे तेथे काही प्रश्न आधी निर्माण झाले. स्त्री-मुक्तीचा प्रश्न हा त्यातीलच. स्त्रियांना नोकऱ्या कराव्या लागल्या. आर्थिक स्वातंत्र्य मिळाले. तरीसुद्धा त्यांचा समाजातील दर्जा दुय्यम राहिला याचे कारण काय? याची चर्चा सुरू झाली.

भारतीय समाज अजून मागासलेलाच आहे. येथील स्त्री अजूनही पतीला देव मानते व आयुष्य वाहून टाकते. पण ही स्थिती फार दिवस राहणार नाही. येथेही महागाईमुळे स्त्रीला नोकरीची, कामाची गरज वाटू लागली आहे आणि काम मिळत नाही. त्यातून त्यांच्यात असंतोष वाढतो आहे. दारू पिऊन, पैसे उधळून, नवरा वडवतो म्हणून असंतोष वाढत आहे. तेव्हा येथील स्त्री–मुक्तीचे समर्थन या असंतोषाला योग्य वळण देऊन स्त्री-स्वातंत्र्याची जाणीव वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत एवढेच. स्त्री-मुक्तीची येथील कल्पना ती येथील मातीतूनच वर आली आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

(२) शिक्षणाने माणूस शहाणा होतो का? हे विधान इतके मूर्खपणाचे आहे की त्यासाठी गाढव व माणूस यात काहीच फरक नाही का, एवढाच प्रश्न विचारून थांबणे योग्य होईल. अनेक वर्षांच्या शिक्षणाने, ज्ञानाने माणसाच्या स्वातंत्र्याच्या कल्पना विकसत गेल्या. स्त्री मात्र वंचित राहिली.

(३) वैदिक काळी स्त्रिया स्वतंत्र होत्या. त्यांना पुरुषांच्या बरोबरीने समान

स्थान होते. हे विधान खरे आहे. त्यावेळी मानवाची हत्यारे फारशी प्रगत नव्हती. खाऊनपिऊन शिल्लक राहील एवढे उत्पादन होत नव्हते. संपत्तीचा संचय नव्हता आणि स्त्रीला अंकित ठेवण्याची गरज नव्हती. स्त्री-पुरुष समान होते. मात्र संपत्ती साठवून ठेवण्याची शक्यता तयार झाली. खाजगी मालमत्ता– तिला वारस, त्यासाठी स्त्रीवर स्वामित्व ही कल्पना पुढे आली. वरील लेखामध्ये 'पुढील जगाची काळजी' ही जी कल्पना आहे ती म्हणजे दुसरे तिसरे काही नसून संपत्ती– तिची काळजी– तिला वारस हीच साखळी सूचित केली आहे. यातूनच स्त्रीची गुलामी व मुलग्याची आई ही तिची भूमिका यांना महत्व मिळाले.

(४) एकदा ही शास्त्रीय परंपरा मान्य केली की मग गांधीजींसारख्या थोर माणसानेसुद्धा स्त्रीचे स्थान घरातच आहे म्हणणे म्हणजे तर्कशास्त्राचा बरोबर वापर न करणे आणि ही अन्याय्य रचना मान्य करणे असाच अर्थ होतो. उदा०– हरिजनांनी हरिजनच रहावे. श्रीमंतांनी श्रीमंतच रहावे. स्त्रीने फक्त मुलांची हगणीमुतणी काढावी. नवऱ्याची सेवा करावी. याच्या उलट शास्त्रीय पद्धतीने विचार करणारा माणूस काय म्हणेल की, स्त्रीला बुद्धिमत्ता आहे, स्त्रीचा मेंदू व पुरुषाचा मेंदू एकाच प्रकारचे आहेत. हे सर्व सिद्ध झालंय. तरीसुद्धा स्त्री गुलाम आहे. तिला दुय्यम दर्जा आहे. याचे कारण काय ते शोधा आणि ते नष्ट करा. खाजगी मालमत्ता– तिच्यासाठी वारस आणि ही रचना कायम राहावी म्हणून स्त्रीला बंदिवास. तिच्यामुळे नीतीमत्ता घसरेल म्हणे ! वारे वा ! गांधीजींसारख्या आत्मिक बळावर विश्वास ठेवणाऱ्या माणसाच्या एवढे कसे लक्षात आले नाही की बाह्य बंधने फार दिवस टिकून राहू शकत नाहीत. त्यापेक्षा शिक्षण, नोकरी यामुळे स्त्रीला आत्मविश्वास आला की पुरुषाचीही तिच्याकडे पाहण्याची भूमिका बदलेल. मग आसक्तीपेक्षा खऱ्याखुऱ्या प्रेमाचे साम्राज्य नांदेल.

(५) पाचवा मुद्दा तर अतिशय हास्यास्पद वाटतो. स्वतःकडे स्वतः कोणत्या दृष्टिकोनातून बघतो यावर जग चालत असेल तर जग वेड्यांचा बाजार ठरेल. कारण प्रत्येकजण स्वतःला हुशार समजेल, श्रेष्ठ समजेल, तुमची किंमत नेहमी लोकांच्या मनांत, बाजारात ठरत असते. स्त्रीच्या कामाला आज श्रेष्ठत्व नाही कारण तिच्या कामाला पैसे मिळत नाहीत. आज तेच काम हॉटेलात जाऊन केलं तर तिला पैसे मिळतील. थोडक्यात स्त्रीला आज बाहेर आर्थिक व्यवहारात स्थान मिळालं पाहिजे तरच तिचे व्यक्तिमत्त्व सुधारेल आणि तिच्या कामाला श्रेष्ठत्व मिळेल. घरातील कामे नवरा-बायको मिळून करतील. म्हणजे कोणालाच ते काम कमीपणाचे वाटणार नाही.

मला वाटते, आता तरी या सनातन्यांची तोंडे बंद करायला तरुण मुले-मुली पुढे येतील आणि स्त्री स्वातंत्र्याची निश्चिती देणारा नवा समाज स्थापन करायला मदत करतील.

ल

॥ ३१ ॥

स्त्रीने शेतीचा शोध लावला !

स्त्रीचे समाजातील स्थान दुय्यम का ? हा माझा अभ्यासाचा विषय. स्त्रीचे स्थान दुय्यम असणे ही मनुष्यनिर्मित गोष्ट आहे. हे एकदा मानले की इतिहासाचा प्रवाह मानायलाच हवा आणि थेट प्राचीन काळाला भिडायला हवे. प्राथमिक अवस्थेतील आदिमानव कसा रहात होता ? पोट कसे भरत होता ? स्त्री-पुरुष संबंध कसे होते ? स्त्रीचे समाजातील स्थान काय होते ?

इतिहासात शिरणे खूप गमतीचे असते याचा शोध मला आता आता लागला. पूर्वी इतिहास म्हणजे लांबलचक सनावळ्या पाठ करणे एवढेच आठवते. पण सध्या काही नवी पुस्तके वाचनात आली आणि इतिहास म्हणजे ज्ञानाचा खजिनाच असे लक्षात आले. ' लोकायतः डॉ. स. रा. गाडगीळ ' हे एक पुस्तक त्यातीलच.

आदिमानव फळे गोळा करीत असे आणि शिकारीसाठी वणवण भटकत असे. स्त्रीला मात्र गर्भधारणेमुळे बराच काळ एका ठिकाणी राहावे लागे. त्यामुळे शिकारीला जाणे नियमितपणे जमत नसे. त्यामुळे एक फायदा मात्र झाला. वनस्पतिनिर्मितीची प्रक्रिया तिच्या लक्षात आली आणि हाताने जमीन खणून शेतीचा शोध लावण्याचे श्रेय तिच्याकडे जाते. शिकारीला जाणाऱ्या पुरुषांनी पशुपालनाची सुरुवात केली. यातूनच पुढे दोन प्रवाह सुरू झाले. काही समाजातून शेतीला प्राधान्य मिळाले आणि शेती करणाऱ्या स्त्रीला महत्त्वाचे स्थान मिळाले. काही समाजातून पशुसंवर्धन महत्त्वाचे

ठरून पशू हीच संपत्ती ठरली आणि पशूंना पकडून आणणारा पुरुष श्रेष्ठ झाला.

इतिहासतज्ज्ञांच्या मते भारतात राहणारा मूळ समाज हा कृषिप्रधान समाज होता. हा वैदिक पूर्वकालीन समाज होता. त्यानंतर उत्तरेकडून पशुसंवर्धन करणारे आर्य भारतात उतरले आणि स्वतःबरोबर पुरुषप्रधान संस्कृती घेऊन आले.

या शेतीप्रधान समाजात खूप लक्षणीय विधी व तंत्रमंत्र आढळतात. त्यावेळी मानवाची भोवतालच्या भौतिक जगाच्या आकलनाची पातळी लक्षात घेता त्याला निसर्गातील अनेक चमत्कारांचे गूढ वाटले तर नवल नाही आणि ते चमत्कार तो आपल्या परीने समजून घेण्याचा, त्याचे वैचारिक समर्थन करण्याचा व त्या चमत्कारांचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करणाऱ्याचा प्रयत्न करीत असे.

एक गोष्ट त्यावेळी त्यांच्या लक्षात आली होती, की या जगातील शक्तीचा स्रोत स्त्री आहे. कारण वृद्धी होणे ही क्रिया केवळ स्त्रीकडून घडत असे, स्त्रीला संतती होई. तसेच भूमीतूनही फळे, धान्य निर्माण होई. याचा अर्थ दोघींमध्ये काही साम्य होते. दोघींमध्ये सृजनशक्ती होती. आपल्याकडे प्रकृती म्हणजे स्त्री मानली जाते. त्या कल्पनेचा उगम येथे असणार. आज रासायनिक खते, यंत्रे यावर शेतीची समृद्धता अवलंबून असते. पण त्याकाळी मात्र धान्यनिर्मितीची क्रिया मंत्रतंत्र सामर्थ्यावर अवलंबून आहे अशी आदिमानवांची दृढ श्रद्धा होती. स्त्रीची गर्भधारणा व भूमीची सुफलता या दोन्ही प्रक्रिया एकच आहेत हे लक्षात घेऊन मंत्रतंत्र विधींमध्ये स्त्रियांना खूप महत्त्वाचे स्थान होते. यातुविधी यांनाच म्हणतात.

तंत्र शब्दाचा उगम पाहण्यासारखा आहे. तन्–वृद्धी करणे. प्रसार करणे. तंत्रसाधना म्हणजे वृद्धीसाठी केलेले प्रयत्न. शेतीसाठी पाऊस हवा. तेव्हा पर्जन्यविधीची जबाबदारी स्त्रीकडे. पर्जन्यविधीसाठी स्वतंत्र स्त्री पुरोहित वसत. मध्ययुगीन चेटकिणीची परंपरा या स्त्री मांत्रिकांतून आली असली पाहिजे. यातूनच पुढे देवता संप्रदायाचा किंवा देवी भक्तीचा उदय झाला. त्यावेळी मातृसत्ताक संस्कृतीही होती. जसजशी मातृसत्ताकाची जागा पुरुषाने घेतली तेव्हा धार्मिक विधी स्त्रियांकडून पुरुषांकडे आले. मात्र हा बदल होण्यासाठी कित्येक शतके लागली असावीत मध्यंतरी पुरुषाना स्त्रियांच्या या क्षेत्रात पाऊल टाकण्यासाठी स्त्री बनूनच यावे लागे. प्रारंभीच्या काळातच पौरुषाचे खच्चीकरण करूनच पुरुष देवीचा पुजारी बनू शके. नंतर मात्र केवळ स्त्रीचा वेष परिधान करणे, कुंकवाचा मळवट भरणे एवढेच उपचार उरले. महुर–तुळजापूर येथील देवीभक्ताला 'भुत्या' म्हणतात. यल्लमा संप्रदायातही हीच चाल आहे. रामकृष्ण परमहंसांनी सुद्धा स्त्रीवेष धारण करून देवीची उपासना केल्याचे उल्लेख आहेत. स्त्री होऊन स्त्रीरूप विश्वत्वाशी लय पावणे हे प्रत्येक तांत्रिकाचे उद्दिष्ट असे.

यात्च तर्कशास्त्राचा पुढचा भाग म्हणजे ज्या स्त्रीची संततीनिर्माणाची क्षमता

अधिक ती स्त्री या कामाला अधिक योग्य. जुळ्या-तिळ्या मुलांना जन्म देणारी स्त्री या क्षेत्रात विशेष महत्त्वाची. या स्त्रीकडे यातुविधीचे काम येई. आफ्रिकेमधील बगांडा जमातीचा एक यात्वात्मक विधी असा आहे. गावातील बहुप्रसवा स्त्री शेतामध्ये अथवा बागेमध्ये नग्नावस्थेत आपल्या मांड्यांच्यामध्ये केळीचे फूल धरून उताणी पडते. नंतर तिचा पती तेथेच तिच्याशी संभोग करतो. अशा प्रकारे हे जोडपे आपल्या मित्रपरिवारांच्या शेतात अथवा बागेत यातुकर्म करीत हिंडते. या विधीमुळे केळ्याचे पीक विपुल येते अशी श्रद्धा आहे. या उलट निपुत्रिक स्त्रीच्या संसर्गाने पीक येत नाही अशी कल्पना आहे. या विधीमध्ये स्त्री महत्त्वाची. पुरुष निमित्तमात्र.

पुष्कळ ठिकाणी पाऊस पडावा म्हणून स्त्रियांनी विवस्त्रावस्थेत शेतात जाऊन नृत्य करण्याची, नांगर धरण्याची क्रिया करायची असते. याचीच दुसरी बाजू म्हणजे निपुत्रिक स्त्रीला निसर्गाच्या सान्निध्यात विवस्त्रावस्थेत स्नान घातल्यास अगर समंत्रक जलसिंचन केल्यास संतती होते. त्याचप्रमाणे स्त्रीदेह आणि वनस्पतिसृष्टी यांच्या साहचर्याची कल्पनाही सार्वत्रिक आहे. मार्कंडेय पुराणात शाकांबरी देवी म्हणते की, वनस्पतीसृष्टी माझ्या देहातूनच उत्पन्न होईल, योनिपूजेची कल्पना ही त्यातूनच पुढे आली. कारण योनी हे निर्मितीचे केंद्र समजले जाई. कमळ हे स्त्रीजननेंद्रियाचे प्रतीक आहे. स्त्रीच्या मासिक रजःस्रावाचा उपयोग पिकांवर कीड पडल्यास जंतुनाशक म्हणून केला जाई यामध्ये रजःस्रावामध्ये औषधी सामर्थ्य नसून यात्वात्मक सामर्थ्य होते.

यातूनच शेतीच्या, वनस्पतिसृष्टीच्या सुफलीकरणाशी मद्य आणि मैथुन यांचा घनिष्ठ संबंध निर्माण झाला. मद्यामुळे माणूस बेभान होतो. म्हणजेच अलौकिक सामर्थ्याने झपाटला जातो आणि त्याच्यामध्ये निर्माणक्षमता तयार होते असे समजले जाई. यालाच वामाचार म्हणतात. वामा–स्त्री–आचार–धार्मिक–विधी. याचाच अर्थ वामाचार. परंतु हा वामाचार म्हणजे स्वैराचार नव्हे. नागांच्या प्रदेशात धान्याच्या समृद्धीसाठी खळ्यावर अनेक जोडप्यांकडून सामुदायिक मैथुनविधी करविला जातो. प्राथमिक अवस्थेतील मानवाच्या शेतीविषयक मंत्र-तंत्र विधीमध्ये स्त्री-पुरुष संयोगाला यात्वात्मक महत्त्व होते.

या सर्वांतून एक महत्त्वाचा प्रकाश पडतो की प्राथमिक अवस्थेतील स्त्री-पुरुष समान होते. एवढेच नव्हे तर स्त्रीला आदिशक्ती म्हणून महत्त्व मिळे. त्यावेळची उत्पादनव्यवस्था, शेती ही सामुदायिक होती. आज पाहतो त्या स्वरूपात मानवी संस्कृती विकसित झाली नव्हती. सगळे धार्मिक विधी हे जगण्यामरण्याच्या रोजच्या प्रश्नांशी निगडीत होते. नंतर मात्र या आचारविधीचा पोकळ सांगाडा उरला. संपत्ती संचयाचा जमाना सुरू झाला. वरिष्ठवर्णांनी बसून खायचे आणि कनिष्ठ वर्गांकडून काम करून घ्यायचे असे वर्ग पडले आणि मग स्त्रीचे देवतेचे स्थान जाऊन केवळ

संतती निर्माणाचे साधन, बीज टाकण्याचे क्षेत्र बनले. देवताचे वास्तव्य फक्त दंतकथा, पुराणे यातूनच दिसून येऊ लागले. वात्सल्य, प्रेम, पातिव्रत्य या भरजरी शब्दांनी भोवताली पुरेसे गूढ बंध तयार केले.

आज खऱ्या मूलभूत स्वरूपात हे स्त्री-पुरुष संबंध उघडे करून सांगितले की लोकांना भोवळ येते. त्यांना माझे एकच सांगणे आहे की, बाबांनो, इतिहासाचे मंथन करा—चौदा रत्ने बाहेर न आली तरच नवल.

॥ ३२ ॥

पेशवाईतील स्त्री-जीवन

'कोणत्याही संस्कृतीचा आत्मा गवसावा अशी इच्छा असेल, त्या संस्कृतीचा मोठेपणा आणि मर्यादा समजावून घ्यायच्या असतील तर त्या संस्कृतीत स्त्रियांचा दर्जा कोणता होता, पुरुषांच्या धर्मअर्थादी व्यवहारात त्या खऱ्या सहचरी होत्या किंवा नाही याचा अभ्यास करून मगच त्या संस्कृतीविषयी अनुमान काढावे लागेल' हे वाक्य आहे डॉ. शारदा देशमुख यांच्या पुस्तकाच्या आरंभाचे. पुस्तकाचे नाव आहे, 'शिवकालातील व पेशवाईतील स्त्रीजीवन.'

स्त्रियांचे समाजातील स्थान कसे कसे बदलत गेले याचा अभ्यास करणाऱ्यांनी तर हे पुस्तक जरूर वाचावे. तसेच शिवकाल व पेशवाई हे मराठी संस्कृतीचे सर्वोच्च काळ, सुखसमाधानाचे काळ असे ढोल वाजविणाऱ्या लोकांनीही हे पुस्तक वाचावे. कोणत्याही काळाला ऐतिहासिक कोंदणात पाहावे लागते. पराक्रमाचे गोडवे जरूर गायले जावेत. पण त्याचबरोबर त्यावेळच्या सामाजिक परंपरांचा, आर्थिक संबंधांचाही अभ्यास केला जावा तरच आपण खोट्या मोठेपणात गुंतून पडत नाही आणि डोळसपणे जुन्या टाकाऊ परंपरांना सोडून नव्या जगाला सामोरे जातो.

धर्मशास्त्रादी ग्रंथांमध्ये विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. ब्राह्म, प्राजापत्य, दैव, आर्ष, गांधर्व, राक्षस, आसुर व पैशाच. या आठ प्रकारांपैकी कोणता प्रकार कोणत्या वर्णास योग्य ते स्मृतिकारांनी सांगितले आहे. यापैकी पहिल्या चार प्रकारात

धार्मिक संस्कार आहेत. ब्राह्म म्हणजे विधिपूर्वक कन्यादान. ब्राह्मणवर्गासाठी हे चारही विवाह योग्य होत. काही क्षत्रिय व वैश्यही ह्या प्रकारच्या विवाहांना मान्यता देत.

गांधर्व, राक्षस, आसुर व पैशाच हे प्रकार बहुधा आर्येतर समाजात रूढ होते. प्रेमवश होऊन स्त्री-पुरुष युगलाने एकांतात विवाहबद्ध होण्याचा संकल्प केला व संभोग केला की गांधर्व. राक्षस विवाह म्हणजे पित्याच्या घरून कन्येला जबरदस्तीने पळवून नेणे. आसुर विवाह म्हणजे कन्येच्या पालकांना मागतील ती किंमत देऊन कन्या विकत घेणे. पैशाच म्हणजे झोपलेली, बेसावध वा मद्य पाजून झिंग आणलेली कन्या जबरदस्तीने पळवून तिच्याशी विवाहबद्ध होणे.

पेशवाईकालीन समाजात ब्राह्म व आसुर हे दोन प्रकार रूढ होते. बहुतेक कनिष्ठ वर्गात मुलाच्या बापाने मुलीच्या बापाला पैसे देऊन मुलीला आपल्या घरी आणावयाची पद्धत होती.

त्या काळामध्ये बालविवाह होत असत. मुलगी आठ वर्षांपुढे लग्नावाचून राहू देणे अधर्म मानला जात असे. बालविवाहाची पद्धती रूढ असल्याने घराणे, प्रतिष्ठा, पैसा या गोष्टींना विवाह ठरविताना महत्त्व असे. त्यामुळे मुलगी पाहण्याचा कार्यक्रम होत नसे. अगदी पेशव्यांच्या बाबतीतसुद्धा. हिंदू धर्माप्रमाणे पुरुष हा विवाहसमयी दान घेणारा असे व 'वधू' ही केवळ देय 'वस्तू' होती. बालविवाहामध्ये वधू सात-आठ वर्षांची असे व वर बारा-तेरा वर्षांचा. मात्र द्वितीय विवाह करण्याची वेळ येई तेव्हा वर ३२–३५ वर्षांचा असे व ७–८ वर्षांचीच वधू मिळे. घोडनवरा व बालनवरी यांच्या विवाहात त्या बिचाऱ्या छोट्या बालिकेवर पुष्कळदा जुलुम होई. अनावर कामवासनेच्या होम कुंडात त्याच्या अल्पवयीन सहधर्मचारिणीची आहुती पडे. सतराव्या आणि अठराव्या शतकात बालसंभोगाचे प्रमाण फार मोठे असले पाहिजे. सरकारने 'संमती वयाचा' कायदा करीपर्यंत सर्व अळीमिळीचा कारभार होता. आगरकरांनी केलेले वर्णन असे आहे, 'सारी लज्जा एकीकडे गुंडाळून ठेवून संधी सापडल्यावर जसा बुभुक्षित लांडगा मेंढीवर उडी घालतो त्याप्रमाणे जे दिवसाढवळ्या किंवा पूर्वरात्री आपल्या अर्धांगीस अंथरुणासकट सभोवती निजलेल्या स्त्रियांतून उचलून नेऊन त्यास योग्य वाटेल त्या एकांत स्थळी किंवा तेथल्या तेथेच अमानुष सुखाचा घुटका घेण्याचे धाडस करतात अशा साहसी, उतावीळ, दांडग्या व क्रूर लांडग्यांच्या हाती गरीब मेंढ्या न पडाव्या.'

त्यावेळची दोन प्रमुख उदाहरणे म्हणजे नाना फडणवीस व दुसरा बाजीराव पेशवा. नाना फडणवीसांची एकूण नऊ लग्ने झाली. सात बायका त्यांच्या हयातीतच मरण पावल्या. बाकीच्या दोन अगदी लहान लहान वयाच्या राहिल्या होत्या. आपल्या कामविकाराची आणि पापवृत्तीची कबुली नानांनी आपल्या आत्मचरित्रात देऊन ठेवली आहे. बाजीरावाचे सहा विवाह झाले. पहिला विवाह भागीरथीबाईंशी झाला.

भागीरथीबाई वयात येण्यापूर्वीच बाजीराव तिला त्रास देत अशा अर्थाचा मजकूर पेशवे दप्तरात आढळतो. बाजीरावाची तिसरी पत्नी राधाबाई ही सुस्वरूप असून त्यांची अतिशय लाडकी होती. परंतु ती मेल्यावर मृत बायकोला कावळ्याचा पिंड वळण्याचे आधीच नव्या बायकोच्या हातचा घास गिळण्याची आतुरता बाजीरावांनी दाखविली.

त्या काळी श्रीमान लोकांच्या बायकांच्या मरणाचे प्रमाण व तेही तारुण्यावस्थेत प्रारंभ होण्याच्या सुमारास फारच अधिक होते. नवरा-बायकोच्या वयातील विलक्षण विषमता हे त्यांच्या मरणाचे कारण असावे. रजोदर्शन होताच संततीसाठी पुरुषागम होत असे व पुष्कळजणी पहिल्या बाळंतपणात मरत किंवा विषमविवाहामध्ये शेवटची वधू पुष्कळदा अगदी कोवळ्या वयात विधवा होई. ती तिचे दुर्दैवी दीर्घ आयुष्य कसे काढत असेल ? १९३१–३३ साली डॉ. घुर्ये यांनी विवाहित स्त्रियांचा अभ्यास करून जो निष्कर्ष काढला आहे तो महत्त्वाचा आहे. शरीरशास्त्राच्या नियमानुसार ४५ वर्षे पर्यंत स्त्रीची धारणाशक्ती कायम असते. पण आपल्या येथे या काळी शेवटच्या प्रसूतीच्या वेळी स्त्रियांचे सरासरी प्रमाण ३५ वर्षे आढळते. याचा अर्थ अकाली मातृत्व आल्यामुळे धारणाशक्तीची शारीरिक मर्यादा कमी होत असली पाहिजे.

त्या वेळी ऋतुप्राप्तीला फार महत्त्व दिले जाई. पती कुठे कामगिरीवर गेला असला तरी त्याला बोलावून घेऊन गर्भाधान उरकून घेत असत. खरे म्हणजे कोणत्याही पूर्वीच्या ऋषींनी धर्मशास्त्रात ऋतुदर्शनानंतरही अविवाहित राहिलेल्या मुलीमुळे धर्मोल्लंघन होते असे म्हटलेले नाही. मात्र पुत्र प्राप्ती हा भाग हतका महत्त्वाचा ठरल गेला की दांपत्याचा संयोग हा विषय-वासनेच्या तृप्तीसाठी नसून पितृ-ऋणातून मुक्त होणे यासाठी असे मानले जात होते. हे पितृऋण कोणते ? पित्याच्या संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी वारस जन्माला घालणे. स्त्रीच्या ऋतुदर्शनाचे कौतुक त्यासाठी.

त्या काळी बहुजन समाजात स्त्रियांना पुनर्विवाहास परवानगी मिळे. मात्र काही ठराविक उच्च जातींमध्ये स्त्रियांना पुनर्विवाहाची परवानगी नव्हती. ब्राह्मण, गोवर्धन, सोनार, कायस्थ आणि उच्च मराठे. लग्न हा शब्द स्त्रीच्या प्रथम संबंधास लावला जाई. पाट, मोहतूर व गंधर्व हे शब्द स्त्रीच्या द्वितीय संबंधास लावले जात. या तिन्ही शब्दातून मात्र बहुजन समाजाच्या स्त्रीच्या विवाहविषयक कल्पना चांगल्या व्यक्त होतात. गंधर्व लावते, तेव्हा स्त्री आपण होऊन पुरुषाला वरते, आपल्या पसंतीने पाट लावते, तेव्हा स्त्रीला नवऱ्याच्या संसारात एक प्रकारचा अधिकार प्राप्त होतो. न्हावरे शब्द न्हाण या शब्दातून आलेला असावा. द्वितीय विवाहाच्या वेळी वधू वयात आलेली. आवडीनिवडीने वागणारी, पुष्कळशी स्वतंत्र असावी असे गृहीत धरलेले दिसते. विधवांचा पाट लागत असे. तसा कित्येक जातीत सधवांचाही लागत असे असलेला नवरा सोडून दुसऱ्यावरोबर लग्न करता येई. दुसऱ्या नवऱ्याला; पहिल्या

नवऱ्याला त्याने बायकोसाठी लग्नात खर्च केलेला पैसा 'देज' द्यावा लागे. काही जातीत आपली बायको परपुरुषाबरोबर राहू लागली असे कळल्यावर पहिला नवरा तिची मूर्ती करून जाळी व सुतक धरून घटस्फोट देई.

उच्चवर्णीयात मात्र विवाहविषयक कायदा हा सर्वस्वी एकपक्षीय व विकृत होता. रूढीचे फायदे पुरुषांना मिळत व तोटे स्त्रियांच्या वाट्याला येत, पुरुषाशी वेदिली झाली तर जन्माचे एकाकीपण वाट्याला येई. उच्चवर्णीय स्त्रीला भविष्याबद्दल अनिश्चितता वाटत राही. पतीचे प्रेम जिंकणे व टिकविणे यासाठी व्रते, उपवास, पूजाअर्चा या सर्वांचा तिला ध्यास. बाळाजी बाजीराव पेशवे यांनी स्त्रियांना अनुलक्षून तेवीस आज्ञा लिहिल्या होत्या. स्वधर्म आणि संस्कृती यांची जपणूक ब्राह्मण वर्गाने केली पाहिजे अशी त्या वेळेच्या राजकर्त्यांची समजूत. रीतिरिवाजांचे हे जंजाळ झिरपत झिरपत समाजातील सर्व थरांमध्ये पोचे. लहानपणापासूनच मुलींना तयार केले जाई. त्यामुळेच कुलधर्म, कुलाचार यांचे स्तोम माजले होते.

उच्चवर्णीय विधवेला दोनच मार्ग होते. (१) संन्यस्त वृत्तीने वैधव्य पालन. (२) सहगमन–सती. संन्यस्त वृत्तीने राहणाऱ्या विधवेचे केशवपन करून तिचे केस मृत देहावरोवर जाळले जात. दहाव्या शतकानंतर केशवपनाची चाल अस्तित्वात आली असावी. कुटुंबात ही विधवा अस्पर्श व अशुभ समजली जाई. सौभाग्यवतीने विधवेच्या पंगतीस बसू नये असा नियम होता. तिला असे वागवीत की जगणे नको होई. या घोर तपश्चर्येच्या बदली तिला 'बोडकी' 'रंडकी' असे म्हणून जखमेवर मीट चोळले जाई.


याचीच पुढची पायरी सती. दहाव्या शतकापर्यंत सतीचे उदाहरण क्वचितच आढळते. उत्कट प्रेमामुळे सती गेल्याची उदाहरणे आढळतात. क्षत्रियांनी ही पद्धती प्रथम प्रचारात आणली तरी हळूहळू ब्राह्मण विधवाही सती जाऊ लागल्या. ब्राह्मणापासून चांडाळापर्यंत कोणत्याही स्त्रीला सती जाण्यासाठी शास्त्राची परवानगी आहे. सतीची अनेक उदाहरणे पाहिली असता स्त्रियांची आत्माहुती ही दिव्य प्रेमापोटी घडलेली आत्माहुती नव्हे, हे पटते. प्रीतीपेक्षाही धार्मिक वृत्तीचा जबरदस्त पगडा, मोक्षाचे प्रलोभन, घराण्याची प्रतिष्ठा ही कारणे मोठी असत. एखादी थोड्या कमकुवत मनाची स्त्री मृत्यूला घाबरून स्मशानातून माघारी फिरली तर तिचे हाल कुत्री खात नसत. अशा स्त्रीवर बहिष्कार घालण्यात येई. मृत पतीमागे त्याची संपत्ती विधवेला द्यावी लागू नये यासाठीही सती प्रथेचा वापर उपयोगी असे.

सतीच्याबाबत सक्ती कशी होई याचे एक उदाहरण म्हणजे शाहूमहाराजांची राणी सकवारबाई. सकवारबाईला सती जाण्याची इच्छा नव्हती. पण बाळाजी बाजीरावाने तिच्या भावाला कैद करून आणले व तिच्या भावाच्या हाताने सकवारबाईला शाहू महाराजांच्या पादुकांच्या सरणावर पेशव्यांनी जिवंत जाळविली. रघूजी भोसले जेव्हा

मेले तेव्हा त्यांच्या सहा स्त्रिया सती गेल्या. सती जाणाऱ्या स्त्रीचा अतिशय गौरव होत असे. राज्यकर्ते आर्थिक सहाय्य करीत. सतीचे आप्तेष्ट तिला साडी-चोळीचा आहेर करीत. तीही ऐपतीप्रमाणे दानधर्म करी. माधवरावांची पत्नी रमाबाई हिने लाखो रुपये किमतीच्या दागदागिन्यांचा दानधर्म केला.

एका इंग्रजी लेखकाने 'पुणे शहराचे वर्णन' या पुस्तकात सतीचा अमानुष प्रकार वर्णन केला आहे. 'एक स्त्री सती जात असता अंग पोळून बाहेर निघाली. सर्व अंगाची लाही होते म्हणून नदीत उडी टाकण्यासाठी नदीकडे पळू लागली. पण ब्राह्मण लोकांनी तिला जुलुमाने सरणात फेकली व वर मोठेमोठे ओंडके टाकून तिचा प्राण घेतला.'

धर्माच्या नावाखाली सतीसारख्या अघोरी रूढीला उदात्त रूप दिले जात होते एव्हढेच. शेवटी धर्म म्हणजे तरी काय? स्त्रीचे दास्य, स्त्रीची गुलामी ह्या काळच्या समाजाला पोषक होती. तिच्याकडून भरपूर काम करून घेता येई. तिची निष्ठा मिळे. कुटुंबव्यवस्था भक्कम राही. पुरुष प्रधानता मानली जाई. स्त्रीला वारसा द्यावा लागत नसे. त्यामुळे पुरुषांकडून पुरुषांकडे संपत्ती पुढे जाई आणि हे सगळं टिकून राहावं म्हणून 'धर्म' या कल्पनेचे गूढ वातावरण सामान्य माणसाच्या मनावर पसरले जाई.



॥ ३४ ॥

वैभवशाली काळातही स्त्री दास्यातच !

पेशवेकालीन महाराष्ट्र हा मध्ययुगीन संस्कारांच्या परंपरेतील महाराष्ट्र आहे. त्यावेळचे स्त्री-पुरुषांचे वैवाहिक संबंध आपण बघितलेच. सती जाण्यासाठी स्त्रीची मानसिक तयारी कशी होत असे हेही त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यासावरून लक्षात येते. या अभ्यासाची आज गरज भासते, कारण तो आपला वारसा आहे. आजची स्त्री ते संस्कृतीसंचित घेऊन आलेली आहे. तिला दोष देताना, तिच्या नाकर्तेपणाबद्दल संतापताना अज्ञान, बुद्दूपणा, संकुचितपणा याची टिंगल-टवाळी करताना सगळ्यांनीच तिच्या या भूतकालाची दखल घेतली पाहिजे. तिचे पंख किती दुबळे झाले आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. आणि मग ते का दुबळे झाले हे पाहून तिला योग्य त्या सोयी सवलती देऊन तिच्या प्रगतीची अपेक्षा केली पाहिजे.

त्या काळी कुटुंबव्यवस्था अतिशय चिरेबंदी होती. शेती हेच उत्पन्नाचे मुख्य साधन असल्याने शेतीसाठी बरेच मनुष्यबळ लागे. अविभक्त कुटुंबपद्धती ही अनुकूल व्यवस्था होती. यामुळे जमिनीचे व इतर संपत्तीचे वाटप न होता संपत्तीच्या आधारावर विशेष अधिकार व मान मिळत असे. या कुटुंबातील लोकांचे परस्परांशी संबंध चांगले राहणे महत्वाचे होते. ह्या संबंधीची विशिष्ट तऱ्हेने आखलेली उतरंड होती. कुटुंबप्रमुख पुरुष, त्याचे मुलगे या क्रमाने पुरुषांचे नंबर असत. स्त्रियांचा क्रम त्या नंतर. त्यामुळे ५ वर्षाचा नातू हा त्याच्या चाळीस वर्षाच्या विधवा आत्यापेक्षा

सुद्धा जास्त अधिकार गाजवू शके. विधवा सुनेचा किंवा विधवा नातसुनेचा क्रम सगळ्यात शेवटी लागे. स्त्रियांचे एकूणच स्थान आश्रिताचे. अन्नावारी रावण्याचे. त्यात नवरा मेल्यावर तिचा एक उपयोग संपला. मग काम उरते ते फक्त घरातील लोकांची सेवा करण्याचे. विधवा विवाह नाकारण्याचे हेही कारण असावे.

त्या काळी कुटुंबातील लोकांचे परस्पर संबंध धार्मिक रूढी, चालीरीती याद्वारे आखलेले होते. या संबंधावरच कुटुंबसंस्थेचे स्थैर्य व शांती अवलंबून असे. स्त्रियांना बंधनात ठेवणे जरूर होते. त्यांनी महत्त्वाकांक्षी होऊन उपयोगी नाही. त्यांना अस्मिता आली तर सबंध समाजरचना बदलून जाण्याची भीती. त्यांच्या कष्टावर, त्यांच्या पिळवणुकीवर पुरुषांचे राजकारण आधारित. घरातले कष्ट स्त्रिया उचलीत. पुरुषांना राजकारणासाठी वेळ मिळे. स्त्रीने प्रजोत्पादनाचे काम नाकारले व इतर ठिकाणी ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली तर घर कोण सांभाळेल ? स्त्रीची अस्मिता जागृत होऊ लागली तर पुरुषाचा अहंकार कोण पोसेल ? यासाठीच स्त्री अडाणी, अशिक्षित राहणे आवश्यक होते, तिच्या अंधश्रद्धेमुळे ती व्रतवैकल्यात आपला बराच-वेळ घालवी. कुळाचार, कुलधर्म यांचे आचरण करता करता ती चार भिंतीच्या बाहेर जाण्याची आकांक्षा बाळगत नसे. हे विश्लेषण सनातन्यांना पटणार नाही. त्यांनी फक्त एकदाच त्या काळच्या कष्टकरी वर्गाकडे नजर टाकावी. त्या लोकांच्या स्त्रियांना कावाडकष्ट करावेच लागत. त्यांच्यामध्येही अंधश्रद्धा आढळतात. पण व्रतवैकल्ये फार कमी. अंधश्रद्धा हा अडाणीपणाचा भाग झाला. राज्यकर्त्या ब्राह्मणवर्गाचे अनुकरण करण्याच्या सवयींचा परिणाम.

त्या वेळच्या स्त्रियांना शिक्षण काय मिळे तेच बघूया. म्हणजे स्त्रीचे दुबळेपण हे कसे जोपासले जाई ते कळेल. आज्ञाधारकपणा हा स्त्रीचा खास गुण. न बोलता काम करणे, आपल्या भावनांना आवर घालणे, यांचे महत्त्व पटविले जाई. भावाशी बोलायचे नाही. परक्या पुरुषादेखत पदर घेऊन जायचे. सासूदेखत पतीशी बोलायचे नाही. बाजारात जायचे नाही. या चालीरीतींचा अर्थ काय ? लहानपणीच ती मामाच्या कडेवर बसून जाणाऱ्या नवरीमुलीकडे डोळे विस्फारून पाही. लग्नासाठी तिची मानसिक तयारी होई. गृहकृत्यदक्षतेचे शिक्षण मिळे. मोठ्या कुटुंबात पाणी ओढणे, भरणे, दळण-कांडण, केर–पातेरे, स्वयंपाक, वाढणे ही सगळी शारीरिक मेहनतीची कामे करावी लागत. यानंतर त्यांना सांस्कृतिक शिक्षण मिळावे व धर्माची पकड पक्की व्हावी म्हणून कथाकीर्तनाची देवळातून सोय असे. खानदानी घरी पुराणिकाला घरीच बोलाविले जाई.

श्रीमंत घरातील मुलींनाच फक्त अक्षरांची ओळख असे. मात्र या शिकलेल्या स्त्रियांना संस्कृत ग्रंथ किंवा मराठीतील अवघड ग्रंथ वाचण्याइतकी गती आली नव्हती. स्वराज्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण न वाढता उलट कमी झाल्याचेच आढळते.

कारण विवाहाचे वय अधिकच अलीकडे आले होते. 'प्रजेच्या शिक्षणाबाबत, ज्ञान संवर्धनाबाबत, कला कौशल्याबाबत पेशव्यांनी काही केले नाही, असा शेरा इंग्लिश इतिहासकार मारतो. पुरुषांमध्येही राजघराण्यातील पुरुष पुराणिककारकून साक्षर असत.

राजघराण्यातील मुलींना लढाईचे शिक्षण मिळे. स्त्रिया घोड्यावर बसत. अहिल्याबाईने कुणबीणींची सेना उभारली होती. झाशीच्या राणीचे युद्धकौशल्य प्रसिद्ध आहेच. संधी मिळाली की स्त्रिया तिचा फायदा घेऊ शकत.

त्यावेळचे संपत्तीच्या वारसा हक्काचे कायदे पाहिले की स्त्रीचे जिणे अगदी स्पष्ट होते. संपत्ती नेहेमी पुत्र, पौत्र, प्रपोत्र याच क्रमाने वाटली जाई. अविभक्त कुटुंबपद्धतीमध्ये नवऱ्याच्या मागे मुलगा असेल तर मुलाचा संपत्तीमध्ये वाटा राही. पण मुलगा नसेल तर विधवा बाईला सर्वस्वी दिरांच्या मर्जीवर अवलंबून राहावे लागे. एवढेच नव्हे तर तिला आपले चारित्र्य शुद्ध ठेवण्यासाठी कसोशीचे प्रयत्न करावे लागत. तिच्या हालचालींचा जरा जरी संशय आला तरी तिचे अन्न-वस्त्र थांबविले जाई. ती पूर्ण निराधार बने.

विभक्त कुटुंब झाले असले तर नवऱ्याच्या मागे अपत्यहीन स्त्रीला आपल्या मनाप्रमाणे संपत्तीचा विनियोग करता येई. मुलगा असेल तर मात्र संपत्ती मुलाकडे जाऊन तिला पोटगीचा आधार मिळे.

दत्तक घेण्याचा अधिकार पुरुषास असे. ब्रह्मचारी पुरुषसुद्धा दत्तक घेऊ शके. कुमारिकेला मात्र दत्तक घेता येत नसे. बापाच्या संपत्तीवर दत्तक मुलाचा अधिकार राही. असे असूनसुद्धा दत्तक घेताना आईची संमती विचारली जात नसे.

तेव्हा ज्यांच्याकडे संपत्ती आहे त्या संपत्तीमध्ये स्त्रियांना हक्क नव्हता. ज्यांच्याकडे संपत्ती नाही त्या पुरुषांच्या बायकांना नवऱ्याबरोबर नेहमीच काबाडकष्ट उचलावे लागत. नवरा मेल्यावर जबाबदारी आणखी वाढे. धोब्याची बायको धोविणीचे काम करी. मध्यमवर्गीय स्त्रिया स्वयंपाक पाणी, दळणकांडण करून पोट भरीत. सुईणीचे काम करत. नाहीतर पेशवे दक्षिणा वाटत तेथे हात पसरीत.

याचा अर्थ उदरनिर्वाहासाठी प्रत्येक स्त्रीला विवाह करण्याची जरूर भासे. इतर कोणतेही व्यवसाय व त्यासाठी योग्य ते शिक्षण व साधने तिला मिळत नसत. अनाथ, अशरण स्त्रियांची स्थिती फार वाईट होती. वेश्याव्यवसाय हा एक स्त्रीसुलभ व्यवसाय. देवाला सोडलेल्या देवदासी, कलावंतिणी या तर हा व्यवसाय करीतच. पण विधवा स्त्रियाही पुष्कळदा या मार्गाकडे वळत. घाशीराम कोतवालमध्ये आढळणारे वर्णन 'बावन खणी आणि पाचपन्नास कसबिणी' हे याच काळातील.

फौजांच्या करमणुकीसाठी तमाशांची निर्मिती याच काळातील. महारमांग बायका शालू नेसून नाचू लागल्या व पैसे कमवू लागल्या.

स्त्रियांसाठी अर्थार्जनाचा आणखी एक व्यवसाय म्हणजे दासी किंवा बटीक बनणे. राजेरजवाडे, सरदार, कुणबिणी बाळगीत. दासी विकत घेत. आपण पुष्कळदा लहान मुलांची थट्टा करताना 'कोंडा देऊन विकत घेतले तुला' असे म्हणतो. पण त्या काळी गरिबांवर तीच परिस्थिती येई. हेडे व चारण या जमाती बटकींचा धंदा करीत. दुष्काळ पडला की हे लोक भाकर, कोंडा देऊन मुले-मुली विकत घेत. मुलींना लहानाचे मोठे करून विकीत. या दासीना धन्यापासून पळून जाण्याची परवानगी नसे. दोन वेळचे जेवण व चोळीखण एवढीच त्यांची कमाई. आजच्या मोलकरणीपेक्षा ह्या बटकींची स्थिती वाईट असे. या स्त्रिया बहुधा अतिशुद्ध जातीतून येत.

अशा तऱ्हेने सर्व बाजूनीच स्त्रीची कोंडी झालेली दिसते. स्त्रीला माणूस म्हणून जगणे शक्य नव्हते. शिक्षण नाही. अर्थार्जनाचे मार्ग उपलब्ध नाहीत. बालविवाहामुळे फुलण्याच्या आधीच जिच्या पाकळ्या खुडल्या जातात, अंधश्रद्धेमुळे जिची दृष्टी अधू झाली आहे, असे सर्वस्वी पुरुषप्रधान अंधारमय जीवन तिच्या वाट्याला येई. त्यातून काही कर्तृत्ववान स्त्रिया विजेसारख्या चमकून गेलेल्या आढळतात. पण त्यामुळे सबंध स्त्रीजीवन प्रकाशवर्षात न्हाऊन निघत होते असे म्हणता येत नाही. शिवकालाने महाराष्ट्राला अस्मिता दिली, स्वातंत्र्य दिले, पण समाजव्यवस्थेची घडी बदलली नाही. तो वैभवशाली काळ स्त्रीसाठी मात्र वनवासाचाच काळ होता.

उपसंहार

हे प्रचारासाठी केलेले लेखन नव्हे. तसेच विद्वत्तापूर्ण वैचारिक लेखनाचा प्रयत्नही नव्हे. आयुष्याकडे डोळसपणे पहायला शिकले की नजर सताड उघडी होते. निरीक्षणाची ताकद वाढते आणि घडणाऱ्या घटनांचा मागोवा आपोआपच अधिक चिकित्सकपणे घेतला जातो. तसाच काहीसा हा प्रयत्न. गेली दोन वर्षे स्त्री दास्याचे सत्य उमजू लागले होते. त्यातच 'मनोहर'च्या संपादकांचे पत्र आले, 'मी–तरुणी' सदर लिहिणार का? दर आठवड्याला ८०० शब्द. वर्षभराचा वायदा.' आधी जीव दडपून गेला. दर आठवड्याला नवेनवे सुचून लिहायचे. वर्षाला ५२ लेख. अभ्यासू पद्धतीने नव्हे. चुरचुरीत, खुसखुशीत. स्त्रीप्रश्नाचे ५२ पैलू शोधायचे. दर आठवड्याची बांधीलकी. या दडपणाखाली लिहिणे जमेल का? हो, म्हटले. त्यानिमित्ताने बसून समोरच्या मूर्त जीवनाचा अधिक विचार केला जाईल, स्त्री–दास्याची जाण अधिक सखोल होईल असा स्वतःला दिलासा दिला. आश्चर्य म्हणजे विषय सुचत गेले. घटनांची नोंद अधिक काळजीपूर्वक झाली. प्रश्न माझ्या भोवतीच्या जीवनात उभे होतेच. त्यांना स्त्री-मुक्तीची धार आलेली नव्हती. तेच प्रश्न स्त्री-मुक्तीच्या शास्त्रीय प्रकाश झोतात तपशिलाने पाहू लागले.

येथे प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न फिजूल होता. मनोहरच्या प्रकृतीला ते मानवले नसते. सामान्य तरुण-तरुणीने वाचले नसते. एकीकडे शिक्षण, समानसंधी या

वरवरच्या देखाव्याने स्त्रीदास्याची समस्या संपत आली आहे, निदान तीव्रता खूप कमी झाली आहे असा आभास. दुसरीकडे धर्माची, कल्पना प्रणालीची (ideology) रूढींची घट्ट पकड अशा स्थितीत मध्यमवर्गांयांमध्ये स्त्री-मुक्तीची कल्पना रुजविणे अधिकाधिक कठिण होऊन बसले आहे. काही वाचकांच्या प्रतिक्रियांनी वेळोवेळी मला हे तीव्रतेने जाणवे. उदा. 'प्रत्येक तरुणीने स्वावलंबी झाले पाहिजे, आर्थिक स्वातंत्र्य मिळवले पाहिजे.' याला वाचकांचे व्यावहारिक उत्तर काय? 'मी पुरेसा पैसा मिळवतो. मग माझ्या बायकोने नोकरी करायची काय गरज? तिने हौशी नाटकातून कामे करावीत. [कारण व्यावसायिक नाटकांसाठी तिला फार वेळ बाहेर जावे लागेल व कुटुंबातील शांतीचा तोल ढळेल.] घरात मुलाबाळांचे सुख बघावे.' [किती छान श्रमविभागणी!] स्त्रीची भूमिका काय? या संबंधीच्या मूलभूत कल्पनांनाच धक्के द्यायला बाहेर पडलेली मी. पण अशा प्रकारच्या झापडे लावलेल्या वाचकांपुढे 'तुम्ही शहाणे!' असे म्हणायची पाळी यायची.

अशा स्थितीत केलेले हे स्फुट लेखन. सर्व लेख योजनाबद्ध, एका क्रमाने आखलेले नव्हे; काही तात्कालिक, काही वैयक्तिक कहाणीच्या स्वरूपाचे, काही नेहमीच्या भ्रामक समजुतींचा समाचार घेणारे अशा विविध रूपात आलेले हे लेख. या सर्व लेखांचा एकत्रित संग्रह आजच्या तरुणीला उपयोगी होऊ शकेल असे वाटल्यावरून हा संकलनाचा प्रयत्न. मनोहरच्या संपादकांनी या संकलनाला परवानगी दिली याबद्दल त्यांचे हार्दिक आभार. 'अभिनव प्रकाशन'च्या श्री. वामनराव भटांनी या पुस्तकाच्या (खपाऊ नसलेल्या) प्रकाशनाची जबाबदारी घेतल्याबद्दल त्यांचे ऋण.

संग्रह प्रकाशित करण्याचे ठरल्यावर प्रस्तावनेसाठी आपोआप डोळ्यासमोर नाव आले कृष्णाबाई मोटे यांचे. त्या माझ्यापेक्षा खूपच वडील. या वयात नवे समजून घेण्याची उत्सुकता व मोकळेपणा जपून ठेवलेल्या ज्या थोड्या व्यक्ती सापडतात त्यात कृष्णाबाईंचा समावेश आदरपूर्वक करावासा वाटतो. कृष्णाबाईंनी आनंदाने संमती दिली व सांगोपांग वाचन करून दीर्घ प्रस्तावना लिहून दिली. त्यांनी त्यांची पिढी व आताची कॉलेज युवती यांची तुलना करत त्यांच्या पिढीच्या 'मूड' संबंधी, मनोवृत्ती संबंधी मोलाची माहिती पुरविली. माझे लक्ष मुख्यतः आजच्या तरुणीवर केंद्रित झाले होते. तिचा पूर्वेतिहास द्यावासा वाटला तो केवळ आजच्या 'निर्बुद्ध' वाटणाऱ्या स्त्रीच्या अस्तित्वाची मुळे शोधण्याच्या हेतूने. पण त्यामुळे स्त्री-सुधारकांच्या प्रयत्नांची, शिकलेल्या पहिल्या पिढीतील स्त्रियांच्या मनोधैर्याची नोंद घेतली गेली नाही. कृष्णाबाईनी मार्मिक प्रश्न विचारला आहे. 'आजच्या तरुण स्त्रीच्या मनात छाया दातार म्हणतात तसा असंतोष खरोखरच पेटतो आहे का, की ती गुलामीतच धन्यता मानते?' शहरात राहाणाऱ्या आणि मध्यमवर्गात वावरणाऱ्या आपल्या सगळ्यांच्याच मनात हा प्रश्न उमटणे रास्त आहे. सर्वसामान्य

चित्र हे असंतोषाचे नाही हे मलाही कबूल. पण आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी गेले, चर्चा केल्या आणि माझ्या लक्षात आले, संक्रमणाला सुरुवात झाली आहे. असंतोष सुप्त आहे. त्याला वाट करून द्यायला हवी. बाह्य परिस्थिती अनुकूल नाही. औद्योगीकरणाचे वारे जोरदार वहात नाहीत. संस्काराचे ओझे जात नाही. बाजारू संस्कृतीचा, चित्रपटांचा प्रभाव वाढत जातो. आणि तरुण मुलींच्या मनाची कवाडे घट्ट बंदच रहातात. हीच कवाडे उघडायला हवी आहेत.

भोवताली असंख्य शिकलेल्या मुली निमूटपणे बोहोल्यावर चढताना बघूनही शिक्षणामुळे स्त्रिया मनाने स्वतंत्र होतील असा आशावाद बाळगणारे अजूनही सापडतात, तेव्हा आश्चर्य वाटते. आजचे शिक्षण नपुंसक आहे. ते ज्ञानाच्या माहितीच्या गोळ्या पुरवीत कप्पे बंद मने तयार करते. पण वर्षानुवर्षाच्या चिरेबंद संस्कारांना सुरुंग लावू शकत नाही. ते नवीन तर्कशास्त्र शिकवीत नाही. मूलभूत संकल्पना, प्रमेये यांना आवाहन देत नाही. शालीनता, सहनशीलता, वात्सल्य, मुलांवर संस्कार, शांततापियता हे स्त्रीसुलभ गुण आहेत असे खुशाल मुलींच्या मनांना पढवत राहाते. याला आवाहन देणारे शिक्षण प्रस्थापिताला परवडणारे नाही. राजकारण, अर्थकारण, समाजकारण हे एकमेकांचे हात गुंफून उभे असतात. समाजकारणामध्ये सुधारक वल्गना केल्या, किंवा नारे दिले म्हणून वास्तव बदलू शकत नाही. त्यासाठी राजकारण, अर्थकारणाचेही घोडे पुढे दौडावे लागतात. हेच पुष्कळशा विचारवंतांनाही समजू शकत नाही आणि मग 'आजची तरुणी इतकी मुर्दाड, हलकी फुलकी अस्मिता हरवलेली का?' या प्रश्नाच्या दगडावर डोके आपटून रक्तंबबाळ होऊन व्यथित होणे एवढेच फक्त हाती उरते.

कृष्णाबाईंनी जगातील समाजवादी देशांतील व्यक्तिस्वातंत्र्याबद्दल शंका व्यक्त केली आहे आणि 'समाजवादी अर्थव्यवस्थेत' मला अभिप्रेत असलेले 'स्त्रीचे व्यक्तिमत्व बहरून ते एक स्वयंभू अस्तित्व म्हणून डौलात उभे राहील, ही दातारांची कल्पना भ्रामक आहे असे वाटू लागते' असे सूचित केले आहे. मनोहरच्या लेखमालेचा उद्देश फार मर्यादित होता. एक नवी शास्त्रीय विचारसरणी पटवून देऊन त्या विचारसरणीमध्ये स्त्रीच्या स्थानाचा केलेला विचार लोकांपर्यंत पोचविणे आवश्यक आहे. पण ते तेथे योजिले नव्हते. तरी पण कृष्णाबाईंच्या मताशी सहमत होणारे अनेक लोक आज आहेत. त्यांच्यासाठी थोडेसे स्पष्टीकरण आवश्यक आहे.

एखाद्या विचारसरणीतील तर्कशुद्ध आदर्श वास्तवात येतांना एका रात्रीत ते पूर्ण रूपाने अवतरतील असे मानणे चूक आहे. नवी समाजनिर्मिती, नवा मानव, नवी स्त्री ही एक लांब पल्ल्याची प्रक्रिया आहे. जुने संस्कार, स्वभाववैशिष्ट्ये एकदम पुसून जाऊ शकत नाहीत. नवा मानव नक्की कसा तयार होईल याचा ब्ल्यू प्रिंट शोधण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवहारांचा अभ्यास करून

त्यांचे परस्परसंबंध लक्षात घेऊन समाजपरिवर्तनाची काही मार्गदर्शक तत्वे मात्र जरूर सापडतात. या तत्वानुसार समाजवादी अर्थव्यवस्था मानवांचे परस्पर संबंध व त्यानुसार त्याची स्वभाववैशिष्ट्ये बदलण्यासाठी भौतिक पाया तयार करते. थोडक्यात, हे मूलभूत तत्व असे सांगता येईल. सर्व मानवांचे हितसंबंध विरोधी न रहाता जर सुसंगत राहिले तर एकाने दुसऱ्याचे शोषण करण्याची गरज उरणार नाही व सर्वांमध्ये अधिक सहकार्य व समानतेची भावना निर्माण होऊ शकेल. स्त्री व पुरुष यांच्यातील आज आढळणारा वैरभाव व असमानता ही या नव्या समाजात नष्ट होण्याची शक्यता निर्माण होईल. कारण शोषण, पिळवणूक ही त्या समाजाची गरज नसेल. स्त्रियांच्या मुक्ततेसाठी तेथे जाणीवपूर्वक प्रयत्न सर्व पातळ्यांवर होतील.

समाजवादी म्हणवणाऱ्या देशांमध्ये हे प्रयत्न पूर्णपणे यशस्वी झालेले नाहीत. याला अनेक कारणे आहेत. त्यांचा अभ्यास केला पाहिजे. काही कारणे अपरिहार्य आहेत. काही टाळता येण्याजोगी आहेत. अगदी मागासलेल्या देशात जेव्हा क्रांती होते तेव्हा त्या क्रांतीला व तेथील समाजवादाच्या प्रयोगाला काही मर्यादा राहातात आणि तरी सुद्धा स्त्री-मुक्तीच्या अनेक पैलूंपैकी काही पैलूंबाबत तेथील स्त्री नक्की अधिक स्वतंत्र्य आढळते. स्त्रीला नोकरी देणे व आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देणे हे चीनसारखा मागासलेला देशही आपले मूलभूत कर्तव्य मानतो. भारतामध्ये स्त्रीच्या बेकारीची गणतीसुद्धा केली जात नाही. कारण गृहिणी म्हणूनच तिचे स्थान गणले आहे. एका वाचकाच्या पत्रात प्रश्न होता, 'रशियन स्त्री सुखी आहे का?' सुखाच्या कक्षा रुंदावत जात असतात. आर्थिक स्वातंत्र्यच म्हणजे सुख असे समीकरण चुकीचे आहे. पण सुखामध्ये आर्थिक स्वातंत्र्याचा समावेश आहे. शेवटी स्त्रीच्या मुक्तीची बैठक भौतिक संपन्नतेवरच खूप मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. आवडीचे शिक्षण, व्यवसाय, पाळणाघरे, स्वस्त जेवण, डबाबंद अन्न या सर्व सुखसोयी मिळाल्या तरच आज परंपरागत जबाबदाऱ्या कमी होऊ शकतात. आज काही समाजवादी देशात तेथील गरजेप्रमाणे स्त्रियांना 'अधिक संतती निर्माण करा' किंवा 'संतती नियमनासाठी विवाह उशिरा करा' असे सल्ले देऊन स्त्रियांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न होतो. त्याबद्दल अनेक जण खेद व्यक्त करतात. राष्ट्रनिष्ठा ह्या भावनेला आवाहन करणे मार्क्सवादी चूक मानतात. पण बूर्झ्वा विचारवंतांना हे बोचायचे कारण काय? चीन व व्हिएतनाम संबंधी जे दोन लेख आहेत ते स्त्री-मुक्तीच्या संदर्भात तेथे जे जाणीवपूर्वक प्रयत्न झाले ते मला महत्त्वाचे वाटले म्हणून ते प्रयत्न समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्या उल्लेखांमुळे तेथील समाजव्यवस्था मी अचिकित्सक (uncritically) दृष्टीने स्वीकारते असा ग्रह करून घेणे योग्य होणार नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक लेखाच्या शेवटी तात्पर्य काढण्याचा अट्टहास ठेवून समाजवादाचा प्रचार करण्याची गरज मला वाटली नाही. एखाद्या

प्रसंगी वास्तवातील अंतर्विरोध उलगडून दाखविताना हा अंतर्विरोध कधी नष्ट होऊ शकेल हे अपरिहार्यपणे सांगितले जाते. तेथे प्रचारकी शिक्का बसेल या भीतीने हात राखून ठेवण्याचे मात्र मला जमलेले नाही.

मी स्वतः केवळ ललित लेखनाकडून किंचित वैचारिक लेखनाकडे वळले त्याला माझे 'गृहिणीचे वैफल्य' कारणीभूत झाले आहे हे आवर्जून सांगावेसे वाटते. प्रामुख्याने करिअरची महत्त्वाकांक्षा बाळगणारी, हुशार अशी विद्यार्थिनी मी नव्हते. काहीतरी करावे इतपत धुगधुगी होती. पण माझ्या नकळतच मी प्रेम, विरह, विवाह, नेटकेपणाचा संसार अशा चाकोरीत काहीशी स्वखुशीनेच सामील झाले. १९६४ साली मी जेव्हा बी. ए. झाले त्यावेळी सर्वसाधारण मूड असा होता. बदल्या, नवी गावे, नवऱ्याच्या नव्या नोकऱ्या, त्यातून येणारी अस्थिरता, हुरहूर, मुले यात एक आवर्तन उलटून गेले आणि पुन्हा ती धुगधुगी कुटेतरी ठुसठुसत असल्याचे जाणवले. शालीन, प्रेमळ, चतुर, नेटका संसार करणारी गृहिणी एवढीच आपली भूमिका? हा आपला कल्लोळ आणि भोवतालच्या जगात चाललेले बदल, तरुणांमधील वाढता असंतोष, श्रीमंत व गरीब यांच्यातील वाढत जाणारी खोल दरी व तिचा सामाजिक परिणाम, या सर्वांचा संगम होऊन एक बंडखोरपणा उफाळून आला. जग बदलायला निघायचे तर प्रथम स्वतःच्या 'स्त्री' म्हणून स्वीकारलेल्या भूमिकेत बदल करणे आवश्यक आहे हे लक्षात आले. टिपीकल उच्चमध्यमवर्गीय कुटुंबाचा सुखी कोश उसवायला हवा होता. पार्ट्या, हळदकुंकू, डोहाळ जेवणे, केळवणे, वाढदिवस, पिकनिक्स, पाककला कौशल्य, पाहुण्यांची सरबराई या सर्वांनाच तिलांजली द्यायला पाहिजे होती. तरच मला नव्या कामांसाठी वेळ मिळणे शक्य होते. नवी भूमिका शोधता येणार होती. अंतःस्थ शक्तीचा परिचय होऊ शकणार होता. एवढेच नव्हे तर घरच्या सगळ्यानाच या नव्या जीवनाची सवय करणे भाग होते. कधी वादविवादाने कधी भांडून, कधी हट्टाने हे नवे जीवन घडत होते. वैचारिक पातळीवर पटणाऱ्या गोष्टी प्रत्यक्ष व्यवहारात अंगवळणी पडतांना किती संघर्ष निर्माण होतात याचा अनुभव येत गेला. कॉलेजच्या मुलींबरोबर स्त्रीप्रश्नांची चर्चा करताना नेहमी हाच प्रश्न उभा रहातो. 'सगळं पटतं खरं, पण नवरा चिडला तर? संसार मोडला तर?' माझे अनुभव विचारले जातात. 'सासूबाई रागावतात का? नवरा परवानगी देतो का?' अजूनही 'परवानगी'च्या रिंगणातच प्रश्न घोटाळतात.

यातूनच चळवळीचे महत्त्व पटतंय. एकटी-दुकटीने चालायचे बळ सामान्य मुलींच्यात येणं कठिण आहे. संघटित फळी आणि आर्थिक मागण्या घेऊन राजकीय सांस्कृतिक क्रांती हीच स्त्री-मुक्ती प्रयत्नांची दिशा आहे, याचे भान आले आहे. या लेखांतून मध्यमवर्गीय तरुणींशी संवाद साधणे एवढंच मर्यादित उद्दिष्ट आहे.